
पंजाबातील
विज्ञान प्रसाराचे जनक



रुचिराम साहनींच्या डायरीतून..

संपादक:
नरेंद्र के. सेहगल
सुबोध महंती

अनुवाद:
सुधा गोवारीकर



पंजाबातल्या विज्ञान-प्रसाराचे जनक

रुचिराम साहनींच्या डायरीतून

(The memoirs of Ruchi Ram Sahni या मूळ इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद)

संपादक
नरेंद्र सहगल,
सुबोध महंती

अनुवाद
सुधा गोवारीकर



विग्यान प्रसार

उपोद्घात

एखादी घटना घडण्याची वेळ यावी लागते, हेच खरे. टंकलिखित कागदांचे ३२ ताव माझ्या हातात देताना नंदन कुधियाडी म्हणाला होता, "हे वाचा. तुम्हाला फार आवडेल." बिरबल साहनींच्या वडिलांनी लिहिलेले ते आत्मचरित्रात्मक लिखाण होते. भारतात पुरावनस्पतिशास्त्राची स्थापना करण्याचा मान प्रा. बिरबल साहनींकडे जातो. पुढच्या वर्षी त्यांची जन्मशताब्दी होती. त्यानिमित्त विज्ञान व तंत्रज्ञान प्रसार राष्ट्रीय मंडळातर्फे (एन्.सी.एस्.टी.सी.) बिरबल साहनींचे जीवन व कार्य यावर लघुचित्रपट काढण्याच्या विचारात आम्ही होतो. नंदन हा चित्रपट-निर्माता आहे व त्याने त्यासंबंधी पूर्वसंशोधन सुरू केले होते. ज्या वेळी त्याने ते कागद मला दिले त्या वेळी तो मुंबईला जायला निघाला होता. त्या गडबडीत त्या कागदांसंबंधी आमचे काहीच बोलणे झाले नाही.

त्या बाडावर 'पंजाब विज्ञान संस्था' असे शीर्षक होते. ते बघून मी बाकीची पाने नुसती चाळली. 'घर ते ऑफिस या प्रवासात वाचू केव्हातरी', असा विचार करून मी ते कागद माझ्या दप्तरात ठेवून दिले. ज्यांच्याविषयी आजवर कुणी काही लिहिले नव्हते, अशा त्या थोर माणसाची - प्रा. रुचिराम साहनी यांची - नव्याने ओळख करून देणारी ती बहुमूल्य पाने होती, याची मला जराही कल्पना नव्हती.

पुढे कित्येक दिवसांनी ऑफिसला जाताना मी ते कागद वाचायला

घेतले. एकदा सुरुवात केल्यावर मी त्यांत इतका गुंगून गेलो, की ते संपूर्ण वाचल्यावरच खाली ठेवले. इ.स. १८८५ पासून प्रा. रुचिराम साहनींनी विज्ञान-प्रसारासाठी केलेल्या प्रयत्नांची ती कहाणी होती - तीदेखील त्यांच्या स्वतःच्या शब्दांत. मी लगेच नंदनला फोन लावला. तो त्या वेळी मुंबईत होता. त्याने दिलेल्या कागदांचे मला किती महत्त्व वाटले हे सांगून, रुचिरामांचे बाकीचे आत्मचरित्र मिळवून देण्याची त्याला विनंती केली.

दरम्यान वाचलेल्या मजकुरावर आधारित रुचिराम साहनींबद्दल मी दोन लेख लिहिले. विज्ञान व तंत्रज्ञानप्रसारार्थ राष्ट्रीय मंडळाचे (एन्.सी.एस्.टी.सी.) एक मासिक निघते, त्यात ते लेख प्रसिद्ध केले. पहिल्यात रुचिराम साहनींनी पंजाबी भाषेतून विज्ञान-प्रसार कसा केला, याविषयी माहिती होती. दुसऱ्या लेखात पंजाब विज्ञान संस्थेच्या कार्यशाळेविषयी लिहिले. त्या कार्यशाळेत सुरवातीला साधी साधी शास्त्रीय यंत्रे आणि प्रयोगशाळेत लागणारी उपकरणे दुरुस्त करणे व बनविणे ही कामे चालत. त्या दोन लेखांना चांगला प्रतिसाद मिळाला. त्यांचे पंजाबीत भाषांतर करण्यात आले; त्यामुळे ते लेख अनेकांपर्यंत पोहोचले. तसेच चंडीगढहून प्रसिद्ध होणाऱ्या 'जनसत्ता' या हिंदी मासिकांच्या रविवारच्या पुरवणीत ते छापले गेले.

काही थोर व्यक्ती दीर्घकाळ अंधारातच राहतात; आणि त्यांचा शोध लागल्यावरही त्यांचे नाव आणि कीर्ती दूरवर पोहोचत नाही. ज्यांचे चरित्र देशातल्या सर्व प्रदेशांत वाचले जायला पाहिजे, ज्यांच्या जीवनकार्याविषयी खूपसे लिहिले गेले पाहिजे, अशा गुणवत्तेचे प्रा. रुचिराम साहनी हे गृहस्थ होते. ज्या काळात इंग्रज आपल्यावर राज्य करीत होते, तो काळ भारतीय व्यक्तींच्या विकासाकरता अजिबात अनुकूल नव्हता. या पार्श्वभूमीवर रुचिरामांनी तन-मन-धन अर्पून जे अपार परिश्रम केले, त्याला तोड नाही. आपले विज्ञान-शिक्षक, विज्ञान-प्रसारक आणि स्वावलंबनाचे पुरस्कर्ते यांच्या अनेक पिढ्यांना रुचिरामांचे कार्य प्रेरणा देत राहील. असे असूनही ते भारतियांना अज्ञात राहिले. अगदी अलीकडे म्हणजे १९९० मध्ये

केवळ योगायोगाने ते उजेडात आले. त्यानंतर मात्र त्यांच्याविषयी मासिके, वर्तमानपत्रे यांतून बरेच लिहिले गेले. पंजाबमध्ये त्यांच्या नावाने एक विश्वस्त मंडळ (ट्रस्ट) स्थापले गेले. त्या मंडळातर्फे विज्ञान-प्रसाराकरता दोन पुरस्कारही ठेवले गेले. हे पुस्तक इंग्रजीतून तयार होत असताना त्यातला एक पुरस्कार दिलाही गेला.

रुचिराम साहनींनी लिहून ठेवलेल्या वृत्तांतावरून काही घटना, त्यांचे जीवन व विज्ञानकार्य स्पष्ट झाले. ते अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याच्या हेतूने हे पुस्तक तयार होत आहे. रुचिरामांचे व्यक्तित्व, गुणविशेष, जीवनदृष्टी, जीवनाविषयी त्यांचे चिंतन, त्याचप्रमाणे त्यांचे विचार आणि कार्य यांचा असलेला सुसंगत मेळ यासंबंधी चांगली कल्पना यावी, असेच त्यांचे आत्मवृत्त आहे.

एवढेच नव्हे, तर रुचिरामांचा कुणाकुणाशी संबंध आला होता त्याची सविस्तर माहितीही त्यावरून आपल्याला कळते. या आत्मवृत्तात रुचिरामांविषयी अधिक सखोल संशोधन करण्याकरता पूरक असे धागेदोरे मिळतात.

जास्तीत जास्त लोकांना रुचिराम साहनींचा परिचय व्हावा हा या पुस्तकाचा मुख्य हेतू आहेच; पण हे पुस्तक वाचून रुचिरामांचा अधिक शोध घ्यायला आणि अशा इतर व्यक्तींचा शोध घेण्यास वाचक उद्युक्त व्हावेत, असाही आमचा या पुस्तकामागे एक उद्देश आहे. म्हणजे काय करायचे? तर :

* रुचिरामांच्या आत्मवृत्तात त्यांनी कोणकोणत्या ठिकाणी काम केले, वास्तव्य केले, ह्याचे उल्लेख आहेत. त्या देशी किंवा परदेशी ठिकाणांहून रुचिरामांविषयी आणखी काही माहिती मिळवण्याचा प्रयत्न करणे.

** स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातल्या काना-कोपऱ्यात ज्या व्यक्तींनी विज्ञानावर काही काम केले होते व रुचिरामांप्रमाणे त्यांचे कार्य अंधारातच पडून राहिले होते, अशा थोर व्यक्तींचा शोध घेण्यास मदत करणे. तसेच या पुस्तकात समाविष्ट नसलेले असे रुचिरामांचे विज्ञानकार्य अधिक स्पष्ट

होईल अशा घटना, खुणांची माहिती कुणा वाचकाला असेल, तर ती माहिती आम्हाला पुरवावी. आम्ही त्यांचे कृतज्ञ राहू.

नरेंद्र सहगल

♦♦♦

कृतज्ञता

रुचिराम साहनींवरचे हे पुस्तक तयार करणे हा एक सुखद अनुभव होता आणि त्या पुस्तकाला मिळालेल्या भरघोस यशाने ते सुख द्विगुणित झाले. त्याकरता कुणाचे आभार मानायचे, तर नंदन कुधियाडीचे. हे मुंबईचे तरुण चित्रपट-निर्माते आहेत. त्यांनी रुचिरामांची टंकलिखित आत्मचरित्रातील महत्त्वाची पाने शोधून काढली व आमच्या निदर्शनास आणून दिली. पंजाब राज्याच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंडळाने (कौन्सिल ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी) त्यांच्या संपूर्ण आत्मचरित्राची झेरॉक्स प्रत मिळवून देण्यात आम्हाला साहाय्य केले; त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. रुचिराम साहनींच्या आप्तेष्टांनी - विशेषतः प्रा. अशोक साहनी आणि प्रा. के. सी. साहनी यांनी - ह्या पुस्तकातील रुचिरामांचा 'जीवन-परिचय' हे प्रकरण तयार करण्यात सहकार्य व साहाय्य केले; त्याबद्दल त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

'रुचिराम साहनींच्या विज्ञानविषयक कार्याविषयी किंवा तशा प्रकारचे काम केलेल्या स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर व्यक्तींविषयी ज्यांना काही माहिती असेल, त्यांनी आम्हाला लिहावे', असे आवाहन आम्ही देशभरातील अनेक प्रमुख वर्तमानपत्रांतून केले होते. त्याला ज्यांनी उत्तर पाठविले, त्या सर्वांना धन्यवाद.

विज्ञान व तंत्रज्ञान प्रसार राष्ट्रीय मंडळाच्या नियतकालिकात रुचिराम साहनींविषयी दोन लेख आम्ही प्रसिद्ध केले होते. त्यांचे पंजाबीत भाषांतर करून, पंजाबात अनेकांना रुचिरामांचा परिचय करून दिला याबद्दल चंडीगढच्या श्री. मनमोहन शर्मा यांचे आम्ही ऋणी आहोत. श्री. शर्मा एवढेच करून थांबले नाहीत; तर रुचिरामांचे काम, त्यांची तत्त्वे ही देशभर आणि विशेषतः पंजाबमध्ये प्रसृत व्हावीत या हेतूने रुचिराम साहनी स्मृत्यर्थ विश्वस्त मंडळाची स्थापना केली.

- संपादक

संपादकांचे टांचण

रुचिरामांनी लिहिलेली व स्वतः दुरुस्त्या केलेली अशी त्यांच्या आत्मवृत्ताची टंकलिखित प्रत आमच्या हाती आली. ती काळजीपूर्वक वाचताना त्यातील काही पाने गहाळ झाल्याचे व काही मजकूर पुसला गेल्याचे आमच्या लक्षात आले. ज्या घटनांविषयी अत्यल्प माहिती होती, तेवढीही हरवलेल्या पानांतून नाहीशी झाली. त्या हरवलेल्या मजकुराच्या शोधात आम्ही पुष्कळ वेळ घालवला; पण त्याचा काही उपयोग झाला नाही. शेवटी जेवढा मजकूर आमच्या हाती होता, त्याच्या आधारावरच आम्हाला भागवून घ्यावे लागले.

मिळालेल्या माहितीची रचना शक्य तितकी एकसंध आणि ओघवती करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. त्याकरता आम्हाला अनेक उपाय योजावे लागले.

ज्या मजकुराचा त्यांच्या विज्ञानकार्याशी संबंध नव्हता, असा मजकूर संपूर्ण गाळावा लागला किंवा काही ठिकाणी तो थोडक्यात बसवावा लागला. निरनिराळ्या ठिकाणी शीर्षके व उपशीर्षके द्यावी लागली. काही ठिकाणी नवेच मथळे द्यावे लागले. हे सर्व करताना मुळातला मजकूर जसाच्या तसा मांडण्याचा आम्ही कसून प्रयत्न केला. तसेच रुचिरामांची मुळातली भाषा व शैली यांतून प्रतीत होणारे त्यांच्या व्यक्तित्त्व, यांना

जराही धक्का लागू नये याची आम्ही जाणीवपूर्व काळजी घेतली. पुस्तक वाचताना हे सर्व जमले आहे, असे आम्हाला वाटते.

या पुस्तकात आलेली छायाचित्रे व इतर चित्रे ही मुळातल्या पानांत नव्हती. रुचिरामांच्या नातेवाईकांकडून आम्ही छायाचित्रे मिळवली आणि त्यांच्या लिखाणातील काही विशेष प्रसंगांचे वर्णन वाचून श्री. अविनाश पांड्ये यांनी आपल्या कल्पनेतून चित्रे काढली. वाचता-वाचता मध्येच थांबून, ज्या काळात रुचिराम वावरत होते, त्या काळातल्या परिस्थितीची दृश्य कल्पना वाचकांना यावी, या हेतूने ही चित्रे पुस्तकात घातली आहेत.

त्यांच्या आत्मचरित्रात अनेक व्यक्तींचे उल्लेख आहेत. त्यांतील निवडक व्यक्तींची श्री. पांड्ये यांनी काढलेली रेखाचित्रे आम्ही पुस्तकात समाविष्ट केली आहेत. त्या त्या व्यक्तीची उपलब्ध छायाचित्रे व रुचिरामांनी केलेल्या वर्णनांच्या आधारेच ही चित्रे रेखाटली आहेत.

♦♦♦

रुचिराम साहनींचा जीवन-परिचय

प्राध्यापक रुचिराम साहनींच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू होते. ते शास्त्रज्ञ होते, नव्या कल्पनांचे जनक होते, उत्साही शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांच्या अंगी देशाभिमान होता आणि ते निष्ठावान सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांच्याजवळ स्वतंत्र विचार आणि प्रगमनशील कल्पना होत्या. त्यांच्या कार्य-जीवनाची सुरुवात एका सरकारी नोकरीपासून झाली. इ.स.१८८५ साली इंडिया सरकारच्या हवामानखात्यात सेकंड असिस्टंट रिपोर्टर म्हणून रुचिराम रुजू झाले. इंडिया हवामानखात्याच्या संस्थापकांपैकी

**भारतात आधुनिक विज्ञान-परंपरेचा पाया घालणाऱ्यांपैकी एक प्रमुख व्यक्ती असूनही, रुचिराम साहनींचे संशोधनकार्य, विशेषतः त्यांचे विज्ञानप्रसाराचे कार्य अंधारातच राहिले. त्यांचे सुपुत्र, प्रा.बिरबल साहनी हे विख्यात पुरावनस्पतिशास्त्रज्ञ होते. त्यांच्या संदर्भातच केवळ रुचिराम साहनींचा उल्लेख येई, अशी परिस्थिती होती. या थोर शास्त्रज्ञाचा नव्याने शोध लावण्याचे श्रेय 'विज्ञान व तंत्रज्ञान प्रसार राष्ट्रीय मंडळ'(एन्.सी.एस्.टी.सी.) यांच्याकडेच जाणे योग्य आहे. रुचिरामांचे टंकलिखित आत्मचरित्र हातात पडल्यावर मंडळाने रुचिरामांविषयी संशोधन सुरू केले. अलीकडेच डॉ. नरेन्द्र सहगल यांनी रुचिरामांच्या विज्ञान-प्रसार कार्याची माहिती देणारे दोन लेख मंडळाच्या मासिकातून प्रसिद्ध केले आहेत. (एन्.सी.एस्.टी.सी. कम्युनिकेशन्स् : १९९१ नोव्हेंबर, १९९२ जानेवारी).*

एक सर एच्.एफ्.ब्लॅनफोर्ड यांच्या देखरेखीखाली रुचिरामांनी काम केले. १८८७ साली रुचिराम साहनी लाहोरच्या गव्हर्नमेंट कॉलेजमध्ये रसायनशास्त्रज्ञ व भौतिकीचे असिस्टंट प्रोफेसर म्हणून लागले. निवृत्त होईपर्यंत म्हणजे एप्रिल १९१८ पर्यंत ते तिथेच काम करीत राहिले.

आधुनिक भारताच्या इतिहासात १९ व्या शतकाची शेवटची २५ वर्षे अनेक दृष्टींनी महत्त्वाची ठरतात. भारतामध्ये सर्व क्षेत्रांत बौद्धिक धुमारे फुटण्यास सुरुवात झाली होती. तसे पाहिल्यास ज्या सुमारास इंग्रजी साम्राज्याने उच्चांक गाठला होता, त्याच वेळी भारतीय मनात राजकीय जाणीव आणि राष्ट्रीयता जोम धरू लागली होती. अशा महत्त्वाच्या काळातच रुचिरामांनी आपल्या विज्ञानकार्याचा प्रारंभ केला.

त्या वेळी भारतातील विज्ञान बाल्यावस्थेत होते, हे आपल्याला माहीतच आहे. तरी विज्ञानाबद्दलची जाणीव आपल्या संस्कृतीत शिरू पाहत होती. आधुनिक विज्ञानक्षेत्रात भारतियांचा फारसा सहभाग नव्हता. भारतात विज्ञान-परंपरेचा पाया घालणाऱ्यांपैकी एक म्हणून रुचिरामांचे नाव घ्यावे लागेल. जगदीशचंद्र बोस (१८५८ ते १९३७) हे कलकत्त्याच्या प्रेसिडेंसी कॉलेजमध्ये १८८५ साली काम करू लागले. पी.सी.रे (१८६१ ते १९४४) १८८८ मध्ये एडिंबरोहून हिंदुस्थानात परतले आणि इ.स. १८८९पासून प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये हंगामी असिस्टंट प्रोफेसर म्हणून काम पाहू लागले. शास्त्रीय संशोधनाला आकार देण्याचा देशी प्रयत्न म्हणून महेन्द्र लाल सरकार यांनी इ.स.१८८७ साली 'द इंडियन असोसिएशन फॉर कल्टिव्हेशन ऑफ सायन्स' संस्थेची स्थापना केली. १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत त्या संस्थेचे काम मर्यादित होते. तेथे मुख्यतः रसायनशास्त्र आणि पदार्थविज्ञान या विषयांवर व्याख्याने आयोजित केली जात. इ.स. १९०७ मध्ये सी.व्ही.रामन संस्थेचे सभासद झाले. आशुतोष मुखर्जी (१८६४-१९२४) हे कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरू होते. भारतात आधुनिक विज्ञानकार्याला निश्चित स्वरूप देण्यात त्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली. ज्या वेळी रुचिराम

एम्.ए.चा अभ्यास करीत होते, तेव्हा आशुतोष मुखर्जीही प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये शिकत होते. इ.स. १९१४ मध्ये आशुतोष मुखर्जींच्या अध्यक्षतेखाली इंडियन सायन्स काँग्रेसचे पहिले अधिवेशन भरले. रुचिरामांनी विज्ञानकामाला सुरुवात केली, तेव्हा अशा कार्याकरता भारतातील परिस्थिती प्रतिकूल होती. एक तर शास्त्रीय संशोधन करता येईल अशी फारच थोडी ठिकाणे देशात होती, संशोधनाकरता आवश्यक सुविधा तर जवळ-जवळ नव्हत्याच; आणि ज्या थोड्या ठिकाणी संशोधन करणे शक्य होते, तेथे भारतियांना - म्हणजे नेटिव्हांना - प्रवेश मिळणे मुष्किल होते.

शिक्षणक्षेत्रातही दोन स्तर असत. पैकी 'इंडियन एज्युकेशनल सर्व्हिस' ही वरच्या स्तरावर होती आणि त्या स्तरात बहुतेक सर्व इंग्रज माणसेच काम करीत. पंजाब शिक्षण खात्यात रुचिराम काम करू लागले, तेव्हा या स्तरात सर्व हिंदुस्थानात केवळ तीन भारतियांचा समावेश होता. परिस्थिती इतकी प्रतिकूल असताना, रुचिरामांनी आधुनिक विज्ञानाची परंपरा भारतात निर्माण व्हावी याकरता प्रयत्न केले, हा त्यांचा विशेष होय. 'आण्विक न्यूक्लियस'वर काम करणारे रुचिराम हे पहिले भारतीय होते. अर्नेस्ट रदरफोर्ड (१८७१ ते १९३७) यांच्याबरोबर रुचिरामांनी काम केले. रदरफोर्डबरोबर काम करणारे निएल्स बोहर (१८८५ - १९६२) यांचेही मार्गदर्शन रुचिरामांना लाभले. रदरफोर्ड यांच्या प्रयोगशाळेत जाण्यापूर्वी रुचिराम जर्मनीत गेले होते. तेथे कासिमीर फजन यांच्याबरोबर रेडिओ ॲक्टिव्हिटीवर संशोधन काम करायचे रुचिरामांच्या मनात होते. पण ते काम जेमतेम सुरू होते, तोच पहिल्या महायुद्धाला तोंड फुटले व रुचिरामांना जर्मनी सोडावी लागली.

रुचिरामांचे अतिशय बहुमोल काम म्हणजे पंजाबातल्या लोकांत विज्ञानाबद्दल जाणीव निर्माण करणे हे होय. त्या वेळचा पंजाब आत्ताच्या पंजाबापेक्षा खूपच विस्तृत होता. आताचा पंजाब, हरियाना, हिमाचल प्रदेश, पाकिस्तानातील पंजाब प्रांत इतका प्रदेश त्या वेळच्या पंजाब प्रांतात

सामावलेला होता. विज्ञानप्रसाराचा अशा प्रकारचा प्रयत्न बंगालमध्ये चालू होता. पंजाबात मात्र शास्त्र लोकपातळीवर आणण्याचा प्रयत्न करणारे रुचिराम साहनी हेच पहिले होते. प्रा. कँपबेल ओमान यांच्या सहकार्याने रुचिरामांनी 'पंजाब विज्ञान संस्थे'ची स्थापना केली. या संस्थेच्या छत्राखाली विज्ञान-प्रसाराचे काम चाले. विज्ञानाच्या विविध बाजू स्पष्ट करणारी व्याख्याने ही संस्था आयोजित करीत असे. त्या व्याख्यानांना लोकांकडून उत्साहाने प्रतिसाद मिळे. लहान व दूरच्या ठिकाणी व्याख्यात्यांनी यावे याकरता थोडे शुल्क देण्याचीही लोकांची तयारी होती. सर्वसामान्य लोकांनी पैसे देऊन विज्ञानावरची मोपी व्याख्याने ऐकण्याचे हे भारतातील पहिलेच उदाहरण असावे.

शाळा व कॉलेजांत विज्ञान शिकविण्याच्या पद्धतीत सुधारणा करण्याकरता रुचिरामांनी खूप कष्ट घेतले. विज्ञान-शिक्षणात त्यांचा प्रयोगांवर भर होता. शाळा व कॉलेजच्या प्रयोगशाळांत लागणारी शास्त्रीय साधी उपकरणे दुरुस्त करण्याची सोय असल्याखेरीज शास्त्र शिकवणे शक्य होणार नाही, असे त्यांना वाटे. त्याकरता पंजाब विज्ञान संस्थेचाच एक विभाग म्हणून एक कार्यशाळा त्यांनी सुरू केली. तेथे शास्त्रीय साधी उपकरणे दुरुस्त केली जात आणि काही बनवलीही जात. ही कार्यशाळा त्यांनी स्वखर्चाने उभी केली. कार्यशाळेत मुलांना स्वयंपूर्ण होण्याइतके प्रशिक्षण दिले जात असे. देशातील औद्योगिक विकासाबद्दल त्यांना फार आस्था वाटे. लाहोरजवळ सल्फ्युरिक ॲसिड बनविण्याचा एक कारखाना त्यांनी पी.सी.रे यांच्या साहाय्याने सुरू केला. बरीच वर्षे तो भरभराटीत होता.

रुचिरामांनी स्वातंत्र्य-चळवळीत भाग घेतला होता. जालियनवाला बाग हत्याकांडानंतर इंडियन नॅशनल काँग्रेसने पंजाबमध्ये त्या प्रकरणाची चौकशी सुरू केली होती. त्या कालावधीत मोतीलाल नेहरू (१८६१ ते १९३१), सी.आर्.दास (१८७० ते १९२५), पंडित मदनमोहन मालवीय (१८६१ ते १९४६) या सर्वांबरोबर काम करण्याची संधी

रुचिरामांना मिळाली. रुचिरामांच्या कित्येक लोकप्रिय व्याख्यानांना महादेव गोविंद रानडे (१८४२ ते १९०१) अध्यक्ष म्हणून हजर राहिले होते. खिलाफत चळवळीच्या वेळी आपल्या मुस्लिम मित्रांकरता इंग्रज सरकारने बहाल केलेली उपाधी रुचिरामांनी परत केली होती. इंग्रजांच्या सत्तेविरुद्ध ते आयुष्यभर झगडले. सामाजिक सुधारणेच्या चळवळींचे, विशेषतः स्त्रियांच्या संदर्भातील चळवळींचे, रुचिराम पुरस्कर्ते होते.

रुचिरामांचे कुटुंब आणि बालपणातील शिक्षण -

रुचिरामांचा जन्म डेहरा इस्माइल खान ह्या सिंधू नदीच्या काठावरच्या एका बंदरगावी ५ एप्रिल १८६३ रोजी झाला. त्यांचे वडील करमचंद हे व्यापार करीत असत. त्यांची आई गुलाबदेवी पिंड ददान खान गावच्या होत्या. त्यांचे वडील तिथे पतपेढी चालवत असत. साहनी कुटुंब - किंबहुना साहनी जमात म्हणणे अधिक उचित ठरेल - मुळातले लढवय्ये होते. ते लोक सेनानी म्हणून ओळखले जात. आज रुचिरामांच्या आई व वडिलांची गावे पाकिस्तानात आहेत.

त्यांच्या प्राथमिक शिक्षणाची सुरुवात वयाच्या पाचव्या किंवा सहाव्या वर्षी झाली. त्या काळात विद्यार्थ्याला एक पाढा शिकवला की गुरुजींना चार आणे मिळत असत. नवव्या वर्षी रुचिराम सेठ कल्याणदासांच्या व्यवसायात मदत करू लागले. लवकरच ते वडिलांच्या व्यवसायालाही हातभार लावू लागले. घाऊक व्यापार आणि सावकारी असे वडिलांच्या व्यवसायाचे स्वरूप होते. अकराव्या वर्षापर्यंत वडिलांना मदत करून नंतर ते पुन्हा शाळेत जाऊ लागले. डेहरा इस्माइल खान या गावात चर्च मिशन ब्रँच स्कूल होते. रुचिराम त्या शाळेत शिकू लागले. त्या शाळेचे

** प्रा.मुल्कराज साहनी यांच्या 'लँडमार्कस् अँड स्ट्रँडीनेस्' या आत्मचरित्रातील वर्णनावर ही माहिती आधारली आहे. मुल्कराज हे रुचिरामांचे सुपुत्र होते. त्यांनी आपले कार्यजीवन 'जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया' या संस्थेत सुरू केले. त्यांच्यामुळेच पंजाब विद्यापीठात भूगोल विभाग सुरू झाला.*

मुख्याध्यापक उर्दू शिकवत असत. त्यांची बदली झाली त्याबरोबर रुचिरामांनीही शाळा बदलली. ते मेन चर्च स्कूलमध्ये जाऊ लागले. वरच्या सारख्याच एका कारणाने त्यांनी ती शाळाही सोडली. इ.स. १८७८ मध्ये धरमप्रकाश स्कूलमधून ते माध्यमिक शालांत परीक्षेत उत्तम रीतीने पास झाले.

जिल्ह्यात त्यांचा पहिला क्रमांक आला. त्या सुमारास त्यांचे वडील वारले. मृत्यूसमयी त्यांची सांपत्तिक स्थिती फार वाईट होती. ज्या गावात साहनी कुटुंबाला मानाचे स्थान होते, त्याच गावात हलाखीच्या परिस्थितीत राहणे अशक्य वाटले; म्हणून साहनी कुटुंबाने स्थलांतर केले व ते बेहरा गावी राहायला गेले.*

कुटुंबावर झालेल्या आघाताने रुचिराम खचले नाहीत. ते डेहरा इस्माईल खान सोडून आडिवाल येथे गेले. ते शहर आता पाकिस्तानात आहे. डेहरा इस्माईल खान ते आडिवाल हे अंतर जवळजवळ २०० कि.मी. इतके आहे. आपली पुस्तके पाठुंगळी घेऊन रुचिराम चालत-चालत त्या गावी गेले; पण त्या गावातही ते फार काळ राहिले नाहीत. कारण पूर्वीसारखेच. शाळेचे मुख्याध्यापक काशीनाथ चटर्जी यांची बदली झाली व त्यांच्या जागी नवे मुख्याध्यापक आले. ते रुचिरामांना योग्यतेचे वाटले नाहीत; म्हणून ती शाळा सोडून ते लाहोरला पोहोचले. तिथे त्यांनी कलकत्ता बोर्डाची परीक्षा दिली. त्यात ते सहाव्या किंवा सातव्या क्रमांकावर उत्तीर्ण झाले. त्यानंतर ते लाहोरच्या सरकारी महाविद्यालयात दाखल झाले. हे महाविद्यालय पंजाब विद्यापीठाशी संलग्न होते. कॉलेजचे प्राचार्य होते जी.एल्. लेटनर. इ.स. १८८१ मध्ये रुचिराम इंटरची (आजची तेरावी) परीक्षा दुसऱ्या क्रमांकाने, तर १८८४ मध्ये बी.ए.ची परीक्षा पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. बी.ए.चा अभ्यास करीत असताना रुचिराम अनेक वादविवादांत भाग घेत. अशा वेळी त्यांच्या विरोधात त्यांचे मित्र पंडित गुरुदत्त उभे राहत. पंडित गुरुदत्त अल्पायुषी ठरले; पण आपल्या तेवढ्या आयुष्यात ते आर्यसमाजाचे प्रमुख सभासद बनले होते. तसे पाहिले तर पंजाबातील आर्यसमाजाच्या चळवळीचे श्रेय बहुतांशी पंडित गुरुदत्तांकडेच जाते. काही काळ पंडित गुरुदत्त हे 'द आर्य इन्टेलिजन्स' या नियतकालिकाचे संपादकही होते. हे नियतकालिक लाला सालिगराम यांच्या मालकीचे होते. रुचिराम आणि पंडित गुरुदत्त यांच्यामधल्या वादाचे विषय विविध असत. उदा. 'अकबर विरुद्ध औरंगजेब', 'मनू कोण?', 'विद्युत् लहरी की हर्टझियन लहरी?'. रुचिरामांनी तत्त्वज्ञानाचाही अभ्यास केला. विल्यम हॅमिल्टन (१७८८ ते १८५६), जॉन स्टुअर्ट मिल (१७४२ ते १८३२) यांची पुस्तके त्यांनी वाचली. त्या कालावधीत ते आर्टस्कूलमध्येही जात असत. तिथे त्यांची रुडयार्ड किप्लिंगचे वडील लॉकवुड किप्लिंग यांच्याशी ओळख झाली.

** ही माहिती शक्तिगुप्ता यांनी लिहिलेल्या 'बिरबल साहनी' या पुस्तकातून घेतली आहे. शक्तिगुप्ता ह्या रुचिरामांची भाची लागतात. रुचिरामांच्या मुलांपैकी बिरबल साहनी हे सर्वाधिक प्रसिद्ध होते. त्यांनी लखनौ येथे 'बिरबल साहनी इन्स्टिट्यूट ऑफ पालिओबॉटनी' स्थापन केली.*

संशोधन आणि विज्ञान-शिक्षणात रुचिरामांचे योगदान -

एम्.ए.च्या पदवीकरता जरी त्यांनी पदार्थविज्ञान आणि रसायनशास्त्र हे विषय घेतले होते, तरी त्यांना गणित विषयाची मनापासून आवड होती. त्या काळात विज्ञान विषयातील पदव्यांना बी.एस्सी. किंवा एम.एस्सी. म्हणत नसत. ऑक्सफर्ड व केंब्रिज विद्यापीठांप्रमाणे त्यांना बी.ए., एम्.ए. असेच म्हणत असत. एम्.ए.चा अभ्यास करीत असताना प्रा. जे. कॅंपबेल ओमान यांचा रुचिरामांवर खूप प्रभाव होता. प्रा. ओमान यांनीच कॉलेजमध्ये पदार्थविज्ञान आणि रसायनशास्त्र विभाग सुरू केला होता. ते प्रयोगशील व उत्तम वक्ते होते. रुचिराम त्यांच्याबद्दल लिहितात :

''अगदी बेताच्या बुद्धीच्या विद्यार्थ्यांमध्येही विज्ञानाविषयी रस निर्माण करण्याचे कसब त्यांच्या ठायी होते. अर्थात् त्या वेळी विज्ञान म्हणजे पदार्थविज्ञान आणि रसायनशास्त्र एवढेच मानले जाई. प्रा. ओमान यांनी

कॉलेज सोडल्यानंतर (१८९६) विज्ञान-विषयात जीवशास्त्र (प्राणिशास्त्र व वनस्पतिशास्त्र) यांचा समावेश करण्यात आला.''

युरोपीय प्राध्यापक सामाजिक चळवळी व घटनांपासून अलिप्त राहत असत; पण प्रा. ओमान यांना त्यातही रस असे.

एम्.ए. होण्यापूर्वी रुचिराम मोठ्या अनिच्छेने इंडिया सरकारच्या हवामानखात्यात सेकंड असिस्टंट रिपोर्टर म्हणून रुजू झाले. त्यांचा खरा ओढा संशोधनाकडे होता. त्यांना अध्यापकाची नोकरी नोकरी हवी होती; कारण त्या नोकरीत संशोधनाची संधी मिळू शकली असता.

कितीही तल्लख बुद्धीचा असला, तरी एखाद्या भारतियाला - नेटिव्हला - विद्यापीठात किंवा संलग्न कॉलेजात फॅकल्टी मेंबर होता येणे हे इंग्रजांच्या राज्यात जवळ-जवळ अशक्य होते आणि फॅकल्टी मेंबरलाच संशोधनाकरता असलेल्या प्राथमिक सुविधांचा विचार करणे शक्य होई. या परिस्थितीची प्रा. ओमानना पुरेपूर जाणीव होती; म्हणून त्यांनी रुचिरामांना हवामान-खात्यातली नोकरी घेण्याचा सल्ला दिला. अध्यापनाची संधी आली, तर रुचिराम केव्हाही परत येऊ शकतील, असे प्रा. ओमान यांचे म्हणणे होते.

हवामानखात्यात नोकरी करण्याकरता रुचिरामांना कलकत्त्याला जावे लागणार होते. कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये त्यांना आपला एम्.ए.चा अभ्यास पूर्ण करता येईल असे ओमान यांनी सुचवले होते. अशा सर्व बाजूंनी पटवून दिल्यावर रुचिरामांनी १० जानेवारी, १८८५ रोजी हवामानखात्यात काम सुरू केले. त्यानंतर कलकत्त्याहून त्यांची सिमल्याला बदली झाली. सिमला येथे हवामानखात्याची प्रमुख कचेरी होती. तिथे सर एच्.एफ्. ब्लॅनफोर्ड, एफ्. आर. एस्. यांच्या हाताखाली काम करण्याची त्यांना संधी मिळाली. ह्याच ब्लॅनफोर्डचे भाऊ भारतीय भौगोलिक सर्वेक्षण विभागात होते. हवामानखात्यात रुचिरामांचे काम कशा स्वरूपाचे होते? दिवसाच्या आणि महिन्याच्या हवामानाचा अहवाल तयार करणे. अशा प्रकारची जबाबदारी एका भारतियाला - नेटिव्हला - मिळणे

ही गौरवाची गोष्ट होती. रुचिरामांची नेमणूक अशा जागेवर झाली, हे अनेक इंग्रजांना रुचले नाही व अलाहाबादहून प्रसिद्ध होणाऱ्या 'पायोनियर'सारख्या प्रमुख वर्तमानपत्रांमधून त्या नेमणुकीवर टीका करणारे लेख येत राहिले. नेटिव्ह असे जबाबदारीचे काम करण्याच्या योग्यतेचा असूच शकत नाही, असा त्या लेखांचा मतितार्थ असे. आपल्यावर टाकलेले काम रुचिराम पूर्ण करीत राहिले व त्याने सर ब्लॅनफोर्ड यांचे समाधानही होत होते. एका वेळी तर बंगालच्या उपसागरात चक्री वादळ सुरू होणार असल्याचे अचूक पूर्वानुमान रुचिरामांनी करून दाखविले होते.

इ.स.१८८७ मध्ये रुचिराम पुन्हा एकदा लाहोरच्या सरकारी कॉलेजमध्ये आले. तेथे ते फॅकल्टीचे कनिष्ठ सभासद झाले. अधिकाराने कनिष्ठ असले, तरी रुचिरामांनी कॉलेजमधील अध्यापनाचा दर्जा वाढविण्याकरता प्रयत्न केला. ते स्वतः विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त प्रयोग करण्यात मार्गदर्शन करीत असत. त्या वेळी कॉलेजमध्ये विज्ञान-विषयांवर चांगलेसे ग्रंथालय नव्हते. त्या अडचणीवर मात करण्यासाठी त्यांनी वैयक्तिक ग्रंथसंग्रह केला. दर महिन्याला ठराविक रक्कम ते पुस्तक-खरेदीसाठी ठेवत. वर्गात शिकवण्याकरता तपशीलवार टिप्पणी तयार करण्याचा त्यांचा शिरस्ता होता. त्या टिप्पण्यांपैकी काही पुस्तकरूपाने प्रसिद्धही झाल्या. युनिव्हर्सिटी सिंडिकेटचे ते दीर्घकाळ सभासद होते. कॉलेजमध्ये शिकवण्यापुरतेच रुचिरामांचे कार्य मर्यादित नव्हते; विज्ञान-प्रसाराला पद्धतशीर स्वरूप देण्यासाठी त्यांनी 'पंजाब विज्ञान संस्थे'ची स्थापना केली. विज्ञानप्रसाराकरता त्यांनी ५०० हून अधिक व्याख्याने दिली. संस्थेच्या कार्यक्रमात भाग घेण्यास अनेक प्राध्यापकांना उद्युक्त केले. साबण बनविण्याची पद्धती, इलेक्ट्रोप्लेटिंग, माणसाच्या सेवेसाठी विद्युत्‌शक्ती, काच कशी बनवतात, पंजाब आणि पंजाबातल्या नद्या, तारायंत्रा(टेलिग्राफ)ची तार कशी बोलते, अशा विविध विषयांवर रुचिराम व्याख्याने देत. व्याख्यानांच्या जोडीला ते प्रात्यक्षिके

करून दाखवत असत. कधी कधी ते पडद्यावर चित्रे दाखवत. त्या वेळची चित्रे दाखवण्याची पद्धत फार प्राथमिक स्वरूपाची होती. रुचिरामांनी चित्रे दाखवण्याची ती पद्धतही सुधारली. इंग्रजी व पंजाबीतून ते आपली व्याख्याने देत. उर्दूतही देत असावेत. 'पंजाब विज्ञान संस्थे'ची उद्दिष्टे साध्य करण्यास उपयोगी अशी कार्यशाळा स्थापून ती संस्थेला जोडली. साधी शास्त्रीय उपकरणे बनविणे आणि दुरुस्त करणे ही कामे या कार्यशाळेत चालत. इथे प्रशिक्षित झालेले विद्यार्थी कार्यरत राहावेत या उद्देशाने त्यांनी 'लॉक अँड सेफ' विभाग सुरू केला. रुचिरामांच्या कार्याला वाहून घेण्याला व परिश्रमांना हेडमिस्त्री अल्लाबक्ष यांच्या कौशल्याची जोड मिळाली. त्या दोघांनी मिळून ह्या कार्यशाळेचे रूपांतर पूर्णतया उद्योगात केले. या कारखान्यात तयार झालेली यंत्रसामुग्री इंग्लंडमधे बनलेल्या यंत्रसामुग्रीच्या दर्जाची असे. पुढे-पुढे अधिक दर्जेदार व अधिक गुणवत्तेची यंत्रे बनवायला सुरुवात केली.

पुणे येथे एकदा औद्योगिक परिषद भरली होती. देशात औद्योगिक प्रगती करण्याकरता झटणारे सुप्रसिद्ध कार्यकर्ते नामजोशी यांनी रुचिरामांना परिषदेत आपली उपकरणे व यंत्रे प्रदर्शित करण्याकरता निमंत्रण दिले. त्याप्रमाणे रुचिरामांनी आपली उपकरणे प्रदर्शनात ठेवली. त्या वस्तू हिंदुस्थानात; आणि तेही लाहोरमध्ये बनल्या आहेत, यावर कुणाचा विश्वासच बसेना. ही सामुग्री परदेशातून आयात केली असावी आणि फार-तर लाहोरच्या कार्यशाळेत त्यांच्यावरचा रंगाचा सुबक थर काढून त्या जागी ओबड-धोबड रंग देऊन त्यांना देशी रूप दिले असावे, असे परिषदेच्या सभासदांचे मत झाले. प्रदर्शनात ठेवलेली सर्व उपकरणे व यंत्रे लाहोरच्या कार्यशाळेत बनली आहेत हे सभासदांना पटविण्याकरता रुचिरामांनी त्यांच्यापुढे तीन प्रस्ताव मांडले :

* परिषदेच्या कुणाही प्रतिनिधीने, परिषदेच्या खर्चाने 'पंजाब विज्ञान संस्थे'ला भेट देऊन तिथे ही उपकरणे बनतात किंवा नाही, याची शहानिशा करावी.

* ह्या उपकरणांची किंमत परदेशी उपकरणांच्या तुलनेने अर्धी आहे. तेव्हा मोठ्या संख्येने ही उपकरणे खरेदी करावीत, म्हणजे परिषदेचा फायदा होईल.

* उपकरणे बनविण्याकरता आवश्यक त्या सुविधा पुरविल्या, तर आमचा हेड मिस्त्री या प्रदर्शनातली उपकरणे बनवून दाखवू शकेल. परिषदेचे सभासद ते पाहून आपली खात्री करून घेऊ शकतील.

ह्या प्रस्तावांमुळे परिषदेच्या समितीला त्या उपकरणांची विश्वासार्हता मान्य करावी लागली. इंडियन नॅशनल काँग्रेसने भरविलेल्या अनेक औद्योगिक प्रदर्शनांत 'पंजाब विज्ञान संस्था' भाग घेई. त्यात संस्थेने कितीतरी पारितोषिके मिळवली होती. कलकत्त्याला संस्थेच्या कार्यशाळेला सुवर्णपदक देण्यात आले. त्या वेळी जगदीशचंद्र बोस हे परीक्षकांमध्ये होते. कार्यशाळेच्या विस्तारासाठी होशंगाबादचे विज्ञान-प्रशिक्षक हिरालाल आणि जालंदर विभागातील शाळा तपासणी अधिकारी मास्टर प्यारेलाल या दोघांनी फार मोलाचे सहकार्य केले.

विज्ञान आणि प्रौद्योगिक संशोधन मंडळाची (सी.एस्.आय्.आर्.) स्थापना करणारे डॉ. शांतीस्वरूप भटनागर (१८९४ ते १९५५) यांचा भारताचे विज्ञान व तंत्रज्ञानविषयीचे धोरण ठरविण्यात मोठा हातभार लागला होता. भटनागरांवर रुचिरामांचा फार प्रभाव होता. भटनागरांचा वैज्ञानिक दृष्टिकोन व कार्य घडविण्यात रुचिरामांचा वाटा होता. त्या संदर्भात भटनागर लिहितात :

''प्रा. रुचिराम साहनी माझ्या बाबतीत बारकाईने लक्ष घालीत. माझ्या परदेशातील शिक्षणासाठी मला दयालसिंग कॉलेज ट्रस्टतर्फे शिष्यवृत्ती मिळवून देण्यात त्यांचा मोठा वाटा होता.''

जर्मनीला जाण्यापूर्वी रुचिराम काही सिद्धांत प्रस्थापित करण्याच्या कामात लागले होते. निरनिराळ्या संयुगांचा विरघळण्याचा गुणधर्म आणि त्या संयुगांतील इतर घटक यांच्यातील संबंधाबाबत त्यांचे संशोधन चालले होते. संयुगांच्या इतर घटकांमध्ये आण्विक वजन हा एक होता.

अगदी मुरलेले रसायनशास्त्रज्ञ जेव्हा एखाद्या वस्तूचे आण्विक वजन निश्चित करतात, तेव्हा त्यात फरक आढळून येतो. याचे कारण 'प्रयोगातील चूक' हे नसावे, तर शिशाच्या क्षाराच्या (लेड सॉल्ट) संयुगात असलेल्या इतर कोणत्या तरी पदार्थाच्या बदलत्या मात्रेमुळे हा फरक येत असावा, या निर्णयाप्रत रुचिराम आले होते; आणि बिस्मथच्या बाबतीतही असेच घडे, हेपण त्यांच्या लक्षात आले होते. जर्मनीत जाऊन त्याचा सखोल अभ्यास करावा, असे त्यांच्या मनात होते. तेथे गेल्यावर डॉ.फजन यांचे संशोधन पुष्कळच झाल्याचे त्यांना कळले. आण्विक वजन काढताना येणाऱ्या फरकाचे कारण रेडिॲक्टिव्ह आयसोटोप आणि रेडियम-डी आहे, हे त्यांनी सिद्ध केले. त्यांनी बिस्मथवर काम सुरू केलेले होते. आपण ज्या समस्येवर संशोधन करण्याचे योजले होते, त्यापैकी एकाचे उत्तर फजनना मिळाले व दुसऱ्याचे उत्तर मिळवण्याच्या ते अगदी जवळ आले आहेत, हे समजल्यामुळे रुचिरामांचा संशोधन करण्याबाबत निश्चय डळमळू लागला. रेडिओ-ॲक्टिव्हिटीची तंत्रे आपल्याला अवगत नसल्याने फजनच्या कामात आपली मदत होण्यापेक्षा अडथळाच होईल असेही त्यांना वाटू लागले. पण रुचिरामांनी केलेले संशोधन पाहून डॉ.फजन चांगलेच प्रभावित झाले व त्यांनी रुचिरामांना आपल्याबरोबर काम करण्याचा आग्रह केला. तेवढ्यात पहिल्या जागतिक महायुद्धाला तोंड फुटले आणि त्यांना जर्मनी सोडून जावे लागले. तिथून ते ब्रिटनमध्ये गेले. मँचेस्टरच्या व्हिक्टोरिया विद्यापीठातल्या भौतिकी प्रयोगशाळेत ते अर्नेस्ट रदरफोर्ड यांच्याबरोबर संशोधन-कार्य करू लागले. तिथे ते अल्फा, बीटा, गॅमा या किरणांचा अभ्यास करू लागले. शिवाय रेडिओ-ॲक्टिव्ह आणि कॉस्मिक किरणांमध्ये अल्फा किरण विखुरतात, त्याचेही संशोधन त्यांनी सुरू केले. त्यांच्या निरीक्षणातून जे निष्पन्न झाले, ते रदरफोर्ड यांनी इतर वैज्ञानिकांना सांगितले; आणि फिलॉसॉफिकल मॅगेझिनमध्ये ते प्रकाशित झाले. त्यासंबधीच्या फोटोग्राफिक प्लेट्स् घेऊन बोटीने मायदेशी परतले. दुर्दैवाने बोटीत त्या प्लेट्स् खराब झाल्या आणि

रुचिरामांची आशादायी संशोधन कारकीर्द एकाएकी संपुष्टात आली.

सामाजिक चळवळीत रुचिरामांचा सहभाग -

रुचिराम उदारमतवादी होते. तरुण वयातच त्यांनी ब्राह्मो समाजाची दीक्षा घेतली. नंतर ते ब्राह्मो समाज चळवळीचे नेते बनले. सुधारक, धार्मिक आणि सामाजिक क्रांतिकारी विचारांनी बंगालात मूळ धरले होते. त्यातूनच ब्राह्मो समाज चळवळीचा उगम झाला. १८८६ साली रुचिराम कलकत्त्याला गेले होते. त्यांच्या त्या वास्तव्यात रुचिरामांचा जगाकडे बघण्याचा एक दृष्टिकोन तयार झाला. त्यांचे सुपुत्र मुल्कराज साहनी लिहितात :

''वडिलांच्या सुधारकी कल्पनांनी कलकत्त्याच्या मुक्कामात आकार घेतला होता, ह्यात शंका नाही.....''

कलकत्त्यात सामाजिक, साहित्यिक व राजकीय क्षेत्रातल्या अनेक महत्त्वाच्या व्यक्तींशी रुचिरामांचा परिचय झाला. रविंद्रनाथ ठाकूर त्यांना भेटले, सत्यजित राय यांचे वडील उपेन्द्र किशोर यांच्याशी मैत्री झाली. केशवचंद्र सेनांची व्याख्याने ऐकायला रुचिराम जात असत. आशुतोष मुखर्जी, पी. सी. रे, जगदीशचंद्र बोस अशा भारतीय विज्ञान-परंपरेची पायाभरणी करणाऱ्या व्यक्तींशी त्यांचा कलकत्त्यात संबंध आला.

रुचिरामांच्या धर्माला मर्यादा नव्हत्या. आपल्या जातीपासून त्यांनी फारकत घेतली होती. प्रसंगी तत्कालीन सनातनी समाजाने त्यांना वाळीत टाकले. असल्या शिक्षांना भीक न घालता त्यांनी सनातनी धर्माच्या विरुद्ध आपला लढा चालूच ठेवला. ते स्वतः शीख नव्हते; पण सुवर्ण मंदिराच्या तळ्याच्या सफाई-कामात त्यांनी जातीने काम केले. गुडघ्यापर्यंत पाण्यात उतरून त्यातील गाळ डोक्यावरून बाहेर नेला होता. ह्यालाच आज कार सेवा म्हणतात. शीख गुरुद्वारांसंबंधी त्यांनी एक पुस्तकही लिहिले होते.*

---

* *'स्ट्रगल फॉर रिफॉर्म्स् इन सिख श्राइन्स्' - रुचिराम साहनी, अमृतसर. इसवी सन माहीत नाही.*

आपल्या देशबांधवांच्या हक्कांसाठी ते खंबीरपणे लढले. स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी स्वतःला झोकून दिले. स्वराज्य पार्टीचे सभासद म्हणून त्यांनी १९२३ साली पंजाब विधानसभेत प्रवेश केला. राष्ट्रीय वृत्तीच्या सरदार दयालसिंग मजिथिया यांच्याशी रुचिरामांचा घनिष्ठ संबंध होता. रुचिरामांच्या आग्रहामुळे त्यांनी 'दि ट्रिब्यून' हे नियतकालिक, 'दयालसिंग पब्लिक लायब्ररी' आणि 'द युनियन अकॅडमी' (पुढे ह्याचे नाव दयालसिंग कॉलेज झाले.) यांची स्थापना केली.*

''ह्या (म्हणजे विसाव्या) शतकाच्या सुरुवातीच्या दशकात या पुरातन भूखंडात सर्वत्र स्तिमित करून टाकण्यासारखे राजकीय व सामाजिक बदल घडत आहेत. ह्या वृत्तांतील हीच गोष्ट सर्वात मनोवेधक आहे. या पुस्तकानंतर ह्याच काळात भारतात जी जागृती होत आहे, त्याची संपूर्ण माहिती देणारा एक छोटा खंड लिहिण्याचा माझा विचार आहे.''**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्याचे पाहून रुचिराम ३ जून १९४८ या दिवशी मुंबईत निधन पावले.

♦♦♦

** रुचिराम साहनी - लेखक : व्ही.एस्.सुरी आणि टी.आर्.सरीन. 'डिक्शनरी ऑफ नॅशनल बायोग्राफी'*

*** अवेकनिंग ऑफ एशिया : रुचिराम साहनी, लाहोर १९२९.*

एका भारतीय अधिकाऱ्याच्या धडपडीची सुरुवात

अधिकारी म्हणून माझ्या कारकीर्दीतले माझे अनुभव अद्वितीय आहेत, असे मला मुळीच म्हणायचे नाही. माझ्या हुद्यावर काम करणाऱ्या इतर भारतियांच्या मानाने मला माझ्या भावनांची कदर करून व आदराने वागविले गेले, असे म्हटल्यास अधिक योग्य होईल. एक शतकाच्या तृतियांशाला एक महिना कमी इतकी वर्षे मी सरकारी नोकरी केली. माझ्या नोकरीची सुरुवात १० जानेवारी १८८५ या दिवशी भारतेय हवामान विभागात झाली. तिथे श्री. एच्. एफ्. ब्लॅनफोर्ड, एफ्.आर्.एस्. या देवदूतासारख्या माणसाच्या हाताखाली मी काम केले. १८८७ च्या मार्च महिन्याच्या अखेरीस मी पंजाब शिक्षण विभागात लागलो. लाहोरच्या सरकारी महाविद्यालयात विज्ञानाच्या (पदार्थविज्ञान आणि रसायनशास्त्र) असिस्टंट प्रोफेसर म्हणून मी रुजू झालो. वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी म्हणजे १५ एप्रिल १९१८ या दिवशी त्याच कॉलेजमधून सेवानिवृत्त झालो. त्या वेळी मी रसायनशास्त्राचा सीनियर प्राध्यापक होतो. त्याशिवाय १९०८ साली दहा महिने मुलतान प्रांतातल्या शाळांचा डायरेक्टर आणि १९०९ साली तीन महिने अमृतसर प्रांतातल्या शाळांचा डायरेक्टर म्हणून मी काम पाहिले. आठ प्राचार्य आणि सार्वजनिक शिक्षण विभागाचे पाच डायरेक्टर्स् यांच्या हाताखाली मी काम केले. ३१ वर्षांच्या कारकीर्दीत माझा तीसहून अधिक युरोपीय प्राध्यापकांशी जवळून संबंध आला. शिक्षण विभागातील (विशेषतः अध्यापनातील) उच्च नेमणुकांपासून भारतियांना दूर ठेवण्याचा

पद्धतशीर प्रयत्न त्या काळात केला जाई. कुणाला आश्चर्य वाटेल; पण संपूर्ण भारतात केवळ तीन भारतियांचा 'इंडियन एज्युकेशनल सर्व्हिस'मध्ये समावेश होता, अशी वस्तुस्थिती होती. सर जगदीशचंद्र बोस - डी.एस्सी., एफ्.आर्.एस्., डॉ.डी.एन.मलिक - डी. एस्सी. आणि मद्रासमधले इंग्रजीचे प्राध्यापक असलेले एक ख्रिश्चन गृहस्थ हे ते तीन भारतीय होते. सर पी. सी. रे यांच्यासारख्या माणसालाही जन्मभर शिक्षण विभागाच्या खालच्या स्तरात राहून समाधान मानावे लागले होते.

माझ्या दीर्घकालीन नोकरीत पन्नास एक सहकाऱ्यांशी माझा संबंध आला. त्यापैकी दोघांशी माझा गंभीर मतभेद झाला होता. इतरांशी माझे संबंध मैत्रिपूर्ण होते. त्यामधल्या काही जणांशी माझा अधिक जिव्हाळ्याचा आणि सुखद संबंध होता. स्वातंत्र्य आणि स्वायत्ततेच्या कल्पना सतत हृदयाशी बाळगूनच मी माझी नोकरी केली. असे असूनही माझ्या सहकाऱ्यांकडून आणि वरिष्ठांकडून जी वागणूक मला मिळाली, त्यात तक्रारीला जागा नाही. एवढेच नाही, तर त्यापैकी काहीजणांनी आपल्या युरोपीय सहकाऱ्यांपेक्षा माझ्यावर अधिक विश्वास टाकला, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. माझी बुद्धी व कुवत यानुसार विज्ञान विभागामध्ये मी चोख आणि मनापासून काम केले, असे मी स्वतःविषयी म्हणेन. माझ्याकडून ज्या अपेक्षा केल्या होत्या, त्या पूर्ण करण्याकरता पडेल ती किंमत द्यायला मी नेहमी तयार असे. काही वेळा मला तशी किंमत द्यावीही लागली होती. मात्र ते करीत असताना न्याय आणि आत्मसन्मानाचा बळी मी कधीच दिला नाही.

डेन्झिल इबेट्सनची कॉलेजला भेट -

मी एम्.ए.चा अभ्यास करीत होतो. माझ्या भावी कार्यजीवनाला वळण देणाऱ्या अशा दोन घटना त्या वेळी घडून आल्या. एक म्हणजे श्री. डेन्झिल इबेट्सन आय्.सी.एस्. यांनी कॉलेजला अचानक दिलेली भेट. त्या वेळी ते पब्लिक इन्स्ट्रक्शनचे डायरेक्टर होते. पुढे त्यांना 'सर' हा

किताब मिळाला व ते पंजाबचे गव्हर्नरही झाले.

त्या वेळी गणिताचे असिस्टंट प्रोफेसर होते बाबू शशिभूषण मुखर्जी. कॉलेजच्या कायमस्वरूपी स्टाफवर ते एकटे भारतीय होते. भारतीय शैक्षणिक सेवांच्या वरच्या गॅझेटेड श्रेणीत अधिक भारतियांचा समावेश करण्याबाबत काही हालचाली सुरू होत्या. मला वाटते की, १८८२ च्या एज्युकेशन कमिशनने तसा सल्ला दिला होता.* त्यानुसार डॉ.जगदीशचंद्र बोस, डी.एस्सी. (लंडन) यांची प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये नेमणूक झाली. नंतर काही महिन्यांनी जी. एन. चटर्जी, बी.ए. (कॅन्टॅब) यांची गव्हर्नमेंट कॉलेजमध्ये नेमणूक झाली.

श्री. इबेट्सन माझ्या कामाच्या टेबलापाशी आले. त्या वेळी मी जे प्रयोग करीत होतो, त्यापैकी काही त्यांनी पाहिले. मला जेवढे आठवतेय, त्याप्रमाणे मी अल्कलॉइड गाळून (एक्स्ट्रॅक्शन) त्यांची चाचणी करीत होतो. माझी वही तपासून त्या प्रयोगाबद्दल काही प्रश्न त्यांनी विचारले. त्यांना पाहिजे असलेल्या काही टेस्टस् त्यांनी पाहिल्या. असा जवळ-जवळ एक तास त्यांनी माझ्याबरोबर घालवला. परीक्षा पास झाल्यावर काय करायचा माझा इरादा आहे, असेही त्यांनी विचारले. निश्चित काही ठरवले नाही; पण विज्ञानक्षेत्रात प्रगती करण्याचा माझा विचार त्यांना सांगितला. ते गेल्यानंतर प्रा. ओमाननी मला सांगितले की, माझी इबेट्सनवर चांगली छाप पडली असून, कॉलेजच्या स्टाफवर मला घेण्याचे घाटत असावे.

** लॉर्ड रिपन ह्यांनी कमिशनच्या अध्यक्षपदी सर.डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर यांची नियुक्ती केली होती. कमिशनच्या सभासदांमध्ये आनंद मोहन बोस आणि सर सैयद अहमद हे दोन भारतीय होते. खरे तर श्री. बोसांना अध्यक्षपद देऊ केले होते. 'जर अध्यक्षपदी योग्य असे युरोपीय गृहस्थ असतील, तर कमिशनच्या सूचनांना अधिक वजन येईल.' असे श्री. बोस यांनी निदर्शनास आणून दिले. श्री. बोस हे भिडस्त वृत्तीचे गृहस्थ होते. ते अत्यंत बुद्धिमान होते. केंब्रिज विद्यापीठातून ते रँगलर झाले होते; शिवाय बॅरिस्टरही होते.*

अर्थात् त्याचे निश्चित स्वरूप प्रा. ओमाननाही माहीत नव्हते. कदाचित्, डी.पी.आय्. (डिरेक्टर पब्लिक इन्स्ट्रक्शन)च्या कचेरीत किंवा इबेट्सन यांच्या डोक्यात काय बेत चालले होते, हे मला मोकळपणाने सांगणे प्रा. ओमानना प्रशस्त वाटत नसावे.

मी हवामान विभागात लागलो -

लवकरच एक प्रस्ताव आला. प्रा.ओमान ह्यांना एक पत्र आले. इंडिया सरकारच्या हवामान विभागात असिस्टंट मीटिअरॉलॉजिकल रिपोर्टर हवा होता, तेव्हा ते काम करण्यास पात्र अशा एखाद्या विज्ञानातील पदवीधराचे नाव सुचवा, असे त्या पत्रात लिहिले होते. ते पत्र त्यांनी मला दाखवले. विज्ञानक्षेत्रात अशा नेमणुका वारंवार होत नसतात; आणि अशी संधी पुन्हा इतक्यात येणार नाही, असे सांगून ती जागा स्वीकारण्याचा प्रा.ओमाननी मला आग्रह केला. ते म्हणाले, इबेट्सनचे बेत कदाचित् ढासळतील; पण समजा, शिक्षणक्षेत्रातून मला हवा असलेला प्रस्ताव आला, तर तो स्वीकारायला काहीच अडचण येणार नाही. तसे झाले तर माझी बदली मी पंजाबात करून घेऊ शकेन. असे परोपरीने त्यांनी पटवून दिल्यावर मी कबूल झालो. आणि थोड्याच दिवसांनी अलाहाबादच्या म्यूइर कॉलेजमध्ये पदार्थविज्ञानाचे प्राध्यापक श्री.ए.एस्. हिल यांना जाऊन मी भेटावे, असा तारेने संदेश आला. त्या वेळी श्री.एफ्.एच्.ब्लॅनफोर्ड रजेवर होते आणि तात्पुरते त्यांचे काम श्री. हिल बघत होते. १० जानेवारी १८८५ पूर्वी म्हणजेच मी त्यांना जाऊन भेटण्यापूर्वी, श्री. हिल यांनी देशभरातील इतर प्रांतांतून आलेल्या काही उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या होत्या. त्या उमेदवारांपेक्षा मी अधिक शिकलेलो होतो असे म्हणता येणार नाही. पण त्यांनी चक्री वादळाविषयी एक-दोन प्रश्न विचारले होते. त्या प्रश्नांना मी जी उत्तरे दिली, ती त्यांच्या मनास आली असावीत; आणि म्हणून त्यांनी मला झुकते माप दिले, असे मला वाटते.

वस्तुस्थिती अशी होती. काही वर्षांपूर्वी मी बोटीतून चिनाब नदी पार करीत होतो. नदीच्या मध्यात एक भोवरा होता. त्यातून बोट बाहेर येईपर्यंतचा अनुभव भयंकर आणि अविस्मरणीय होता. तो अनुभव गाठीशी असल्याने माझी उत्तरे कदाचित् अधिक सरस झाली असतील. 'कलकत्त्याला जाऊन रुजू हो', असे त्यांनी मला सांगितले. आमचे ऑफिस शेतकी विभागाशी संलग्न होते. इंडिया सरकारचे अंडर सेक्रेटरी त्या विभागात होते. त्यांचे नाव श्री. टी. डब्ल्यू. होल्डरनेस्. त्यांनी माझा पगार निश्चित केला. एम्.ए. चा अभ्यास थांबवायची माझी इच्छा नाही असे मी त्यांना सांगितले. तेव्हा काही वेळ प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये रसायनशास्त्राच्या वर्गात बसायला हरकत नाही, असे ते म्हणाले. मला कामावर ठेवून घेण्याची निकड त्यांना असावी; कारण रसायनशास्त्राच्या प्राध्यापकांना - श्री. अलेक्झांडर पेडलर, एफ्.आर्.एस्. यांना - रसायनशास्त्राचा अभ्यास करण्याची तुझी सोय करण्याबद्दल मी लिहीन, असे त्यांनी मला आश्वासनही दिले. प्रा. पेडलर हे बंगाल प्रांतात मीटिअरॉलॉजिकल रिपोर्टरचे काम बघत असत. त्या कामाकरता त्यांना दरमहा २५० रु. भत्ता मिळत असे. कालांतराने त्यांना 'सर' हा किताबही मिळाला.

कलकत्त्यात मला मदत करायला सर्वजण तयार असल्याचे मला आढळले. लाहोरच्या गव्हर्नमेंट कॉलेजमध्ये असताना फुलर्स एक्झिबिशनर म्हणून मला ३५ रु. शिष्यवृत्ती मिळत होती. ती शिष्यवृत्ती चालू ठेवण्याची पंजाब विद्यापीठाला विनंती करण्यात येईल; म्हणजे हवामान विभागातून मिळणाऱ्या पगाराशिवाय शिष्यवृत्तीचे पैसेही मला मिळतील, असे मला सांगण्यात आले. कॉलेजची फी कापून मगच मला शिष्यवृत्तीचे पैसे मिळत होते, असे प्रेसिडेन्सी कॉलेजच्या प्राचार्यांनी - श्री. सी. एच्. टोनी यांनी - माझ्या लक्षात आणून दिले. त्या कारणाने कॉलेजची फी त्यांनी मला माफ केली. लाहोरच्या गव्हर्नमेंट कॉलेजमध्ये एम्.ए.करता दरमहा फक्त २ रु. भरावे लागत; तर प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये त्याच वर्गासाठी १२ रु. आकारत असत, हे कदाचित् त्यांच्या लक्षात आले नसावे.

ह्या सगळ्या सवलती आणि प्रेसिडेन्सी कॉलेजमधील अधिक चांगल्या शिक्षणाची सोय या दोन्हीमुळे हवामान विभागातली नोकरी स्वीकारायला मी उद्युक्त झालो. इंडिया सरकारचा सेकंड असिस्टंट मीटिअरॉलॉजिकल रिपोर्टर असा माझा हुद्दा होता. फर्स्ट असिस्टंटच्या जागेवर श्री. डलस नावाचे एक युरोपीय गृहस्थ होते. त्यांचा पगार ५०० रु. होता व तो १००० रु. पर्यंत वाढू शकत होता. थोडा अनुभव घेतल्यानंतर माझ्या श्रेणीचा पुनर्विचार करण्याचे आश्वासन श्री.होल्डरनेसनी दिले होते. हिंदी महासागरातून जात असणाऱ्या जहाजांच्या लॉगबुकांच्या संबंधातील काही विशिष्ट कामाची जबाबदारी श्री. डलस यांची होती; आणि हवामानाचे दैनिक आणि मासिक अहवाल तयार करण्याचे काम माझ्यावर सोपविले होते. लवकरच हवामानाचे अहवाल सिमल्याहून प्रसृत होणार होते; त्याकरता माझी तिथे कायमची बदली होणे अगत्याचे झाले. कलकत्त्यात माझ्या कामाचे तास किंवा माझे काम यांना निश्चित चौकट नव्हती आणि त्यामुळे मी चार ते पाच तास प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये घालवू शकत होतो. प्रशिक्षण घेणे हे माझे काम होते. मीही प्रत्येक गोष्ट शिकून घ्यायचे ठरवले होते. माझ्या कामाशिवाय मी माझ्या मदतनिसांचे म्हणजे कंप्यूटरांचे कामही शिकून घेई. अधूनमधून अलिपूरच्या सेंट्रल ऑब्झर्वेटरीत मी जात असे. अलिपूर हे कलकत्त्यापासून दोन ते तीन मैलांवर होते आणि त्या दोन्ही गावांमध्ये किती तरी माळराने पसरली होती. आता मात्र अलिपूर हा कलकत्ता शहराचाच एक भाग झाला आहे. दाबमापक आणि इतर उपकरणे वापरून काळजीपूर्वक अंशशोधन करण्याचे काम मी आत्मसात् केले. सिमल्यात ऑफिसमध्ये माझ्याखाली काम करणारे कंप्यूटर (आकडेमोड करणारी माणसे) कारकून वगैरे सर्वांचे काम नीट शिकून घेण्याची माझी जिद्द होती. वेळ आली तर त्यांच्यापैकी कुणाचीही जागा घेण्यास मला अवघड जाऊ नये, असा माझा हेतू होता. ते करीत असताना भारतातच नव्हे, तर इतर देशांच्या हवामानाचा शास्त्रीय अभ्यास मी करीत असे. अशा प्रकारे माझ्या भावी कामाशी पूर्ण परिचय करून घेण्याचा प्रयत्न मी करीत होतो. ही नोकरी घेतल्यावर प्रा. ओमान यांच्या बहुमूल्य सल्ल्यानुसार वागत होतो.

कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये -

प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये माझ्या कित्येकांशी ओळखी झाल्या. त्यातल्या अनेक व्यक्तींनी पुढे देशातल्या सामाजिक जीवनावर आपला ठसा उमटवला. त्यांच्यापैकी एक होते सर आशुतोष मुखर्जी. सर अलेक्झांडर पेडलरांच्या मार्गदर्शनाखाली मी एम्.ए.च्या शेवटच्या वर्षाचा अभ्यास करत होतो, तेव्हा आशुतोष मुखर्जी गणितात एम्.ए. करीत होते. असे ते माझे सहाध्यायी होते. मी एका ब्राह्मो वसतिगृहात राहत होतो. न्यू हॅरिसन रोडच्या बाजूला सीताराम घोष रस्ता होता. त्या रस्त्यावर ते वसतिगृह होते. आपल्याला लष्करी शिक्षण नाही ह्या गोष्टीची खंत त्या काळात बंगाल्यांना अतिप्रकर्षाने वाटे. (हा तमभाव मी सहेतुक वापरत आहे.) आशुतोष आणि इतर काही जण मला संध्याकाळी फिरायला घेऊन जात; आणि गुरू गोविंदसिंग, रणजीतसिंग, हरिसिंग नलवा ह्या व त्यांच्यासारख्या इतर वीरांच्या पराक्रमाच्या व साहसाच्या कथा सांगण्याचा मला आग्रह करीत. आमच्या वसतिगृहातील कित्येक विद्यार्थी सैनिकी शिक्षण घ्यायला उत्सुक असत. तसे शिक्षण मी त्यांना द्यावे, त्यांचा ड्रिल सार्जंट व्हावे, असे त्यांना वाटे. त्याबाबत माझा नकार ऐकून घ्यायला ते तयारच नसत. पंजाबी लोकांचा तगडेपणा माझ्यात नाही, मी कधीही बंदूक खांद्यावर घेतलेली नाही, असे त्यांना सांगण्याचा मी परोपरीने प्रयत्न करी; पण ते मानत नसत. 'असं कसं शक्य आहे? प्रत्येक पंजाबी हा जन्मजातच लढवय्या असतो.' असे ते मला उलट सांगत. वसतिगृहातील एक श्री. दास माझ्याकडून ड्रिल (कवायत) शिकण्याच्या कल्पनेने इतके भारून गेले, की मी त्यांना ते शिक्षण द्यायचे ठरवले. मी त्यांना दोन बांबूच्या काठ्या आणायला सांगितले. त्या म्हणजे आमच्या बंदुका. एक त्यांना व एक मला. खरीखुरी शस्त्रे बाळगायची बंदी असल्याने लाठ्यांना बंदुका


सर अशुतोष मुखर्जी

मानण्याची कल्पना त्यांना पसंत पडली. त्या काठ्या खांद्यावर घेऊन मी श्री. दासांना आमच्या वसतिगृहाच्या अंगणात फेऱ्या मारायला लावीत असे. रोज सकाळी एक तास हा खेळ चाले. असा एक आठवडा झाल्यावर माझा विद्यार्थी सैनिकी शिक्षणात पारंगत झाल्याचे मी जाहीर करून टाकले. बंदूक उडवणे सोडून बाकी सैनिकाचे सर्व शिक्षण आत्मसात् केल्याचे त्यांना मनोमन पटले होते. पुढे काही वर्षांनी हे दास मला पुन्हा भेटले. त्या वेळी ते बेथ्यून कॉलेजमध्ये प्राध्यापक झाले होते. मुलांच्या कॉलेजमध्ये प्राध्यापकांना जो त्रास सहन करावा लागतो, त्याच्या मानाने इथे कमी उपद्रव होत असावा असे मला वाटले. गेल्या चाळीस वर्षांत बंगाली तरुणांच्यात मोठा कौतुकास्पद बदल घडून आला आहे, असे माझे पक्के मत झाले आहे. मेकॉलेने बंगाल्यांना भेकड म्हटले होते. त्या मताच्या योग्यायोग्यतेविषयी प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये असताना आम्ही मित्र चर्चा करीत असू. कलकत्त्यात राहायला येऊन काही महिने झाले होते; पण तेवढ्या वेळात रस्त्यात दोन मुले एकमेकांना बुकलत आहेत असे दृश्य मी एकदाही पाहिले नव्हते. लाहोरच्या बाजारातून फेरफटका मारताना अशी मारामारी हटकून बघायला मिळे. एकदा सुमारे दोनशे विद्यार्थ्यांना सामोरे जायची माझ्यावर वेळ आली; आणि माझ्या केसालाही धक्का न लागता मी सहीसलामत बाहेर आलो. माझ्या प्रांतात ते असंभव होते. आज परिस्थिती बदलली आहे.

प्रा. पेडलर यांची व्याख्याने आणि माझे काम याशिवाय त्यांच्याशी माझा जो संबंध आला, तो पथ्यावर पडला. प्राध्यापक पेडलर हे

रासायनिक विश्लेषक होते. स्थानिक फर्ममधून मद्य आणि इतर पदार्थ विश्लेषणाकरिता ते घेऊन येत; पण विश्लेषण ते स्वतः कधीच करीत नसत. प्राध्यापकसाहेब आणलेले पदार्थ नियमितपणे आपल्या प्रयोगशाळा सहाय्यकाकडे देत असत. हे सहाय्यक म्हणजे रसायनशास्त्रात एम्.ए. झालेले गृहस्थ होते. ते प्रयोगशाळेतील प्रयोगात तरबेज होते. मी प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये असताना ते गृहस्थ ते पदार्थ विश्लेषणाकरता मलाच देत असत. मी ते काम आनंदाने करीत असे. ही व्यवस्था सर्वांनाच सोयीची होत असे. मला मोलाचा अनुभव मिळे. विश्लेषणाकरता मद्य असे, ते अगदी थोडे पुरत असे. त्यामुळे उरलेल्या मद्याच्या बाटल्या प्रयोगशाळा सहाय्यकांना मिळत. प्रत्येक विश्लेषणाकरता मिळणारे ३२ रु. प्राध्यापक पेडलरांच्या खिशात जात.


याखेरीज प्राध्यापक पेडलर नगरपालिकेचे विश्लेषणाचे काम करीत. त्यात नगरपालिकेचे पाणी आणि गॅस यांचे विश्लेषण करावे लागे. त्याचा रोजी अहवाल पाठवावा लागे. इथेही तसाच प्रकार होई. काही वेळा महिना-महिना पाणी व गॅस ह्यांचे विश्लेषण मीच करीत असे. अशी प्रत्यक्ष तालीम मिळणे हे माझ्यासारख्या रसायनशास्त्राच्या विद्यार्थ्याला महत्त्वाचे वाटे. योग्य प्रकारच्या उपकरणांची रचना नेटकी केल्यास मोठ्या शहराला होणाऱ्या गॅस-पुरवठ्यासंबंधीचा अहवाल काही मिनिटांतच करता येतो, असे या सातत्याने केलेल्या विश्लेषणांवरून माझ्या लक्षात आले.

प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये माझ्या सहाध्यायांपैकी दोन ब्राह्मो तरुण होते. त्यांच्या काही आठवणी सांगाव्याशा मला वाटतात. श्री. उपेन्द्र किशोर रॉय चौधुरी उर्फ उपेनबाबू हे उंचनिंच व देखणे होते. त्यांचे केस कुरळे होते. अशा आकर्षक व्यक्तिमत्त्वाच्या उपेनबाबूंचा आवाज मोठा गोड होता. प्रा. पेडलरांची पाठ वळली रे वळली, की उपेनबाबूंना गाणे म्हणण्याचा आग्रह हमखास होई. कधी कधी तब्बल पंधरा मिनिटे प्रयोगशाळा त्यांच्या गाण्याने पुलकित होऊन जाई. ह्या गोष्टीला अनेक वर्षे झाली. मी पुन्हा एकदा कलकत्त्याला गेलो, तेव्हा एका रविवारच्या

संध्याकाळी ब्राह्मो मंदिरात प्रार्थना चालू होती. मी व डॉ. पी. सी. रे (नंतर त्यांना 'सर' हा किताब मिळाला.) शेजारी-शेजारी बसलो होतो. माझे जुने मित्र आणि सहाध्यायी उपेन्द्र किशोर राय चौधुरी यांच्याविषयी मी डॉ.रेंना विचारले. "समाजात या नावाचे कुणी गृहस्थ असल्याचे मला माहीत नाही.", असे त्यांनी उत्तर दिले. मी पुष्कळ वर्षांत उपेनबाबूंना भेटलो नव्हतो. तेवढ्यात वरच्या बाल्कनीतल्या गटाने आरती म्हणायला सुरुवात केली. त्या समूहगानाचे नायक उपेनबाबू होते, हे मी तात्काळ ओळखले. प्रार्थना संपल्यावर मी डॉ. रेंना ते सांगितले. "अच्छा, तुम्ही उपेन रे यांच्याबद्दल म्हणत होता !" ते उद्गारले. आता इंग्रजी धर्तीच्या त्या नावानेच ते सर्व हिंदुस्थानभर ओळखले जात होते. वर्तमानपत्रे व पुस्तके यांतील चित्रांकरता हाफटोन ब्लॉक-मेकर म्हणून त्यांची ख्याती होती. त्या उपेन रेंना मी शेवटी भेटलो. त्या मुक्कामात मला त्यांनी अनेकदा आपल्या घरी बोलावले. आपल्या स्टुडिओत नेऊन तेथे चाललेल्या कामाची संपूर्ण प्रक्रिया त्यांनी मला समजावून सांगितली. त्यात त्यांनी कशा सुधारणा केल्या आहेत, तेही सविस्तरपणे सांगितले.


रविंद्रनाथ टागोर

दुसरे गृहस्थ म्हणजे गगनचंद्र होम. कलकत्त्याच्या नगरपालिका वृत्तपत्राचे संपादक श्री. अम्मल होम यांचे ते वडील. हे अम्मल होम लाहोरहून प्रसिद्ध होणाऱ्या 'ट्रिब्यून'च्या कामात काही काळ सहभागी होते. या अम्मल होम यांनी काही वर्षांपूर्वी एक आठवण मला सांगितली. १९३५ साली इंडियन नॅशनल काँग्रेसच्या वार्षिकोत्सवानिमित्त निघणाऱ्या अंकाकरता काँग्रेसच्या संबंधात



राजाराममोहन रॉय

रवीन्द्रनाथांच्या आठवणी नोंदवून घ्याव्यात म्हणून ते रवीन्द्रनाथ टागोरांना भेटले होते. कविवर्यांनी अम्मल होमना विचारले, "गगनचंद्र होमचे तुम्ही कुणी लागता का?" ते आपले वडील आहेत असे सांगितल्यावर रवीन्द्रनाथांच्या चेहऱ्यावर संतोष झळकला. ते म्हणाले, "गगनचंद्र होम आणि रुचिराम हे दोघे प्रेसिडेन्सी कॉलेजचे विद्यार्थी होते. तेव्हा ते महर्षींना भेटायला आले होते, ते मला स्पष्ट आठवतं."

कविवर्य माझ्यापेक्षा थोडेसे मोठे होते. १८८५ साली मी त्यांच्या वडिलांना - महर्षींना - भेटलो होतो. तेव्हा रवीन्द्रनाथ आसपास असल्याचे माझ्या स्मरणात नाही. पण माघोत्सवाच्या दिवशी (राममोहन रायनी स्थापन केलेल्या ब्राह्मो-समाजाचा वर्धापन दिन) महर्षींचे म्हणजे देवेन्द्रनाथ टागोरांचे दर्शन घेतल्याचे मला स्पष्टपणे आठवते. त्या वेळी कलकत्त्याला मी विद्यार्थी होतो. महर्षी देवेन्द्रनाथ टागोरांना आदरांजली वाहून त्यांचा आशीर्वाद घेणे हे प्रत्येक ब्राह्मो - मग तो लहान असो वा वृद्ध - आपले कर्तव्य मानीत असे. स्त्री-पुरुष, बाल-वृद्ध सर्वजण त्यांच्या घराकडे लोटत असत. ते दृश्य मोठे प्रेरणादायी असे. महर्षींना प्रणाम करण्यासाठी दोन ब्राह्मो विद्यार्थी आल्याची एक सामान्य घटना तब्बल पन्नास वर्षांनंतर रवींद्रनाथांच्या स्मरणात राहावी, याचे मला अप्रूप वाटले.


महेन्द्र लाल सरकार यांची संस्था -

डॉ. महेंद्र लाल सरकारांच्या संस्थेत ज्ञान-विज्ञानावरची व्याख्याने


फादर ई. लाफाँ

ऐकायला मी नियमितपणे जात असे व ते मला फार उपयोगी पडले. त्या व्याख्यानांपासून प्रेरणा घेऊनच प्रा. ओमान आणि मी 'पंजाब विज्ञान संस्था' सुरू करायला उद्युक्त झालो. सेंट झेवियर कॉलेजचे फादर ई. लाफाँ यांची व्याख्याने मी कधीही विसरणार नाही. तेथे इतर पुष्कळ व्याख्याते होते; पण जनसामान्यांच्या ठायी विज्ञानाविषयी कुतूहल निर्माण व्हावे या हेतूने एखादा क्लिष्ट मुद्दा स्फटिकाइतका स्पष्ट करण्यात त्या जेझुइट प्राध्यापकांचा हात कुणी धरू शकत नसे. डॉ. सरकारांच्या या संस्थेतच मी डॉ. जगदीशचंद्र बोसांना प्रथम पाहिले. ते शक्ती (एनर्जी) या विषयावर बोलले. व्याख्यान देताना त्यांनी पुष्कळ प्रयोगही करून दाखविले; पण त्यात प्रभावित होण्यासारखे मला काहीच आढळले नाही. त्या वेळी डॉ. बोस प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये प्राध्यापकीय कामावर रुजू झाले होते. ते सडपातळ होते. ते सावकाश पण सजगतेने बोलले; पण त्यात थोडी अनिश्चितता जाणवत होती. व्यासपीठावर येताना त्यांच्या डोक्यावर विणकाम केलेली रेशमी काळी टोपी घातली होती, हे मला चांगलेच आठवते.

एका अतिशय रोचक अशा सार्वजनिक चर्चेचा उल्लेख करायलाच हवा; कारण त्या चर्चेचा माझ्या मनावर कायमचा ठसा उमटला होता. ही चर्चा डॉ. सरकारांच्या संस्थेत झाली की इतर कुठल्या सार्वजनिक सभागृहात झाली, हे मला आठवत नाही; पण ती कुठे झाली ह्याला काहीच महत्त्व नाही. त्या चर्चेमागचा उत्साह आणि त्यासाठी घेतलेले परिश्रम यांना खरे महत्त्व आहे. डॉ. खाष्टगीर आणि डॉ सिंप्सन या वैद्यकीय क्षेत्रात


महेंद्र लाल सरकार

त्या वेळी ख्यातनाम व्यक्तींनी ती चर्चा घडवून आणली होती. आहारातील मांस व कडधान्ये या दोन घटकांविषयी ते बोलत असत. एका आठवड्यात डॉ. खाष्टगीर कडधान्यांचे - कडधान्यांना काही लोक घोड्याचा खुराक म्हणत असत - आहारात काय महत्त्व आहे, ते सांगत. ते मांस या आहार-घटकाची निंदा करीत व सुसंस्कृत माणसांच्या आहारात त्याचा समावेश झाल्याबद्दल घृणा व्यक्त करीत. त्याच्या पुढच्या आठवड्यात डॉ. सिंप्सन मांसाहाराचे महत्त्व सांगत असत. अशा प्रकारे जवळजवळ सहा आठवडे ती चर्चा चालली होती. आपल्या विधानांच्या स्पष्टीकरणाकरता दोघेही तपशीलवार आलेख भिंतीवर लावत असत. दोन्ही प्रकारच्या आहारांचे - मग त्याला घोड्याचा आहार म्हणा; नाही तर कुत्र्याचा आहार म्हणा किंवा काही म्हणा - शास्त्रीयदृष्ट्या काय महत्त्व आहे हे समजावून सांगण्यावर त्यांचा भर असे. लोकांना त्या चर्चेत रस वाटेल अशा बेताने ते बोलत असत. सुरुवातीपासून शेवटपर्यंत लोकांची हजेरी बऱ्यापैकी होती; त्यावरून त्यांना ती चर्चा आवडली असे म्हणायला हरकत नाही. त्या चर्चेत जीवनसत्त्वांचा मात्र फारसा उल्लेख येत नसे. आजकाल माणूस आणि पशू या दोघांच्या आहारात जीवनसत्त्वांचे फार महत्त्व मानले जाते. त्या चर्चेला माझी प्रतिक्रिया अशी झाली : डाळ काय किंवा मांस काय, दोन्ही गोष्टींचा आहारात संयमित समावेश असावा. एका गोष्टीचा स्वीकार व दुसरीला हद्दपार करण्याचे कारण नाही.

डॉ. सरकारांच्या संस्थेविषयीची हकीगत संपवण्यापूर्वी एक मजेशीर

घटना सांगतो. त्या काळी व्यापारी संस्था आणि सरकारी कचेऱ्यांमधून उच्चशिक्षित भारतीय फार थोड्या संख्येने असत. त्यांत दरवान किंवा हलक्या प्रतीची कामे करण्याकरता मात्र भारतियांचा भरणा असे. डॉ. सरकारांच्या संस्थेच्या प्रशस्त सभागृहात होणाऱ्या व्याख्यानांना एखादा पगडीवाला पंजाबी येईल याची शक्यता अगदीच कमी असे. एक दिवस व्याख्यान ऐकण्याकरता मी सभागृहात शिरलो व कुठे खुर्ची रिकामी आहे काय, ते बघू लागलो. सभागृहात सर्वत्र उघडी डोकी ! पगडी किंवा टोपी घातलेले एकही डोके नाही. मी सगळ्यांकडे बघितले, तसे त्यांनीही मला. त्यांनी एका सामूहिक आवाजात माझे स्वागत केले. जवळच्या एका खुर्चीवर मी बसलो आणि डोक्यावरचे पागोटे काढून खाली ठेवले. ते बघून श्रोत्यांनी पुन्हा एकमुखाने स्वागत केले. तेव्हा मी माझे पागोटे उचलून डोक्यावर ठेवले. श्रोत्यांनी पहिल्यापेक्षाही आणखी मोठ्याने आवाज करून संमती दर्शवली.

कलकत्त्यासारख्या मोठ्या शहरात राहणे हा एक अनुभवच होता. ते एक प्रकारचे शिक्षण होते. डोळे उघडे ठेवून कलकत्त्याच्या रस्त्यावरून चालणे म्हणजे एखादा न संपणारा चित्रपट पडद्यावर पाहण्यासारखे होते. आत्तापर्यंत मी पाहिलेली मोठाली शहरे म्हणजे लाहोर, दिल्ली, अलाहाबाद वगैरे कलकत्त्याच्या एका कोपऱ्यात मावली असती; आणि तरीही कलकत्त्याचा आकार हे त्याचे वैशिष्ट्य नव्हते, हे माझ्या ध्यानात आले होते. रस्त्याच्या कोपऱ्या-कोपऱ्यावर चकित करून सोडणारी कुतुहलाची नगरपालिका दृष्टीस पडे, त्याने मी फार प्रभावित झालो. त्या कलकत्त्याच्या काही महिन्यांच्या मुक्कामात माझ्यावर कशाकशाचा ठसा उमटला ह्याची जंत्री करू लागलो, तर ते जिकीरीचे काम ठरेल.

त्या लांबच-लांब जंत्रीतील एक गोष्ट मी सांगतो. एकदा माझ्या एका वर्गमित्राला मी धोतर कुठे मिळते, हे विचारले. त्याने एका बाजारातल्या एका दुकानाचे नाव सांगितले आणि पुढच्या रविवारी माझ्याबरोबर त्या दुकानात येण्याची तयारीही दाखवली. मला दुकानदार फसवतील याची

त्याला खात्रीच होती. त्याच्या आस्थेबद्दल मी त्याचे आभार मानले; पण मी आपली काळजी घेण्याइतका मोठा आहे, असे त्याला सांगितले. त्याने सांगितलेल्या दुकानात मी पोहोचलो. काळ्या काठाच्या मँचेस्टरमध्ये विणलेल्या धोतराची किंमत विचारल्यावर तत्परतेने उत्तर आले - "एक रुपया दहा आणे." मी त्याला म्हटले, "बाबूजी, कापड व्यापाऱ्याच्या मुलाला तुम्ही बनवू शकणार नाही." त्यावर, "केवढ्याला घेता?" असे त्याने विचारले. मी म्हटले, "दहा आणे." तो कबूल झाला. स्वच्छ धुतलेले काळ्या काठाचे धोतर काखोटीस मारून मी घरी पोहोचलो. मी जेव्हा माझ्या मित्राला ते दाखवले, तेव्हा कोणत्याही बंगाल्याने ह्याच किंमतीला घेतले असते, असा शेरा त्याने मारला. पण ही तर सुरुवात होती. खरा किस्सा पुढेच आहे. एकदा माझे नवे धोतर नेसून मी रस्त्यावरून चालत होतो. सत्तर वर्षांचे ओझे घेऊन वाकलेले एक बंगालीबाबू माझ्यापाशी आले. आपल्या खणखणीत आवाजात त्यांनी मला हटकले, "काळ्या काठाचं धोतर तुम्ही का नेसलात? हा तर शुद्ध बंगाली राष्ट्रीय पोषाख आहे." ते अधिकारवाणीने बोलत होते; पण त्यात कृत्रिमपणा जाणवत होता. "हे धोतर नेसून मी काही पाप किंवा गुन्हा केलाय का?" मी विचारले. "नाही. पण काळ्या काठाचं धोतर हा केवळ बंगाली राष्ट्रीय पोषाख आहे." ते हेका सोडीनात आणि मीही माघार घ्यायला तयार नव्हतो. असा संवाद तीन-चार मिनिटे चालला होता. शेवटी मी म्हणालो, "तुमच्या काळ्या काठाच्या धोतराला मी तुम्ही देता त्याहून अधिक मान देतो आणि त्याला भारतीय राष्ट्रीय पोषाख बनवून टाकतो." या तडजोडीने त्यांचे समाधान झाले असावे; पण तरी फुरंगटल्यासारखे ते निघून गेले. पुढे कित्येक वर्षे काळ्या काठाचे धोतर हाच माझा आवडता घरातला पोषाख होता. पण बंगालखेरीज इतर ठिकाणी मी धोतर नेसून कधीच बाहेर जात नसे.

एच्. एफ्. ब्लॅनफोर्ड आणि हवामान विभाग -

सिमला हे माझे कामाचे कायमचे ठिकाण होणार होते. त्याकरता कलकत्त्याला रामराम म्हणण्याची वेळ झाली होती. सिमल्याहून दैनिक हवामान अहवाल काढायचा होता. पंजाबात परत जाण्यापूर्वी मी आग्ऱ्याचा ताजमहाल बघून घेतला. तसेच एक आठवडा लाहोर आणि बेहरा येथे घालवला आणि नंतर १८८५ च्या एप्रिलमध्ये मी सिमल्याला जाऊन पोहोचलो. इंडिया सरकारची उन्हाळ्यातली राजधानी म्हणजे सिमला. माझे वरिष्ठ अधिकारी एच्. एफ्. ब्लॅनफोर्ड रजेवरून परतले होते. दोन प्रचंड इमारतींमध्ये इंडिया सरकारचे पुष्कळसे विभाग माववले होते. त्यापैकी एका इमारतीच्या सर्वात वरच्या म्हणजे सहाव्या मजल्यावर हवामान खात्याचे ऑफिस होते. त्याकरता चार प्रशस्त दालने होती. एका खोलीत कचेरी आणि बाकीच्या तीन खोल्यांतून श्री. ब्लॅनफोर्ड आणि त्यांचे दोन सहकारी बसत असत. आमच्या हवामान विभागाचा हा छोटासा भाग सिमल्यात होता. दहा-बारा कंप्युटर्स (गणितातली संगणन करणारी माणसे) व कारकून तिथे होते. दैनिक आणि मासिक हवामान अहवाल तयार करण्यासाठी ते पुरेसे होते. श्री. डलस यांचा एक ड्राफ्ट्स्मन होता. तो त्यांच्याच खोलीत बसत असे. इतर सर्वजण हवामानाचे अहवाल तयार करण्याच्या कामाकरिता होते; आणि दैनिक व मासिक हवामान अहवाल तयार करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली होती.

प्रथम कलकत्त्याहून काही कंप्यूटरांना सिमल्याला आणले. त्या कंप्यूटरांच्या जागी योग्य अशी स्थानीय माणसे - म्हणजे पंजाबी - नेमणे हे माझे पहिले काम होते. हे काम आवश्यक होते; कारण बंगाल्यांना सिमल्यात वर्षभर राहणे कष्टाचे झाले असते आणि त्यांच्या जागी येणाऱ्या पंजाबी माणसांना प्रशिक्षण दिल्यानंतरच बंगाली कंप्यूटरांना कलकत्त्याला परत पाठवणे शक्य होणार होते. पहिले दोन महिने दैनिक हवामान अहवाल प्रसिद्धीकरता पाठवण्यापूर्वी मला माझ्या वरिष्ठांना - म्हणजे श्री. ब्लॅनफोर्ड यांना - दाखववावा लागे. पण एक दिवस अहवाल तपासण्याचे श्री ब्लॅनफोर्ड यांनी साफ नाकारले. यापुढे अहवालाची संपूर्ण जबाबदारी मी घेतली पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. एका परीने मी माझे काम करायला पात्र झाल्याचा तो शिक्कामोर्तब होता; पण नव्या जबाबदारीच्या जाणिवेने माझे मन व्यापून टाकले. ह्या जाणिवेत दोन गोष्टी होत्या. एक म्हणजे, काही कारणाने मिळालेल्या माहितीवरून तयार केलेला अहवाल चुकीचा ठरण्याची भीती. दुसरी म्हणजे, आपली योग्यता सिद्ध करायला संधी मिळणार याबद्दल अभिमान. दैनिक हवामान अहवाल तयार करण्याकरिता हिंदुस्थान व ब्रह्मदेश येथील १२० केंद्रांकडून तेथील हवामान वातावरणाची माहिती कळविण्यात येई. ती माहिती आम्हाला तारेने पाठवीत. त्या ठिकाणांच्या हवामानाचे निरीक्षण करून त्यांच्या नोंदी आम्हाला मिळत आणि त्यांच्या आधारावर आम्ही हवामानाचा दैनिक अहवाल तयार करीत असू. संध्याकाळी साडेचार वाजेपर्यंत हा अहवाल तयार होत असे. मग तो सिमल्याला सरकारी छापखान्यात पाठवला जाई. त्याच वेळी त्या अहवालाचा सारांश तारेने हिंदुस्थानातल्या सगळ्या वृत्तपत्रांकडे पाठवला जाई.

खोलीत परतल्यावर आधी काय केले, तर ब्लॅनफोर्डनी बघायला नाकारलेला अहवाल फाडून टाकला. नवा कोरा अहवाल तयार करायला मला जवळ-जवळ अर्धा तास लागला. आम्हाला ठिकठिकाणाहून मिळालेल्या नोंदींशी तो पुन्हा-पुन्हा पडताळून पाहिला. माझी विधाने अत्यंत काळजीपूर्वक मांडण्याची मी दक्षता घेतली. आणि तरीही तो अहवाल छपाई विभागाकडे पाठवताना मला भीती वाटत होती. दुसऱ्या दिवशी तारीख-वारासह तो अहवाल छापून आला. त्याची एक प्रत मी श्री.ब्लॅनफोर्ड यांच्या टेबलावर ठेवली. त्याचे स्वागत कसे होणार, ह्या चिंतेत मी होतो. सुमारे अर्ध्या तासाने एक कागद दाखविण्याच्या निमित्ताने मी त्यांच्या खोलीत गेलो. खरे तर आजच्या हवामान अहवालाने त्यांचे समाधान झाले आहे की नाही, तेच मला बघायचे होते. त्यांच्याकडून चांगला किंवा वाईट असा कोणताच शेरा मिळाला नाही, तेव्हा आपल्या अहवालात गंभीर स्वरूपाची चूक नसावी, असे मी ठरविले. असे कितीतरी

दिवस गेले. हवामान अहवालातील एखाद्या मुद्द्यावर ते माझ्याशी केव्हातरी चर्चा करीत असत. अशा वेळी त्यांचा आविर्भाव चिडक्या वरिष्ठासारखा नसून प्रेमळ शिक्षकासारखा असे. एक दिवस ते चिडलेले दिसले. त्यांच्या बाबतीत हे अघटित होते. टेबलावरचा छापील अहवाल माझ्याकडे भिरकावीत ते म्हणाले, '' अशामुळे आपल्या विभागावर वृत्तपत्रं टीकेची झोड उठवतात.'' मी म्हणालो, ''त्या प्रांतात सर्व ठिकाणी दाबमापक खाली उतरला होता आणि कोष्टकं मात्र उलटेच आकडे सांगत होती.'' मग माझ्या अहवालातले विधान आणि त्या विधानाला आधारभूत असलेले कोष्टकातले आकडे यांच्यावर मी नजर टाकली. माझ्या लक्षात आले की, अहवालाने माझा घात केला होता. त्यातून सुटका होण्याचा प्रश्नच नव्हता. पण तरी मला आश्चर्य वाटत होते. एक शब्दही न बोलता मी माझ्या खोलीत परतलो. माझ्या अहवालाची मूळ प्रत मागवली. ती पाहिल्यावर मात्र मी सुटकेचा निःश्वास टाकला; कारण त्यात मिळालेली माहिती, त्यावरून बनविलेली कोष्टके आणि माझे विधान हे एकमेकांशी जुळत होते. जो घोटाळा झाला होता, तो छापखान्यात झाला होता. हे मी जेव्हा ब्लॅनफोर्ड यांच्या निदर्शनास आणून दिले, तेव्हा त्यांनी खेद व्यक्त केला व म्हणाले, ''तरी मला आश्चर्य वाटत होतं की, तुझ्यासारख्या काळजीपूर्वक काम करणाऱ्याकडून अशी चूक झालीच कशी ?'' त्यानंतर त्यांनी मला सांगितले, ''हे बघ लाला रुचिराम, छपाई विभागाला एक खरमरीत पत्र लिही आणि झाल्या गफलतीला जबाबदार अशा खिळे जुळवणाऱ्याच्या विरुद्ध कडक कारवाई करण्याची मागणी कर.''

मी माझ्या खोलीत आलो व त्यांनी सांगितलेले पत्र तयार करू लागलो. कडक कारवाईची मागणी केली, तर एक-दोघांची नोकरी जाण्याचा संभव होता, असा विचार करून झालेल्या चुकीला २ रुपये दंड करावा असे मी त्या पत्रात सुचविले. छपाई विभागाच्या अधिकाऱ्याकडे ते पत्र पाठवण्यापूर्वी मी ते ब्लॅनफोर्डसाहेबांना दाखवावे असे ठरविले.

त्यांनी सांगितलेल्या मागणीऐवजी मी केवळ दोन रुपये दंडाची मागणी केली होती, त्यामुळे ब्लॅनफोर्डांचा माझ्यावर रोष तर होणार नाही ना, अशी भीती बाळगूनच मी त्यांना ते दाखवले. ते पत्र वाचताना त्यांच्या तोंडावर उमटलेल्या वेदना व करुणा मी कधी विसरणार नाही. ते म्हणाले, ''लाला रुचिराम, दोन रुपये दंड हा त्या गरिबांना फार नाही का होणार? आधीच त्यांना इतके कमी पैसे मिळतात ! आठ आण्यांची शिक्षा सुचव.'' हे म्हणताना श्री. ब्लॅनफोर्ड अगदी रडकुंडीला आले होते. त्यांचा राग थोड्या वेळातच शमला होता. एवढेच नाही, तर त्या रागाचे रूपांतर गरीबांविषयीच्या कळवळ्यात झाले होते. दुसऱ्या दिवशी ती चूक कशी घडून आली ते त्यांना समजले आणि त्यांचा जीव भांड्यात पडला. वेळ वाचवण्याच्या हेतूने नेहमी लागणारे काही शब्द-समुच्चय अहवाल छापून झाल्यावर कंपोजीटर्स् (खिळे जुळविणारे कामगार) सोडवीत नसत (म्हणजे त्या शब्द-समुच्चयाचे खिळे विलग करीत नसत.) आधीच जुळवून ठेवीत असत उदा. 'दाबमापक खाली उतरतो आहे', 'दाबमापक वर चढतोय', 'तपमान वाढले आहे', वगैरे. नजरचुकीने छापताना चुकीचे वाक्य उचलले व लावले गेले. प्रूफ तपासणाऱ्याच्या नजरेतूनही चूक निसटली ह्याचे कारण त्याने तो मजकूर मूळ मजकुराशी ताडून पाहिला नव्हता. केवळ इंग्रजी बरोबर आहे आणि वाक्य अर्थवाही आहे एवढेच त्याने बघितले होते.

हळुवारपणा, गोड समंजसपणा, सदसद्विवेकबुद्धी, व्यक्तिशः निष्ठा, हाताखाली काम करणाऱ्यांविषयी कणव इत्यादी सर्व गुण श्री. ब्लॅनफोर्ड यांच्या ठायी होते. विभागप्रमुख कसे असावेत याविषयी आपली जी कल्पना असते, तसेच ते होते. अशा माणसाच्या छत्राखाली माझ्या कार्यजीवनाची सुरुवात झाली, हे नमूद करायला मला संतोष वाटत आहे. हवामान विभागात मी दोन वर्षे काम केले. त्या कालावधीत हवामानशास्त्राविषयी मला खूप काही शिकायला मिळाले. विशेषतः त्यात नवे संशोधन कोणत्या दिशेने चालले होते, त्यातून काय निष्पन्न होण्याचा संभव आहे

याबद्दल मला बरेच काही कळले. कित्येकदा मला श्री. ब्लॅनफोर्ड घरी बोलावत. रशिया, अमेरिका आणि इतर ठिकाणी झालेली निरीक्षणे, तेथील संशोधनाची परिणती यांच्याविषयी मला सांगत असत. तो तास फार सुखद असे. नव्याने हस्तगत झालेले एखादे उपकरण कसे काम करते, ते मला दाखवत. जगातल्या निरनिराळ्या ठिकाणच्या हवामानाचा कसा आंतर्संबंध असतो, ते समजावून देण्यावर त्यांचा भर असे. एका देशाच्या हवामानावर आजूबाजूच्या प्रदेशातील परिस्थितीचा कसा व किती परिणाम होत असतो, हे ते परोपरीने समजावून सांगत. ह्या साऱ्याचा माझ्या मनावर खोल ठसा उमटला. माझ्या ह्या सहृदय वरिष्ठाच्या माणुसकीबद्दल आता आणखी सांगण्याची जरुरी नाही. सगळे इंग्रज जर श्री. ब्लॅनफोर्ड यांच्यासारखे असते, तर इंग्रज व हिंदुस्थानी माणसांच्यामध्ये दुर्दैवाने आज जे सामाजिक आणि राजकीय संबंध आहेत, त्यापेक्षा ते कितीतरी वेगळे झाले असते. श्री. ब्लॅनफोर्ड व मी राजकारणावर कधी बोलत नसू. आमच्या बोलण्याचा विषय सर्वसामान्यपणे विज्ञान असे - विशेषतः हवामानशास्त्र. मला जे काय संशोधन करायचे आहे, त्याची पूर्वतयारी म्हणून या वयात पुस्तके वाचण्याची सवय मी लावून घ्यावी, असे मला पटवून देण्याचा ते प्रयत्न करीत असत आणि त्याकरिता ते अनेकदा मला पुस्तके आणि वेगवेगळे अहवाल वाचायला देत असत. अमुक एक प्रकारची कामे मी स्वतः करण्यापेक्षा, सहायकांकडून करून घ्यावीत; म्हणजे मला माझ्या अभ्यासाला अधिक वेळ देता येईल, असा सल्ला ते बरेचदा देत. त्या सल्ल्याचा उपयोग करून मी एक ब्रीदवाक्य बनवले होते - 'जे दुसऱ्यांकडून करवून घेता येते, ते काम स्वतः करू नये.'

आणखी काही आठवणी सांगून श्री. ब्लॅनफोर्ड यांना वाहिलेली ही आदरांजली पूर्ण करतो. ह्यातले प्रसंग क्षुल्लक वाटतील; पण ते या माणसाच्या सुशीलपणाविषयी पुष्कळ काही सांगून जातात. त्या दिवसांत हिंदुस्थानी माणसाला हाक मारण्याकरता 'की हाय' हा शब्दप्रयोग इंग्रजी

भाषेत रूढ झाला होता; पण माझे साहेब खुर्चीवर बसून मला कधीही ओरडून हाक मारत नसत. त्यांनी कधी मला बोलवायला चपराशालाही पाठविले नाही. जेव्हा मला बोलवायचे असेल, तेव्हा आपल्या खुर्चीवरून उठून ते आमच्या दोघांच्या खोल्यांमधला दरवाजा उघडत व हलकेच 'लाला रुचिराम' अशी हाक मारत. हाक ऐकून मी लगेचच त्यांच्या टेबलापाशी जाई. तिथे माझ्यासाठी नेहमी एक खुर्ची असे.

युरोपियांची अपमानास्पद वागणूक -

मला असे काही युरोपीय अधिकारी माहीत होते की त्यांना कुणी हिंदुस्थानी माणूस भेटायला गेला, की तो आत येण्यापूर्वी जवळपास असलेली खुर्ची आत नेऊन ठेवायला सांगत असत. उद्देश, आलेला माणूस उभा राहावा. मग सवडीने खुर्ची आणायला सांगत. तसेच उच्चपदस्थ हिंदुस्थानी माणसांना व्हरांड्यात वाट पाहत तिष्ठत ठेवणे हाही युरोपीय लोकांचा नित्याचा खेळ असे. अशा प्रसंगी चपराशामार्फत निरोप पाठवला जाई - "साहेब न्हाणीघरात आहेत." माझ्या मित्रांनी मला सांगितले, की चपराशी त्यांना साहेब मोरीत गेले आहेत म्हणून थांबायला सांगे; आणि त्या वेळी साहेब आपल्या खोलीच्या खिडकीच्या काचेतून त्यांच्याकडे डोकावून पाहत असल्याचे स्पष्ट दिसत असे. घराबाहेर वाट बघायला लावून अपमान झाल्यावर हिंदुस्थानी पाहुणा कसा वागतो हेच त्यांना बघायचे असे. थोडे अपवाद सोडले, तर इंग्रजांच्या व्हरांड्यातून टाकावू अशा खुर्च्या निवडून ठेवलेल्या असत. चपराशामार्फत त्या खुर्च्यांवर बसायला सांगण्यात येई. श्री. ब्लॅनफोर्ड यांची माझ्याशी असलेल्या वागणुकीचे बरोबर मूल्यमापन व्हावे, याकरता इतर युरोपीय लोकांची पद्धत सांगितली. मी जोडे घालून समोर गेल्याबद्दल श्री. ब्लॅनफोर्ड यांनी कधीही नापसंती दर्शवली नव्हती. वृत्तपत्रकारांच्या भाषेत 'जोडे-प्रश्न' हा युरोपीय आणि त्यांना भेटायला येणारे हिंदुस्थानी यांच्यातील सततच्या वैमनस्याचे कारण होत असे - अगदी कचेरीत

लोकदेखील ! यावरून मला एकदा बोलणी खावी लागली होती. शाळांच्या इन्स्पेक्टरांबरोबर मी सार्वजनिक शिक्षण निदेशकांकडे गेलो होतो. इंग्रजांना आदर दाखविण्याच्या विषयात ते माझ्यापेक्षा पुष्कळच जाणकार होते. त्यांनी कचेरीत शिरण्यापूर्वी जोडे तर काढलेच; पण ते कुणाच्या नजरेस पडणार नाहीत अशा बेताने व्हरांड्यातल्या दूरच्या कोपऱ्यात नेऊन ठेवले. ते बघून निदेशकसाहेब मला म्हणाले, "इतर अधिकारी नेहमी दाखवतात तसा आदर तू वरिष्ठांना दाखवत नाहीस." आपला आत्मसन्मान खर्ची घालून कुणाला आदर दाखविण्याचा प्रयत्न मी पूर्वी केला नव्हता आणि भविष्यातही करण्याचा माझा इरादा नव्हता. मी केवळ हसून गप्प राहिलो.

हवामान विभागाच्या शेजारीच सर्वेक्षण विभागाच्या प्रमुखांची कचेरी होती. तिथल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना तर इंडिया सरकारच्या विज्ञान विभागात कुणी नेटिव्ह जबाबदारीचे काम करीत आहे हे सहन होत नसे. मी व्हरांड्यातून त्यांच्या अंगावरून जाताना हे अधिकारी एखादा नापसंतीचा आविर्भाव किंवा एखादे विधान - मला कळावे अशा रीतीने - करीत. अशा वेळी मीही मान ताठ ठेवून एखादे चपखल उत्तर पुटपुटत असे. पण त्याविषयी माझ्या वरिष्ठांना मी कधी सांगितले नाही. फार संवेदनशील राहण्यात अर्थ नाही; पण अपमान सहन करण्याचेही कारण नाही, असे माझे धोरण असे. चीड आणणाऱ्या अनुभवांबाबत तक्रार करायची नाही; पण सडेतोड उत्तर देऊन किंवा तशा वागणुकीने प्रसंग पार पाडायचा, असा नियमच मी स्वतःला घालून घेतला होता. या नियमापासून मी कधी ढळलो (किंवा नाइलाजाने ढळावे लागले), तर माझ्या मनाला शांती मिळत नसे. आणि शांती मिळणे तर आवश्यक होते.

अलाहाबादहून 'पायोनियर' नावाचे वृत्तपत्र प्रसिद्ध होत असे. मी हवामान खात्यात नोकरी करीत असताना माझ्यावर या वृत्तपत्रातून जालीम टीका करण्यात येत असे. एका लेखात तर "उपलब्ध माहितीच्या आधारावर मी हवामानाचे अचूक अनुमान करायला हवे तसे ते मी केले नाही." अशी तक्रार केली होती. तेवढ्यावर लेखक थांबले नव्हते. पुढे जाऊन "वैज्ञानिक क्षेत्रातल्या असा जबाबदारीच्या जागेवर नेटिव्हची नेमणूक करण्याची वेळ अजून आलेली नाही." अशी पुस्ती जोडली होती. नंतर त्या लेखकाने मनाचा मोठेपणा दाखवून स्पष्ट केले होते - "या अवघड आणि जबाबदारीच्या कामावर नेमणूक झालेल्या त्या विशिष्ट व्यक्तीविषयी माझी तक्रार नाही; पण अशा कामाकरता केवळ युरोपीय व्यक्तीच पात्र ठरू शकतात." शेवटी - "आणि हे दैनिक अहवाल परदेशात पाठवले जातात. ह्या देशांत रशिया हा एक देश आहे. अहवाल बनविण्याचे काम एक नेटिव्ह करतो हे कळल्यावर त्यांच्या मनात इंडिया सरकारबद्दल काहीच आदर राहणार नाही." असे लिहून तो लेख संपवला होता. तो अपमानकारक लेख मी श्री. ब्लॅनफोर्डना दाखवला; आणि त्याला उत्तर लिहिण्याची परवानगी मागितली. आपल्याकडे येणारी माहिती अपुरी असते आणि अनुमान अचूक येण्याची बरीच शक्यता असल्याशिवाय अनुमान करू नये अशी त्यांचीच - म्हणजे श्री.ब्लॅनफोर्ड यांचीच - सूचना होती, याचीही मी त्यांना त्या वेळी आठवण करून दिली. टीकाकार जर शास्त्रज्ञ नसेल, तर अशा वृत्तपत्रीय वादात पडायचे नाही, असा त्यांचा नियम होता. त्यामुळे गप्प बसण्याखेरीज मला दुसरा उपाय राहिला नाही. आपल्या कृतीचे समर्थन करण्याकरता युवक नेहमी अधीर होत असतात आणि मीही त्याला अपवाद नव्हतो.

लवकरच मासिक अहवाल करण्याची वेळ आली. त्याबरोबर एका मुद्यावर तपशीलवार चर्चा करण्याची मला संधी मिळाली. त्या मुद्यांचा 'पायोनियर'मध्ये उल्लेख होता; पण त्या वृत्तपत्राचे नाव मी त्या चर्चेत घेतले नाही. मासिक अहवाल सादर करताना त्या मुद्यांकडे त्यांचे लक्ष वेधून, त्यातील माझी विधाने तशीच राहू द्यावीत अशी मी त्यांना विनंती केली. त्याबरोबरच "तुम्हाला आवश्यक वाटल्यास योग्य ते बदल किंवा सुधारणा करा." अशीही विनंती केली.

अहवाल वाचून छापण्याकरिता त्यांनी माझ्याकडे परत पाठवला. ज्या

रीतीने मी त्या केसमधल्या घटना मांडल्या होत्या, त्याबद्दल त्यांनी माझे मनापासून अभिनंदन केले. छपाईला देण्याकरिता अहवालाखाली त्याला पुष्टी देणारी एक नोंदही लिहिली.

काही महिन्यांनंतर ते फिरतीवर जाऊन सिमल्याला परतले, तेव्हा त्यांनी मला विचारले, ''तुझ्यावर टीकेची झोड उठविणाऱ्या लेखकाचं नाव तुला ठाऊक आहे का?''

''ते जाणून घेण्याचे माझ्याकडे काही साधन नाही.'' असे मी उत्तर दिले. त्यावर ज्या श्री.हिल यांनी माझी या जागेकरता नेमणूक केली, त्या हिलनीच ते लेख लिहिल्याचे त्यांनी मला सांगितले. हे श्री.हिल म्यूझर कॉलेजमध्ये पदार्थविज्ञानाचे प्राध्यापक होते. शिवाय ईशान्य प्रदेशाचे प्रांतीय रिपोर्टरही होते. त्यांना एक खरमरीत पत्र लिहिल्याचे श्री. ब्लॅनफोर्डनी मला सांगितले.

चक्री वादळाची पूर्वसूचना -

माझ्या एकट्याच्या जबाबदारीवर मी एकदा उत्तर बंगालातील सर्व बंदरांकडे धोक्याचे इशारे पाठवले. त्या वेळी ओरिसा हा बंगालचाच भाग होता. हवामान विभागातील माझ्या कारकीर्दीतली ती सर्वांत महत्त्वाची घटना ठरली. सकाळी कचेरीत गेल्यावर नेहमीप्रमाणे मी हवामान अहवालांचे तक्ते मागवले. ते तपासताना डायमंड हार्बर येथील वातावरणीय दाब एकाएकी वेगाने खाली आल्याचे नमूद केलेले आढळले. त्याचे कारण किंवा स्पष्टीकरण सापडेल असे काही आजूबाजूच्या केंद्रांतून आलेल्या रिपोर्टांमध्ये नमूद केलेले नव्हते. श्री. ब्लॅनफोर्ड आणि डलस दोघेही त्या वेळी कलकत्त्याला गेले होते. सिमल्यात मी एकटाच होतो. मी ताबडतोब डायमंड हार्बरच्या निरीक्षकाला तार पाठवून हवामानाचा ताजा रिपोर्ट मागवून घेतला. मोठे वादळ येत आहे, अशी मला शंका आली होती, ती त्या नव्या रिपोर्टवरून दृढ झाली. ''मी सांगेपर्यंत वेधशाळा सोडू नकोस आणि प्रत्येक तासाला तिथल्या वातावरणाची परिस्थिती कळवत रहा.'' असा तातडीचा निरोप त्याला पाठवला. थोड्या वेळानंतर आजूबाजूच्या दोन-तीन केंद्रांनाही तसेच करायला सांगितले. दरम्यान मी पूर्वीच्या वादळांचे रिपोर्ट काढून त्यांचा झटपट अभ्यास करू लागलो; आणि मोठे वादळ किनाऱ्याकडे येत असल्याबद्दल माझी जेव्हा खात्री झाली, तेव्हा मी तातडीने धोक्याचे इशारे पाठवून दिले.

धोक्याचे इशारे पाठवल्यानंतर मी एक लांबच लांब तार कलकत्त्याला श्री. ब्लॅनफोर्डना पाठवली. त्यात मला मिळालेल्या रिपोर्टांतले महत्त्वाचे गुणविशेष लिहिले; आणि मी काय व का केले, हेही लिहिले. या घटनेनंतर कित्येक दिवसांनी कलकत्त्यातल्या ऑफिसमधील एका माणसाने मला सर्व हकीगत सांगितली. माझी तार मिळाल्यानंतर काही वेळात ब्लॅनफोर्ड अस्वस्थ झाले. त्यानंतर ते प्रा. पेडलर यांच्याकडे गेले आणि मोठ्या वादळाबद्दल त्यांना काही कळले आहे का, ते विचारू लागले. बंगालचा हवामान रिपोर्टर म्हणून प्रा. पेडलर काम बघत असत. त्याकरता त्यांना बंगालमधील केंद्रांकडून रिपोर्ट मिळत असत. ते दुसरे-तिसरे काही नसून जे रिपोर्ट आम्हाला सिमल्याला रोज सकाळी मिळत, त्यांच्याच प्रती असत. या येणाऱ्या वादळाबद्दल प्रा. पेडलरांना काहीच कल्पना नव्हती. खरे तर त्यांनी तोपर्यंत रिपोर्ट पाहिलेही नव्हते. मागे सांगितल्याप्रमाणे प्रा.पेडलर अनेक उद्योग करीत. प्रेसिडेन्सी कॉलेजात ते रसायनशास्त्राचे प्राध्यापक होते. कलकत्ता नगरपालिकेचे ते विश्लेषक होते. बंगाल सरकारच्या हवामान विभागाचे रिपोर्टर होते. त्याशिवाय कलकत्त्यातल्या आयात करणाऱ्या मोठ्या संस्थांकरता मद्य व औषधांचे विश्लेषक म्हणूनही ते खासगी व्यवसाय करीत. ब्लॅनफोर्डच्या सूचनेवरून प्रा. पेडलरांनी त्यांच्या हुकमतीतल्या सर्व केंद्रांना (जी केंद्रे माझ्या सांगण्यावरून मला दर ताशी रिपोर्ट पाठवीत होती.) त्या सर्व रिपोर्टांच्या नकला पाठवायचा हुकूम केला. ह्या वेळेपर्यंत वादळाची तीव्रता खूपच वाढली होती आणि ते किनाऱ्यावर धडकू लागले होते. ज्या रिपोर्टांनी माझ्या मनात वादळाची

शंका उद्भवली होती, तो रिपोर्ट मला मिळाला तेव्हा वादळ किनाऱ्याहून खूप दूर होते. ज्या-ज्या घटना श्री. ब्लॅनफोर्डना व प्रा.पेडलरना मिळाल्या, त्याच घटनांवरून मी वादळाचे अचूक अनुमान बांधले आणि धोक्याच्या सूचना पाठवून दिल्या होत्या. ते बरोबरच केले अशी त्यांची खात्री पटली.

कालांतराने 'फॉल्स पॉइंट सायक्लोन' या शीर्षकाखाली जो पेपर प्रसिद्ध झाला, त्याचा विषय म्हणजे हेच वादळ होते, असा माझा कयास आहे.

आणखी एक वादळ -

सिमल्यातल्या पहिल्या वर्षाच्या हिवाळ्यात माझ्या सहाय्यकांनी एक मोठे वादळ उठवून दिले आणि त्याचा मुकाबला मलाच करावा लागला. तारेने पाठविण्यात आलेल्या निरीक्षण केलेल्या आकड्यात एक नवी सुधारणा करण्याचा हुकूम कलकत्त्याहून आला होता. आमच्या कंप्यूटर लोकांना आधीच वाजवीपेक्षा अधिक काम करावे लागे. ह्या हुकुमामुळे त्यांचे काम एक तासाने वाढणार होते, अशी कंप्यूटरांची समजूत झाली. ते इतके न वाढता थोडेच वाढेल, असे मी त्यांना समजावून सांगितले; पण ते ऐकेनात व सगळ्यांनी एकदम आपले राजीनामे सादर केले. कंप्यूटरांचा प्रमुख होता जलंदरचा अल्ला बक्ष आणि त्याच्या खालचा होता अमरसिंग. हे दोघे सर्वांचे पुढारी झाले. काही महिन्यांपूर्वी मीच त्या दोघांची नेमणूक केली होती आणि त्यांना इतरांपेक्षा वरचढ जागा दिल्या होत्या. मी त्या सगळ्यांना जितका चुचकारू लागलो, तितके ते अधिक आग्रही होत गेले. परिस्थिती बिकट होती. अधून-मधून बर्फ पडत होता; त्यामुळे कलकत्त्याहून माणसे आणायचा प्रश्नच उद्भवत नव्हता. जाहिरात देऊन नवीन माणसे नेमणे आणि त्यांना प्रशिक्षण देणे हेही कठीण होते. काही झाले तरी धमक्यांना बधायचे नाही, असे मी ठरविले. राजीनाम्यांबद्दल पुनर्विचार करण्याकरता मी त्यांना चोवीस तास दिले. त्यानंतर त्या सर्वांचे राजीनामे स्वीकारीन, एवढेच नव्हे, तर नोटिशीचा कालही १ महिन्याऐवजी

१५ दिवस करीन असे मी त्यांना आश्वासन दिले. तेवढ्या वेळात त्या दोघांचे काम शिकून घ्यायचे आणि त्यांचा सराव करण्याचा मी निश्चय केला. म्हणजे ते गेल्यावर त्यांच्या जागी आलेल्या माणसांना प्रशिक्षण द्यायला मी कचरत नाही हे त्यांच्या लक्षात येईल, असा माझा हेतू होता. दुसऱ्या दिवशी 'राजीनामे मागे घेत आहात का ?' असे विचारले, तेव्हा त्यांचे नकारार्थी उत्तर आले. मी अल्लाबक्षला त्याचे कागद दाखवायला सांगितले. दिवसातून तो किती तास काम करतो, ते मला बघायचे होते. नंतर त्याला जवळ उभे करून मी त्याचे काम करू लागलो. जवळ-जवळ पाऊण तास तो माझे काम बघत होता. त्याचे काम करण्यात मला काही अडचण तर येत नव्हतीच; पण ते काम मी त्याच्याहीपेक्षा जलद गतीने करीत होतो हे त्याच्या लक्षात आले. तो जरा अस्वस्थ झाला. त्याच्या कामाचा आढावा घेऊन मी त्याला म्हटले, "ह्या कामाकरता तुला तीन तासांपेक्षा अधिक वेळ लागण्याचे कारण नाही." आणि मग मी म्हटले, "राजिनाम्याकरता लागणाऱ्या नोटिशीच्या काळाच्याऐवजी एका महिन्याच्या पगारावर पाणी सोडायला तयार असाल, तर मी त्याला आणि अमरसिंगला लगेच सोडून देतो. जोवर नवीन माणसांना प्रशिक्षण देऊ शकणार नाही, तोवर मी त्यांचं काम करून टाकेन." आणि मग मी त्यांना बरेच सुनावले. ते इथे देण्याचे कारण नाही. त्यांनी आपला हेका सोडला नाही, तर मी त्या दोघांना सुट्टी द्यायला मागे-पुढे पाहणार नाही; आणि त्यात त्यांचा तोटा आहे हे लक्षात यायला अल्लाबक्षला वेळ लागला नाही. राजीनामा मागे घ्यायला परवानगी द्या, अशी तो माझी विनवणी करू लागला. त्याचा राजीनामा आता कामाच्या रेकॉर्डवर गेला आहे. पण नव्याने अर्ज केला, तर मी जरूर विचार करीन, असे मी त्याला सांगितले. त्याने तसे केले व मीही त्याचा राजीनामा रद्द केला. त्यानंतर अमरसिंगनेही तसाच अर्ज केला, त्याचा परिणामही तसाच झाला. मग बाकीच्या सहाय्यकांना बोलावणे पाठवून त्यांच्याकडून सामूहिक अर्ज लिहून घेतला. तो अर्ज स्वीकारताना मी त्यांना समज दिली की, पुन्हा असा प्रकार झाला,

तर ह्या वेळची त्यांची वर्तणूक लक्षात घेऊन मी त्यांना कामावरून काढून टाकीन. तसेच सरकारी नोकरीतून काढून टाकलेल्या माणसाला इतर कुठेही सरकारी नोकरीत भरती होता येत नाही, याचीही त्यांना जाणीव करून दिली. समस्या सहज सुटली म्हणून मला आनंद झाला. खरे सांगायचे तर कडक कारवाई करण्याचे माझ्या मनात नव्हते; आणि तशा निर्णयासाठी श्री. ब्लॅनफोर्ड यांच्याकडे जावे लागले असते आणि तेच मला शक्य तोवर टाळायचे होते.

त्या हिवाळ्यात आणखी एक मनोरंजक घटना घडली. दूरवरच्या बर्फाच्छादित पर्वतरांगांकडे रोज पाहून बर्फाचे आच्छादन खाली उतरल्याचे माझ्या लक्षात आले. हवामान अहवालात ह्याचा उल्लेख करायचा आणि नंतर हे आच्छादन कोणत्या पातळीपर्यंत उतरले आहे तेही द्यायचे, असे मी ठरविले. त्याकरता जाको शिखरावरून काही निरीक्षणे घ्यावीत ह्या हेतूने मी एक दिवस निघालो. डोंगराच्या मागच्या बाजूने एका पायवाटेने चढण्याचे मी का ठरवले, हे मला आठवत नाही; पण तसा चढलो हे खरे. प्रिझ्मॅटिक होकायंत्र मी गळ्यात अडकवले होते. नुकत्याच झालेल्या पाऊस आणि बर्फ ह्यांच्या मिश्रणाने रस्ता निसरडा झाला होता आणि पाचोळ्यामुळे तो झाकलाही गेला होता. म्हणून मी तो चढ रांगतच चढू लागलो. नजरचुकीने होकायंत्राची केस उघडी राहिली होती. मी रांगून चढत असतानाच केसमधून होकायंत्र निसटले आणि घरंगळत खाली जाऊ लागले. घरंगळताना होकायंत्राचे झाकण मध्येच थांबले; पण होकायंत्र मात्र घसरत राहिले व एका खळग्यात जाऊन पडले. खाली जाऊन मी झाकण उचलले आणि ज्या दोन झाडांच्या मधून होकायंत्र खाली जाताना मी पाहिले होते, त्या झाडांपाशी दोन दगड ठेवले. मी तिथे एकटाच होतो; पण मग कचेरीत जाऊन मी एका शिपायाला घेऊन आलो. ज्या झाडांच्या मधून होकायंत्र होकायंत्र घसरत गेले, त्या झाडापाशी त्याला उभे केले. मग मी प्रथम जिथे उभा होतो, तिथे गेलो आणि माझ्या जवळचे झाकण

त्या झाडांच्या मधून जाईल अशा बेताने खाली सोडून ते झाकण कुठून जात होते, हे त्या शिपायाने बघून ठेवले. ते झाकण जेव्हा दिसेनासे झाले, तेव्हा मी शिपायाला झाकणाच्या दिशेने जाऊन झाकण व होकायंत्र शोधायला पाठवून दिले. माझ्या अपेक्षेप्रमाणे त्या दोन्ही गोष्टी एकमेकांपासून थोड्या अंतरावर पडलेल्या मिळाल्या. होकायंत्र हरवले आहे, असे वरिष्ठांना सांगण्याची पाळी आली नाही म्हणून मी आनंदलो. ती एक केवळ २० ते २५ रुपयांची गोष्ट नव्हती; तर त्यातून माझा निष्काळजीपणा दिसला असता. ज्याला वरिष्ठांची मर्जी राखायची महत्त्वाकांक्षा असते, त्याच्यावर तशी वेळ न असलेली बरी. पण तरी मी घडलेला सर्व प्रसंग श्री. ब्लॅनफोर्डना पत्रातून कळवला. होकायंत्र परत कसे मिळवले या पार्श्वभूमीवर ती गोष्ट मोठी रोचक झाली; आणि बोलणी बसण्याऐवजी अभिनंदनच माझ्या पदरात पडले.

नेटिव्हद्वेष्टा जॉन इलियट -

हवामान विभागात नोकरी करण्याचा माझा काळ संपत आला. १८८६ च्या उन्हाळ्यात केव्हा तरी प्रा.ओमान यांचे पत्र आले. कॉलेजात असिस्टंट प्राध्यापकाच्या जागेवर माझी नेमणूक करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी मला कळवले होते. माझा पगार सुरुवातीला २०० रु. असेल व तो ३५० रु.पर्यंत वाढू शकेल असे ठरविण्यात आले होते. अर्थात् माझ्याकडून अर्ज गेल्यानंतरच मला नेमणुकीचे पत्र मिळेल असेही त्यांनी मला लिहिले होते. ते पत्र मी श्री. ब्लॅनफोर्ड यांना दाखविले. विभागाला माझा चांगला उपयोग होऊ लागल्यावर लगेच मी विभाग सोडून जाणार, ही कल्पना त्यांना फारशी पसंत पडली नाही. मला मिळणाऱ्या कमी पगाराबद्दल सहानुभूती दाखवून त्यांनी माझ्या श्रेणीचा पुनर्विचार करण्याचे अभिवचन दिले. त्यांना सोडून जाण्यात मला वाईट वाटत असल्याचे मी त्यांना सांगितले. ते लवकरच सेवानिवृत्त होतील आणि त्यांच्यानंतर येणाऱ्या श्री. जॉन एलियट यांच्याशी माझे कसे जमेल,

याबद्दल मी साशंक असल्याचे मी त्यांना सांगितले. जॉन एलियट हे पक्के नेटिव्हद्वेष्टे असल्याचे मला माहीत होते. माझ्या बंगाली मित्रांनी त्या गोष्टीचा अनेकदा उल्लेख केला होता आणि त्याकरताच त्यांनी एलियटना 'नेटिव्हद्वेष्टा' हा किताब दिला होता म्हणा ना ! मोठ्या मिनतवारीने श्री. ब्लॅनफोर्ड यांच्याकडून लाहोरच्या त्या जागेसाठी अर्ज करण्याची संमती मिळवली. ते एका अटीवर कबूल झाले. ते म्हणजे त्या आर्थिक वर्षा-अखेरीपर्यंत मी विभाग सोडायचा नाही. त्याच सुमाराला ते स्वतःही आपली सूत्रे सोडणार होते. माझ्या अर्जाला कालांतराने उत्तर आले. त्यात मार्च महिन्याच्या अखेरीस मी रुजू व्हावे असे म्हटले होते.

श्री. एलियटनी प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये मिळवलेली ख्याती योग्यच होती. मला स्वतःलाही त्याचा अनुभव आला. गव्हर्नमेंट कॉलेजला उन्हाळ्याची सुट्टी पडली (जुलै ते सप्टेंबर १८८७), तेव्हा मी सिमल्याला गेलो. त्या मुक्कामात एकदा मी श्री. एलियटना भेटायला गेलो. त्यांनी मला बसायला सांगितले नाही. आणि अर्थात् तिथे रिकामी खुर्चीही नव्हती. गेल्या-गेल्या त्यांनी मला विचारले, ''काय हवंय?''

''मी इथे केलेल्या कामाचा एक त्रोटक आढावा तुम्ही पंजाब शिक्षण विभागाकडे पाठवू शकाल का?'' मी विचारले. यावर त्यांनी कमालीचे अपमानकारक उत्तर दिले. उगीचच रागावून ते म्हणाले, ''तुझ्यासाठी श्री. ब्लॅनफोर्डनी एक खास छडी ठेवल्याचे माझ्या ऐकण्यात नाही.'' मी तत्काळ उत्तरलो, ''तुमच्या छडीच्या कक्षेबाहेर मी गेलो आहे हे काय थोडं समाधान आहे !'' व बाहेर निघून गेलो. त्यांच्या हाताखाली काम करण्यापूर्वीच मी विभाग सोडला हे माझे भाग्य होते, असे मला वाटू लागले.

त्यांना भेटायला जाण्यात माझा धोरणीपणा कमी पडला अशी टोचणी मला लागून राहिली. पण धोरण वयाबरोबर येते. श्री. ब्लॅनफोर्डसारख्या माणसाच्या हाताखाली काम केल्यानंतर (जरी मी एलियटविषयी पुष्कळ ऐकले होते, तरीही) त्यांच्या जागी इतका हलकट माणूस येईल, याची

मला यत्किंचितही कल्पना आली नाही. चुका ह्याच आपल्या खऱ्या शाळा असतात. बरे झाले की, आयुष्याच्या सुरुवातीच्या काळात मी एक बहुमूल्य धडा शिकलो. नाण्याला परस्परविरोधी दोन बाजू असतात. इथे एका बाजूचे प्रतिनिधी होते श्री. ब्लॅनफोर्ड; तर दुसरीचे श्री. एलियट.



पंजाब शिक्षण विभागातले माझे दिवस

सन १८८७ च्या मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मी सिमला सोडले आणि लाहोरच्या सरकारी कॉलेजमध्ये विज्ञानाचा असिस्टंट प्राध्यापक म्हणून २९ मार्च रोजी रुजू झालो. तिथे काम सुरू केल्यावर थोड्याच दिवसांत प्रा.ओमान दोन वर्षांच्या प्रदीर्घ रजेवर गेले. ते गेल्यामुळे माझ्यावर बरीच जबाबदारी येऊन पडली. रसायनशास्त्र विभागाचे संपूर्ण काम माझ्याकडे आले. पदवीकरता शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या तशी फार नव्हती. मला वाटते, तिसऱ्या व चौथ्या वर्षांना मिळून तिसापेक्षा अधिक विद्यार्थी नव्हते; आणि एम्. ए.करता तर एकच विद्यार्थी होता.


ह्या माझ्या एकुलत्या एक विद्यार्थ्याचे नाव होते - श्री.जगन नाथ. त्यांना एक वर्षाकरता शिष्यवृत्ती मिळाली होती आणि शिष्यवृत्तीशिवाय दुसरे वर्ष कॉलेजमध्ये शिकणे त्यांना परवडण्यासारखे नव्हते. बी.ए.करता रसायनशास्त्र हा विषय त्यांनी घेतला नव्हता; पण तो विषय शिकण्याची त्यांची जबरदस्त इच्छा होती. एम्.ए. या पदवीची त्यांना फारशी पर्वा नव्हती. रसायनशास्त्रात एम्.ए. करून चांगली नोकरी मिळवावी असाही त्यांचा उद्देश नव्हता. केवळ हौस म्हणून रसायनशास्त्र शिकावे आणि नंतर एखाद्या उद्योग सुरू करावा असा त्यांचा विचार होता. तो विषय शिकण्याचा त्यांचा उत्साह पाहून त्यांना शिकवण्यात मलाही रस वाटे.

सुरुवातीला ते बरेचदा बी.ए.च्या वर्गातही बसत असत. ते वर्ष त्यांनी माझ्याबरोबर घालवले. इंटरमीजिएट आणि पदवीच्या वर्गांसाठी बरेच प्रयोग तयार करावे लागत; त्यात मला श्री.जगन नाथ यांची मदत होई.

सरकारी कॉलेजमध्ये घालवलेल्या वेळेचा जगन नाथने इतका उत्तम विनियोग केला, की कॉलेज संपल्यावर लगेचच त्यांना नोकरी मिळाली. प्रथम त्यांची लाहोरच्या डी.ए.व्ही. कॉलेजमध्ये आणि नंतर अमृतसरच्या खालसा कॉलेजमध्ये रसायनशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. आपल्या साध्या राहणीमुळे त्यांनी थोडे-फार पैसे जमविले व सेवानिवृत्तीनंतर ते राजपुतान्यातील आपल्या गावी राहायला गेले. त्यांच्याबद्दल मला जे कळले, त्याने मला फार बरे वाटले. अतिशय साधेपणाने राहून ते आपला सारा वेळ धर्माच्या अभ्यासात खर्च करू लागले. साभूर तलावाच्या ठिकाणी यात्रेला आलेल्यांना ते प्रबोधन करीत, सामाजिक सेवेची कामे करीत आणि शक्य होईल तेवढी गरिबांना मदत करीत. आपल्या चरितार्थाकरता कुणावरही अवलंबून न राहता ते आपल्याच बचतीवर जीवन कंठीत होते. त्यांचा उद्योग सुरू करण्याचा जो मानस होता, त्याला ही जीवनशैली अगदीच विसंगत होती हे खरे; पण हिंदुस्थानात अशा प्रकारचा मार्गबदल इतक्या ठिकाणी दिसून येतो आणि, त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही राहत नाही.

प्रात्यक्षिके व व्याख्याने यांची तयारी -

कॉलेजमध्ये शिकवायला लागल्यापासून पहिली पाच वर्षे मी फार नियमबद्ध घालवली. विद्यार्थ्यांना दाखविण्याच्या प्रयोगांबाबत माझा नियम असा होता : प्रत्येक प्रयोग विद्यार्थ्यांना दाखविण्यापूर्वी एक आठवडा तयार असला पाहिजे. त्याकरता तो प्रयोग किंवा प्रात्यक्षिक ओळीने तीन वेळा अचूक आणि उत्कृष्ट झाले पाहिजे. हा नियम मी काटेखोरपणे पाळत असे. समजा, एखाद्या प्रयोगाचे उत्तर तिसऱ्या वेळी चुकीचे आले, तर तो प्रयोग मी पुन्हा तीन वेळा ओळीने अचूक येईपर्यंत करीत असे, तेव्हाच माझे



वर्गात प्रयोग शिकवण्यासाठी आदल्या दिवशीची पूर्वतयारी

समाधान होई. फॅरडेंनी नवशिक्यांकरता केलेल्या सूचनांबरहुकूम मी बारीक-सारीक तपशिलांकडे लक्ष पुरवीत असे. एखाद्या दिवशी मला तीन ठिकाणी तीन प्रयोग-प्रात्यक्षिके करायची असतील आणि तीनही वेळा मला काडेपेटी लागणार असेल, तर प्रत्येक टेबलावर मी एकेक काडेपेटी ठेवीत असे. शिवाय माझ्या खिशात मी नेहमीच काडेपेटी बाळगत असे; म्हणजे काही रासायनिक कृती दाखवण्याची वेळ आली, तर काडेपेटी मागावी लागत नसे. अशा तयारीमुळे मला आत्मविश्वास आला. नंतरच्या काळात प्रयोगांच्या तयारीकरता मला फारसे कष्ट घ्यावे लागत नसत. आदल्या दिवशी सर्व सामग्री टेबलावर लावून ठेवली की पुरेसे होई. हां, आता एखादा प्रयोग क्लिष्ट असेल व आयत्या वेळी काही समस्या निर्माण होण्याचा संभव असेल, तर गोष्ट निराळी !

आणखी एक गोष्ट : कॉलेजमधल्या दीर्घ कारकीर्दीत दुसऱ्या दिवशीच्या प्रयोगाची तयारी व्याख्यानाला अनुरूप आहे, ह्याची खात्री केल्याशिवाय मी कधी घरी गेलो नाही. बहुतेक सर्व प्रयोगांकरता आवश्यक त्या सामानाची तपशीलवार यादी माझा प्रयोगशाळा सहाय्यक तयार करून ठेवीत असे; पण घरी जाण्यापूर्वी दुसऱ्या दिवशीच्या व्याख्यानाला आवश्यक अशी सामग्री व्यवस्थित मांडली आहे हे प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय मला राहवायचे नाही.

हिवाळ्याच्या दिवसात माझ्या कॉलेजमध्ये जाण्याच्या वेळा असत - सकाळी साडेनऊ ते साडेअकरा व्याख्यानांकरता आणि दुपारी २ वाजता प्रात्याक्षिकांकरता. दुपारच्या जेवणानंतर एक तास झोपण्याची मला नितांत गरज वाटे. सबंध आयुष्यभर दुपारच्या जेवणानंतर झोप मला घेरून टाकी. तोच प्रकार जरा कमी प्रमाणात रात्रीच्या जेवणानंतर घडे. म्हणून रात्रीच्या जेवणानंतर मला माझी गादी जवळ आणि तयार असावी लागे. पुन्हा कामाकरता ताजातवाना होण्यासाठी एक तासाची झोप मला फार जरूर वाटे. जेव्हा कधी मला जेवणाच्या सुट्टीनंतर कामाला जावे लागे, तेव्हा मी जेवण न जेवता एक कपभर चहा पिऊन जात असे. अजूनही रात्री

जेवणानंतर मी लगेच झोपायला जातो. रात्रीच्या जेवणानंतर जर मी कधी बसून राहिलो, तर मला डुलक्या येऊ लागतात. मग कुटुंबातील कुणीतरी मला गादीवर जाऊन झोपा, असे सुचवतात.

एवढे सारे सांगण्याचे एक कारण आहे. वरिष्ठ प्राध्यापकांसकट सगळेजण आपली व्याख्याने सलग वेळात असावीत, असा आग्रह धरत. मी मात्र व्याख्यानाकरता दोनदा कॉलेजला जाण्याचे पसंत करीत असे. त्याचे स्पष्टीकरण म्हणून मी माझ्या व्यक्तिगत सवयींचा पाढा वाचून दाखवला.

कॉलेजच्या पहिल्या पाच वर्षांत मी सर्वाधिक कष्ट केले. मी सतत कामात असे. नव्याने स्थापन केलेल्या पंजाब विज्ञान संस्था-कार्यशाळा यांच्यासाठी आणि माझ्या अध्यापनाव्यतिरिक्त कार्यक्रमासाठी मला बराच वेळ द्यावा लागे. त्याशिवाय अध्यापनाच्या कामात मी दिवसाचे दहा तास घालवीत असे. जेव्हा मी इतके तास अध्यापनाकरता घालवीत असे, असे म्हणतो, तेव्हा त्यात रविवार आणि सुट्ट्याही धरलेल्या असतात. त्यात जराही अतिशयोक्ती नाही. विद्यार्थ्यांना दाखविण्यापूर्वी माझ्या प्रयोगांची प्रात्यक्षिके पुन्हा-पुन्हा करून बघण्याचा माझा परिपाठ मी पूर्वी सांगितला आहेच. साहजिकच माझ्या सहाय्यकाला माझ्याकरता अधिक वेळ द्यावा लागे. त्याकरता मी माझ्या खिशातून थोडी बिदागी त्याला देत असे. पहिल्या वर्षी माझे मित्र श्री. जगन नाथ यांच्या सहकार्याचा मला लाभ झाला. बी.ए.करता त्यांनी रसायनशास्त्र न घेतल्याने, त्याची उणीव भरून काढण्यासाठी ते परिश्रम घेत असत. ते करत असताना माझ्या व्याख्यानांच्या, तसेच प्रात्यक्षिकांच्या तयारीकरताही ते हसतमुखाने मदत करीत. त्याबद्दल मी त्यांच्या सदैव ऋणी असे.

विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त प्रात्यक्षिके दाखवण्याचा माझा प्रघात होता. त्यामुळे मला व्याख्यानांच्या तयारीबरोबर प्रात्यक्षिकांचीही तयारी करावी लागे. त्याकरता बराच वेळ द्यावा लागे; पण त्याचे मला फार महत्त्व वाटत असे. पहिली दोन-तीन वर्षे माझ्या व्याख्यानांचा सारांश मी लिहून काढी.

वर्गात मी त्याकडे बघत नसे; पण ते कागद माझ्याबरोबर असत. तसेच काही अधिक महत्त्वाच्या गोष्टींची स्पष्टीकरणे वेगळ्या वहीत लिहून ठेवण्याचीही माझी सवय होती. त्याला 'क्लास नोट बुक' असा मथळा मी देत असे. त्या वहीतली स्पष्टीकरणे कधी मी वर्गात लिहून घ्यायला सांगत असे; तर कधी मी वही एका कोपऱ्यातल्या टेबलावर ठेवून देत असे. व्याख्यान संपल्यावर विद्यार्थ्यांनी ती वही वाचावी व महत्त्वाच्या गोष्टी उतरवून घ्याव्यात, असा माझा उद्देश असे. तसेच व्याख्यानातले मुद्दे एखाद्या चिठ्ठीवर अनुक्रमे लिहून ती चिठ्ठी व्याख्यानाच्या वेळी मी माझ्या हातात ठेवीत असे.

अशी भक्कम पूर्वतयारी केलेली असल्याने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांनी मी गडबडून जात नसे. नवीन प्राध्यापक, विशेषतः ज्यांनी अध्यापनास नव्याने सुरुवात केलेली असते, अशा प्राध्यापकांवर हुशार विद्यार्थी प्रश्नांचा भडिमार करणार हे ठरलेले असते. वर्गात शिकवण्याबाबत मी स्वतःवर काही बंधने घालून घेतली होती. त्यापैकी एक म्हणजे : व्याख्यानाच्या वेळी विचारलेल्या एखाद्या प्रश्नाचे उत्तर मला माहीत नसेल, तर काहीतरी सांगून वेळ मारून न्यायची नाही. 'या प्रश्नाचे उत्तर मला माहीत नाही; पण बघून मी पुढच्या वेळी सांगेन' असे आश्वासन द्यायचे. त्याकरता माझ्या विषयावरची चांगली व महत्त्वाची पुस्तके मी संग्रही ठेवली होती. त्या वेळी विद्यापीठाचे ग्रंथालय नव्हते. कॉलेजच्या ग्रंथालयात इंग्रजी भाषा-साहित्य, इतिहास, तत्त्वज्ञान, कथा-कादंबऱ्या व इतर विषयांवरची पुस्तके होती; पण विज्ञानाच्या पुस्तकांबाबत तिथली परिस्थिती केविलवाणी होती. सुरुवातीला पुस्तकांवर मी एक हजार रुपये खर्च केले. त्यानंतर प्रत्येक महिन्याला निदान १५ रुपये पुस्तकांवर खर्च करण्याचा माझा नियम होता. तो माझी नोकरी संपेपर्यंत टिकून होता. त्या पैशातून मी रसायनशास्त्र आणि पदार्थविज्ञान यांवरची पुस्तके साठवली. एका महिन्यात समजा, पुस्तकांकरता ३० ते ४० रु. खर्च झाले, तरीही पुढच्या महिन्यात १५ रु. पुस्तकांकरता खर्ची टाकले पाहिजेत, असा माझा

शिरस्ता होता. पुढे-पुढे प्रकाशकांकडून मला भेट-प्रती मिळत गेल्या आणि पुस्तकांच्या माझ्या संग्रहात घसघशीत भर पडत गेली. हे माझे खासगी ग्रंथालय मला केवळ व्याख्यानांकरताच उपयोगी पडले नाही; तर निरनिराळ्या मार्गांनी ते माझ्या कामी आले.

कला विद्यालयात -

कॉलेजच्या अध्यापनात रुजू झाल्यावर लवकरच मी 'मेयो स्कूल ऑफ आर्ट'मध्ये जाऊ लागलो. मी सहा महिने तेथे जाऊन सुतारकाम शिकलो. कॉलेजमधल्या नित्यक्रमात सुतारकामाचे शिक्षण मला फार उपयोगी पडले. त्या कला विद्यालयात श्री. लॉकवुड किप्लिंग (रुडयार्ड किप्लिंगचे वडील), भाई रामसिंग आणि शेर मुहम्मद यांच्याशी माझी ओळख झाली, ही मोठी भाग्याची गोष्ट आहे. श्री. किप्लिंग हे कला विद्यालयाचे मुख्याध्यापक होते; तर इतर दोघे जण तेथले वरिष्ठ विद्यार्थी-शिक्षक होते. रामसिंग आणि शेर मुहम्मद ह्या दोघांना शिक्षकांच्या जागा मिळायला पुष्कळ वेळ लागला हे खरे; पण तोपर्यंत त्यांना चांगला स्टायपेंड मिळत असे. पुढे रामसिंग मुख्याध्यापक आणि खानसाहेब शेर मुहम्मद हे उपमुख्याध्यापक झाले. रामसिंग हे कलात्मक आकृतिबंध काढण्यात निष्णात होते; तर शेर मुहम्मद सुशोभन-कलेत तरबेज होते. लाहोरमधील विद्यापीठाचे पदवीदान समारंभाचे दालन, वस्तुसंग्रहालय, चीफ कोर्ट, ऐचिसन कॉलेज या सगळ्या इमारतींचे आकृतिबंध रामसिंगानी रचले होते. पण कलात्मकतेच्या दृष्टीने, माझ्या मते, खालसा कॉलेज हीच त्यांची सर्वोत्कृष्ट इमारत आहे. शेर मुहम्मदांना तितकीशी संधी मिळाली नाही; पण लाहोरच्या गव्हर्नमेंट हाऊसच्या भिंती त्यांनीच सजविल्या होत्या. त्या दोघांची माझ्या मित्रांत गणना करताना मला नेहमीच अभिमान वाटतो.

भाई रामसिंग आणि मुन्शी शेर मुहम्मद या अलौकिक पुत्रांना आज पंजाब विसरला आहे. त्या दोघांनी भारतीय कला व कसब ह्यांच्या पुनरुज्जीवनाचे काम केले ह्याची पंजाबला जाणीव झाली नाही; आणि

म्हणून त्या दोघा कलाकारांचे व्हायला पाहिजे तसे कौतुक झाले नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. सुतारकाम शिकण्याच्या उद्देशाने मी जेव्हा श्री. लॉकवुड किप्लिंगांकडे गेलो, तेव्हा त्यांनी मला भाई रामसिंगांच्या ताब्यात दिले हे सांगताना आजही मला आनंद वाटत आहे. कलेचे रसग्रहण हा तिथे जाण्यामागे माझा मुख्य उद्देश होता; प्रत्यक्ष सुतारकाम शिकणे हे दुय्यम काम होते. शिक्षक-विद्यार्थी या नात्याने रामसिंग मोठ्या उत्साहाने मला म्यूझियम्‌मधल्या कलाकृती दाखवत. चित्रांचे, शिल्पांचे तसेच इतर मोठ्या कलाकृतींचे मूल्यमापन करताना कोणत्या गोष्टी विचारात घ्याव्या लागतात, ते समजावून सांगत. आज ज्याला टॉलिंग्टन मार्केट म्हणतात, ते त्या वेळी म्यूझियम् होते आणि त्याच्या बाजूच्या एका साध्याशा इमारतीत कला विद्यालय भरत असे. त्याच्याच एका बाजूला सध्याची प्रशस्त आणि देखणी इमारत बांधण्यात आली.

हिंदी व ब्रिटिश यांच्यातला सामाजिक तणावपूर्ण संबंधाचा काळ -

सरकारी कॉलेजमध्ये काम करायला लागून थोडे दिवस झाले होते, तेव्हा एक रोचक प्रसंग घडला. माझ्या नोकरीच्या कारकीर्दीतील तशी पहिलीच घटना होती. आज मागे बघताना, तशा घटनांतून काय सूचित होई ह्याचा विचार केला, तेव्हा झाल्या गोष्टीबद्दल मला खेद वाटत नाही. गेल्या शतकातील म्हणजे १९ व्या शतकातली शेवटची पंचवीस वर्षे हिंदुस्थानी व इंग्रज यांच्यातील सामाजिक संबंध अनेक दृष्टींनी फार बिकट झाले होते. ब्रिटिशांचे साम्राज्य झपाट्याने वाढत होते आणि साम्राज्य याचा अर्थ व त्याचे मूल्य बदलत चालले होते.*

** येथे लेखक स्वतःच्या 'ए सेंच्युरी ऑफ कल्चरल फरमेंट' या पुस्तकातल्या 'ग्रोथ ऑफ नॅशनॅलिझम् इन इंडियन' या प्रकरणाचा संदर्भ देत आहेत; पण ते पुस्तक प्रकाशित किंवा अप्रकाशित अशा कोणत्याच स्वरूपात आम्हाला अद्याप मिळालेले नाही.*

- संपादक

आजवर न झालेल्या अशा सामाजिक व बौद्धिक जागरणाचे पडसाद साऱ्या हिंदुस्थानावर उठत होते. देशातला बुद्धिजीवी वर्ग एका विचित्र परिस्थितीत सापडला होता. एका बाजूला तो पाश्चिमात्य संस्कृतीवर आकृष्ट झाला होता; पण दुसऱ्या बाजूला आपल्या परंपरा तोडायची त्याची तयारी नव्हती. काही शासकीय उपायांवर ते कडवी टीका करीत होते हे सत्य आहे; पण त्यांना युरोपीय कला व विज्ञानाचे मनापासून प्रेम होते आणि इंग्रजी वाङ्मयातील मुक्त भावनेची ते मुक्तकंठाने प्रशंसा करीत होते, हेही खरेच आहे. त्यांना सर्वात अधिक मोलाचे वाटत होते ते राणीच्या जाहिरनाम्यामुळे * मिळालेले सामाजिक व राजकीय स्वातंत्र्याचे अभिवचन.

सर चार्ल्स् ऐचिसन हे अध्यक्ष असताना पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या सूचनेवरून एक ठराव मांडण्यात आला. त्यानुसार उच्चसेवांचे दोन भाग केले गेले. एक, इंपिरियल व दुसरी, प्रॉव्हिंशियल. या दोन सेवांत काम करणाऱ्यांच्या पगारात तर पुष्कळ तफावत होतीच; पण त्याशिवाय त्यांच्यात अनिष्ट भेदभाव केला जाई. या मुद्यावर वर्तमानपत्रांतून तीव्र प्रतिक्रिया येत होत्या. एक दिवस प्राचार्य टी. ओ. लुइस ह्यांनी आम्हा चारही भारतीय असिस्टंट प्राध्यापकांना बोलावले. एल्. सागरचंद, बाबू शशिभूषण मुखर्जी, जी. एन्. चटर्जी आणि मी असे आम्ही चौघेजण त्यांच्या खोलीत गेलो. आम्ही बसतो न बसतो, तेवढ्यात त्यांनी आम्हाला सुनावले,

''पब्लिक इंस्ट्रक्शनच्या डायरेक्टरांच्या सांगण्यावरून ह्यापुढे असिस्टंट प्राध्यापकांना दिवसातून चार तास शिकवावं लागेल; आणि जरूर पडेल तेव्हा दोन ते तीन विषय शिकवावे लागलीत. प्राध्यापक दिवसातून तीन तास एकच विषय शिकवतील.''

** सन १८८० पासून सुरेंद्रनाथ बॅनर्जींचे एकही भाषण राणीच्या जाहिरनाम्याचा व भारतियांच्या स्वातंत्र्याचा उल्लेख केल्याशिवाय संपलेले मला आठवत नाही. त्यांच्या भाषणाचा तसा शेवट ऐकल्यावर श्रोत्यांत जो अमाप उत्साह संचारे, त्याचे वर्णन करणे अशक्य आहे.*

''वरिष्ठ व कनिष्ठ प्राध्यापकांत असा भेद का केला जावा?''

या माझ्या प्रश्नाला त्यांनी उत्तर दिले,

''सर्वसामान्यपणे कनिष्ठ प्राध्यापक तरुण असतात आणि एका विशिष्ट विषयात त्यांचं स्पेशलायझेशन झालेलं नसतं. याउलट वरिष्ठ प्राध्यापक वयाने मोठे असून त्यांचं स्पेशलायझेशन झालेलं असतं.''

''म्हणजे कनिष्ठ प्राध्यापक कधी स्पेशलायझेशन करू शकणार नाहीत, आणि त्यांना वरिष्ठ प्राध्यापक होता येणार नाही,'' मी म्हणालो.

श्री.लुइसना माझे उत्तर सहन झाले नाही. ते रागावून म्हणाले,''काय म्हणालात, ते पुन्हा एकदा सांगा. मला पब्लिक इन्स्ट्रक्शनच्या डायरेक्टरांना सांगितलं पाहिजे.''

अशी भीती दाखवताना त्यांनी माझे म्हणणे उतरवून घ्यायला पेन सरसावले. मी काही म्हणायला तोंड उघडण्यापूर्वी लाला सागरचंद (पुढे ह्यांना रायबहादूर हा किताब मिळाला.) माझ्या मदतीला धावून आले. ते म्हणाले,

''त्यांचे शब्द माझेही आहेत असं समजा.''

त्यांनी ते शब्द उच्चारताच उरलेले दोघेही एका वेळी म्हणाले,

''आणि माझेही !''

आमच्या या एकजुटीने निश्चित बाजू मांडण्याचा श्री.लुईसवर जो परिणाम झाला, तो मी कधी विसरणार नाही. त्यांच्या हातातले पेन अक्षरशः गळून पडले. ते म्हणाले,

''बरं आहे. तुम्ही जाऊ शकता.''

त्या विचित्र प्रस्तावामुळे आम्हाला कोणत्याही एका विषयाचे प्राध्यापकपद - अगदी तात्पुरतेसुद्धा - कधीच मिळू शकले नसते. त्या प्रस्तावाबद्दल पुन्हा आम्ही काही ऐकले नाही. प्रॉव्हिंशियल एज्युकेशन सर्व्हिसमधल्या हिंदुस्थानी माणसांना त्यांच्या जागेवरच ठेवण्याकरता आणि त्यांनी उच्च श्रेणीतल्या इंडियन एज्युकेशन सर्व्हिसमध्ये प्रवेश मिळवण्याची आकांक्षा धरू नये याकरिता निरनिराळे उपाय ही मंडळी

योजत असत. इंडियन एज्युकेशन सर्व्हिस हे नाव असलेल्या सेवेत एकाही हिंदुस्थानी माणसाला न घेण्याची सर्वतोपरी खबरदारी घेतली जाई. मी सेवानिवृत्त झालो तोपर्यंत त्या सेवेत सबंध देशातल्या केवळ तीन हिंदुस्थानी व्यक्तींना प्रवेश मिळाला होता.*

सर सी.पी.रे यांना डी. एस्सी. असूनही प्रॅव्हिंशियल सर्व्हिसमध्येच राहावे लागले होते. अशाच गुणवत्तेचे आणखी कित्येक होते.

या सुमाराला किंवा त्यानंतर थोड्या दिवसांनी आणखी एक घटना घडली, त्याविषयी मी थोडक्यात सांगणार आहे. इंडियन नॅशनल काँग्रेसचे १८९३ चे अधिवेशन लाहोरला होणार, असे घाटत होते; त्यामुळे लाहोरमध्ये एक प्रकारचे चैतन्य आले होते. तसेच ब्रिटिश पार्लमेंटवर दादाभाई नौरोजी निवडून आले होते. त्यांच्या - म्हणजे लॉर्ड सॅलिसबरीच्या शब्दात ब्लॅकमॅनच्या - स्वागताची तयारी सारे लाहोर करीत होते. त्या निमित्ताने काढलेल्या दिंडीची लांबी सहज एक मैल झाली होती. **

हा प्रसंग गव्हर्नमेंट कॉलेजात अध्यापक वर्गात असणाऱ्या भारतियांच्या संबंधातला आहे. काँग्रेसच्या अधिवेशनामुळे समाजाच्या भावना चेतावणार असे पंजाब सरकारने गृहीत धरले होते; आणि त्याला आळा घालण्याकरता सरकारने हुकूम काढला -

"सरकारी नोकरांनी काँग्रेसच्या चळवळीत भाग घ्यायचा नाही, आर्थिक मदत करायची नाही किंवा तशी मदत मिळवून देण्याकरता आपले वजन टाकायचे नाही." असा हुकूम काढणे त्यांना अगत्याचे वाटले; कारण त्या वेळी सरकारी नोकरांना राजकीय संस्थांत भाग घ्यायला मनाई नव्हती. कॉलेजचे कितीतरी प्राध्यापक 'इंडियन असोशिएशन ऑफ

सर जगदीशचंद्र बोस, F.R.S. (पदार्थ विज्ञान), डॉ. मल्लिक (गणित), मद्रास येथील एक ख्रिश्चन सदगृस्थ (इंग्रजी).

*** दिंडीची आघाडी वॉटरवर्क्सच्या टाकीपाशी होती. तिथेच त्यांचे स्वागत होणार होते; आणि दिंडीची पिछाडी वझीरखान मशिदीसमोरच्या मैदानावर पोहोचली होती.*

कलकत्ता'च्या स्थानिक शाखेचे सभासद होते. ती एक प्रभावी संस्था असून तिच्या शाखा देशभर पसरल्या होत्या. आम्हा लाहोरवासियांना बऱ्याच स्वातंत्र्याची सवय होती. वरच्या हुकुमाने आमच्या हालचालींवर बंधन येणार होते आणि आम्हाला ते समर्थनीय वाटत नव्हते. कॉलेजमधले आम्ही चारही असिस्टंट प्राध्यापक परिस्थितीची चर्चा करण्याकरता एका वर्गाच्या खोलीत जमलो. आपल्यात एकजूट असली पाहिजे, कोणताही निर्णय घेतला की तो सगळ्यांनी स्वीकारायचा, याबाबत आमचे एकमत झाले. अधिवेशनाला हजर राहण्याचा आम्ही निर्णय घेतला. त्याकरता विशेष पाहुण्यांकरता असलेली ५० रु.ची तिकिटे विकत घ्यायचे आम्ही ठरवले. त्या तिकिटांमुळे आम्हाला व्यासपीठावरची खुर्ची मिळाली असती. पण तिथे न बसता सर्वसामान्य श्रोत्यांप्रमाणे मागच्या रांगेतल्या खुर्च्यांवर बसायचे; म्हणजे आपण कुणाच्या नजरेत भरणार नाही, असाही आम्ही निर्णय घेतला. काँग्रेसच्या त्या अधिवेशनाला आपले थोडेसे आर्थिक साहाय्य व्हावे असा आमचा हेतू होता. तो तिकिटे विकत घेतल्यामुळे साध्य होणार होता आणि तोही सरकारी नोकरांकरता नव्याने घातलेल्या चौकटीत राहून ! आणि आमच्या अपेक्षेपेक्षा अधिक सुरळीतपणे ते पार पडले.

उद्घाटनाच्या दिवशी स्वयंसेवकाने आमची तिकिटे पाहून आम्हाला व्यासपीठावर बसण्याची विनंती केली. त्याला काहीतरी कारण सांगून आम्ही ते टाळले. अधिवेशनात स्वयंसेवकाचे काम करण्यास जे थोडे विद्यार्थी पुढे आले होते, त्यांच्यात ही बातमी पसरली. स्वयंसेवक जमविण्याची जबाबदारी श्री. चार्ल्स् गोलकनाथ यांच्याकडे होती. त्यांनी आम्हाला पुढील हकीगत सांगितली. उद्घाटनाच्या दिवशी संध्याकाळी बरेच विद्यार्थी त्यांच्याकडे आले व आपण स्वयंसेवकाचे काम करण्यास तयार आहोत असे सांगू लागले. अधिवेशन सुरू होण्यापूर्वी स्वयंसेवकाची कामे करायला फारसे विद्यार्थी पुढे येत नव्हते आणि आता वाजवीपेक्षा अधिक विद्यार्थी आलेले पाहून त्याचे कारण काय, असे गोलकनाथांनी

विद्यार्थ्यांना विचारले. अधिवेशनात भाग घेतल्यास सरकारी नोकरी मिळणे कदाचित् मुष्किल होईल म्हणून अधिवेशनापासून दूर राहिलेले बरे, असा सल्ला काही मित्रांनी दिल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. पण कॉलेजमधल्या चारही हिंदुस्थानी प्राध्यापकांनी अधिवेशनाची भारी तिकिटे विकत घेतल्याचे कळल्यावर मात्र त्यांना धीर आला आणि ते स्वयंसेवकाचे काम करण्यास पुढे आले. आमच्या तिकिट-खरेदीचा असा काही परिणाम होईल, असे आम्हाला स्वप्नातही वाटले नव्हते. अधिवेशनाला फूल ना फुलाची पाकळी मदत व्हावी, एवढाच आमचा उद्देश होता.

अशा प्रकारच्या घटना घडत असताना १८९४ ते ९५ च्या दरम्यान मला एक अस्वस्थ करून टाकणारा अनुभव आला. त्यापूर्वी तसा अनुभव आला नव्हता; पण त्यानंतरही आला नाही, असे मात्र मी म्हणू शकणार नाही.

एक दिवस सकाळी एक विद्यार्थी मला भेटायला घरी आला. तो माझ्या मित्राच्या नात्यातला होता आणि कधी-कधी तो माझ्याकडे येत असे. हा विद्यार्थी आमच्या कॉलेजमध्ये नव्हता; पण आमच्या कॉलेजशी संलग्न असलेल्या अशा कॉलेजमध्ये शिकत होता. दुसऱ्या दिवशी त्याची परीक्षा होती. त्याने मला रसायनशास्त्रातला एक प्रश्न विचारला. तो प्रश्न परीक्षेत येईल असे त्याला वाटत होते. इंटरमीजिएटच्या विद्यार्थ्यांकरता घालण्याजोगा तो प्रश्न नाही असे मी त्याला सांगितले; पण तो ऐकेना. त्याने त्या प्रश्नाचे उत्तर सांगण्याचा मला आग्रह केला. मी एका पेन्सिलने आकृती काढून त्याला तो प्रश्न समजावून सांगितला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे तो प्रश्न परीक्षेत विचारला होता. त्या गोष्टीचा मला अर्थ लावता येईना. परीक्षा संपल्यावर मी कॉलेजमध्ये परतलो, तेव्हा त्या गोष्टीबद्दल प्रा.ओमानना सांगितले. त्यांनी ते सर्व ऐकले आणि ते सर्व प्राचार्यांना सांगायची माझी तयारी आहे का, असे विचारले.

''मी तसं करणं तुम्हाला योग्य वाटत असेल, तर प्राचार्यांना सांगायला माझी काहीच हरकत नाही.'' मी उत्तर दिले. आणि प्राचार्य कचेरीत आहेत

अशी सधा बघून मी त्यांना भेटायला जायला निघालो. तेव्हा, ''प्राचार्यांना भेटायला जाल, तेव्हा मी तुमच्याबरोबर आलो तर चालेल का?'' असे प्रा. ओमानने मला विचारले. माझी त्याला काहीच हरकत नव्हती. पण माझ्याबरोबर येण्यात त्यांचा काय हेतू असेल, हे मला तेव्हा कळले नाही. आम्ही दोघे प्राचार्य रॉबर्टसनना भेटलो. माझे सारे म्हणणे त्यांनी शांतपणे ऐकून घेतले, मला एक-दोन प्रश्नही विचारले आणि शेवटी, ''ह्यात मला करण्यासारखं काय आहे, हे समजत नाही.''

एवढे बोलून ते थांबले. माझ्या मनातली मळमळ प्राध्यापक आणि प्राचार्य या दोघांना सांगून टाकल्याने मला हलके वाटू लागले. त्या सगळ्या प्रसंगाचे पर्यवसान पाहिल्यावर प्रा. ओमान माझ्याबरोबर आले ही गोष्ट सुदैवाची ठरली. ह्या गोष्टीला एक वर्ष झाले. प्राचार्य रॉबर्टसन हिंदुस्थान सोडून गेले होते.

पुढच्या वर्षी परीक्षेच्या सुपरिटेंडेंट्स्पैकी एक म्हणून माझी निवड झाली. परीक्षा सुरू झाली होती. पदार्थविज्ञानाच्या प्रात्यक्षिकांकरता सर्व विद्यार्थी कॉलेजच्या हॉलमध्ये जमले होते. त्यांना गटा-गटाने तीन ते चार परीक्षकांकडे पाठविण्याचे काम माझ्याकडे होते. हॉलमध्ये विद्यार्थी काही प्रश्नांची चर्चा करीत होते, ते माझ्या कानावर आले. ते ज्या प्रश्नांची चर्चा करीत होते, त्यातले निदान दोन प्रश्न तरी इंटमीजिएटच्या विद्यार्थ्यांच्या आवाक्यापलिकडचे होते असे मला वाटत होते. पण मी तेव्हा सुपरिंटेडेंट होतो व त्यासंबंधी काही बोलणे योग्य झाले नसते. त्यांचे गट यथाक्रम परीक्षकांकडे जातात, हे बघणे एवढेच माझे काम होते.

परीक्षा संपली तेव्हा काही विद्यार्थ्यांना काही प्रश्न अगोदर माहीत होते अशी मला शंका आली. त्या शंकेला पुरेसे सबळ कारण होते. गतवर्षीप्रमाणे मी ते प्रा. ओमानजवळ बोलून दाखवले. ते म्हणाले, ''गेल्या वर्षी माझ्यासमक्ष तुम्ही प्राचार्य रॉबर्टसनना सर्व प्रसंग सांगितला होतात. आता त्याच भानगडीत पुन्हा पडू नका.''

नेटिव्ह प्राध्यापकाचे धाडस -

ह्या वर्षी प्रा.रॉबर्टसनच्या जागेवर श्री.डालिंगर आले होते. ते नवीन होते आणि माझा त्यांच्याशी विशेष परिचय नव्हता. ह्या वर्षी प्रा.ओमान प्रात्यक्षिक परीक्षेकरता परीक्षक होते. थोडे दिवस गेले आणि एक दिवस प्राचार्य डालिंगरांनी मला तातडीने बोलावून घेतले. मी त्यांच्या खोलीत प्रवेश केल्यावर पहिला प्रश्न त्यांनी विचारला -

''पदार्थविज्ञानाच्या प्रॅक्टिकल परीक्षेतले प्रश्न फुटण्याविषयी तुम्हाला काही माहीत आहे का?''

मला जे काही माहीत होते, ते मी त्यांना सर्व सांगितले.

''मग तुम्ही मला किंवा रजिस्ट्रारना त्याबद्दल कधी सांगितलं नाहीत.'' ते रागाने म्हणाले आणि परीक्षेचे सुपरिंटेंडेंट आणि कॉलेजचा प्राध्यापक म्हणून माझ्यावर काय जबाबदारी आहे त्याबद्दल बरेच सांगू लागले. मी स्पष्टीकरणात्मक काही बोलणार, तर मला मध्यावर तोडून त्यांनी गुरकावून सांगितले,

''तुम्ही अमुक वेळी डॉ.स्टैनना भेटा.''

मध्ये फारसा वेळ नव्हता म्हणून मी तसाच डॉ. स्टैनकडे गेलो. ते ओरिएंटल कॉलेजच्या त्यांच्या वर्गात होते. ते त्या कॉलेजचे प्राचार्य आणि विद्यापीठाचे कुलसचिव (रजिस्ट्रार) अशा दोन्ही भूमिका सांभाळत होते. ते एकटे होते आणि माझी वाटच पाहत होते. एखाद्या गुन्हेगाराचे करावे तसे त्यांनी माझे स्वागत केले. मी आत येताक्षणीच त्यांनी विचारले,

''पदार्थविज्ञानाच्या पेपर फुटण्याची गोष्ट तुम्ही माझ्या कानांवर का नाही घातली?''

''मी प्रा.ओमानच्या ते लक्षात आणून दिलं होतं; पण त्यांनी मला 'उगीच त्या भानगडीत पुन्हा पडू नकोस' असा सल्ला दिला; म्हणून मी गप्प बसलो.'' मी सांगून टाकलं. ते ऐकून त्यांना रागच आल्यासारखे दिसले. गेल्या काही दिवसांत काय घडले होते, याची मला कल्पना नव्हती.

''लाला रुचिराम, तुम्ही गव्हर्नमेंट कॉलेजमध्ये प्राध्यापक आहात. ओरिएंटल कॉलेजमध्ये अॅलेक्झांड्रा स्कॉलर* आहात. विद्यापीठाचे परीक्षक आणि परीक्षेचे सुपरिंटेंडेंटही आहात. ह्या सगळ्या पदांची जबाबदारी तुमच्या लक्षात आली आहे का?'' असा सवाल त्यांनी मला टाकला.

''मला माझी जबाबदारी व्यवस्थित समजते. गेल्या वर्षी मी ही गोष्ट प्राचार्यांच्या नजरेस आणून दिली होती; पण त्यातून काहीच निष्पन्न झालं नाही. म्हणून ह्या वर्षी तीच गोष्ट मी तुमच्या किंवा प्राचार्यांच्या लक्षात आणून दिली नाही. पण जे काय मला वाटलं, ते मी सारं प्रा. ओमान यांना लगेच सांगितलं.''

माझ्या ह्या उत्तराने डॉ.स्टैन यांचे समाधान झाले नाही. ते कमालीचे अस्वस्थ झाले. काय म्हणावे, हे त्यांना सुचेना. शेवटी ते म्हणाले,

''ह्याचा अर्थ असा होतो की, त्या प्रामाणिक आणि सरळ परीक्षकाने ते आमच्या निदर्शनास आणून दिलं नसतं, तर ही गोष्ट आम्हाला कधीच कळली नसती.''

''म्हणजे कोण?'' असे मी विचारताच ते म्हणाले,

''ते म्हणजे अर्थात अमुक-अमुक.''

त्यांचे उत्तर ऐकून मला एक फारसी काव्यपंक्तींची** आठवण झाली. मला राहवले नाही.

** गव्हर्नमेंट कॉलेजच्या कामाव्यतिरिक्त मी त्या वेळी कपूरथळा अॅलेक्झांड्रा स्कॉलर म्हणूनही काम करीत होतो. त्याकरता मला ओरिएंटल कॉलेजमध्ये विद्यापीठाच्या विज्ञानवर्गापुढे आठवड्यातून तीन व्याख्याने उर्दूतून द्यावी लागत. विद्यापीठाच्या अधिकारीवर्गाच्या सूचनेवरून मला एका विज्ञानावरच्या पुस्तकाचे उर्दूत भाषांतरही करावे लागले होते. जागतिक विज्ञानमालेतील बॅलफोर स्टुअर्ट ह्यांच्या 'शक्तीचे रूपांतर' या पुस्तकाचे मी भाषांतर केले; पण पुरेशा आर्थिक साहाय्याअभावी ते कधी प्रकाशित झाले नाही.*

*** ह्या काव्यपंक्ती त्याच वेळी माझ्या लक्षात आल्या की नंतर, हे मला नीटपणे आठवत नाही. त्यांच्यासमोर मी त्यांचा निश्चितच उल्लेख केला नाही. पण त्या काव्यपंक्ती झाल्या प्रसंगाला साजेशा होत्या.*

आणि मी तात्काळ म्हटले,

"ते तुमचे प्रामाणिक आणि सरळ परीक्षकच पेपर फुटण्याला कारणीभूत आहेत."

त्यानंतर जे घडले, ते बघायला स्वर्गातले देवच उतरायला पाहिजे होते. एक हिंदुस्थानी तरुण प्राध्यापक आपल्या कार्यजीवनाच्या उंबरठ्यावर उभा होता; आणि तरीही एका गोऱ्या माणसावर निःसंदिग्ध शब्दांत आरोप करायला धजावला होता. ह्या प्रसंगाची मला पुढे अनेकदा आठवण होई. प्रत्यक्ष घटनेच्या ठायी अमर्याद सामर्थ्य असते, ते माझ्या लक्षात आले. या प्रसंगाच्या संदर्भात 'सत्य' हा शब्द वापरणे योग्य होणार नाही. त्या शब्दाची पवित्रता फार उच्च श्रेणीची आहे. पण अशा प्रकारचे प्रसंग मी वेळोवेळी नमूद केले आहेत. माझ्या जीवनाच्या कठीण मार्गात ते एखाद्या प्रकाशझोतासारखे ठरले आहेत. तसे मला माझे आयुष्य फार कठिण वाटले नाही. आयुष्यात मी जो काही त्याग केला असेल, तो मनःशांती आणि आत्म्याचे समाधान यांच्या तुलनेत कःपदार्थ ठरला. मॅझिनी ज्याला 'योग्य पथ' म्हणतो, त्यावरून चालण्याचे जेव्हा-जेव्हा मी धाडस केले, तेव्हा-तेव्हा हा अनुभव येत असे.

वर्गातल्या चौथऱ्यावर ठेवलेल्या टेबलामागच्या खुर्चीवर डॉ.स्टैन बसले होते. मी चौथऱ्याखाली जमिनीवर उभा होतो. माझ्या तोंडचे ते भयंकर शब्द ऐकून डॉ.स्टैन संतापले. ते चौथऱ्यावरून खाली उतरले आणि माझ्यासमोर अगदी जवळ उभे राहिले. एका क्षणी तर त्यांचे नाक माझ्या चेहेऱ्याला टेकले आहे अशी मला शंका आली. ते म्हणाले,

"लाला रुचिराम, तुम्ही काय म्हणताय? एका गोऱ्या माणसावर तुम्ही गंभीर आरोप करीत आहात, ह्याची तुम्हाला शुद्ध आहे का?"

आणि मग, "ही गोष्ट मला कुलगुरूंना सांगणं प्राप्त आहे." अशीही पुस्ती जोडली.

त्यांच्या त्या धमकावणीच्या शब्दांनी मी डगमगलो नाही. मी सांगितले,

"सर, मी काय म्हटलं ते मला नीट माहीत आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वी प्रश्न सांगण्याची त्यांची ही पहिलीच वेळ नाही. माझ्या लक्षात आल्याबरोबर मी ती गोष्ट वरिष्ठांच्या कानावर घातली आणि त्यांच्या सल्ल्यानुसार मी वागलो आहे."

"ठीक आहे. तुम्ही काय ते स्पष्टीकरण कुलगुरूंना द्या." असे सांगून माझ्यावर बंधन आणण्याचा इरादाने ते म्हणाले, "तुम्ही केलेलं विधान मला लेखीत द्या; म्हणजे मी ते कुलगुरूंपुढे ठेवीन." तेव्हा मी त्यांच्या टेबलातल्या खणातून एका ताव काढला. तेथलीच शाईची दौत आणि टाक घेऊन मी एका विद्यार्थ्याच्या डेस्कपाशी गेलो व लिहायला लागलो. हे सर्व होत असताना डॉ. स्टैन यांच्यामध्ये पूर्ण बदल घडून आला होता. मी बसलो होतो, तिथे ते आले आणि मऊ आवाजात म्हणाले,

"हे पहा लाला रुचिराम, बाब मोठी गंभीर आहे. घाई करू नका. त्यावर नीट विचार करा आणि उद्या चार वाजेपर्यंत मला तुमचं विधान लिहून, पाठवून द्या."

जरी मी लिहायला तयार झालो होतो, तरी हा जो वेळ मिळाला, त्याबद्दल मला बरेच वाटले. काहीही लेखी विधान पाठवण्यापूर्वी मला प्रा. ओमानना सर्व वृत्तांत सांगता येईल याचा मला आनंद वाटला.

डॉ.स्टैनच्या खोलीतून मी तडक प्रा.ओमान यांच्या घरी गेलो. माझ्यात आणि डॉ. स्टैन यांच्यात झालेली देवाण-घेवाण ऐकून प्रा.ओमान इतके चकित झाले की पलिकडच्या खोलीत जाऊन त्यांनी आपल्या बायकोला बोलावून आणले. मग माझ्या धाडसाची ती कथा मी पुन्हा ऐकवली, तोवर त्यांचे जवळ-जवळ सर्व कुटुंब माझ्याभोवती जमले होते. माझे सांगून संपल्यावर प्रा.ओमानननी त्या प्रसंगावर आणखी प्रकाश टाकला. हा प्रकार गेली काही वर्षे चालला आहे, असे त्यांनी सांगितले. तो विशिष्ट गोरा माणूस परीक्षेच्या आधी एक-दोन दिवस आपल्या विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेतले काही प्रश्न देत असे. त्याकरता त्यांची एक ठराविक पद्धत होती. परीक्षेपूर्वी ते आपल्या सगळ्या वर्गाला बोलावून आठ-नऊ महत्त्वाचे प्रश्न समजावून सांगत असत. त्यातले दोन किंवा तीन प्रश्न परीक्षेत येणारे असत. एकदा

काय झाले, ते महाशय प्रश्न समजावून सांगत असताना प्रा.ओमानचा एक विद्यार्थी तिथे हजर होता. डॉ. स्टैनच्या त्या प्रामाणिक व सरळ परीक्षकाच्या एका विद्यार्थ्याचा तो मित्र होता. त्याने त्याला बोलावले होते. मला शंका येण्याच्या दोन वर्षे अगोदर हे घडले होते. आपल्या विद्यार्थ्याने सांगितलेल्या हकीगतीची खात्री करून घेण्यासाठी खरे तर प्रा. ओमाननी मला ती गोष्ट प्राचार्यांच्या कानावर घालण्याची सूचना केली होती; आणि ते माझ्याबरोबर आलेही होते. मी डॉ.स्टैनच्या पुढ्यात केलेल्या विधानाला पुष्टी देणारी ही मोलाची माहिती होती. हे चालले असताना आणखीही एक गोष्ट मला कळली. काही कारणाने त्या प्रामाणिक माणसाने त्या वर्षीच्या पेपर फुटण्याची जबाबदारी प्रा.ओमानवर ढकलली होती. पदार्थ-विज्ञानाच्या पेपरमधले प्रश्न त्यांच्या विद्यार्थ्यांना अगोदर कळत असत, ह्याकरता एक भक्कम पुरावा आहे ह्याची त्यांना कल्पना नव्हती आणि त्या काळात प्रा.ओमान परीक्षक नव्हते; तर ते स्वतः होते.

माझ्या विधानाला अशा प्रकारे बळकटी आलेली होती. डॉ.स्टैनना लिहून देण्याकरता आम्ही दोघांनी मजकूर तयार केला. प्रा. ओमानना आपली व्यक्तिगत भूमिकाही स्पष्ट करायची होती. डॉ. स्टैनना माहिती पुरविणाऱ्या माणसाच्या अंगाशी त्याचीच करणी आली होती. त्याच्या विरुद्ध बराच पुरावा तयार झाला आणि त्या परिस्थितीत तो निर्णायक होता.

दुसऱ्या दिवशी विद्यापीठाची कचेरी उघडल्यावर मी स्वतः जाऊन तो सील केलेला कागद दिला व त्याची पावतीही घेतली. त्यानंतर त्या घटनेविषयी काहीही ऐकले नाही. माझा कागद कुलगुरूंपर्यंत पोहोचला किंवा नाही, हे मला समजले नाही. तो गोरा माणूस ह्यानंतरही दोन वर्षे परीक्षक म्हणून काम पाहत होता. पुढे त्याचे नाव गाळले गेले. विद्यापीठातील विविध मंडळांतले वरिष्ठ अधिकारी माझ्याशी ज्या अधिक सामंजस्याने वागत होते, त्यावरून त्यांच्यापैकी काही जणांना तरी झाला प्रकार माहीत असावा, असा मी तर्क बांधला होता.

♦♦♦

माझे पहिले परदेशगमन

ब्रिटन किंवा युरोप येथल्या एखाद्या विद्यापीठात काही काळ घालवावा अशी इच्छा मी बरेच दिवस उराशी बाळगून होतो. १९१४ सालच्या सुरुवातीला एक अगदी अनपेक्षित आणि विचित्र घटना घडली आणि मी तत्काळ परदेशात जाण्याची तयारी करू लागलो. गव्हर्नमेंट कॉलेजमध्ये शिकत असताना आणखी पुढच्या शिक्षणाकरता परदेशात जाण्याची कल्पना प्रथम माझ्या मनात आली. त्या सुमाराला कमी व्याजाने कर्ज मिळण्याची चांगली शक्यता निर्माण झाली होती. पण जशी कर्ज मिळण्याची योजना आकार घेऊ लागली, तशी कर्जावर शिकण्याची कल्पना मला आवडेनाशी होऊ लागली. नंतर श्री. ए. सी. हेरमरी हे विज्ञानाचे प्राध्यापक म्हणून आले, तेव्हा एक वर्ष दीर्घ मुदतीची रजा घेण्याचा मी विचार करू लागलो. वरिष्ठ प्राध्यापक देशात नवखे असताना मी रजा घेणे प्रशस्त नाही; कारण मग विज्ञान विभागात दोन्ही व्यक्ती नवख्या होतील, असे मला सांगण्यात आले. म्हणून माझ्या दीर्घ रजेचा बेत मला पुढे ढकलावा लागला. त्यानंतर सुमारे दोन वर्षांनी मी नोकरी सोडून एक रासायनिक उद्योग काढण्याचा बेत करू लागलो. तो बेतही बारगळला. त्यानंतर माझ्यावर एक क्लेशकारी प्रसंग आला. माझ्या आयुष्यातील तो प्रसंग सर्वाधिक निराशाजनक आणि घुसमटवून टाकणारा

ठरला. तो या लिखाणातून संपूर्ण गाळून टाकावा का, असा मी अनेकदा विचार केला; पण ह्या आत्मचरित्रात्मक लिखाणाचे कधी-काळी प्रकाशन झालेच, तर त्यात काय घ्यायचे आणि काय गाळायचे, हे माझ्यावर थोडेच अवलंबून राहणार होते असा मी विचार केला; आणि सर्व घटना जशाच्या तशा लिहून ठेवाव्यात असे जरा नाखुशीनेच ठरविले.

क्लेशकारी अनुभव -

त्या अप्रिय घटनेमुळे काही काळाकरता युरोपमध्ये जाण्याची माझी इच्छा तीव्र झाली. युरोपमध्ये जाऊन रेडिओ-ॲक्टिव्हिटीवर काही महत्त्वाचे संशोधन करावे अशी माझी मनिषा होती. गेली दोन-तीन वर्षे त्या विषयात मला गोडी वाटत होती. त्या विषयावर पुस्तका-मासिकांतून जे-जे मिळेल, ते-ते मी वाचून काढत होतो; त्याच्या अभ्यास करत होतो. पंजाब विद्यापीठाचा फेलो म्हणून माझी नियुक्ती झाल्यानंतर लवकरच मी विद्यापीठाच्या समितीचा सभासदही (सिंडिक) बनलो. इसवी सन १९२१ पर्यंत मी सिंडिक होतो. नॅशनल काँग्रेसच्या आदेशानुसार फेलोशिप व इतर काही पदांचा मी राजीनामा दिला. तोपर्यंतची सर्व वर्षे विद्यापीठाच्या सभासदांपैकी मी सर्वांत अधिक कार्यशील सभासद होतो. आता मी ज्या घटनेविषयी लिहिणार आहे ती ज्या सुमाराला घडली, त्या सुमारास बोर्ड ऑफ स्टडीज्ची एक सभा झाली होती. त्या सभेत पुढच्या वर्षाकरता परीक्षक निवडण्याचे काम व्हायचे होते. त्या सभेला मी गैरहजर होतो. पुढे थोड्याच दिवसांनी माझ्या लक्षात आले, की विज्ञानाच्या पदवी परीक्षेकरता परीक्षक म्हणून माझे नाव नव्हते. आत्तासारख्या त्या वेळीही विज्ञान व कला यांसाठी वेगवेगळ्या परीक्षा होत असत. त्या दोनांपैकी एका परीक्षेकरता परीक्षकाचे काम मी ओळीने कित्येक वर्षे करीत आलो होतो. राहिलेल्या परीक्षेकरता तेव्हाचे सीनियर प्राध्यापक मुआट जोन्स यांची नेमणूक होई. एम्.एस्सी.चे बहुतेक सर्व सर्व काम प्रा.जोन्सनी आपल्याकडे घेतले होते. त्या वेळी प्रॉव्हिंशियल सर्व्हिसमध्ये मी पूर्ण

प्राध्यापक (फुलप्रोफेसर) होतो; आणि इंडियन एज्युकेशन सर्व्हिसमध्ये जोन्स हे प्राध्यापक होते. त्या वेळी बी.ए. व बी.एस्सी. या दोन्ही परीक्षांसाठी परीक्षक म्हणून प्रा. जोन्सची निवड झाली याबद्दल मला अचंबा वाटला. त्यातून माझे नाव वगळले याचा मला कमीपणा वाटला खरा; पण तसे करण्यात माझ्यावर कुरघोडी करण्याचा कुणाचा इरादा नसून केवळ नजरचुकीने तसे झाले असेल, असे मी धरून चाललो होतो. माझ्यासारख्या जुन्या शिक्षकाला परीक्षकाची जागा ही पैशांकरता महत्त्वाची वाटत नसे. तो एक मान होता. शिवाय माझ्यासारखा २५ वर्षांचा अनुभव असलेला शिक्षक प्रॉव्हिंशियल सर्व्हिसमध्ये असताना, त्याचे नाव वगळून (समजा, नकळत झाले तरी) प्रा. जोन्सना दोन्ही परीक्षांचे परीक्षक म्हणून नेमण्याचे खरे काहीच कारण नव्हते. झाल्या गोष्टीबद्दल मी संशयग्रस्त झालो. माझी मनःशांती पूर्ण बिघडून गेली. अशा विमनस्क मनःस्थितीत मी ती गोष्ट श्री.आर.बी.शादीलाल यांच्याजवळ बोलून दाखवली. (ह्या शादीलालांना नंतर सर हा किताब मिळाला.) काहीतरी गफलत झाली असणार, असे त्यांनाही वाटले. सिंडिकेटच्या पुढच्या सभेत जेव्हा परीक्षकांच्या नावांची यादी पक्की करण्याकरता मांडतील, तेव्हा माझे नाव त्यात पुन्हा घालण्याचे अभिवचन त्यांनी मला दिले. आर.बी.शादीलाल, मी आणि प्रा.जोन्स असे आम्ही तिघेही सिंडिकेटचे सभासद होतो. त्या वेळी विद्यापीठाचे कुलगुरू होते डॉ. जे.सी.आर्.इविंग.

बोर्ड ऑफ स्टडीजनी सुचविलेली परीक्षकांची यादी जेव्हा सिंडिकेटच्या पुढे आली, तेव्हा शादीलालांनी बी.ए. परीक्षेच्या परीक्षकाकरता माझे नाव मांडले. ते ५ विरुद्ध चार मतांनी नाकारले गेले. मी अर्थात् मत दिले नाही. मग त्यांनी बी.एस्सी.करता परीक्षक म्हणून माझे नाव सुचवले; पण त्याचाही वरच्यासारखा ५ विरुद्ध चार असाच निकाल लागला. त्यानंतर त्यांनी त्या तीनही परीक्षांच्या पदार्थविज्ञान या विषयाचा परीक्षक म्हणून माझे नाव पुढे केले. परिणाम तोच. सहा वेळा त्यांनी माझे नाव सुचवले; सहाही वेळा ते पाडण्यात आले. तेव्हा शादीलाल चिडले. कितीही

प्रक्षोभक परिस्थिती निर्माण झाली तरी त्यांच्या मनाची शांती ढळत नसे, अशी त्यांची ख्याती होती. ते उभे राहिले. " 'बोर्ड ऑफ स्टडीज्'च्या सभासदांनी स्वतः सुचविलेली नावे निवडण्याकरता मते देऊ नयेत असे मी सुचवतो, त्याला आपण परवानगी द्या." असे ते कुलगुरूंना उद्देशून म्हणाले.

त्यावर, "माझ्याकडे अनेक ठिकाणांहून तक्रारी आल्या आहेत. तुम्ही सुचविलेली सुधारणा करण्याचा मी प्रयत्न करीन. पण आत्ता तुम्ही त्याचा आग्रह धरू नका." असे डॉ.इविंगनी उत्तर दिले तेव्हा शादीलालनी आपल्या सूचना मागे घेतल्या.

सभा संपल्यानंतर पब्लिक इन्स्ट्रक्शनचे डायरेक्टर श्री.जे.सी.गॉडली माझ्याकडे आले. "गव्हर्नमेंट कॉलेजमधले सर्व युरोपीय प्राध्यापक तुमच्या विरुद्ध का आहेत?" त्यांनी विचारले.

माझ्या वरिष्ठांच्या सहानुभूतिपूर्वक चौकशीला मी "माझे संबंध सामान्यपणे सगळ्यांशी चांगले असतात आणि त्यांच्यापैकी कुणाचा माझ्यावर दात असेल, असे मला वाटत नाही." एवढेच उत्तर देऊ शकलो. कॉलेजमधल्या सगळ्या युरोपीय प्राध्यापकांनी माझ्याविरुद्ध मत दिले होते, असे त्यांनी मला सांगितले. त्या सगळ्यांनी प्रा.जोन्सना पाठिंबा देण्याकरता तसे केल्याबद्दल ते नाराजीने बोलू लागले, तेव्हा माझ्यावर चकित होण्याची पाळी आली. निदान वरच्या वर्गांच्या परीक्षेच्या कामात मला सहभागी करून घ्यायला हवे होते; कारण प्रा.जोन्सच्या बरोबरीने मीही त्या वर्गांना शिकवत होतो, असेही ते म्हणाले. मला दाखवलेली सहानुभूती व पाठिंबा यांच्याकरता डॉ. गॉडलींचे आभार मानले व मी निघून जाऊ लागलो, तेव्हा त्यांनी त्यांचे मत सहाही वेळी शादीलालांच्या प्रस्तावाच्या बाजूने दिल्याचे मला आपणहून सांगितले.

अधिक श्रेष्ठ रसायनशास्त्रज्ञ कोण आहे? -

दुसऱ्या दिवशी कॉलेजमधले काम संपवून मी घरी जायला निघालो

होतो, तेव्हा माझ्यात आणि प्रा.जोन्समध्ये एक विचित्र संवाद झाला. त्यांनी मला गाठून आपल्या कचेरीत नेले. मला खुर्चीवर बसायला सांगून ते टेबलाच्या कोपऱ्यावर टेकून बसले आणि मला अफलातून एक प्रश्न विचारला. (ते विचारताना हसत होते.)

प्रा.जोन्स : रायसाहेब, आपल्या दोघांत अधिक श्रेष्ठ रसायनशास्त्रज्ञ कोण आहे? तुम्ही का मी ?

मी : हा प्रश्न कसा उद्भवतो, हेच मला कळत नाही.

प्रा.जोन्स : पदवी-परीक्षांकरता परीक्षक म्हणून तुमचं नाव सुचवायला तुमची संमती होती; आणि बोर्ड ऑफ स्टडीजनी मला निवडलं.

मी : प्रा.जोन्स, माझं नाव सुचवण्याकरता मी केवळ संमती दिली असं जे तुम्हाला वाटलं, ते चूक आहे. खरं म्हणजे, माझं नाव सुचवायला शादीलालना मीच सांगितलं होतं. माझं नाव नजरचुकीनं राहून गेलं होतं, असा माझा समज होता.

प्रा.जोन्स : अस्सं ! आपलं नाव सुचवायला तुम्हीच त्यांना सांगितलंत, हे मला माहीत नव्हतं. पण बोर्ड ऑफ स्टडीजनी मात्र निश्चितपणे मलाच निवडलं.

मी : होय. तसं आहे खरं !

प्रा.जोन्स : तुम्ही स्वतःला माझ्यापेक्षा श्रेष्ठ रसायनशास्त्रज्ञ समजता का? श्री.गॉडलींचं मत तुमच्याविषयी इतकं चांगलं असायचं काय कारण आहे?

मी : मला माहीत नाही. तुम्हाला रसायनशास्त्रातील किती माहिती आहे, याची मला कल्पना नाही; आणि मला त्या शास्त्राचं किती ज्ञान आहे, ते कळायला तुम्हाला काही मार्ग नाही. पब्लिक इन्स्ट्रक्शनचे डायरेक्टर माझ्याशी विशेष सहानुभूतीने वागतात ह्याची मला कल्पना नाही. बाकीचे प्रश्न तुम्ही त्यांना प्रत्यक्ष विचारू शकता.

प्रा.जोन्स : पण तुम्हाला हे माहीत आहे ना, की मी एम्.ए.च्या वर्गांना शिकवतो आणि तुमचं शिकवणं केवळ बी.ए. आणि बी.एस्सी.च्या वर्गांपुरतं मर्यादित आहे."

त्यांनी मला हेही सांगितले की श्री. गॉडली माझ्याशी काय बोलत होते, ते त्यांनी स्वतः ऐकले होते. सिंडिकेट रूम आणि सिनेट सभांकरता वापरल्या जाणाऱ्या खोलीच्या मध्ये जो पडदा होता, त्याच्यामागे ते उभे होते.

मी : एम्.ए.च्या वर्गांना शिकवण्याचं सगळं काम तुम्हाला हवं होतं, तेव्हा मी काहीच म्हटलं नाही. इतर विषयांत असिस्टंट प्राध्यापकांना एम्.ए.च्या वर्गांवर शिकवण्याचं काम दिलं जातं. इथं मी पूर्ण (फुल) प्राध्यापक आहे. माझ्या गाठीला पंचवीस वर्षांचा अनुभव आहे. प्रॉव्हिशियल सेवा म्हणजे इंडियन एज्युकेशन सर्व्हिसची प्रांतीय सेवा आहे.

प्रा.जोन्स : ते काहीही असेल, मी एम्.ए. ला शिकवतो आणि तुम्ही शिकवत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

मी : श्री. जोन्स, तुम्ही इथं सहा किंवा सात वर्षं आहात. मी एम्.ए.च्या वर्गांना पदार्थ- विज्ञान आणि रसायनशास्त्र सात वर्षं एकटा शिकवत होतो, हे तुम्हाला माहीत आहे का?

प्रा.जोन्स : ते केव्हा होतं?

मी : वीस वर्षांपूर्वी मी प्रथम एम्.ए.चे वर्ग घेतले. त्यानंतर अधून-मधून एम्.ए.च्या वर्गांना पदार्थविज्ञान आणि रसायनशास्त्र शिकवण्याचं संपूर्ण काम एकेक वर्षाकरता माझ्याकडे असे. ती सर्व मिळून सात वर्षं होतात.

प्रा.जोन्स : (रागारागाने) आणि वीस वर्षांबद्दल काय म्हणालात?

मी: हो. श्री. जोन्स, तुम्ही त्या वेळी फार लहान असणार.

प्रा.जोन्स : (त्यांचा राग अनावर झाला होता.) काय म्हणालात? पुन्हा सांगा.

मी : कॉलेजच्या चार भिंतींमध्ये बसून हे बोलण्याचं आपल्याला कारण नाही. कॉलेजच्या आवाराच्या बाहेर या विषयावर तुमच्याशी चर्चा करायला मी तयार आहे.

प्रा.जोन्स : (रागाने) तुम्ही एम्.ए.च्या वर्गांना कधी शिकवलंत, ते सांगा.

मी : श्री.जोन्स, मी तुम्हाला सांगितलं की वीस वर्षांपूर्वी प्रथम मी एम्.ए.ला रसायनशास्त्र शिकवलं. अगदी अचूक म्हणायचं, तर सन १८८७ आणि १८८८ ही दोन्ही वर्षं मी एम्.ए.ला रसायनशास्त्र शिकवत होतो.

प्रा.जोन्स : (संतापून) ओ ! ओ !

मी : या विषयावर आणखी बोलण्याचं कारण नाही.

प्रा.जोन्स : वा, असं कसं चालेल? हे तर अधिक रोचक होऊ लागलं आहे. मी फार लहान होतो, त्याचं काय म्हणत होतात?

मी : हो, त्या वेळी तुम्ही रांगत असणार.

प्रा.जोन्स : मग तुम्ही माझ्यापेक्षा नक्की श्रेष्ठ रसायनशास्त्रज्ञ असणार तर !

मी : मला माहीत नाही; आणि मी तसं म्हटलेलं नाही. श्री. जोन्स, मला वाटतं, स्टाफच्या दोन सभासदांनी अशा प्रकारचं संभाषण कॉलेजच्या हद्दीत करणं बरं दिसत नाही.

प्रा.जोन्स : माझ्या साध्या प्रश्नाचं उत्तर तुम्हाला द्यायलाच पाहिजे. आपल्यामधला श्रेष्ठ रसायनशास्त्रज्ञ कोण आहे?

मी : मला ते माहीत नाही, असं मी तुम्हाला सांगितलं आहे. तुमच्या रसायनशास्त्रीय ज्ञानाची चाचणी घेण्याची माझ्यावर कधी वेळी आली नाही आणि माझं ज्ञान तपासण्याची तुम्हाला कधी संधी मिळाली आहे, असं मला वाटत नाही. पण तुमचा आग्रह असेल, तर आपण त्या प्रश्नाचं उत्तर शोधू शकू. तुम्ही त्या विषयातला एक भाग निवडा. त्यावर मी तुम्ही सांगाल त्या वर्गाला व्याख्याने देईन. तो भाग मी पंधरा दिवस शिकवीन, तेव्हा तुम्ही उपस्थित राहत जा. नंतर मी एक भाग निवडीन. मी सांगितलेल्या वर्गाला तुम्ही तो पंधरा दिवस शिकवा, तेव्हा मी हजर राहत जाईन. अशी दोघांची शिकवण्याची पाळी संपली की आपण एकमेकांच्या कामाचा आढावा घेऊ. त्यावरून प्रत्येकाला आपापल्या विषयात किती

कळतं, ते समजून येईल.''

एकमेकांची शिकवण्याची कुवत आणि विषयातले ज्ञान तपासण्याची कल्पना प्रा.जोन्सना मुळीच आवडली नाही. थोडे थातुर-मातुर बोलून त्यांनी मला विश्वासात घेतले आणि एक गुपित सांगितले. ते म्हणाले की मी फार सौम्य परीक्षक असल्याने माझे नाव बोर्ड ऑफ स्टडीजनी गाळले. त्यावर मी त्यांनी विचारले,

''असं होतं तर सिंडिकेटच्या सभेत माझ्याऐवजी तुमचं नाव का घातलं याचं हे महत्त्वाचं कारण का नाही सांगितलंत?''

त्यापुढे मी त्यांना सांगितले, ''मी जर सौम्य परीक्षक असेन, तर सगळ्यांकरता आहे; केवळ माझ्या विद्यार्थ्यांकरता नाही. तसं पाहिलं तर, मी हिंदुस्थानी आहे या कारणाने विद्यार्थ्यांना माझ्याकडे येणं हे तुमच्याकडे येण्यापेक्षा सुलभ आहे. असं असूनही काही सवलत मागायला येण्याचं कुणीही धाडस केलेलं नाही.'' याउलट श्री.जोन्स आपल्या विद्यार्थ्यांना भेटायला वसतिगृहात जात आणि प्रात्यक्षिक परीक्षेत येणाऱ्या प्रश्नांची खुबीने कल्पना देत असत, हे सर्वश्रुत होते. मी श्री. जोन्सना असेही सांगितले, ''ग्रेस मार्क देण्याची माझी सवय आहे. कोणताही विद्यार्थी एका मार्काने नापास होत असेल, तर मी त्याला ग्रेस मार्क देतो. माझ्या त्या ग्रेस मार्काचा लाभ एका मार्काने नापास होणाऱ्या सर्वांना मिळतो. केवळ निवडक विद्यार्थ्यांकरता मी तो मार्क राखून ठेवत नाही.''

या उलट मला एक उदाहरण माहीत आहे. एका वेळी प्रा.जोन्स आणि संलग्न कॉलेजातील एक प्राध्यापक परीक्षक होते. त्या वेळी एका विद्यार्थ्याला सोळा मार्क पडले. सतरा पडले असते, तर तो पास होणार होता. त्या वेळी ग्रेस मार्क द्यायला ते दुसरे प्राध्यापक तयार होते; पण श्री.जोन्स तयार होईनात. मुलांच्या क्षमतेची परीक्षा करण्याइतका नाजूक रासायनिक तोल आपल्या कुणाच्याचकडे नाही असे मी म्हटले. मी जर सौम्य परीक्षक होतो; तर श्री.जोन्स फार कठोर होते हे सर्व सांगून पुढे मी म्हटले,

''पदवी परीक्षेच्या परीक्षकांकडून माझं नाव का वगळलं हे तुम्ही सिंडिकेटला सांगितलं नाहीत ह्याचं मला वाईट वाटतं. जर तुम्ही ते सांगितलं असतंत, तर मी माझ्याऐवजी तुमचं नाव वगळायला सिंडिकेटला सांगितलं असतं. तिथे मी त्या बिचाऱ्या विद्यार्थ्याचं उदाहरण दिलं असतं. एक मार्क मिळाला असता, तर तो पास होणार होता. पण तेवढ्यावरून तुम्ही दोन परीक्षक १५ मिनिटं चर्चा करीत होतात आणि तरीही त्याला पास करावं किंवा नाही यावर तुमचं एकमत झालं नाही. म्हणून शेवटी तुम्ही एक युक्ती काढलीत. एक रुपयाचं नाणं फेकून निर्णय केलात. तो विद्यार्थी नशीबवान; म्हणून निर्णय त्याच्या बाजूने लागला. सिंडिकेटच्या पुढे मी खिशातून नाणं काढून उडवून दाखवलं असतं आणि सांगितलं असतं की या विद्यापीठाचे पदवीधर असे बनवले जातात.''

हे ऐकून श्री.जोन्सची घाबरगुंडी उडाली. त्यांचा नूर बदलून गेला. 'आपण मित्र आहोत आणि कितीतरी वर्षे एकत्र काम करीत आहोत', असे त्यांनी गोडीने मला सांगितले. त्यापुढे जाऊन ते असेही म्हणाले की सिंडिकेटच्या पुढच्या सभेत पदवी-परीक्षांपैकी एकाचा परीक्षक म्हणून (आजपर्यंत जसा मी असायचो,) ते स्वतःच माझे नाव सुचवतील. मग आम्ही मैत्रीच्या भावनने आपापल्या घरी गेलो. यथासमय एका पदवीकरता परीक्षक म्हणून माझी निवड करण्यात आली. त्या प्रसंगानंतर आम्ही एकमेकांशी जमवून घेतले व शत्रुत्वाची भावना आमच्यामध्ये नाही असा माझा समज झाला. वरवर आमचे संबंध सलोख्याचे दिसत होते; पण वस्तुस्थिती त्याहून अगदी वेगळी होती.

मला पत्ता लागू दिला नाही -

वरच्या प्रसंगानंतर थोड्याच दिवसांनी श्री.जोन्स ह्यांनी इंग्लंडमध्ये एक नोकरी स्वीकारली. साहजिकच कॉलेजच्या रसायनशास्त्र विभागात एक जागा मोकळी होणार होती. अशा वेळी, सर्वसामान्यपणे, त्या जागेवर दुसरा कुणी नेमण्यापेक्षा ती जागा मला मिळायला हरकत नव्हती. पण एकूण परिस्थिती बघता, मी विस्ताराने स्पष्ट केलेच आहे, तशी अपेक्षा

करणेही फार होते. सर चार्ल्स् ऐचिसनच्या अध्यक्षतेखाली पब्लिक सर्व्हिस कमिशनने उच्च पदांच्या नोकऱ्या दोन वेगळ्या श्रेणित विभागल्या होत्या. इंपीरियल किंवा इंडियन आणि प्रॉव्हिशियल किंवा प्रांतीय सेवा. वरकरणी त्या समांतर असल्याचे घोषित केले होते; पण प्रत्यक्षात त्या दोन्हींत तफावतीची दरी होती. पगारात तर खूप फरक होता; पण त्याहून तीव्र फरक होता, तो म्हणजे कामाबाबतच्या अपेक्षा आणि सवलतींबाबत. हिंदुस्थानी माणूस फक्त प्रांतीय (प्रॉव्हिशियल) सेवेतील उच्चपदाची अपेक्षा धरू शकत असे. तेथे त्याचा पगार ७०० रु. इतका असे. इंपीरियल किंवा इंडियन एज्युकेशनल सेवेमध्ये सर्वसामान्य युरोपीय व्यक्तींची नेमणूक होत असे. श्री.ओमान सेवानिवृत्त झाल्यावर ज्येष्ठ प्राध्यापकपद हे इंडियन एज्युकेशनल सेवेत समाविष्ट करण्यात आले; आणि प्रांतीय सेवेत दुसरे प्राध्यापकपद निर्माण करून मला देण्यात आले. इंडियन एज्युकेशनल सेवेत हिंदुस्थानी माणसांना प्रवेश देऊ नये असे कुठे लिहून ठेवले नव्हते; पण त्या सेवेत हिंदुस्थानी माणसांना प्रवेश न देण्याची अतोनात खबरदारी घेतली जाई आणि ती सेवा प्रत्यक्षात फक्त युरोपीय व्यक्तींकरता राखून ठेवली जाई, हे सत्य आहे. माझा अध्यापनाचा अनुभव लक्षात घेऊन माझ्या बाबतीत अपवाद केला जाईल आणि रिकामी जागा भरायला मला संधी मिळेल असे वाटत होते. मी सेवानिवृत्त झालो तोपर्यंत - म्हणजे एप्रिल १९१८ पर्यंत - इंडियन एज्युकेशन सेवेत केवळ तीन हिंदुस्थानी होते. पण त्या जागेवर कुणाची तरी नेमणूक होईपर्यंत मला रसायनशास्त्र विभागाची सूत्रे घ्यावी लागणार होती आणि माझ्या जागेवर दुसऱ्या कुणाला तरी नेमावे लागणार होते. ह्या दोन्ही गोष्टी अपरिहार्य होत्या. हे सारे श्री.जोन्स विस्ताराने मला सांगत बसत; पण खरी त्याची गरज नव्हती. त्यांच्या प्रत्येक वर्गाने काय केलेय, कुठल्या विषयात ते कमकुवत होते, कोणता भाग शिकवायचा ठेवला आहे ह्याचा तपशील ते मला सांगत बसत. काय शिकवले आहे व काय शिकवायचे राहिले आहे, ह्याची मला कल्पना यावी म्हणून ते सांगत होते,

असे मला वाटावे असा त्यांचा हेतू होता. सांगायला खेद होतो की हे सर्व सांगत बसण्यात मला चकवण्याचा त्यांचा खरा उद्देश होता. मला सारे तपशील सांगण्यात ते बराच वेळ घालवीत असत. आपल्याकडे कोणती रसायने किती प्रमाणात आहेत वगैरे माहिती प्रयोगशाळा-प्रमुखाला देणे आवश्यक असते; पण तीही माहिती ते मला पुरवीत बसत. प्रत्यक्षात गुपचुपपणे त्यांनी माझ्याविरुद्ध एक रिपोर्ट तयार केला होता व तो प्राचार्यांकडे पाठवून दिला होता. रिकाम्या जागेवर काम करण्यास योग्य असा माणूस लाहोरमध्ये नाही, तेव्हा बाहेरून कुणाला तरी आणावे असे त्यात सुचवले होते. श्री.जोन्स लाहोर सोडून जाण्यापूर्वी दोन दिवस अगोदर केवळ योगायोगाने मला एक गोष्ट कळली. जर्मन विद्यापीठातून डॉक्टरेट मिळवून आलेले एक श्रीमान हिंदुस्थानी विद्यापीठातून एम्.ए. करण्याच्या तयारीत होते. त्यांची प्राध्यापकपदाकरता नेमणूक झाली होती. एखाद-दुसऱ्या दिवसात ते लाहोरला येणार होते. या बातमीने मला केवढा धक्का बसला, हे सांगणे केवळ अशक्य आहे. त्या जागेवर दुसऱ्या कुणाची निवड झाली आहे ह्याचा धक्का तर अनपेक्षित होताच; पण त्याहीपेक्षा त्या पदावर (श्री.जोन्सच्या) काम करणाऱ्या व्यक्तींविषयी माझ्या त्या दिवसापर्यंत ज्या कल्पना होत्या, त्या साफ कोसळून गेल्या. माझ्या मनात काय-काय विचार येऊन गेले ते येथे लिहिणे मला जमणार नाही; पण सर्व गोष्टींविषयीच्या माझ्या कल्पना निश्चितपणे बदलून गेल्या. त्या शेवटच्या दोन दिवसांत माझे व श्री.जोन्सचे संबंध पार बिघडले व ते सर्वांच्या लक्षातही आले. त्यांच्या निरोप-समारंभाला मी हजर राहणार नाही, ह्याबद्दल सर्वांची खात्री होती. पण पुन्हा माझी दिशाभूल करण्यात आली. प्रा. बेदन माझ्याकडे आले व निरोप-समारंभाला आल्याशिवाय राहू नका, अशी माझी विनवणी केली. तुम्हाला मागे टाकून नुकतेच शिक्षण संपवून आलेल्या माणसाची नेमणूक करण्यात श्री.जोन्सचा हात नाही, अशी काही हकीगतही त्यांनी मला सांगितली. निरोप-समारंभाला उत्तर म्हणून श्री.जोन्सनी जे भाषण तयार केले आहे, ते आपण वाचले

असल्याचे त्यांनी मला सांगितले. त्यात माझ्याबद्दल खूप काहीसे म्हटले आहे आणि ते वाचून ह्या नेमणुकीला ते जराही कारणीभूत असतील असे वाटत नाही, असे बराच वेळ मला पटवून देत प्रा. बेदननी माझ्याकडून समारंभाला हजर राहण्याचे वचन घेतले. पण प्रत्यक्षात श्री.जोन्सच्या भाषणात माझ्याविषयी काहीही उल्लेख आला नव्हता. नंतर मला कळले की, माझ्याविषयीचा मजकूर एका वेगळ्या कागदावर श्री.जोन्सनी लिहिला होता आणि प्राचार्यांकडे आपली भाषणाची प्रत देताना तो कागद त्यांनी काढून घेतला. जेव्हा मी ते प्रा.बेदनच्या निदर्शनास आणून दिले, तेव्हा मला बनवले असल्याचे त्यांनी कबूल केले. पण शेवटी मोठ्या प्रौढीने ते म्हणाले,

''पण श्री.जोन्स तुमच्यापेक्षा अधिक हुशार असल्याचंच सिद्ध झालं.'' झाल्या गोष्टीबद्दल मी असे म्हणेन की, श्री.जोन्स हे माझ्यापेक्षा अधिक धूर्त होते खरे; पण त्या प्रकरणात सावजापेक्षा शिकाऱ्याचे फार अधिक नुकसान झाले होते.

श्री.जोन्स गेल्यानंतर एक-दोन दिवसांनी मी प्राचार्य कर्नल स्टीफन्सनकडे गेलो. श्री.जोन्सनी माझ्याविरुद्ध लिहिलेला रिपोर्ट आणि माझी झालेली गळचेपी याबद्दल तक्रार केली. पदवी परीक्षकांच्या नेमणुकीबद्दल सिंडिकेटच्या सभेत जे झाले, तेव्हापासून त्यांनी माझ्यावर दात धरल्याची मी त्यांना आठवण करून दिली. हे सगळे जरा कडकपणे मी त्यांना सांगत होतो व सांगताना दोन-तीन वेळा 'हे नाही चालायचं' असेही म्हटले. कर्नल स्टीफन्सनने त्याबद्दल मला चांगलेच फैलावर घेतले आणि,

''तुमच्यावर दात धरून त्यांनी तुमच्याविरुद्ध रिपोर्ट लिहिला असा आरोप एका इंग्रजावर करायचं तुमचं धाडस कसं झालं? आणि 'हे नाही चालायचं', म्हणजे काय? काय नाही चालायचं हो?'' असे विचारले.

मग मीही त्यांना सांगितले, ''विभागातला मी एक ज्येष्ठ (सीनियर) अधिकारी आहे असा माझा समज होता; पण आता मला समजलं आहे की ते तसं नाही. सत्तावीस-अठ्ठावीस वर्षं मी चाकरी केली आहे. आज पेंशनवर पाणी सोडून तडकाफडकी निघून जाणं मला परवडणार नाही. ह्या विषयावर मी तुमच्याशी अधिक बोलणार नाही; कारण इतक्या वर्षांच्या मेहनतीने जे पेन्शन मला जवळ-जवळ मिळाल्यासारखं आहे, त्यावर पाणी सोडायची माझी तयारी नाही. पण घडलेल्या सर्व प्रकाराविषयी माझं मत मात्र बदलणार नाही.''

इतके बोलून मी उठलो व दरवाज्याकडे गेलो. कर्नल स्टीफन्सन झटक्यात उठले व माझ्या आधी दरवाज्यापाशी पोहोचून त्यांनी माझ्यासाठी दरवाजा उघडून धरला. तेव्हा मी म्हटले,

''कॉलेजच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला माझ्यासारख्या कनिष्ठ माणसाकरता दरवाजा उघडायला लावण्याची आणखी एक चूक मी माझ्या हातून घडू देणार नाही.''

असे म्हणून मी दोन ते तीन मिनिटे तिथे थांबून राहिलो. प्राचार्यही दरवाजा उघडा धरून तसेच थांबले. काय करावे, हे आमच्यापैकी कुणालाच कळेना. ते त्यांच्या खुर्चीकडे जाईनात व मी दरवाज्यातून बाहेर जाईना. शेवटी प्राचार्यांनी तो पेच सोडविला. ते म्हणाले,

''मीही घरी निघालो आहे.''

एवढे म्हणून ते उघड्या दारातून बाहेर गेले व आपल्या घराकडे चालू लागले. त्यानंतर मी एका विचित्र मनःस्थितीत सापडलो. कॉलेजमधून घरी आलो, तेव्हा माझे मन क्षुब्ध झाले होते. काय करावे, ते मला सुचत नव्हते. आता जी आमची बैठकीची खोली आहे, त्या प्रशस्त खोलीत मी येरझाऱ्या घालू लागलो. जिवाची तडफड होत होती.

''माझ्या क्षमतेचं मूल्यमापन करायला हा जोन्स कोण लागून गेला आहे?'' मी स्वतःशीच म्हटले. पण व्हायची ती हानी झालेलीच होती. प्राचार्य आणि पब्लिक इन्स्ट्रक्शनचे डायरेक्टर या दोघांनी बिनविरोध श्री.जोन्सचे म्हणणे मानले व त्यावर शिक्कामोर्तब केले होते. एका तरुण माणसाच्या - केवळ तो इंग्रज होता म्हणून - रिपोर्टमुळे माझी आयुष्यभराची सेवा डावलली गेली याची व्यथा फार तीव्र होती. अशा

मनःस्थितीत मी अर्धा तास त्या खोलीत फेऱ्या मारत होतो. चालता-चालता मी स्वतःला विचारले,

"मी जिवंत मासा आहे की मेलेला? मी प्रवाहाच्या विरुद्ध पोहू शकतो का? की प्रवाहपतितासारखा मी अधोगतीलाच लागणार आहे? मी जिवंत मासा आहे की मेलेला?"


काही मिनिटांतच ह्या प्रश्नाचे उत्तर मी निश्चितपणे दिले - "मी जिता मासा आहे. मला प्रवाहाविरुद्ध पोहता येतं आणि मी तसा पोहणार आहे."

हे शब्द माझ्या तोंडून बाहेर पडले आणि मला एक प्रकारचे समाधान वाटले. मनातला ताण सुटला. थोड्या वेळात मी झोपायला गेलो. एक तासभर झोपलो. त्याच दिवशी दुपारी युरोपमध्ये जायचे व संशोधन करायचे असा मी ठाम निश्चय केला. संशोधनकामाची आवड म्हणून संशोधन करावे असे मी आजपर्यंत ठरवीत होतो - कितीही अडचणी आल्या तरी. वर उल्लेखलेल्या घटनेवरून* अडचणी कोणत्याही प्रकारच्या असू शकतात याची कल्पना येईल. तरी मी ज्या अनेक समस्यांवर काम करीत होतो, त्या युरोपहून परतल्यावर सोडवण्याची मी आशा करीत होतो. श्री. जोन्सच्या कृत्याने माझ्या युरोपला जाण्याच्या मनिषेला जोर आला; ती थोपवण्याच्या पलीकडे गेली. रात्र होण्यापूर्वी लाहोरमधल्या रोम कॅथलिक चर्चमध्ये काम करीत असणाऱ्या एका जर्मन कॅथलिक पाद्रीकडे मी गेलो. त्यांच्याकडून जर्मन शिकण्याचे ठरवून टाकले.

रेडिओ-ॲक्टिव्हिटीकडे माझा ओढा -

मला रेडिओ-ॲक्टिव्हिटी या विषयाची विशेष ओढ वाटू लागली

** काही अशा अडचणी सांगण्याने कष्ट होतील म्हणून मी ते सांगायचे टाळतो. हिंदुस्थानात त्या काळी वैज्ञानिक संशोधन फारच थोडे होई. तसे संशोधन करण्याकरता हिंदुस्थानी माणसांच्या वाटेत फार अडचणी येत असत आणि पंजाबात तर त्या अडचणी दहापटीने अधिक असत.*



'कॉलेजच्या प्राचार्यांनाच. दार उघडायला लावण्याची आणखी एक चूक मी होऊ देणार नाही.'

होती. गेली काही वर्षे पुस्तके, नियतकालिके यांच्या साहाय्याने मी त्या विषयावर काही काम सुरू करावे याकरता मी फार उत्सुक झालो होतो.

म्हणूनच मी प्रा. स्मिथेल्स् यांना लिहिले. कोणत्या तरी जर्मन विद्यापीठात चांगल्या जाणकार प्राध्यापकाबरोबर त्या विषयाचा अभ्यास व संशोधन करण्याची माझी सोय करता येईल का, असे विचारले.

लाहोर सोडण्याच्या सुमारास शिसे व बिस्मथ यांचा आण्विक भार निश्चित करण्याविषयीची माझी जिज्ञासा वाढली होती. विविध क्षारांच्या विरघळण्याबद्दलचे नियम करताना मला एक गोष्ट आढळली होती. ती म्हणजे काही पदार्थांचा आण्विक भार निश्चित करताना भल्या-भल्या संशोधकांच्या उत्तरांत तफावत येई. प्रयोग करताना थोडी-फार तफावत नेहमीच येते; पण त्याला काही प्रमाण असते. आण्विक भाराच्या बाबतीत ही तफावत प्रमाणाबाहेर येत असे. या तफावतीचे कारण शोधता-शोधता मी एका निर्णयाप्रत येऊन पोहोचलो होतो. या तफावतीला काहीतरी बाह्य कारण होते. ज्याला आपण शुद्ध शिसे किंवा शुद्ध बिस्मथ समजतो, त्यात इतर कुठल्या तरी पदार्थाची मिसळ असावी आणि ती मिसळ अगदी सूक्ष्म आणि वेगवेगळ्या प्रमाणात होत असावी. आणि त्या दोनही पदार्थांच्या वेगवेगळ्या वेळी निश्चित केलेल्या आण्विक भारात जी तफावत येत होती, तिला हा मिसळलेला पदार्थ कारणीभूत होत असावा.

प्रा.स्मिथेल्स्नी मला डॉ.कासिमीर फजन्स्कडे जाण्यास सुचवले. डॉ. फजन्स् वर उल्लेखलेल्या समस्येवर संशोधन करीत होते. त्यांच्याच प्रयोगशाळेत मी संशोधनाला सुरुवात केली.

त्या काळात सरकारकडून पासपोर्ट मिळवण्याची जरुरी नसे. कितीतरीजण ओळखपत्र घेऊन युरोपमध्ये जात असत. अशाच ओळखपत्राकरता मी लाहोरच्या कमिशनरांकडे अर्ज केला; पण माझी जाण्याची वेळ आली तरी मला ओळखपत्र मिळाले नव्हते. माझ्या मित्रांच्या मते ओळखपत्र बरोबर असणे जरी चांगले असले, तरी ते काही अत्यावश्यक नसते. माझ्या युरोपातल्या मुक्कामात कदाचित् ओळखपत्राची

मला गरज पडणारही नाही. पण मुंबईत गेल्यावर मी शेठ भगवानदासना भेटायला गेलो. ते माझे मित्र होते. त्यांनी युरोप व चीनमध्ये बराच प्रवास केला होता. त्यांच्या सल्ल्यावरून मी लाहोरच्या डेप्युटी कमिशनरांना तार केली आणि माझे ओळखपत्र माझ्या हायडेलबर्गच्या पत्त्यावर पाठवून द्यायला सांगितले. शेठजींचा तो सल्ला मला कमालीचा उपयोगी पडला. मी जर्मनीत असतानाच पहिल्या महायुद्धाला तोंड फुटले. आणि तेव्हा जर माझ्याजवळ ओळखपत्र नसते, तर मला जर्मनीतून बाहेर येणे अशक्य झाले असते.

जहाजावर टिरॉल नावाच्या माणसाशी माझी ओळख झाली. अठरा वर्षे हिंदुस्थानात राहून ते मायदेशी म्हणजे जर्मनीला चालले होते. त्यांच्याकडून मी जर्मन भाषेचे नियमित धडे घेऊ लागलो. त्या भाषेतून मी त्यांच्याशी थोडे बोलायलाही लागलो. आमचे जहाज ऑस्ट्रियन लॉइड कंपनीच्या मालकीचे होते. मी ट्रिएस्टला उतरलो. जहाजावरचे बहुतेक कर्मचारी इटालियन होते; पण त्या सर्वांना जर्मन येत असे. त्यांच्याबरोबर जर्मनमधून बोलण्याची मला संधी मिळे. ह्या संभाषणामुळे जर्मन बोलण्यात माझ्या काय त्रुटी होतात, ते लक्षात येई. माझे पाद्री शिक्षक मायदेशापासून बरीच वर्षे दूर होते आणि त्यांचे उच्चार पुष्कळसे इंग्रजी धर्तीवर झाले होते. मुंबईला जहाजात बसल्यापासून जर्मन बोललेले माझ्या कानावर येऊ लागले. प्रथम-प्रथम मला एकही शब्द कळायचा नाही. जहाजावर माझ्याबरोबर एक लाहोरी होता. जर्मनीवरून तो इंग्लंडला व्यापाराकरता जात होता. त्याची मला चांगली मदत झाली. हा लाहोरी मोठा धडाडीचा होता. अनारकली येथे काही एजन्सी बिझिनेस करीत होता. त्याची ओळख करून घ्यायला मला आवडले. आता मला नक्की आठवत नाही; पण त्याचे नाव लाला शंकरदास असावे असे वाटते. हिंदुस्थानात परत आल्यावर त्याची लाहोरमध्ये एक-दोनदा गाठ पडली होती. जहाजावरच्या वायरलेस ऑपरेटरशी मी दोस्ती केली. पुष्कळदा त्याच्याजवळ बसून तो त्याचे यंत्र कसे चालवतो, ते मी शिकून घेतले

होते. त्याचे ते यंत्र क्रिस्टल प्रकारचे होते. मोठ्या दिमाखात त्याने मला सांगितले की तो त्या यंत्राद्वारे २००० मैलांवरही संदेश पाठवू शकत असे. त्याने पुष्कळ प्रवास केला होता. बडबडा असल्याने तो निरनिराळ्या देशांच्या गोष्टी सांगत असे. जहाजावरच्या स्वयंपाक्याशीही मी ओळख करून घेतली. तो मला चहाच्या वेळी किंवा इतर वेळीही चांगले-चुंगले पदार्थ व केक देत असे. सर्व प्रवाशांकडून दहा-दहा मार्क गोळा करून जहाजावरच्या कर्मचाऱ्यांना वाटून देण्यात येत असत. त्या स्वयंपाक्याने माझ्याकडे जातीने लक्ष पुरविले होते. तो एकदा आजारी पडला, तेव्हा मी त्याची काळजी घेतलीच; शिवाय थोडे शिलिंगही त्याला दिले. (सगळ्या प्रवाशांकडून घेतल्या जाणाऱ्या दहा मार्कांच्या वर ते शिलिंग होते.)

हायडेलबर्ग -

लीडस् विद्यापीठाच्या प्रा.स्मिथेल्स्नी मला डॉ.फजन्स्कडे जाण्याचा सल्ला दिला होता. त्यांनी माझी कार्लस्रूहला जाण्याची व्यवस्थाही केली. हे ठिकाण हायडेलबर्गपासून २५ मैलांवर होते. मला कुठून तरी कळले होते की हायडेलबर्ग येथे श्रीमती शेरेर नावाच्या बाई आहेत. जगातल्या विविध ठिकाणांहून येणाऱ्यांची राहण्याची सोय त्या करतात. त्या जर्मन भाषा शिकवायच्या. कार्लस्रूहला जाण्यापूर्वी एखाद-दुसरा दिवस हायडेलबर्गला थांबावे असे मी ठरविले; आणि त्या बाईंना तार पाठवून मला उतरवून घ्यायला रेल्वे स्थानकावर कुणाला तरी पाठवा, असे कळवले. हायडेलबर्गच्या स्टेशनवर त्यांची मुलगी माझी वाट बघत होती. रम्य अशा नेकर नदीच्या उजव्या किनाऱ्यावर एका टेकडीच्या उतारावर त्यांचे घर होते. अशा घरांना 'पेन्शन' म्हणतात. तिथे एका हिंदुस्थानी विद्यार्थ्याशी माझी ओळख झाली. पुढे त्यांची मला फार मदत झाली. त्याचे नाव होते डॉ.हुदलीकर. भूगर्भशास्त्र हा विषय घेऊन ते मुंबई विद्यापीठातून एम्.ए. झाले होते. पुणे येथल्या फर्गसन कॉलेजमध्ये ते काही काळ शिकवत होते.

त्या विषयाचा आणखी अभ्यास करण्याकरता ते हायडेलबर्गला आले होते. कार्लस्रूहला जाण्यापूर्वी हायडेलबर्गच्या ज्या पेंशनमध्ये मी राहिलो होतो, तिथेच डॉ.हुदलीकरांचे वास्तव्य होते. थोड्याच दिवसांत आमची मैत्री झाली. संध्याकाळी आम्ही दूरवर फिरायला जात असू. कार्लस्रूहच्या माझ्या मुक्कामात मी हायडेलबर्गला बरेचदा येत असे - कधी विद्यापीठ बघायला, तर कधी तिथल्या काही विख्यात प्राध्यापकांना भेटायला. असे काही दिवस गेले आणि मी आणखी एका हिंदुस्थानी विद्यार्थ्याला भेटलो. त्यांचे व्यक्तिमत्त्व मोठे लोभसवाणे होते. आता ते पंडित मोतीलाल नेहरूंचे जावई झाले आहेत. श्री. रणजीतसिंह पंडित हे राजकोटच्या एका उच्च घराण्यात जन्मले होते. त्यांची चाल-चलवणूक बघितली की ते गर्भश्रीमंतीत वाढले होते, हे सहज लक्षात येई. वेदांचा गाढा अभ्यास केलेले शंकर पांडुरंग पंडित ह्यांचे ते पुतणे होते, हे मला पुढे कळले. शंकर पांडुरंग पंडित हे प्रार्थना समाजाचे नेते सभासद होते आणि जवळ-जवळ २८ वर्षांपूर्वी त्यांचा व माझा निकटचा संबंध आला होता. त्यांचे पुतणे म्हणून रणजीतसिंह पंडित व माझ्यात आणखी एक दुवा निर्माण झाला. युद्ध सुरू झाल्यावर मला तडकाफडकी जर्मन देश सोडून जावे लागले, तेव्हा डॉ.हुदलीकर आणि रणजीतसिंह पंडित यांनी मला जी मदत केली, ती मी कधी विसरणार नाही. हुदलीकर, पंडित आणि मी संध्याकाळी फिरायला गेलो की पंडितांच्या देखण्या चेहऱ्यामुळे आणि काळ्या-कुरळ्या केसांमुळे जर्मन



मोतीलाल नेहरू

तरुणी त्यांच्याकडे आकर्षित होत असत. दोन वेळा तर अशा मुली त्यांच्यापाशी येऊन त्यांच्या केसांना हात लावून बघण्याची इच्छा प्रदर्शित करताना मी स्वतः बघितले होते.

प्रा.लेनार्डची व माझी हायडेलबर्गमध्ये गाठ पडली. त्यांचे व्यक्तिमत्त्व फार छान होते. नेकर नदीच्या रमणीय काठावरून ते दररोज फिरायला जात. चालताना मान हलवण्याची त्यांना सवय होती. हायडेलबर्गमध्ये मी प्रा.गोल्डश्मिटना भेटायला गेलो होतो. त्या दिवशी सुट्टी होती; पण केवळ आपला गोनियोमीटर दाखवून त्याचे कार्य समजावून सांगण्याकरता ते मुद्दाम प्रयोगशाळेत आले.

हायडेलबर्गहून मी प्रा.हुदलीकरांबरोबर कार्लस्रूहला गेलो. हॉटेलमध्ये आमचे सामान ठेवून डॉ. फजन्स्ना भेटायला आम्ही टेक्निक होखशूलमध्ये गेलो. त्या संस्थेचे निदेशक डॉ. ब्रेडिग हे कॅटॅलिस्ट म्हणून प्रसिद्ध होते. आम्ही तिथे पोहोचल्यावर लगेचच डॉ.हुदलीकर निघून गेले; कारण त्यांना हायडेलबर्गला जाणारी परतीची गाडी पकडायची होती.

डॉ.फजन्स् हे चळिशीच्या आसपास असतील. रेडिओॲक्टिव्हिटी या विषयात त्यांनी चांगलेच नाव कमावले होते. विज्ञानक्षेत्रातल्या महत्त्वाच्या सहा व्यक्तींची नावे लंडन टाइम्सने प्रसिद्ध केली होती, त्यात डॉ.फजन्स्चे नाव होते. त्यांच्याशी परिचय व्हायला मला अजिबात वेळ लागला नाही. एक तर आम्हा दोघांना एकाच विषयात रस होता; आणि दुसरे म्हणजे त्यांचा गोड व आनंदी स्वभाव. औपचारिक विचारपूस आणि माझ्या प्रवासाविषयी थोडे बोलणे झाले. त्यानंतर आम्हा दोघांत पुढील संवाद झाला.

डॉ.फजन्स् : प्रा. साहनी, शिसं या पदार्थाशी संबंधित अशा एखाद्या प्रश्नात तुम्हाला रस आहे का?

रुचिराम साहनी : होय. गेले काही दिवस शिशाच्या आण्विक भारासंबंधीच्या एका प्रश्नावर मी काम करीत आहे.

डॉ.फजन्स् : तुमचं काम कुठपर्यंत आलं आहे?

रुचिराम साहनी : एक किंवा दोन धातु-संयुगांचे शुद्धीकरण करण्याच्या प्रयत्नात मी आहे. तसेच शिशाचा आण्विक भार अचूकपणे काढण्याविषयी काही लिखाण मी वाचत आहे.

(मी जे काम केले होते, त्याच्या टिप्पण्या काढल्याचेही मी त्यांना सांगितले.)

डॉ.फजन्स् : हे विशेष आहे. या मुद्यावर विचार करायला काय कारण झालं?

रुचिराम साहनी : विविध संयुगांची विरघळण्याची क्षमता आणि संयुगात सामावलेले घटक यांच्यात जे नातं असतं, त्यासंबंधीचे नियम शोधण्याच्या कामात मी गुंतलो आहे. त्या अभ्यासात आण्विक भाराचं महत्त्व आहे; म्हणून ज्या पदार्थांचा मी अभ्यास करीत होतो, त्यांचा आण्विक भार काळजीपूर्वक काढण्याची मला जरुरी भासली. शिशाच्या बाबतीत मात्र एक समस्या उभी राहिली. वेगवेगळ्या रसायनशास्त्रज्ञांनी काढलेल्या शिशाच्या आण्विक भारात चांगलीच तफावत असते, हे पाहून मला आश्चर्य वाटले. त्याचा शोध घेऊ लागलो, तेव्हा माझी अशी खात्री झाली की ही तफावत केवळ प्रयोगा-प्रयोगात आढळते तशी नाही; तर शिशाच्या क्षारात मिसळलेल्या कोणत्या तरी संयुगाचा परिणाम म्हणून ती तफावत येते. हे संयुग अगदी सूक्ष्म प्रमाणात पण वेगवेगळ्या मात्रेने शिशात उपस्थित असणार, असे मला निश्चितपणे वाटते.

डॉ.फजन्स् : हे अतिशय रसपूर्ण आहे. त्यावर तुम्ही आणखी काम करायला पाहिजे होतं. तुम्ही काय केलं असेल, त्याचा मला बरोबर अंदाज आला.

असे म्हणून 'रेडियम डी'वर लिहिलेला व नुकताच प्रकाशित झालेला एक पेपर त्यांनी ड्रॉवरमधून काढला. ते स्वतःही अशाच मार्गाने कसे विचार करीत होते, हे त्यांनी मला सांगितले, 'रेडियम डी' हा वेगवेगळ्या मात्रेने शिशात मिसळतो आणि म्हणून शिशाच्या आण्विक भारात तफावत येते. 'रेडियम डी'च्या या अवखळपणामुळे तुम्ही आणि मीच काय; पण

रसायनशास्त्रज्ञांची सारी पिढीच बुचकळ्यात पडली होती, असे ते म्हणाले.

डॉ.फजन्स्नी पुढचा प्रश्न बिस्मथविषयी विचारला. बिस्मथच्या संबंधात शिशासारखीच आण्विक भाराची समस्या होती; पण मी त्याच्यावर प्रत्यक्ष काही संशोधन केले नव्हते, असे मी त्यांना सांगितले. जे दोन प्रश्न त्यांनी सोडवायला घेतले होते, तेच प्रश्न मीही घ्यावेत, या योगायोगाचे त्यांना नवल वाटले. दोनापैकी एकाचे उत्तर त्यांनी शोधले होते आणि दुसऱ्यावर नुकतेच काम सुरू केले होते. हा दुसरा प्रश्न सोडविण्यास त्यांनी मला पाचारण केले. त्याला मी चटकन होकार भरत नाही असे पाहून ते म्हणाले,

''कदाचित् तुम्हाला एकट्याला तो प्रश्न सोडवायचा असेल.'' त्यावर मी म्हणालो, ''तसं नाही डॉ.फजन्स्, तुमच्याबरोबर काम करायला मला आवडेल. मी चटकन 'हो' म्हणालो नाही याचं कारण वेगळंच आहे. बोलता-बोलता माझ्या लक्षात आलं आहे की बिस्मथच्या आण्विक भाराबाबत जी समस्या आहे, ती रासायनिक समस्या नसून रेडिओॲक्टिव्हिटीची समस्या आहे. शिशाच्या आण्विक भाराचा प्रश्न तुम्ही सोडविला आहे. त्याच्या मुळाशी रासायनिक कारण नव्हतं, त्याची मला कल्पना होती. तुम्ही दिलेल्या स्पष्टीकरणावरून त्याचं कारण रेडिओॲक्टिव्हिटीत दडलेलं असतं, हे सिद्ध झालं. रेडिओॲक्टिव्हिटीबद्दलचं माझं ज्ञान केवळ पुस्तकं वाचून आलेलं आहे. त्या संबंधातलं साधंसं उपकरणही मी कधी हाताळलेलं नाही. तेव्हा तुमच्याबरोबर मी काम करणं म्हणजे कामाच्या प्रगतीचा वेग कमी करण्यासारखं होईल आणि ते मला बरोबर वाटत नाही.''

डॉ. फजन्स् उतरले, ''नाही प्रा. साहनी, रेडिओॲक्टिव्हिटीचं तंत्र शिकायला तुम्हाला एक महिन्याहून अधिक वेळ लागणार नाही. ज्ञानाची ही एक नवीन शाखा आहे. त्यात मोजमापनाविषयी फारसं शिकण्यासारखं नाही. आपल्या समस्येकरता घ्यावी लागतील तेवढी मोजमापं आपण घेऊ.

रसायनशास्त्रज्ञ म्हणून तुमची मला मोलाची मदत होईल; कारण प्रत्यक्ष रेडिओॲक्टिव्हिटीची मापनं घेण्यापूर्वी आपल्याला कितीतरी रासायनिक क्रिया कराव्या लागतील.''

थोडक्यात सांगायचे म्हणजे बिस्मथचा अचूक आण्विक भार शोधून काढण्याच्या कामात डॉ.फजन्स्बरोबर सहभागी व्हायचे मी कबूल केले. त्या संस्थेत सात प्राध्यापक आणि खासगी व्याख्याते होते. त्याच्या दुप्पट संशोधन करणारे होते. माझ्यापेक्षा लहान असले, तरी सर्वजण वयाने मोठे होते. तिथे मिस् जोन्स् नावाची एक इंग्रज तरुणी होती. ती मोठी चुणचुणीत होती. संशोधन-कामात ती हुशार होतीच; पण संस्थेत चहा-पाण्याची व्यवस्था बघण्यातही ती तितकीच वाकबगार होती. डॉ. ब्रेडिग संस्थेचे डायरेक्टर होते. मी हिंदुस्थान सोडण्यापूर्वी त्यांची ख्याती माझ्या कानांवर आलेली होती. त्यांनी कॅटॅलिसिस्वर जे काम केले होते, त्यासंबंधी सहा व्याख्याने मी लिहून काढली होती व दिलीही होती. आपल्या गबाळेपणामुळे डॉ. ब्रेडिग संस्थेतल्या माणसांमध्ये उठून दिसत असत. त्यांच्या हालचाली अगदी मंद असत. कुठल्याच गोष्टीत त्यांची छाप पडत नसे. ते पुष्कळदा माझ्या खोलीत येत; माझ्याजवळ बसून कामाची चौकशी करीत. डॉ.रेइस हे खासगी व्याख्याते होते. ते मोठ्या टेचात राहत असत. माझे, खरे तर, त्यांच्याशी काहीच काम नसे; पण तरी अधून-मधून ते माझ्याकडे येत व काही सूचना करीत. एकदा त्यांनी मला ग्रंथालयात नेले आणि तिथले नियतकालिकांचे गठ्ठे काढून दिले. माझ्या संशोधन-कामात त्यातले कित्येक पेपर उपयोगी ठरतील, असे त्यांनी मला सांगितले. कामाचा उत्साह आणि स्फुरण यांनी ते वातावरण ओथंबलेले असे. एखाद्या विद्यार्थ्याला एखादे काम नेमून दिले की तो जसा त्याच्याच मागे लागतो, तशी माझी परिस्थिती झाली होती. त्या विषयावर अनेक वर्षे काम करीत असल्याप्रमाणे मी माझ्या कामात गुंगून गेलो होतो. माझे संशोधन जरा आकार घेऊ लागले, तेवढ्यातच युरोपीय देशांमधली तेढ विकोपाला गेली. प्रथम जर्मनी व रशिया यांच्यामध्ये आणि नंतर जर्मनी, ऑस्ट्रिया

हे एका बाजूला; तर इंग्लंड, फ्रान्स दुसऱ्या बाजूला अशा लढायांना तोंड फुटले. डॉ. फजन्स्सारख्या प्रसिद्ध शास्त्रज्ञाबरोबर अतिशय महत्त्वाच्या प्रश्नाचे उत्तर शोधून काढण्याची उत्कृष्ट संधी निसटली याबद्दल मला फार खेद झाला. माझ्या त्या अल्प मुक्कामात कार्लस्रूहमध्ये काही उल्लेखनीय प्रसंग घडले. रोज सकाळी कार्फेन होटेलमध्ये मी नाष्टा करीत असे. त्या वेळी, एक लहानसा ब्रेडरोल, मध, एक अंडं, एक कप कोको किंवा दूध आणि फळे असा आहार मी घेत असे. तो आटोपून ९ वाजण्याच्या सुमारास मी प्रयोगशाळेत जाई. दुपारी एक वाजण्याच्या सुमाराला जवळच्या एका रेस्टॉरंटमध्ये मी जेवण घेत असे आणि दीड वाजल्यापासून साडेचारपर्यंत पुन्हा प्रयोगशाळेत काम करी. त्यानंतर मी स्वतःसाठी चहा बनवून बिस्किटांबरोबर पीत असे. चहा बनविण्याची व्यवस्था साधी पण छान होती. मिस् जोन्स्बद्दल मी सांगितले आहेच. ती कॉरिडॉरच्या एका खिडकीत स्टोव्ह पेटवायची व पाणी भरलेली किटली त्यावर ठेवून द्यायची.

एक दिवस मी माझ्या हॉटेलवर चाललो होतो. रस्त्यात सैनिकांच्या कितीतरी तुकड्या मार्चिंग करीत होत्या. काही ठिकाणी तर क्षणभर थांबणेही मुष्किल झाले होते. काही तासांत त्या ठिकाणचा सारा नूरच पालटून गेला. प्रत्येकजण युद्धाविषयी बोलत होता. तोपर्यंत कदाचित् युद्धाची घोषणा झाली असावी. येणाऱ्या युद्धाची फक्त तयारी चालली आहे, असे मला वाटले. मी हॉटेलवर पोहोचलो तेव्हा हॉटेलचे मालक श्री. कॉख म्हणाले, ''आता हा देश सोडून जाणं कठीण आहे, फार उशीर झाला आहे.'' हायडेलबर्गपर्यंत जायला एखादी गाडी मिळेल का, असे विचारताच त्यांनी नकारार्थी मान हालवली व म्हणाले, ''अशक्य !'' आणि पुढचे काही तास हॉटेल सोडून न जाण्याचा त्यांनी मला सल्ला दिला. ते म्हणाले, ''मोठ्या युद्धाची तयारी चालू झाली आहे. लवकरच आगगाड्यांतून सैनिकांची ने-आण सुरू होईल.'' ते ऐकून मी डॉ.हुदलीकरांना तार केली आणि कार्लस्रूहला येऊन मला घेऊन जाण्याची

विनंती केली. मला कार्लस्रूहमध्ये एकटेपणा जाणवू लागला होता; मी बावरून गेलो होतो. काही वेळाने डॉ.फजन्स्चा फोन आला. त्यांनी मला अडकून पडावे लागतेय याबद्दल दिलगिरी व्यक्त केली आणि कार्लस्रूह न सोडण्याचा सल्ला दिला. ते स्वतः राखीव सैनिकी अधिकारी असल्याने युद्ध सुरू झाल्यावर त्यांना बोलावणे येईल; पण त्यांची बायको माझी काळजी घेईल असेही त्यांनी सांगितले. माझे पैसे वेळेवर न आल्यास लागतील तेवढे पैसे देण्याचे श्री.कॉख व डॉ.फजन्स् या दोघांनीही आश्वासन दिले. एक वर्षाहून जास्त दिवस पुरतील इतके माझे पैसे कार्लस्रूहच्या बँकेत होते. त्या वेळी कार्लस्रूहमध्ये जिकडे-तिकडे जो चेव आलेला दिसत होता, त्याचे मला कधी विस्मरण होणार नाही.

काही तासांनंतर मला डॉ.हुदलीकरांची तार मिळाली. दर काही मिनिटांनी आगगाड्या सुटत होत्या. त्यात फक्त सैनिकच चढत होते. ते पाच ते सहा तास स्टेशनवर थांबून होते; पण कार्लस्रूहला जाण्याकरता त्यांना गाडी मिळत नव्हती, असे त्यांनी त्या तारेत म्हटले होते. मी तार वाचत होतो, तेवढ्यात दारावर थाप पडली. मी दार उघडले, तर समोर डॉ.हुदलीकर दत्त म्हणून उभे. त्यांनी एका पोर्टरला थोडे पैसे दिले, तेव्हा त्याने अगदी गाडी सुटताना डॉ.हुदलीकरांना गाडीच्या डब्यात ढकलले आणि ते कार्लस्रूहला पोहोचले. माझे सामान मी केव्हाच बांधून ठेवले होते.

त्यामुळे डॉ.हुदलीकर तिथे पोहोचल्यापासून अर्ध्या तासात आम्ही टॅक्सीत बसून स्टेशनकडे जायला निघालो. अर्थात् टॅक्सी मिळवणे हेही एक दिव्यच होते. स्टेशनवर गेल्यावर डॉ.हुदलीकरांनी पैसे देण्याचा उपाय केला आणि जादूच्या मंत्रासारखा त्याचा परिणाम होऊन त्यांना व मला गाडीत चुपचाप जागा मिळाली. रात्री हायडेलबर्गला पोहोचलो व शेरेरबाईंच्या पेन्शनमध्ये आरामात रात्र काढली.

एक-दोन दिवस हायडेलबर्गमध्ये थांबून मी जर्मनीहून इंग्लंडमध्ये जाण्याची व्यवस्था केली. शेरेरबाईंच्या वसतिगृहात राहणाऱ्या हिंदुस्थानी

विद्यार्थ्यांपैकी एकादा-दुसरा आपल्याबरोबर यावा, अशी मी खटपट केली. दहा-बारा विद्यार्थी तेथे राहत होते; पण त्या सगळ्यांनी माझ्याबरोबर यायला नकार दिला. त्या क्षणी देश सोडून जाणे धोक्याचे होते; म्हणून त्यांना जर्मनी न सोडण्याचा सल्ला दिला गेला होता. सैनिकांनी भरलेल्या आगगाड्या सर्व दिशांनी पळत होत्या. सबंध देशात एकच गोंधळ माजला होता. बोलण्याचा एकच विषय होता : 'युद्ध'. रशियाबरोबरचे युद्ध आणि फ्रान्स व इंग्लंडबरोबर युद्धाची शक्यता. त्या वेळच्या इंग्लंडमधील परिस्थितीवर विशेष चर्चा होत होती आणि माझ्याबरोबर इंग्लंडमध्ये यावे असे मी कुणाला पटवून देण्याऐवजी ते सगळेजण मला जर्मनीतच राहण्याचा सल्ला देत होते. आता फार उशीर झाला आहे, असे ते मला सांगत होते. हायडेलबर्गहून सुटून हॉलंडला नेणारी गाडी २ ऑगस्ट १९१४ रोजी दुपारी सुटणार होती.

हायडेलबर्गपासून सुमारे २५ मैलांवर मला गाडी बदलावी लागणार होती. काही चौकशी करण्यासाठी मी जात होतो, तेव्हा एक जर्मन माणूस माझा पाठलाग करीत असल्याचे माझ्या ध्यानात आले. तेव्हा माझ्याबरोबर डॉ. हुदलीकर होते. वरून एक विमान चालले होते, ते बघत आणि त्याविषयी बोलत लोकांची गर्दी झाली होती. आम्ही आपला रस्ता चुकू नये म्हणून त्या गर्दीत घुसलो. ते सर्बियाचे गुप्तहेर विमान होते, असे काही बोलणे चालले होते. गर्दीतून बाहेर पडून आम्ही चालू लागलो, तरी तो माणूस आमच्या पाळतीवर होताच. आम्ही स्टेशनवर पोहोचलो, तेव्हा डॉ. हुदलीकर काही चौकशी करण्याकरता स्टेशनमध्ये शिरले. मी बाहेरच उभा होतो. आमच्यावर पाळत ठेवणारा माणूस माझ्यापासून जवळच उभा होता. डॉ.हुदलीकर आल्यावर आम्ही दोघे त्या माणसाकडे गेलो. तो आमचा पाठलाग करीत आहे का, असे विचारल्यावर त्याने 'हो' म्हटले. तेव्हा आम्ही कोण आहोत, हायडेलबर्गमध्ये काय करीत आहोत याची इत्थंभूत माहिती त्याला दिली. त्याने ते ऐकून घेतले व म्हणाला की तो आम्हाला सर्बियन गुप्तहेर समजत होता. त्या वेळी सर्बिया जर्मनीवर हल्ला

करीत होता.

२ ऑगस्ट १९१४ या दिवशी मी हायडेलबर्ग सोडले. डॉ.हुदलीकर आणि रणजीतसिंह पंडित हे दोघेही माझ्याबरोबर मॅनहायेमपर्यंत आले. माझ्यावरच्या प्रेमामुळे ते माझ्याबरोबर आले; पण त्या वेळी ते फार धाडसाचे कृत्य होते. कारण, प्रत्येक प्रवासी गाडी रद्द करण्यात येऊन तिचा उपयोग सैनिकांची ने-आण करण्याकडे केला जात होता. जनमानसातील चैतन्य बघण्यासारखे होते. लहान पोरे-सोरेसुद्धा रशियावर मात करण्याची भाषा बोलत होती. रशियाशी युद्ध सुरू झाल्यापासूनच जर्मन मुलांची ती चित्तवृत्ती उघड झाली होती. हायडेलबर्गमध्ये एका प्राध्यापकाचा मुलगा, "हुदलीकर, हुदलीकर, रशिया आता बाडेनचाच भाग होणार." असे ओरडून सांगताना मी ऐकले होते. एक ना दोन, असे कित्येक प्रसंग सांगता येतील. इतरांप्रमाणे प्राध्यापकही चेतावले होते. एकदा एका सभेला मी गेलो होतो. तिथे सुमारे १०,००० लोक जमले होते. विद्यापीठाचे प्राध्यापक भाषणे देत होते. त्यात ते रशिया व जर्मनीच्या संबंधांचा इतिहास सांगून जर्मनीने रशियाविरुद्ध युद्ध पुकारणे कसे योग्यच आहे, हेच सांगत होते. मी इंग्लंडमध्ये पोहोचलो आणि लवकरच माझ्या लक्षात आले की जर्मनी इंग्लंडची बरोबरी करू शकत नाही.

कार्लस्रूह आणि हायडेलबर्ग या दोन्ही ठिकाणच्या बँकांत मिळून मी सुमारे ३,००० रुपयांचा (जर्मन चलनात) भरणा केला होता. जर्मनी सोडताना ते सर्व पैसे मी काढण्याकरता बँकेत गेलो व काही तासांच्या आत मला माझे सर्व पैसे इंग्लिश सॉव्हरिनमध्ये (सोन्याच्या स्वरूपात) मिळाले. त्यांनी त्या कामाचा थोडा आकार घेतला, एवढेच. पण अशा प्रकारे जर्मनीतून सोने घेऊन बाहेर जायला काही अडचण आली नाही. इंग्लंडला पोहोचल्याबरोबर मी ते सर्व पैसे तिथल्या बँकेत ठेवले; पण त्यानंतर त्यातला एकही सॉव्हरिन काढायला मला परवानगी मिळेना. जे काय पैसे मिळाले, ते कागदी नोटा किंवा चांदीच्या व तांब्याच्या नाण्यांच्या स्वरूपात मिळाले. मुंबईपर्यंतच्या प्रवासात आणि तिथून लाहोरला

जाण्याकरता सोन्याचे पाच सॉव्हरिन देण्याची मी बँक प्रबंधकांना कितीही विनवणी केली, तरी ते तयार झाले नाहीत.

मध्येच विषयांतर करून मी ही गोष्ट सांगितली. दोन ऑगस्ट १९१४ रोजी मी हायडेलबर्गहून हॉलंडला जायला निघालो. हुदलीकर आणि पंडित माझ्याबरोबर जिथपर्यंत शक्य होते, तिथपर्यंत आले. नव्हे, तसा त्यांनी आग्रहच धरला. त्यांना मॅनहायेमपर्यंतच येता आले आणि त्या शूरपणाची किंवा धाडसाची किंमत म्हणून त्यांना हायडेलबर्गला पायी जावे लागले असणार.

♦♦♦

पंजाब विज्ञान संस्था

पंजाब विज्ञान संस्था आणि तिला संलग्न अशी मी स्थापन केलेली शास्त्रीय कार्यशाळा या दोन्हींकरता मला माझ्या आयुष्यातला पुष्कळ वेळ आणि लक्ष द्यावे लागे; म्हणूनच माझ्या जीवनगाथेतल्या प्रत्येक प्रकरणात त्यांचा काही ना काही उल्लेख आला आहे. अशी एखादी संस्था काढण्याची कल्पना प्रा. ओमानना सुचली. कलकत्त्याला जाण्यापूर्वी मी एम्.ए.च्या वर्गात होतो, तेव्हा असा प्रकारच्या संस्थेची आवश्यकता, तिचा विस्तार यावर आम्ही चर्चा करीत असू. सन १८८५ च्या उन्हाळ्यात मी कलकत्त्याहून लाहोरला आलो होतो. त्या वेळी मी सरकारांच्या संस्थेत काय-काय पाहिले, ते प्रा. ओमानना सविस्तर सांगितले; आणि 'पंजाब विज्ञान संस्था' जन्माला आली. प्रा.ओमान तिचे मानद (ऑननरी) सचिव आणि मी संयुक्त सचिव होतो. सर्व प्रकारच्या शास्त्रीय ज्ञानाचा सबंध प्रांतभर प्रसार करणे हा एकमेव उद्देश आमच्या त्या संस्थेमागे होता. त्याकरता इंग्रजीतून अथवा प्रादेशिक भाषांमधून व्याख्याने, व्याख्यानांच्या जोडीला प्रयोग करून दाखविणे, मॅजिक लँटर्नच्या साहाय्याने पडद्यावर चित्रे दाखविणे, काही पुस्तिका प्रकाशित करणे इत्यादी साधनांचा आम्ही भरपूर उपयोग करीत असू. दोन-तीन वर्षांनंतर आम्ही तांत्रिक शिक्षण आणि रासायनिक उत्पादन या गोष्टींना प्रोत्साहन देऊ लागलो. तसे करताना संस्थेचा पायाही रुंदावला. ह्या प्रयत्नात साबण, नीळ किंवा तत्सम उत्पादनांविषयी पुस्तिका आम्ही काढू लागलो. मियानी गावच्या

सुप्रसिद्ध मलिक जोवाला सहाय यांनी आमच्या असल्या पुस्तिकांना पैशाच्या स्वरूपात बक्षिसे देऊ केली व आमच्या कामाला हातभार लावला.

संस्थेचा मूळ हेतू डोळ्यांसमोर ठेवून प्राध्यापक ओमान यांनी 'विद्युत्' आणि 'चुंबकत्व' या विषयांसंबंधात बरीच व्याख्याने दिली. वैद्यकीय महाविद्यालयाच्या डॉ.कालेब यांनी मानवी शरीररचनेसंबंधी अनेक मुद्दे निवडून त्यावर सचित्र व्याख्याने दिली. त्यांच्या श्रोतृगणात विद्यार्थी व शिक्षक यांचाच जास्त भरणा असे; सर्वसामान्य श्रोते विरळच असत. 'माणसाची भीती' आणि 'विषारी आणि बिनविषारी धूर' ही व्याख्याने इतकी लोकप्रिय झाली, की ती पुन्हा द्या, अशी त्यांना विनंती करण्यात आली. कालांतराने संस्थेच्या कामात सहभागी होण्याकरता बरेच जण पुढे आले. ते सगळे महाविद्यालयीन प्राध्यापक होते. त्यांच्यात डॉ.ग्रँटही होते. आपली व्याख्याने सुरस आणि लोकप्रिय करण्यात डॉ.ग्रँट यांचा हातखंडा होता. आपली व्याख्याने व प्रयोग तयार करण्यात ते पुष्कळ वेळ घालवीत असत. इंग्लंडमध्ये फॅरॅडे इन्स्टिट्यूट आणि तशा प्रकारच्या विज्ञानसंस्थांमध्ये दिली गेलेली व्याख्याने नंतर प्रकाशित केली जात. हीच व्याख्याने डॉ. ग्रँट पुन्हा देत असत आणि ती यशस्वी होत असत. सी.व्ही.बॉइस यांचे 'साबणाचे फुगे', फॅरॅडे यांचे 'मेणबत्तीचा रासायनिक इतिहास', पेरी यांचे 'गरगर फिरणारे भोवरे', 'नाजूक पेटीची कथा' वगैरे व्याख्याने 'रोमान्स ऑफ सायन्स' सिरीजमधून पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली होती. कित्येकदा डॉ. ग्रँट त्या पुस्तकातली भाषा व गोष्टी सही-सही आपल्या भाषणात घेत. चकार शब्दानेही त्याचा उल्लेख न करता ते ती व्याख्याने देत असत.

मी पंजाब विज्ञान संस्थेचा सहसंस्थापक होतो आणि संयुक्त सचिव होतो हे खरे असले, तरी पहिली दोन वर्षे मी सिमल्यातच काम करीत होतो. पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे इंडिया सरकारच्या हवामानखात्यात सेकंड असिस्टंट मीटिअरॉलॉजिकल रिपोर्टर म्हणून् रुजू होऊन मी माझ्या कार्यजीवनाला सुरुवात केली. त्या वेळी फर्स्ट असिस्टंट मीटिअरॉलॉजिकल रिपोर्टर होते - श्री.डब्ल्यू. एल्. डलस. सिमल्यात असताना मी आमच्या

संस्थेतर्फे तीन व्याख्याने दिली. साहजिकपणे माझा विषय 'हवामान - हिंदुस्थानच्या विशेष संदर्भासह' असा होता. त्यापैकी दोन व्याख्यानांच्या वेळी श्री. महादेव गोविंद रानडे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते, तो मी माझा सन्मान समजतो. दख्खनमधल्या ग्रामीण विभागात कर्जावरून दंगली उसळल्या होत्या. त्याकरता एक समिती नेमली होती. त्या समितीचे सभासद या नात्याने ते सन १८८६ मध्ये सिमल्याला काही महिने राहिले होते. त्यांचा मुक्काम झाल्याने लोकांना त्यांना भेटण्याची, त्यांच्याशी बोलण्याची, त्यांना ऐकण्याची चांगली संधी मिळाली. त्या सुमाराला शंकर पांडुरंग पंडित हे वेदांचे गाढे अभ्यासक तिथे होते व त्यांचे संभाषण ऐकण्याची संधी सहज उपलब्ध होई. ह्या पंडितांच्या पुतण्याचा ख्यातनाम नेहरू कुटुंबाशी नंतर संबंध जुळला. हवामानावरची माझी तीनही व्याख्याने सरकारी शाळेच्या सभागृहात झाली. त्या वेळी मॉलच्या थोड्या खालच्या अंगाला ती शाळा होती. व्याख्यानात मी ज्या घडामोडी आणि समस्यांचा उल्लेख केला, त्यांच्याविषयी रानडे यांना जाण होती, ह्याचे मला आश्चर्य वाटले आणि समाधानही ! शंकर पांडुरंग पंडित हेही माझ्या व्याख्यानांना हजर राहत असत. प्रत्येक व्याख्यानाच्या शेवटी काही प्रश्न विचारून ते दोघे शंका-निरसन करून घेत. सिमल्यात ते दोघे एकाच ठिकाणी राहत होते. व्याख्यानांच्या जोडीने दाखविण्यासाठी माझ्या ऑफिसमधून मी तक्ते आणून श्रोत्यांना दाखवीत असे. चक्री वादळे आणि मान्सून पावसाचा मार्ग दाखविणारा एक तक्ता मी मुद्दाम तयार करून घेतला होता. माझी व्याख्याने ऐकायला अनेक हिंदुस्तानी आणि युरोपीय माणसे येत असत. बंगाल्यांची संख्या त्यात मोठी असे. त्या काळात इंडिया सरकारची ऑफिसे बंगाली कारकुनांनी भरलेली असत. एकदा माझ्या व्याख्यानाच्या संदर्भात मी म्हणालो, ''मुंबईवरून येणारे मान्सूनचे वारे जिथून वाहतात, त्या प्रदेशात पाऊस पाडतात. जे काही थोडे राहतात, ते अरवलीच्या डोंगरात अडवले जातात; त्यामुळे त्या वाऱ्यांनी उत्तर हिंदुस्थानात पाऊस पडण्याचा संभव फार कमी. उत्तर हिंदुस्थानातला

बहुतेक पाऊस बंगालवरून येणाऱ्या वाऱ्यांमुळे पडतो. एक वेळ बंगालातून आलेल्या कारकुनांशिवाय सिमला ऑफिस चालू शकेल; पण बंगालवरून येणाऱ्या वाऱ्यांशिवाय मात्र उत्तर हिंदुस्थानचं चालणार नाही.''

हे ऐकून माझ्या बंगाली श्रोत्यांनी हसून सभागृह डोक्यावर घेतल्याचे मला चांगले आठवतेय. पंजाबच्या शेतीची भरभराट ही बंगाल आणि मुंबईवरून येणाऱ्या मान्सून वाऱ्यांवर अवलंबून असते; म्हणून उत्तर पंजाबातले जिल्हे हरेभरे असतात आणि नैऋत्य पंजाबातले हिसार आणि सेरिया यांच्यासारखे जिल्हे मात्र कोरडे राहतात, हे मी स्पष्ट करीत होतो. रानडे हे पश्चिम विभागातून आलेले होते. व्याख्यानाचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी आमच्या प्रदेशाच्या आर्थिक सुबत्तेत मुंबईचा काय हातभार लागतो ह्याविषयी काही माहिती सांगितली. तसेच पंजाबातला हिवाळी पाऊस पर्शियामुळे (इराण) येतो, हे ऐकून माझ्या मुसलमान मित्रांना आनंद वाटला असणार. पर्शियातील वातावरणीय घडामोडींमुळे काही प्रत्यावर्ती वारे निर्माण होतात; हे वारे पंजाबातल्या हिवाळी पावसाला कारणीभूत होतात, हे त्या वेळी बहुतांशी सिद्ध झाले होते. उन्हाळ्यापासून हिवाळ्यापर्यंत आणि त्याच्या उलट जाताना हवामानाची परिस्थिती आमूलाग्र बदलत जाते. त्याला धुळीची वादळे, गरजणारी वादळे आणि गारा घेऊन येणारी वादळे कारणीभूत होतात, हे मी माझ्या एका व्याख्यानात सविस्तरपणे सांगितले होते.

लँटर्न स्लाइडस् -

व्याख्यानांच्या जोडीला आम्ही तक्ते व स्लाइडस् दाखवीत असू हे मी वर सांगितलेच आहे. त्या काळी अशा स्लाइडस् तयार करणे हे सोपे काम नव्हते. आजदेखील मोठी शहरे सोडली, तर इतर ठिकाणी व्याख्याने अधिक स्पष्ट करण्याकरता अशा स्लाइडस् तयार करण्याची साधने उपलब्ध नसतात. जिथे अशी साधने उपलब्ध नसतात, तिथेही असल्या स्लाइडस् बनविणे शक्य असते, हे वाचून शिक्षकांना कदाचित् हायसे

वाटेल. सिमल्यात दिलेल्या व्याख्यानातले काही मुद्दे स्पष्ट करण्याकरता मी काही स्लाईडस् बनविल्या होत्या. काचेच्या चौकोनी प्लेटस् मेणबत्तीच्या धुरावर धरून धुरकट करून घेतल्या. मग त्यावर टोकदार पेनने वाऱ्यांची दिशा दाखविणारे बाण आखले. आवर्ती-प्रत्यावर्ती वाऱ्यांच्या दिशा दाखवून मी माझी व्याख्याने अधिक सोपी केली होती. ह्याला खर्च काही येत नाही. माझा हा प्रयोग फार यशस्वी झाला. नंतर मी जेव्हा लाहोरच्या सरकारी महाविद्यालयात अध्यापन करू लागलो, तेव्हा प्रा. ओमान यांच्या सांगण्यावरून माझे एक व्याख्यान मी लिहून काढले व पुस्तिकेच्या स्वरूपात प्रसिद्ध केले. आज त्याची एकही प्रत माझ्याकडे नाही, ह्याची मला खंत वाटते. मला वाटते, सिमल्यात दिलेल्या व्याख्यानमालेतले ते दुसरे व्याख्यान होते. ते मी अधिक सुलभ व विस्तृत करून लाहोरमध्ये दिले होते. मान्सूनचा पाऊस आणि चक्री वादळे यांच्या संबंधातले ते व्याख्यान होते.

अशी व्याख्याने मी जेव्हा लाहोरमध्ये दिली, तेव्हा स्लाइडस्‌मध्ये मी सुधारणा केली आणि त्यापैकी काही पडद्यावर उत्तम रीतीने दाखवता आल्या. या वेळी काचा धुरकटवून घेण्याऐवजी पातळ डिंकाच्या पाण्यात बुडवून वाळवल्या. त्यामुळे काचेच्या पृष्ठभाग जरा खरबरीत झाला आणि आकृत्या काढणे अधिक सुलभ झाले. त्या स्लाइडस्‌वर हिंदुस्थानच्या नकाशाच्या सीमारेषा, त्यावरून वाहणाऱ्या वाऱ्यांच्या दिशा दाखवणारे बाण, सम दाबाची ठिकाणे, सम तापमानाची ठिकाणे सर्व दाखवू शकलो होतो. छपाईची शाईपण चांगली उपयोगाला येते. जनसामान्यांकरता दिलेल्या सोप्या व्याख्यानांच्या वेळी अनेकदा मी तसल्या स्लाइडस्‌चा उपयोग करीत असे. त्या केवळ स्वस्त पडत एवढेच नाही; तर त्या तयार करण्यात वेळही कमी लागे. फोटोग्राफिक स्लाइडस् दाखवायच्या झाल्या, तर तशा स्लाइडस् तयार करणाऱ्याला पत्र लिहिण्यापासून तयारी करावी लागे. मी तयार केलेल्या साध्या स्लाइडस् दाखवण्याचा आणखी एक मोठा फायदा असे. श्रोत्यांमध्ये कित्येक जणांवर व्याख्यान द्यायची वेळ

येई. माझ्या स्लाइडस् पाहून तेही तशा बनविण्यास उद्युक्त होत असत. काही वेळा मात्र फोटोग्राफिक स्लाइडस्ना पर्याय नसे.

साध्या स्लाइडस् बनविण्याच्या अनेक पद्धती असतात. कुणा शिक्षकाला एखादी वेगळी पद्धत सुचते. माझ्या स्लाइडस् मी एक-दोन पद्धतीने बनवीत असे. त्या वाचून विशिष्ट स्लाइड्स्करता कोणती पद्धत वापरावी, हे शिक्षक स्वतःच ठरवू शकतील.

१) चांगल्या टोकाच्या ड्राईंगपेनने जी आकृती हवी असेल, ती ट्रेसिंग पेपरवर काढून घ्यावी. तो कागद काचेच्या प्लेटवर चिकटवावा. चिकटवताना बहुतेकदा केवळ कोपरे चिकटवले की पुरते. काच पातळ असल्यास आणि आकृती जर चांगल्या गडद शाईने काढली असेल, तर आकृती काढलेला ट्रेसिंग पेपर दोन काचांमध्ये ठेवून त्या काचा दोऱ्याने बांधणेही शक्य असते. रबर बँड वापरायचे मात्र मी टाळत असे. ट्रेसिंग पेपरला तेलाचा अगदी हलका हात लावला, तर चित्र अधिक चांगले दिसते.

२) वरच्या पद्धतीने आकृतीत रंग भरणे शक्य होते.

३) आकृती गुंतागुंतीची नसेल आणि केवळ रेघांनी काढणे शक्य असेल, तर ती आकृती पेपरवर कापून काढता येते. अशा वेळी कागद मात्र जाडा ब्राऊन वापरावा; म्हणजे त्यातून उजेड जाणार नाही आणि पडद्यावर गडद पार्श्वभूमीवर आपली आकृती झळाळून दिसेल.

४) कधी-कधी अशी आकृती जाड्या कागदावर कापून ती काचेवर चिकटवून किंवा दोन काचांमध्ये ठेवून मी दाखवीत असे.


अलीकडे सार्वजनिक सोप्या शास्त्रीय शिक्षणातून वर सांगितलेल्या मॅजिक लँटर्न्स्चा अजिबात उपयोग केला जात नाही, याचा मला खेद वाटतो. एवढेच काय, पण पंजाब विज्ञान संस्थेने आपल्या प्रांतात विज्ञानाची ओळख करून देण्याच्या हेतूने जशी व्याख्याने आयोजित केली, तशी व्याख्याने दिवसें-दिवस कमी होत चालली आहेत आणि कधी होत असली, तर ती क्वचितच होतात. कुणाला त्यांच्याविषयी काही

माहीत नसते.

आमच्या प्रांतात विज्ञान-प्रसाराबाबत उदासीनता का आहे, याची कारणमीमांसा करण्यात मी वेळ घालवणार नाही. इथे मी 'आमच्या प्रांतात' असा शब्द सहेतुक वापरला आहे; कारण इतर प्रांतांविषयी मला तितकीशी माहिती नाही. सन १८८५ मध्ये कलकत्त्याला विद्यार्थी असताना डॉ. महेंद्र लाल यांच्या संस्थेत अत्यंत प्रेरणादायी भाषणे ऐकली होती, हे मी सांगितलेच आहे. कलकत्त्याहून आल्यावर आम्ही पंजाब विज्ञान संस्था स्थापली, तेव्हा आमच्या डोळ्यांसमोर डॉ. महेंद्र लाल यांची संस्थाच होती. पूर्वी म्हटल्याप्रमाणे लोकांत विज्ञान-प्रसार करण्याच्या हेतूने अशी एक संस्था काढावी, अशी कल्पना डॉ. ओमानना सुचली होती. मी कलकत्त्याहून सुट्टीला आलो, तेव्हा मी त्यांना तिथले अनेक अनुभव सांगितले. त्यात सेंट झेवियर कॉलेजच्या फादर लाफाँच्या व्याख्यानांबद्दलही सांगितले. तेव्हा आणखी वेळ न दवडता लगेच आमच्या स्वप्नाला साकार करायचे त्यांनी ठरवले.

जनसामान्यांकरता सोपी व्याख्याने -

पंजाब विज्ञान संस्थेतर्फे झालेल्या सोप्या व्याख्यानांना ज्या उत्साहाने प्रतिसाद मिळाला, त्याचे वर्णन करणे केवळ अशक्य आहे. त्या व्याख्यानांनी जनमानसात रस निर्माण केला व त्याचे लोण आजूबाजूच्या संस्थानांत व क्वेट्ट्यापर्यंत पोहोचल्याचें आमच्या अनुभवास आले. ठिकठिकाणांहून 'व्याख्याने पाठवा' अशी मागणी येऊ लागली होती. दूरच्या व लहानशा गावी व्याख्यान ठेवायचे म्हणजे व्याख्यात्याबरोबर प्रयोग सहाय्यकालाही जावे लागे; प्रयोगाचे सामान न्यावे लागे. या सगळ्याला लागणाऱ्या खर्चापैकी थोडा तरी भरून निघावा यासाठी काही शुल्क आकारावे असे आम्ही ठरवले. लाहोरमध्ये किंवा लाहोरबाहेर असो, आमची व्याख्याने प्रात्यक्षिकांसह दिली जात. मॅजिक लँटर्नवरून दाखविलेल्या स्लाईडस्चा आम्ही वापर करीत असू. स्लाइडस् दाखविलेल्या व्याख्यानाची फी आम्ही किती ठेवत होतो, ते मला आठवत नाही; पण



वैज्ञानिक उपकरणांना पंजाबी नावं देताना कधीकधी दुकानदारांच्या साध्यासुध्या शेऱ्यांचासुद्धा खूप उपयोग होई.

१८९६ नंतर दूरच्या ठिकाणी व्याख्यानाकरता १ किंवा २ आणे शुल्क आकारणे ही नित्याची बाब होऊन गेली होती. व्याख्याता स्थानिक असला, तरी शुल्कात बदल होत नसे. व्याख्याता जरी स्थानिक मिळाला, तरी प्रयोग-साधने आणि बहुतेक वेळी प्रयोग-सहाय्यक पंजाब विज्ञान संस्थेतूनच पाठवावा लागे.

व्याख्यानांची बोलावणी आली की, दहापैकी नऊ वेळा मला जावे लागे, हे सांगण्याची गरज नाही. याला अनेक कारणे होती. कितीतरी वर्षे, विशेषतः सन १८९० ते १८९८ पर्यंत, लाहोर आणि पंजाबातल्या दूरच्या लहान-लहान गावांतून मी अशी सोपी पुष्कळ व्याख्याने दिली होती. मला व्याख्यानाचे विषय किंवा त्यांच्याबरोबर दाखवायच्या प्रात्यक्षिकांच्या साधनांची कधीच वाण पडली नाही. एका ठिकाणी एखाद्या व्याख्यानाने लोकांच्या मनात गोडी किंवा जिज्ञासा निर्माण झाली, की इतर ठिकाणच्या लोकांनाही ते व्याख्यान ऐकावेसे वाटे. कधी एका विशिष्ट व्याख्यानाकरता मागणी येई आणि त्यानंतरही तेच व्याख्यान पुन्हा-पुन्हा द्यावे लागे. माझे मित्र व विद्यार्थी यांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत होती. विद्यार्थी मला त्यांच्या गावात जाऊन सोपे व्याख्यान देण्याची व्यक्तिशः विनंती करीत. काही विद्यार्थ्यांचे पालक समाजात विशिष्ट स्थानावर असत. ते मला अशा शब्दांत आपल्या गावाला व्याख्यानाचे निमंत्रण पाठवीत, की त्यांना नकार देणे मला शक्यच होत नसे. कपूरथळा या संस्थानाच्या मुख्यमंत्र्यांकडून मला अशा प्रकारचे आमंत्रण आले होते. त्यांचे दोन मुलगे गव्हर्नमेंट कॉलेजच्या इंटरमीजिएटच्या वर्गात शिकत होते. हे अधिकारी माझे स्नेही होते आणि पंजाब विज्ञान संस्थेचे पाठिराखे होते. कपूरथळ्याला मी तीन व्याख्याने दिली. त्यांचा सर्व खर्च संस्थानाने केला. अशाच प्रकारे मी पतियाळा येथे दोन, मंडीमध्ये एक आणि बहवलपूरमध्ये एक अशी व्याख्याने दिली. बहवलपूर येथे शाळांचे इन्स्पेक्टर या नात्याने माझे व्याख्यान ठेवले होते. या व्याख्यानाकरता माझ्या एका शीख विद्यार्थ्याने गळ घातली होती. तो त्या राज्यात आता एक अधिकारी झाला


होता. माझी ती व्याख्याने खूप लोकप्रिय होत. ती ऐकायला निरनिराळ्या प्रकारचे लोक येत; वेगवेगळ्या क्षेत्रांतले लोक असत. अजूनही कधी-कधी पांढऱ्या केसांची मंडळी मला भेटतात आणि विशीच्या आत असताना त्यांच्या खेड्यात दिलेले भाषण ऐकल्याची याद देतात. मी अंदाजे ५०० भाषणे दिली असतील.

या आकड्याने बिचकून जायचे कारण नाही. लाहोरमध्ये सोनेरी मशिदीजवळ बाओलीसाहिब हे ठिकाण आहे. त्याच्या आवारात मी दर वर्षी २० कोर्स देत असे आणि तो उपक्रम बरीच वर्षे चालला होता. व्याख्यानांच्या स्पष्टीकरणाकरता मी सोपे-सोपे प्रयोग करून दाखवीत असे. त्या व्याख्यानांना आलेले श्रोते बहुतेक सगळे दुकानदार असत. आजूबाजूच्या बाजारातून ते येत असत. इंग्रजी जाणणारे ऑफिसातले बाबूही तुरळक असत. माझ्या सगळ्या व्याख्यानांत सर्वात यशस्वी ती व्याख्याने होती, असे मला वाटते. धंद्याच्या वेळातला वेळ काढून आठवडेच्या आठवडे व्याख्याने ऐकायला हे दुकानदार येऊन बसत. त्यांना मनापासून तशी व्याख्याने ऐकण्याची गरज भासे, हे दाखवायला ह्याहून अधिक भक्कम पुरावा कोणता असेल? प्रयोग बघताना किंवा व्याख्यान ऐकताना त्यांच्या तोंडून सहज काही शब्द बाहेर पडत, त्यावरून एखाद्या उपकरणाला पंजाबीत काय म्हणता येईल हे मला सुचे. एकदा इलेक्ट्रिक प्लेट मशीनचे वर्णन करताना एका दुकानदाराने 'बिजली दा चरखा' असे अचूक नाव दिले. काही वेळा एखादी गोष्ट समजावून देताना मला शब्द सुचत नसे - अशा वेळी मी माझ्या श्रोत्यांना नावे किंवा शब्द सुचवायचे आवाहन करीत असे; आणि अशा वेळी चपखल शब्द मिळाल्याशिवाय राहत नसे. अनुरूप आणि नेहमीच्या वापरातला आणि सहज समजेल असा शब्द पुढ्यात येई. पदार्थविज्ञान आणि रसायनशास्त्र यांची तत्त्वे आणि व्यवहारातल्या घटना स्पष्ट करण्याशिवाय मी दहा व्याख्याने रोजच्या जीवनात येणाऱ्या विषयांवर देत असे. उदा. टेलिग्राफची तार कशी बोलते?

शुद्ध आणि अशुद्ध हवा
खेळणी व त्यातून शिक्षण
साबण बनविण्याची कृती
इलेक्ट्रोप्लेटिंग
मानवाच्या सेवेत वीज (ह्या विषयावर तीन ते चार व्याख्याने होत.)
काच कशी बनवितात?
पंजाब आणि पंजाबातल्या नद्या

या शेवटच्या व्याख्यानाकरता उंच-सखल भाग दाखविणारा एक मातीचा नकाशा मी दाखवीत असे. लाहोरमध्ये एका शैक्षणिक प्रदर्शनाकरता माझ्या मार्गदर्शनाखाली तो नकाशा मी बनवून घेतला होता. वर दिलेल्या विषयांवर बाओलीसाहिबमध्ये मी दर वर्षी व्याख्याने देत असे. या यादीवरून विज्ञान-प्रसाराकरता आम्ही कसले विषय निवडत होतो, याची कल्पना येईल. ह्यातली कितीतरी व्याख्याने लाहोरमध्ये अन्य ठिकाणी आणि दूरच्या खेड्यांतून पुन्हा-पुन्हा द्यावी लागली होती. शास्त्रीय अभ्यासाबाबत आमच्या प्रदेशात लोकांच्या उत्साहाला उधाण आले होते, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. या संबंधात मी प्रत्यक्ष शोध घेऊन खात्री करून घेतलेली एक गोष्ट नमूद करतो. त्या वेळी शास्त्र हा विषय म्हणून शिकवणाऱ्या शाळांची संख्या पंजाबात हिंदुस्थानातील इतर कोणत्याही प्रांताच्या मानाने अधिक होती.

जनसामान्यांकरता देत असलेल्या सोप्या व्याख्यानांबाबत आणखी एक गोष्ट. जनतेत शास्त्रीय विषयाबद्दल गोडी निर्माण व्हावी आणि सामान्य लोकांना उपयोगी पडेल अशी माहिती पुरवावी, हा हेतू धरून नव्याने लागलेल्या विलक्षण शास्त्रीय शोधांवर मी अधून-मधून व्याख्याने देत असे. त्यात मला कल्पनेबाहेर यश मिळाले. क्ष-किरण, एडिसनचा फोनोग्राफ आणि बिनतारी संदेशवहन ह्या नव्या शोधांचे प्रात्यक्षिक पाहून लोकांमध्ये त्यांच्याविषयी जिज्ञासा इतकी वाढली होती, की त्या त्या व्याख्यानांकरता तीनपेक्षा अधिक वेळा मागणी येत असे. व्याख्यानांचा



एका सार्वजनिक ठिकाणी वैज्ञानिक प्रयोग दाखविताना

सर्व खर्च तिकिटांतून निघणे हे ठरल्यासारखेच होते. वायरलेसचे प्रात्यक्षिक दाखवताना जनमानसात जी उत्सुकता निर्माण होई, ती पाहणे हा अनुभव होता. ही पुन्हा-पुन्हा होणारी प्रात्यक्षिके भारतात प्रथमच घडत होती, असे म्हणायला हरकत नाही.

राजा जयकिशन कौल, डॉ. बालकिशन कौल आणि राजा सर दयाकिशन कौल यांचे वडील पंडित सूरज कौल यांना 'राजा' हा किताब मिळाला होता. त्या निमित्ताने एक सार्वजनिक समारंभ करायचे ठरले. सर प्रोतुलचंद्र चटर्जी आणि सर शादीलाल हे संयोजक होते. त्यांनी नव्याने शोध लागलेल्या बिनतारी यंत्राचे प्रात्यक्षिक व प्रदर्शन करण्याची मला विनंती केली. बिनतारी संदेश देणारे व घेणारे अशी दोन यंत्रे साधारण १५० फूट अंतरावर ठेवली होती; पण त्या दोन्हींच्या मध्ये संदेश वाहणाऱ्या तारा लपवून नेल्या नाहीत ना, ह्याची शहानिशा करण्यासाठी प्रेक्षक त्या दोन्हींच्या मधून प्रत्यक्ष जाऊन येत होते. खरे तर त्या मार्गावरून संदेशलहरी जात-येत होत्या. काही व्यक्तींच्या सूचनेवरून तिथे हजर असलेल्या लेफ्टनंट गव्हर्नर सर मॅक्वर्थ यंग यांनी जमलेल्या ३०० ते ४०० लोकांना 'त्या दोन यंत्रांच्या मध्ये गर्दी करून उभे राहा आणि संदेशलहरी तुमच्या अंगातूनच जातात, याबद्दल खात्री करून घ्या.' असे सांगितले. सर मॅक्वर्थना मी दाखविलेले प्रात्यक्षिक फार आवडले. नंतर दोन प्रसंगी जेव्हा त्यांच्याकडे युरोपीय मंडळींना मेजवानीला बोलावले होते, तेव्हा ती प्रात्यक्षिके करून दाखवण्याकरता मला त्यांनी खास निमंत्रण दिले होते. जेवणानंतर प्रात्यक्षिकांचा कार्यक्रम होई.

पंजाबी भाषेतून शास्त्रीय कल्पना -

पंजाबी किंवा इतर प्रादेशिक भाषा ही महाविद्यालयीन शिक्षणाचे माध्यम असावे असा ठराव जेव्हा जेव्हा करण्यात येतो, तेव्हा त्याला चिवटपणे विरोध करणारे काहीजण असतात. त्यांच्यासाठी मी एक गोष्ट सांगतो. वर जी मेजवानीची गोष्ट सांगितली आहे, त्या प्रसंगी मी बिनतारी संदेशाचे कार्य व फायदे इंग्रजीतून समजावून दिले. पण पाहुण्यांमध्ये

इंग्रजी न जाणणारी काही बडी मंडळी होती. त्यांच्याकरता सर्व स्पष्टीकरण पंजाबीतून देता येईल का, असे मला लेफ्टनंट गव्हर्नरांनी विचारले. त्याला होकार देऊन मी ते सर्व पंजाबीतून पुन्हा सांगितले. माझे सांगून संपल्या-संपल्या लेफ्टनंट गव्हर्नरांनी, ''पंजाबीतून सांगितलेलं स्पष्टीकरण वृद्ध व सनातन्यांना कळलं असेल का?'' असें त्यांच्या जवळ उभ्या असलेल्या श्री. मदनगोपालना विचारले, तेव्हा ''युवर ऑनर, खरं सांगायचं तर इंग्रजीतल्या स्पष्टीकरणापेक्षा पंजाबीतून सांगितलेलं मलाही अधिक चांगलं समजलं.'' असे श्री. मदनगोपाल यांनी उत्तर दिले. ते स्वतः पंजाबी नसून दिल्लीतले होते. श्री. मदनगोपाल एम्.ए. व बार-ॲट-लॉ होते व उत्तम वकील म्हणून त्यांची ख्याती होती.

शास्त्रीय कल्पना स्पष्ट होण्यासाठी पंजाबी माध्यमाविषयी बोलताना मी माझ्या व्याख्यानासंबंधातली एक घटना सांगतो. रावळपिंडीत मी व्याख्यान देत होतो. ते संपल्यावर श्रोत्यांत बसलेले सर बाबा खेमसिंग बेदी माझ्याकडे आले. पंजाबीतून विज्ञान विषय शिकवणे कधी शक्य आहे यावर आपला विश्वास नव्हता, असे सांगून त्यांनी मला आणखी दोन-तीन दिवस त्यांचे पाहुणे म्हणून राहण्याचा आग्रह केला. स्वतःच्या बागेत त्यांनी अशा प्रकारची व्याख्याने देण्याची मला विनंती केली. बाबा खेमसिंग हे शिखांचे धर्मगुरू होते. धानी पाथोवार प्रांतात त्यांचे पुष्कळ अनुयायी होते. त्यांच्या विनंतीला मान देऊन मी दोन व्याख्याने दिली, त्या वेळी तेच अध्यक्ष झाले. श्रोत्यांमध्ये खेड्यातून आलेले पुष्कळ शीख होते. त्या पैकी अनेकांना केवळ माझे व्याख्यान ऐकण्याकरता मुद्दाम पाचारण केले होते, असे मला नंतर समजले.

संस्थेची समाप्ती -

पंजाब विज्ञान संस्थेच्या प्रयत्नांमुळे लोकांत विज्ञानाविषयी उत्सुकता निर्माण झाली; त्यांना त्यात रस वाटू लागला. त्याचाच परिणाम म्हणून आम्ही संस्थेकरिता निधी उभारू शकलो. शास्त्रीय उपकरणे, शास्त्रीय पुस्तकांचे ग्रंथालय यावर खर्च करून शिवाय सुमारे ३,००० रुपये

आमच्याकडे होते; पण त्या वेळी संस्था बंद करायचा आम्ही निर्णय घेतला. आमचा मुळातला बेत होता, सभागृह बांधण्याचा. त्यामुळे संस्थेला लाहोरमध्ये कायमची वास्तू झाली असती. पण ते व्हायचे नव्हते. सन १९०५ च्या सुमारास लाहोरच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'द सोसायची फॉर द प्रमोशन ऑफ सायन्टिफिक नॉलेज' नावाने एक संस्था सुरू केली होती. तिचा उद्देश पंजाब विज्ञान संस्थेसारखाच होता. डॉ. सी. सी. कालेब यांना त्या नव्या संस्थेचे कायमस्वरूपी अध्यक्ष केले होते. त्या वेळेपर्यंत श्री. ओमान हिंदुस्थान सोडून गेले होते आणि मी दयालसिंगाच्या मृत्युपत्राच्या गंभीर खटल्यात गुंतून पडलो होतो. तो खटला सुमारे दहा वर्षे चालला होता. डॉ. कालेब आणि इतर सहकारी यांनी आपले लक्ष नव्या संस्थेकडे वळवले. एकाच हेतूने प्रेरित झालेल्या दोन संस्था एका ठिकाणी असण्याचे प्रयोजन नव्हते.

गव्हर्नमेंट कॉलेजमध्ये श्री. ए. एस. हेम यांची विज्ञान विभागाचे प्रमुख म्हणून नेमणूक झाली होती. इतरही काही अडचणी उभ्या राहिल्या होत्या. त्यांच्याबद्दल मी इथे सांगणार नाही. एकूण परिस्थितीचा विचार करता पंजाब विज्ञान संस्था बंद करून त्यातील उपकरणे, पुस्तके व निधी नव्या संस्थेला देऊ करणे हे श्रेयस्कर होते. नव्या संस्थेचे अध्यक्ष डॉ. कालेब हे आमच्या संस्थेच्या सक्रिय सभासदांपैकी एक होते. ते एका मोठ्या विज्ञान विभागाचे प्रमुख असल्याने या नव्या संस्थेचे कामकाज त्यांना सहजपणे करता येणार होते.

♦♦♦

पंजाब विज्ञान संस्थेची कार्यशाळा

ह्या कार्यशाळेची स्थापना झाली सन १८८८ मध्ये. पहिल्या-पहिल्यांदा आलेल्या अडचणी आणि नंतरचे यश या सगळ्यांचा थोडक्यात वृत्तांत सांगायचा, तर मला काही वर्षे मागे जायला लागणार आहे. इसवी सन १८८७ च्या मार्च महिन्यात मी लाहोरच्या सरकारी महाविद्यालयात अध्यापनाच्या कामावर रुजू झालो. मी रुजू झालो आणि थोड्याच दिवसांत प्रा. ओमान हे २ वर्षांची प्रदीर्घ रजा घेऊन इंग्लंडला गेले. ते गेल्यावर इंटरमीजिएटपासून एम्.ए.पर्यंतचे रसायनशास्त्राचे सर्व वर्ग घेण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली गेली. पंजाब विज्ञान संस्थेचा मी संयुक्त सचिव होतो. त्याचे काम करून मला व इतरांना जो अनुभव आला होता, त्यावरून जनसामान्यांकरता सुगम व्याख्याने द्यायची झाल्यास काय-काय करावे लागते, याची पूर्ण कल्पना आली होती. कोणत्याही प्रकारचे शास्त्रीय शिक्षण द्यायचे असेल, तर प्रयोग-प्रात्यक्षिकांकरता लागणारी उपकरणे आवश्यक असतात. अशा उपकरणांची दुरुस्ती करण्याची अगदी प्राथमिक सुविधा तरी उपलब्ध असायलाच पाहिजे याबद्दल माझी खात्री झाली होती. तशी सुविधा असणारी एखादी कार्यशाळा सुरू करण्याइतके पैसे तर आमच्याकडे नव्हते. एका लहानशा कार्यशाळेच्या उभारणीपुरते पैसे जरी मिळवू शकलो असतो, तरी शास्त्रीय प्रायोगिक उपकरणांची दुरुस्ती करण्याचे काम आपण सहजी हाती घेऊ



पंजाब सायन्स इन्स्टिट्यूटची कार्यशाळा चित्रकाराने कल्पनाशक्तीने दाखवलेली

शकू, ही गोष्ट संस्थेच्या सभासदांपैकी कुणालाच मी पटवून देऊ शकलो नाही. ही अडचण गंभीर होती. शास्त्रीय उपकरणांची नुसती दुरुस्ती करण्याच्या कामात अनेक अडचणी उभ्या राहतील, अशा शंकेने आमची मने त्या काळात धास्तावलेली असत; मग एखादे उपकरण संपूर्ण बनवण्याची गोष्ट तर दूरच. कॉलेजच्या विज्ञान-विभागाला संलग्न अशी कार्यशाळा उघडण्याची कल्पना कितीतरी वर्षांनंतर निघाली, ही वस्तुस्थिती इथे लक्षात घेतली पाहिजे. पण त्या वेळी अशी कार्यशाळा काढण्याच्या माझ्या बेताला कुणीच पाठिंबा देईना. अशी कार्यशाळा सुरू केली आणि प्रारंभी जरी त्रास झाला, तरी नंतर तिची चांगली फळे मिळतील, याबद्दल मला मनोमन खात्री होती. प्रतिकूल परिस्थितीला लहानपणी तोंड द्यायला लागल्याने माझ्या मनात जे साहस आणि आत्मविश्वास निर्माण झाला होता, तसा संस्थेतल्या माझ्या इतर सहकाऱ्यांकडे नव्हता. प्रतिकूलतेतून मार्ग काढण्याची त्यांच्यावर वेळ आली नव्हती. त्यांचे कशाला, कित्येकदा कार्यशाळा सुरू करण्याबाबत माझ्या स्वतःच्या मनातही शंकांचे काहूर उठे. मी माझे कार्यजीवन नुकतेच सुरू केले होते. अशा कामासाठी पुढे करता येतील इतके पैसे माझ्याजवळ नव्हते. त्या वेळी आपल्या प्रकल्पावर असलेली श्रद्धा हेच माझे भांडवल होते. चिकाटीने जर मी माझा प्रकल्प पार पाडला, तर पंजाबीत म्हणतात त्याप्रमाणे 'यश छप्पर फाडून डोक्यावर बरसेल'. कोण म्हणते श्रद्धा आंधळी असते? श्रद्धा ठेवून वागणारा माणूस तर नक्कीच आंधळा असत नाही. श्रद्धा न ठेवता, जोखीम न पत्करता जो यश संपादन करतो, तोच फक्त आंधळा असतो. श्रद्धा आंधळी असत नाही आणि सश्रद्ध माणसाची दृष्टी दूरपर्यंत, आतपर्यंत पोहोचणारी असते. अश्रद्धाची नजर जिथवर पोहोचू शकत नाही, तिथवर सश्रद्धाची पोहोचते. श्रद्धेने चमत्कार घडतात असे म्हणतात, ते काही खोटे नव्हे.

अल्लाबक्ष : प्रमुख मिस्त्री -

लहानशी कार्यशाळा उभारण्याइतके पैसे माझ्याजवळ नव्हते आणि

पंजाब विज्ञान संस्थेच्या सभासदांनी कार्यशाळा ही एक कल्पनेची भरारी आहे, असे म्हणून हाणून पाडली होती. तरी मला स्वस्थ बसवेना. रेल्वेच्या कार्यशाळेत (वर्कशॉप) अल्लाबक्ष नावाचे मिस्त्री होते. रेल्वेकडून त्यांना महिना २५ रुपये पगार मिळत असे. त्याशिवाय किल्ल्या बनवून, कुलुपे दुरुस्त करुन किंवा अशीच बारीक-सारीक कामे करून दरमहा ते आणखी दहा रुपये मिळवत असत. अशा कामांसाठी लागणारी काही साधी हत्यारे त्यांच्याजवळ होती. तसेच त्यांच्या घरी एक कोळशाची भट्टी आणि चामड्याचा भाता होता. त्यांच्याकडून काही साधी उपकरणे बनवून घ्यावीत असे मी ठरवले. गोष्ट आहे १९८८ सालची. रात्री आठ ते बारा असे चार तास मी अल्लाबक्षांच्या घरी घालवीत असे. वर्गात शिकवण्याची तयारी मी पहाटे उठून करीत असे. त्या वर्षी मी जेवढे काम केले, तेवढे मी माझ्या आयुष्यात कधीही केले नाही. पंजाब विज्ञान संस्थेतर्फे जनसामान्यांकरता सुगम व्याख्याने तयार करण्याचे काम असेच; शिवाय अल्लाबक्षांच्या घरी साकार होणाऱ्या माझ्या कार्यशाळेत माझ्या देखरेखीखाली साधी शास्त्रीय उपकरणे बनविण्याच्या कामात चार-चार तास मी गुंतून राहिलेला असे. या शिवाय सरकारी महाविद्यालयातील अध्यापनाचे काम चालू होतेच आणि ते मी किती काटेकोरपणे करीत असे, त्याचे मी वर्णन मागेच केले आहे. शास्त्रीय उपकरणे बनविण्याचा माझा उद्योग हा पंजाब विज्ञान संस्थेतल्या सभासद मित्रांच्या चेष्टेचा विषय असे. त्यांचे टोमणे आणि विनोद ऐकत असतानाच मी एका शास्त्रीय आणि तांत्रिक कार्यशाळेचा पाया घालत होतो. पुढे माझ्या कार्यशाळेने कशी प्रसिद्धी मिळवली, ते मी ओघात सांगेनच. अल्लाबक्षांच्या घरी मी ज्या काही थोड्या आणि साध्या वस्तू बनविल्या, त्या बनवायला जेवढा खर्च येई, तेवढ्याच किंमतीत किंवा त्यापेक्षा कमी किंमतीत त्या वस्तू काही शाळांना मी विकल्या. त्या वस्तूंच्या किंमती ठरविताना माझ्या वेळाची व श्रमांची मोजदाद मी करीत नसे. त्या बनविण्यात मला जो आनंद व समाधान मिळत असे, तोच माझ्या श्रमांचा मोबदला आहे, असे मी मानत असे.

अल्लाबक्षांचे घर एका चिंचोळ्या बोळाच्या शेवटच्या टोकाला होते. त्या बोळातून दोन माणसांना एकत्र चालता येत नसे. पण तिथे जाऊन उपकरणे बनविण्याच्या कल्पनेने मला इतके पछाडले होते, की त्या चिंचोळ्या बोळातून चालत जाऊन अल्लाबक्षांच्या अंधाऱ्या घराच्या गलिच्छ अंगणात तास न् तास घालविण्यात मला फार सुख वाटे. आज त्या बोळाची आठवण जरी झाली, तरी अंगावर शहारा येतो.

एक वर्ष लोटले. मी आणि अल्लाबक्ष आमच्या शास्त्रीय उपकरणांवर खुश होतो. त्या वेळी आम्ही कोणत्या प्रकारच्या गोष्टी बनवू शकत होतो, हे सांगितले तर हशाच पिकेल. अर्थात् १८८८ मध्ये आम्ही काय बनवू शकत होतो, हे १९४२ मधल्या उत्पादनांच्या तुलनेत बघणे बरोबर नाही. या सगळ्या खटपटीत असताना माझ्यात व अल्लाबक्षांच्यात चांगला मेळ होता, ही फार महत्त्वाची गोष्ट होती. प्रयोगाकरता आवश्यक अशा सर्व प्रकारच्या उपकरणांची दुरुस्ती आणि काही साधीशी उपकरणे बनविणे या कामांकरता एक कार्यशाळा उघडण्याकरता मी मनापासून धडपडतो आहे, ह्याबाबत अल्लाबक्षांची पुरेपूर खात्री पटली होती. एक वर्ष त्या उत्पादनांचा प्रयोग झाल्यानंतर कार्यशाळा माझ्या घरी हलविण्याचा मी प्रस्ताव मांडला. त्या वेळी राजा नौनिहालसिंगांच्या हवेलीजवळ माझे स्वतःचे घर होते. माझ्या कार्यशाळेतच संपूर्ण वेळ काम करावे याकरता अल्लाबक्षांना मी महिना ४५ रुपये देऊ केले, ते त्यांनी आनंदाने मान्य केले; पण रेल्वे कार्यशाळेतील कायमस्वरूपी नोकरी सोडायला मात्र ते तयार होईनात. माझ्याकडची नोकरी कदाचित् काही महिनेच चालेल अशी त्यांना भीती वाटत असावी. शेवटी मी त्येंना कमीत कमी दोन वर्षे नोकरीची हमी देणारे कागद शिक्कामोर्तब करून दिले, तेव्हा त्यांचे समाधान झाले. मी ठरवलेला पगार बघता रेल्वे कार्यशाळेत चार वर्षांत जेवढी कमाई झाली असती, तेवढी माझ्याकडे दोन वर्षांतच होणार होती. दोन वर्षांचा करार करून राहिलेले अल्लाबक्ष प्रत्यक्षात त्यांच्या मृत्यूपर्यंत प्रमुख मिस्त्री म्हणून माझ्या कार्यशाळेत काम पाहत होते. शेवटचे सहा-

सात महिने ते अंथरुणाला खिळून होते, तेव्हाही त्यांचा संपूर्ण पगार म्हणजे ६० रु. मी त्यांना देत होतो आणि त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या बायकोला मी थोडे पेंशनही देऊ लागलो होतो. पण काही महिन्यांतच तिने दुसरे लग्न केल्याने त्याचे कारण राहिले नाही.

जेव्हा कार्यशाळा सुरू केली, तेव्हा अल्लाबक्ष हे एकटेच कारागीर माझ्याकडे होते. त्यांच्या हाताखाली एक-दोन माणसे असत. पण जस-जसे काम वाढू लागले, तशी त्यांनी माणसे शिकवून तयार केली. अल्लाबक्ष मोठ्या माणसांना शिकवायला फारसे तयार नसत. बारा ते पंधरा वयोगटातल्या मुलांना मात्र ते आनंदाने शिकवत असत. अशा मुलांच्यात व त्यांच्यात जिव्हाळा निर्माण होई. माझ्याशी ओळख झाल्यापासून, म्हणजे जेव्हा माझ्यासाठी ते स्वतःच्या घरात काम करीत असत तेव्हापासून आणि त्या नंतरच्या वर्षांतही अल्लाबक्षांना विज्ञानातील प्राथमिक तत्त्वांचा परिचय झाला होता. त्याला अनुसरून ते शास्त्रीय भाषाही वापरू लागले होते आणि तरुण मुलांना शिकवताना ती भाषा मुलांनाही येऊ लागे. शक्यतो तरुण मुलांना शिकवावे असे अल्लाबक्षना वाटे आणि ते स्वाभाविकही होते. माझाही अनुभव तसाच होता. मोठ्या माणसांच्या कामाच्या पद्धती ठराविकच असतात. त्यांना कामाच्या नव्या पद्धती शिकवणे अवघड जाते. आमच्या कार्यशाळेत अल्लाबक्षांच्या हाताखाली शिकायला आलेली मुले प्रथम १० ते १५ रुपयांवर काम करीत. सहा-सात वर्षे शिकल्यावर ही अठरा-वीस वर्षांची मुले ३५ ते ४० रुपये पगार मिळवू लागत. त्यांच्यापैकी काहीजण कलकत्त्याच्या 'बामर लॉरी अँड कंपनी'मध्ये किंवा 'वायव्य रेल्वे'मध्ये १५० ते २०० रुपयांवर लागलेली मी पाहिली आहेत. अशा प्रकारे आमच्या कार्यशाळेत प्रशिक्षण घेतलेली माणसे विजेचे पंखे दुरुस्त करण्याच्या व त्यांची चाचणी करण्याच्या आणि तत्सम कामांकरता इतर ठिकाणी लागली होती. अशा कामांना थोडी बुद्धी चालवावी लागते. जाणकारांच्या नजरेखाली अशी लहान मुले पंखे बनविण्याचे किंवा मोटर एंजिन बनविण्याचे काम अगदी

अथपासून इतिपर्यंत सहज शिकू शकतात. अशी मुले तयार होण्याकरता प्रशिक्षक हुशार असला पाहिजे आणि त्या मुलांना एकेका कामाचे प्रशिक्षण देण्याची त्याला इच्छा असणेही आवश्यक असते. मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणे अवघड नाही; पण त्या उत्पादनाचे यश ते मोठ्या प्रमाणावर विकले जाण्यावर अवलंबून असते.

कुलुपे आणि तिजोरी विभाग -


सरकारी महाविद्यालयाच्या प्राध्यापकाच्या पगारातून जेवढी बचत होऊ शकली, तेवढी सर्व म्हणजे १५०० रु. घालून मी कार्यशाळा व्यवस्थित सुरू केली. एकदा सुरू झाल्यावर कार्यशाळेचा व्याप झपाट्याने वाढू लागला. पहिल्या-पहिल्यांदा पितळाचे ओतीव काम आणि लेथवरचे कातीव काम आम्ही बाहेरून करून आणत असू. जसा व्याप वाढला, तशी बाहेरून करून आणण्याची कामेही वाढली आणि ती कटकटीची होऊ लागली. ह्या बाहेरच्या कामांचे दर जास्त असत. कधी-कधी तर ते आम्हाला न परवडण्याइतके असत. मग नाइलाजाने ओतीव कामाचा एक छोटासा विभाग कार्यशाळेला जोडावा लागला. पण त्याला पुरेल इतके काम आमच्याकडे नव्हते; म्हणून मी बाहेरची कामे घेण्याची प्रमुख मिस्त्र्याला परवानगी दिली. काही वर्षांनंतर आम्ही कुलुपे बनविण्याचा विभाग सुरू केला. त्यामागेही प्रशिक्षित कामगारांना काम देण्याचाच हेतू होता. कामगारांची संख्या वाढली होती. त्यांचा अर्धा दिवस कुलुपे बनविण्याच्या कामात जात असे. माझी मिळकत बेताची होती आणि इतक्या कामगारांना महिनोन्-महिने पगार देणे मला परवडण्यासारखे नव्हते. त्यामुळे कुलुपे बनविण्याचा विभाग 'ज्या प्रमाणात उत्पादन, त्या प्रमाणात पैसे' या तत्त्वावर चालू ठेवला होता. त्या विभागाला लवकरच 'लॉक अँड सेफस्' असे नाव पडले. मी व प्रमुख मिस्त्री मिळून महिनाभर चर्चा करून, युक्त्या-प्रयुक्त्या करून वेगवेगळ्या प्रकारची कुलुपे व किल्ल्या बनविण्याचे प्रयोग करीत होतो आणि त्याचा परिणाम दोन वैशिष्ट्यपूर्ण रचनांच्या कुलुपांत झाला. ही कुलुपे दुसऱ्या कुठल्याही

किल्लीने उघडत नसत. ती फोडूनच उघडावी लागत. सर्व प्रकारच्या किल्ल्या प्रमुख मिस्त्रीच बनवीत असे आणि माझ्या खासगी जागेवर ठेवून देई. प्रत्येक कुलुपाबरोबर आम्ही दोन किल्ल्या देत असू. सर्व कुलुपे माझ्या व्यक्तिगत आणि प्रमुख मिस्त्रीच्या देखरेखीखाली बनविली जात. आमच्या पद्धती सांगण्याच्या भानगडीत मी पडणार नाही; पण वर सांगितल्याप्रमाणे कुलुपे बनवायचे काम थोडीच माणसे, तेही अर्धा वेळच आणि कंत्राटावर करीत. फक्त कुलुपे बनविणाऱ्याला आम्ही एक रुपया देत असू. प्रत्येक कुलूप मी आणि मिस्त्री पारखून घेत असू. किल्ल्या मात्र मिस्त्री बनवी आणि त्या आम्ही दोघे तपासून बघत असू. त्या तपासण्याच्या कामात कोणत्या गोष्टी आम्ही बघत असू, ते इथे सांगायची गरज नाही. पण लवकरच कुलुपांना मागणी वाढली आणि दरमहा १०० रु. इतका आम्हाला फायदा होऊ लागला. कार्यशाळेच्या शास्त्रीय विभागाच्या यशाची खात्री वाटू लागली होती. मुळात शास्त्रीय सामग्री बनविण्याचा व दुरुस्त करण्याचा माझा उद्देश होता. कुलुपे बनविण्याचा माझा मानस नव्हता. हे जरी खरे असले, तरी एक गोष्ट माझ्या लक्षात आली होती. कुलुपे बनवून नियमित अर्थार्जन होत होते. तेव्हा समजा, माझा शास्त्रीय उपकरणे बनविण्याचा उद्योग चालला नाही, तरी काहीतरी ठोस माझ्या हातात होते. एक-दोन वर्षे अशीच गेली आणि अचानक मला ३,००० रुपयांची देणगी मिळाली. दैवाचा असा हात मिळाल्यानंतर काही झाले तरी माझी कार्यशाळा पूर्ण यशस्वी होणार, यात मला शंकाच राहिली नाही. कालांतराने कुलुपे बनविण्याचा विभाग आम्ही बंद केला. त्याचे असे झाले. श्री. आर. बी. लब्धाराम, राय मुलराज आणि काही इतर मंडळींना मिळून कुलुपांचा मोठा कारखाना सुरू करायचा होता. त्यात त्यांनी बरेच पैसेही गुंतवले होते. ही सगळी हकीगत सांगून त्यांनी मला माझा कुलुपांचा विभाग बंद करायची गळच घातली. खरे तर तीन-चार वर्षांपूर्वी गावात एक 'लॉक वर्कशॉप' सुरू झाले होते; पण उत्पादनाची देखरेख काटेकोरपणे न झाल्याने हलक्या दर्जाची कुलुपे तयार होऊ लागली आणि

मग त्यांची कुलुपे गिऱ्हाईकांच्या मनातून उतरली आणि त्यांची कंपनी मोठी खोट खाऊन बंद पडली होती.

लेथ-

आपल्या स्वतःवर आणि आपल्या कामावर श्रद्धा ठेवून काम करणाऱ्याच्या पावलावर पाऊल ठेवून यश येत असते, हे दाखवण्यासाठी एक प्रसंग सांगतो. माझा धीर खचला होता आणि माझा लाडका उद्योग अगदी सुरुवातीलाच बंद करण्याची वेळ आली होती. वर सांगितल्याप्रमाणे सुरुवातीच्या काळात काही ओतीव व कातीव कामे आम्हाला बाहेरून करून घ्यावी लागत. लेथसारखे उपयुक्त यंत्र आमच्याकडे नव्हते; कारण ते विकत घेण्याइतके पैसे माझ्या गाठीला नव्हते. गावात दोन माणसांकडे लेथ होते. त्यांच्यापैकी एकाकडून धातू कातण्याचे सर्व काम मी करून घेत असे. माझे काम वाढू लागले, तसे त्याला माझ्याकडून अधिक काम मिळू लागले. अशा वेळी आपले दर त्याने कमी तर केले नाहीतच; पण आणखी वाढवले. मी नाइलाजाने पडते घेऊन वाढीव दर देऊ लागलो, तसा तो अधिकच ताणू लागला. शेवटी त्याचे दर माझ्या कुवतीबाहेर गेले. मग मी दुसऱ्या लेथ मालकाकडे गेलो. त्याचा लेथ जर मी विकत घेणार असलो, तर तो माझे काम करून द्यायला तयार होता. आपल्या लेथची किंमतही त्याने इतकी फुगवून सांगितली, की ती माझ्या आवाक्याबाहेर होती. त्या दोघांनी माझ्याशी सरळ व साधा व्यवहार करावा यासाठी मी त्यांना परोपरीने समजावले; पण त्याचा काडीमात्र उपयोग झाला नाही. ह्या कोंडीतून बाहेर पडण्याचा मार्ग शोधता-शोधता मी व मिस्त्री थकून गेलो. बँकेकडून कर्ज काढून समजा, मी लेथ विकत घेतला, तर तो माझ्या कामाकरता योग्य ठरेल का? लेथवर काम करण्याचा मला काही अनुभव नव्हता. तरीही कलकत्त्याच्या किंवा मुंबईच्या एखाद्या कंपनीकडे त्याबाबत विचारणा करणे योग्य ठरेल का? मला ज्या कामाकरता लेथ पाहिजे, तसला लेथ बहुधा त्यांच्याजवळ नसेल. मग ते काय करतील? माझी मागणी लिहून घेऊन तसला लेथ इंग्लंडहून मागवतील आणि तो इथे



लेथ व्यवस्थित बसलेली पाहून ते थक्क झाले.

पोहोचेपर्यंत मला तीन-चार महिने वाट पहायला सांगतील. लाहोरमध्ये ज्यांच्याकडे लेथ होते, त्यांना या अडचणीची चांगली कल्पना असावी; नाहीतर काम मिळत असताना त्यांनी माझ्याशी असा आडमुठेपणा केला नसता. असा मी पूर्ण निराश झालो असतानाच मी मिस्त्री अल्लाबक्षांना विचारले, ''समजा, काहीतरी करून मी एक लेथ विकत घेतला, तर आपल्याला चांगला टर्नर मिळेल का? अर्थात् त्या दोन लेथवाल्यांकडचे टर्नर सोडून.'' त्यांच्या टर्नरला बोलावणे म्हणजे संकटाला बोलावण्यासारखेच होते. एकतर ते मला त्रास देऊ शकले असते; शिवाय माझ्याकडच्या इतर कामगारांना चिथावण्याचे कामही करू शकले असते. अल्लाबक्षांना तीन-चार बऱ्यापैकी टर्नर माहीत होते. ते ऐकून त्यांच्यापैकी एकेकाला माझ्याकडे पाठवायला मी अल्लाबक्षांना सांगितले. जेव्हा ते एकेक करून मला भेटायला आले, तेव्हा काही प्रास्ताविक प्रश्नांनंतर कुठे एखाद्या सेकंड हँड लेथ विकावू आहे, का असे मी त्या प्रत्येकाला विचारले. जो मला अशा लेथची महिती लवकर देईल, त्याला चांगल्या पगारावर कामाला ठेवण्याचे मी वचन दिले. यानंतर जे घडले, ते यशस्वी होण्यास पात्र असणाऱ्यांच्याच बाबतीत घडते. काय घडले? त्या टर्नरांपैकी एकाला चांगल्या स्थितीत असलेल्या विकाऊ लेथची माहिती होती. कुसूर या गावी एका माणसाला आपला लेथ बऱ्या किंमतीत विकायचा होता. ज्याने मला ही माहिती पुरवली, तो टर्नर बेकार असून कामाच्या शोधात होता. मी लगेच त्याचा पगार ठरवून टाकला. फक्त लेथ आल्यानंतर कामाला सुरुवात करायची, एवढी अट घातली.

गेले दोन महिने मी निराशेच्या बोगद्यातून जात होतो. अंधाराशिवाय जिथे काही दिसत नव्हते, तिथे आता बोगद्याचा शेवट येऊन उजेड दिसू लागला होता. माझी कार्यशाळा बंद पडण्यापासून वाचणार होती. वरील माहिती कळल्यानंतर जो पहिला सुटीचा दिवस आला, त्या दिवशी मी व माझा नवा टर्नर फिरोझपूरला जायला निघालो. हे ठिकाण कुसूरपासून १६ मैलांवर होते. फिरोझपूरला माझे काही स्नेही होते. त्यांच्यापैकी

एकाला निरोप देऊन, लेथचा मालक ज्याला माहीत आहे, अशा माणसाला माझ्याबरोबर पाठवायला सांगितले. सर्व गोष्टी सुरळीत पार पडल्या. एका घड्याळजीचा तो लेथ-मालक परिचित होता. तो घड्याळजी माझ्याबरोबर यायला तयार झाला. लेथची किंमत ठरवायला त्याची मदत व्हावी अशी माझी अपेक्षा होती. सर्व जमवाजमव होऊन आम्ही दोन तासांत कुसूरकडे जायला निघालो. तिथे गेल्यावर लेथमालक 'तुम्हाला ओळखतो' असे म्हणाला. मिस्त्री अल्लाबक्षने बनविलेले काही पार्टस् विकत घ्यायला तो लाहोरला माझ्या कार्यशाळेत आला होता. त्याला लेथ विकण्याची घाई होती; त्यामुळे लेथची पावती वगैरे त्याने माझ्यासमोर ठेवले. लेथकरता त्याने सुमारे हजार रुपये खर्च केले होते व दोन ते तीन वर्षे त्याने तो लेथ वापरला होता. चौकटी, चक्रे व इतर काही सुविधा त्याला बसवलेल्या होत्या. माझ्या टर्नरने तो नीट चालतो आहे ना, ते नीट पारखून घेतले. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या लेथमालकाने आपल्या वस्तूची किंमत फक्त ३५० रु. मागितली. ह्यापेक्षा आणखी मला काय हवे होते? घासघीस करायला मला त्याने जागाच ठेवली नाही. किंमत मला परवडण्यासारखी होती. मी लगेच त्याला धनादेश देऊन टाकला. त्याने तो आनंदाने स्वीकारला. चक्रे, चौकटी, खिळे यांच्यासकट एका संपूर्ण लेथचा मी मालक बनलो होतो. त्यानंतर तिथे एक तासभरसुद्धा थांबायची माझी तयारी नव्हती. लेथची बांधाबांध करण्याकरता भाग सुटे करावे लागत होते. ते पाहताना मला फार धन्यता वाटत होती. आनंदाच्या भरात ते अवजड यंत्र माझ्याबरोबर पॅसेंजर गाडीतून घेऊन जायचे मी ठरवले. गाडी रात्री दहा वाजता लाहोरला पोहोचली. तिथे लेथ आणि सुट्या भागांची खोकी खाली उतरवल्यावर मी टर्नरला बैलगाडी आणायला पाठविले. तो लेथ कधी आपल्या कार्यशाळेत बसवतो, असे मला झाले होते. मग टर्नरला एक दिवस सुट्टी देण्याचे कबूल करून त्याचाकडून लेथ रात्रीच्या रात्री कार्यशाळेत बसवून घेतला. त्याच्या मदतीला माझे इतर गडीही दिले होते. ते काम पूर्ण व्हायला रात्रीचे दोन वाजले. एअर-पंपाचे

नळकांडे त्या लेथला जोडल्याचे पाहून मला खरे समाधान झाले; कारण ह्याच वस्तूवरून लेथवाल्यांनी मला त्रास दिला होता. रात्री पहिले कातणेही सुरू करून बघितले.

माझ्या कार्यशाळेत सुमारे सहा कामगार होते. सकाळी जेव्हा ते दरवाज्यातून आत आले, तेव्हा त्यांचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना. त्या प्रशस्त खोलीत कित्येक दिवसांचा सोबती असल्यासारखा तो लेथ बसवलेला पाहून त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. हे यंत्र इथे कसे आले? केव्हा आणून बसवले? असे प्रश्न त्यांच्या चेहऱ्यावर उभे राहिले. आदल्या दिवशी सुटी होती. पण त्याच्या आधीच्या संध्याकाळी ते घरी गेले, तेव्हा त्या यंत्राचा मागमूसही इथे नव्हता. आज एखादा चमत्कार व्हावा तसा तो लेथ त्यांच्या डोळ्यांसमोर उभा होता. माझ्या लेथची बातमी लाहोरमधल्या त्या दोन लेथवाल्यांपर्यंत तर पोहोचलीच; पण रेल्वेच्या कार्यशाळेतले कामगार ज्या वस्तीत राहत होते, त्या मोची गेट क्वार्टर्स्च्या भागातही पसरली. त्याच्यानंतर मला कसलाही त्रास झाला नाही, हे सांगायला नकोच. त्या दोन्ही लेथवाल्यांनी मात्र कंत्राटाने खासगी कातीव कामे न घेण्याची माझ्या मिस्त्रीला विनवणी केली.

नाजूक उपकरणांची दुरुस्ती -

सन १८८९ च्या उन्हाळ्याच्या मध्यात प्रा. ओमान दीर्घ रजेवरून परत आले. त्यांच्या गैरहजेरीत मी कार्यशाला सुरू केली, हे त्यांना फारसे रुचले नाही. शाळा-महाविद्यालयांतील प्रयोगशाळेत लागतात तेवढीच उपकरणे दुरुस्त करण्याइतके आमच्या कार्यशाळेचे काम मर्यादित ठेवावे असा त्यांनी आग्रह धरला. कामाचा वेग कमी करणे शहाणपणाचे ठरेल असा मी विचार केला; पण कार्यशाळा सतत कार्यान्वित राहील इतके दुरुस्तीचे काम तिथे नव्हते. आणि जे काय थोडे कारागीर कार्यशाळेत येत, त्यांना पुरेसे काम देण्याकरता काही साधी उपकरणे बनविण्याखेरीज आम्हाला गत्यंतर नव्हते. पैसे घेऊन काम करून देण्याचे जर आम्ही ठरवले असते, तर आम्हाला भरपूर काम मिळाले असते; पण मग

कार्यशाळेचा 'विज्ञानसंस्था' हा गुणविशेष राहिला नसता. या व अशा अनेक कारणांनी बाहेरची इतर कामे घेण्याचा विचार मी माझ्या मनातून काढून टाकला.

जसे दिवस जात होते, तसा अधिक अनुभव आमच्या पदरात पडत होता; आणि त्या अनुभवाच्या जोरावर काही जटिल उपकरणांची दुरुस्ती करण्याचे आम्हाला जमू लागले होते. पंजाब विज्ञान संस्थेतर्फे दिलेल्या व्याख्यानांविषयी मी विस्ताराने लिहिले आहेच. त्या व्याख्यानांच्या जोडीने आमच्या कार्यशाळेची ख्याती सबंध प्रांतभर पसरली. त्याचा परिणाम म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी थिओडोलाइट, प्रिझ्मॅटिक कंपाससारखी उपकरणे आमच्याकडे दुरुस्तीकरता पाठवू लागले. अशा नव्या आणि गुंतागुंतीच्या उपकरणांच्या दुरुस्तीकरता त्यांच्या रचनेची कसून पाहणी, तपासणी करावी लागे. अशा विविध आणि अवघड कामांमुळे माझ्या मिस्त्र्यांचा आत्मविश्वास वाढू लागला; त्याबरोबर शाळा व महाविद्यालयांत लागणारी प्रगत उपकरणे बनविण्याची धमक त्यांच्या अंगी आली.

मध्य प्रांतातल्या हिरालाल यांच्याशी संबंध -

१९ व्या शतकातील शेवटचे दशक सुरू होत असताना माझ्या कार्यशाळेला एक लहान पण जरूर त्या सर्व सामग्रीसह सुसज्ज अशा एका संस्थेचे स्वरूप आले होते. चांगल्या दर्जाची उपकरणे बनविण्याकरता लागणारी हत्यारे आणि कुशल कारागीर ह्या दोन्ही दृष्टींनी आमची कार्यशाळा सुसज्ज होती. आमच्या प्रगतीचे इतरांनाच काय; पण मलाही आश्चर्य वाटे. अशा वेळी आम्हाला अनपेक्षित ठिकाणाहून मदत मिळाली आणि ती मोठी उत्साहवर्धक ठरली. आम्हाला पितळ व जस्त वगैरे धातूंच्या तबकड्या, तसेच तांब्या-पितळ्याच्या ठराविक जाडीच्या तारा लागत असत. त्या स्थानिक बाजारात सहजी मिळत नसत. त्या हस्तगत करायला बऱ्याच अडचणी पार कराव्या लागत. तेव्हा उन्हाळ्याच्या सुट्टीत मुंबईला एक खेप टाकावी असा मी विचार केला. तोपर्यंत माझ्याकडे एक

हजार रुपये शिल्लक होते. मुंबईत वस्तू विकत घेताना माझे थोडे पैसे वाचतील आणि जाण्या-येण्याच्या प्रवासखर्चापैकी थोडा तरी खर्च त्यातून निघेल, अशी आशा करीत मी ते सर्व पैसे बरोबर घेऊन निघालो. त्या वेळेपर्यंत मी अनेकदा मुंबईला गेलो होतो; पण कामाकरता जाण्याची ही माझी पहिलीच वेळ होती. या खेपेस या बड्या व्यापारी शहरात गेल्यापासून नशीब मला कोपऱ्या-कोपऱ्यावर साथ करीत आहे, असे माझ्या लक्षात आले. ज्या गोष्टी विकत घ्यायला मी मुद्दाम मुंबईत गेलो होतो, त्यातल्या काही विकत घेतल्यानंतर मी एका इंग्लिश कंपनीत गेलो. शास्त्रीय उपकरणे पुरविणारी ती एक स्थानिक कंपनी होती. त्या कंपनीकडून आमच्या कार्यशाळेने काचेच्या नळ्या व कांड्या मागवल्या होत्या. त्या तयार असतील तर आपल्याबरोबर लाहोरला घेऊन जाव्यात, अशा विचाराने मी चौकशी केली. तिथल्या सहाय्यकाला आमच्या ऑर्डरविषयी काहीच माहिती नव्हते; म्हणून त्याने ऑर्डरी लिहून ठेवलेली भली मोठी वही उघडून त्यात आमची ऑर्डर तो शोधू लागला जसा-जसा तो पाने उलटून दाखवू लागला, तशा मला इतरही काही ऑर्डरी व त्या पाठविणाऱ्यांची नावे व पत्ते दिसू लागले. त्यात होशंगाबादचे विज्ञान इन्स्ट्रक्टर श्री. हिरालाल यांच्याकडून एअर-पंपाची ऑर्डर आलेली मला दिसली. मला ती माहिती फार मोलाची वाटली. दुकानातील माझे काम संपवून मी घरी गेलो आणि श्री. हिरालालना पत्र लिहून माझी कार्यशाळा काय काय वस्तू पुरवू शकते, याची यादी पाठवून दिली. पत्रात मी पंजाब विज्ञान संस्थेची हकीगत आणि त्या संस्थेला पूरक अशी मी सुरू केलेल्या कार्यशाळेची माहिती लिहिली. तसेच एअर-पंपाची गरज असल्यास आमची कार्यशाळा तसला पंप आनंदाने पुरवू शकते; तसेच त्यांना आणखीही काही उपकरणे हवी असल्यास आम्ही पाठवू शकतो, असे लिहून, 'त्यांना आमचे कोणतेही उपकरण त्यांच्या मनासारखे नसल्यास परत पाठवून द्यावे; त्या परतीचा खर्च कार्यशाळा करेल', अशी पुस्ती जोडली. इंग्लिश कंपनीच्या तुलनेत आमच्या किंमती निम्म्याने

होत्या. आमच्या किंमती आणि उदार सवलती (टर्मस् अँड कंडिशन्स्) पाहिल्यावर हिंदुस्थानी ग्राहक आमचा माल घेणे पसंत करणार, यात मला शंका नव्हती. मी लाहोरला परत गेलो, तेव्हा श्री.हिरालालांचे एक मोठे छान पत्र येऊन पडलेले होते. श्री.हिरालाल पुढे अनेक वर्षे आमचे ग्राहक बनून राहिले होते. श्री. हिरालाल म्हणजे संपूर्ण मध्यप्रांत म्हणायला हरकत नाही; कारण ते मध्य प्रांतातल्या शाळांचे फिरते इन्स्ट्रक्टर होते. त्यामुळे ते कधी ह्या जिल्ह्यात, तर कधी दुसऱ्या जिल्ह्यात, असे प्रांतभर दौरा करीत. ते चढत-चढत शेवटी आपल्या प्रांताच्या डेप्युटी कमिशनरचे काम पाहू लागले. ह्या गोष्टीवरून त्यांची कुवत मोठी होती, हे स्पष्ट होते. त्यांची धमकही वाखाणण्यासारखी होती. मी त्यांना अनेक वेळा भेटलो. कित्येक वर्षे मित्र या नात्याने आमच्यात पत्रव्यवहार चालू होता.

नियतीने दिलेली देणगी -

मी मुंबईला गेलो तेव्हा नियतीने माझ्या कार्यशाळेला ३००० रु.ची देणगी कशी दिली, ते सांगायलाच पाहिजे. कोणत्याही नव्या गावी गेलो की एक-दोन दिवस या गावातून भटकण्यासाठी ठेवायची माझी पूर्वीपासूनची सवय होती. मुंबईसारख्या मोठ्या शहरात तर एकदा काम आटोपले, की ते शहर पहाटेपासून रात्रीपर्यंत पालथे घालायची माझी इच्छा अनावर होत असे. अशा वेळी जेवणाच्या वेळा पाळणे शक्यच नसे. भुकेच्या वेळी जिथे असेन, तिथे जे मिळेल, ते खाण्यात मला मजा वाटे. कधी रस्त्याच्या कडेला असलेल्या आर्मेनियन रेस्टॉरंटमध्ये जाऊन चहा-केक किंवा अंडी व पाव असे मी जेवण करीत असे. कधी मनात आले, तर भाजलेली अख्खी कोंबडी फस्त करून टाकीत असे.

एक दिवस माझी अशी भटकन्ती चालू होती, तेव्हा जोरदार पाऊस पडू लागला. जवळच्याच एका दुकानात लोकांची सरमिसळ गर्दी दिसली. पावसापासून सुटका करून घेण्याकरता मीही त्या दुकानात शिरलो. काही खरेदी करण्याचा माझा इरादा नव्हता. आत गेलो तेव्हा तिथे लिलाव चालू असल्याचे दिसले. शास्त्रीय उपकरणे बनविणाऱ्या एका कंपनीचे दिवाळे

निघाले होते; म्हणून त्यांच्याकडचा उपकरणांचा साठा काढून टाकण्याच्या इराद्याने त्यांनी लिलाव मांडला होता. एक पारशी माणूस तीन कप हातात घेऊन शेवटची बोललेली किंमत पुकारत होता, ''चार रुपयेऽ चार रुपयेऽ!'' कप धातूचे असून चांदीसारखे चमकत होते. त्याच्याजवळ जाऊन मी ते कप हातात घेऊन निरखून घेतले. त्यांना स्पर्श करताच ते कोणत्या धातूचे आहेत, ते लगेच समजले. खरे तर कुणालाही ते कळले असते. कप त्या पारशाच्या हाती देऊन मी त्यांची सहा रुपये किंमत बोललो. किंमत एकदम दोन रुपयांनी वाढवल्याचे ऐकून माझ्या जवळच्या माणसाने हलकेच मला सांगितले, ''कप चांदीचे आहेत असे तुम्हाला वाटले असेल, तर ते चूक आहे.'' मी म्हटले, ''नाही. ते चांदीचे नाहीत; सोन्याचे आहेत.'' ''रोख ठेव (डिपॉझिट) दिलीत, तरच तुम्ही बोललेल्या किंमतीचा विचार करता येईल.'' असे त्या पारशी माणसाने मला सांगितले. तेव्हा मी माझ्या खिशातून शंभराच्या सात नोटा काढल्या व त्यातली एक त्याला देऊन मी म्हटले, ''हे ठेवा. मला आणखीही काही वस्तू घ्यायच्या आहेत.'' माझ्या अशा वागण्याने अवतीभवतीचे लोक चकित झाले. आणि माझ्याजवळचे सगळे पैसे मी मुंबईतच खर्च करून टाकणार आहे हे कळल्यावर तर त्यांना मी वेडाबिडा आहे का, अशी शंका येऊ लागली. तसे ते कुजबुजू लागले. ते माझ्या पथ्यावरच पडले; कारण वेड्याला शह देणारी किंमत कुणी बोलेना. ते तीन कप म्हणजे प्लॅटिनमची ती क्रुसिबल्स् होती, ती ६ रुपयांवर माझ्या नावावर लिहिण्यात आली. ती माझ्या वेस्ट कोटाच्या खिशात जपून ठेवून दिली; आणि नंतर एका मागोमाग एक अशी शास्त्रीय उपकरणांची मालिकाच माझ्या नावावर लिहिली गेली. वीस प्लॅटिनम्च्या तबकड्या (ह्या ग्रोव्ह बॅटरी सेल्स्करता उपयोगी पडतात), तीन ते चार विम्सबर्स्टस् यंत्रे, कार्बनच्या अनेक तबकड्यांचा संच, सुताने किंवा रेशमाने गुंडाळलेली तार, विजेवर चालणाऱ्या घंटा (त्यांच्या बॅटऱ्यांसकट) वगैरे गोष्टी मी विकत घेतल्या. त्या पावसाच्या दिवशी सकाळी काय गोष्टी लिलावाला ठेवल्या होत्या,

त्यांची यादी देणे व्यर्थ आहे. त्या दिवसापर्यंत नवीन गावातली माझी भटकंती इतकी किफायतशीर कधीच ठरली नव्हती. कितीतरी वस्तू मी विकत घेतल्या. त्या सगळ्यांची मिळून किंमत झाली १२४ रुपये. प्लॅटिनमच्या वस्तू सोडून बाकीच्या सर्व वस्तू बांधून लाहोरच्या माझ्या पत्त्यावर आगगाडीने पाठविलेल्या मी जातीने बघितल्या. लाहोरला गेल्यावर प्लॅटिनमच्या वस्तू, तार आणि कार्बन तबकड्या सोडून इतर सर्व वस्तू मी विकून टाकल्या. बाजारात त्यांची जी किंमत होती, त्याच्या पाउणपटीने मी किंमत लावली, तरीही मला ३००० रुपये निव्वळ फायदा झाला. हे सर्व पैसे कार्यशाळेच्या गंगाजळीत गेले; त्यामुळे आमची मुळातली गंगाजळी चांगलीच फुगली. मुंबईहून वाचवून आणलेल्या सातशे रुपयांपैकी जे काही वाचले होते, ते सर्व खर्च करून कार्यशाळा वाढविण्यासाठी जरूर ती सामुग्री मी विकत घेतली.


मास्टर प्यारेलाल : शाळांचे इन्स्पेक्टर -

कार्यशाळेची आर्थिक परिस्थिती मजबूत झाली होती. नियतीची जी देणगी मला मिळाली, त्यामागे काहीतरी हेतू असणार. शाळेत उपयोगी पडणारी ४ ते ७ रु.पेक्षा कमी किंमतीची काही साधने मी काही शाळांना भेट म्हणून पाठवून दिली. त्यात माझे सुमारे २०० रुपये खर्च झाले असतील. शाळांच्या इन्स्पेक्टरांना एक पत्रकही पाठवून दिले. त्यात माझ्या कार्यशाळेची प्रगती कशी चालली आहे, हे लिहिले. शिवाय आमच्याकडे बनलेली डझनभर शालेय उपकरणे पाठवायची तयारी व्यक्त करून आमचा मिस्त्री त्या उपकरणांचे उपयोग व रचना दाखवेल असेही लिहिले. त्या अधिकाऱ्यांना आमच्या उद्योगाविषयी विश्वास वाटावा आणि त्यांनी आपल्या अधिकारातल्या शाळांना आमची उपकरणे विकत घेण्याचा सल्ला द्यावा असा माझा हेतू होता. आमच्या प्रांतात पाच इन्स्पेक्टर्स् होते, त्यातल्या चारांकडून उत्तर तर सोडा; पण साधी पोचदेखील आली नाही. पाचवा इन्स्पेक्टर हा एकच हिंदुस्थानी माणूस होता. त्याचे नाव होते मास्टर प्यारेलाल. ते जालंधर परिसरातले होते. त्यांनी मला पत्र लिहून माझ्या

कार्यशाळेची प्रसिद्धी त्यांच्या कानावर आल्याचा उल्लेख केला. आमची उपकरणे नजरेखालून घालण्याची इच्छा त्यांनी दाखवली; पण त्याकरता उपकरणे जलंधरला पाठविण्याचे कारण नाही, असे सांगितले. ते लवकरच लाहोरला येतील, त्या वेळी आमच्या कार्यशाळेला भेट देऊन ती उपकरणे कशी बनवितात, ते प्रत्यक्षच पाहतील, असेही कळविले. त्यानंतर लवकरच ते लाहोरला थोड्याच दिवसांसाठी येणार असून आपल्या भावाकडे म्हणजे श्री.मदनगोपाल, बार-ॲट-लॉ यांच्याकडे उतरतील, असा त्यांचा निरोप आला. ठरलेल्या वेळी मी त्यांच्याकडे जाऊन त्यांना घेऊन कार्यशाळेत आलो. ते तीन तास कार्यशाळेत थांबले. प्रत्येक गोष्ट नीट पाहून त्याबद्दल अनेक प्रश्नही विचारून घेतले. त्यांनी आमच्या कार्यशाळेत जो रस घेतला आणि त्यानंतर तिच्या प्रगतीकरता जी कळकळ दाखवली, त्याबद्दल मी कृतज्ञ आहे, हे मी इथे नमूद करतो. खरे सांगायचे तर त्या सुरुवातीच्या दिवसात मास्टर प्यारेलाल आणि हिरालाल ह्यांच्या प्रोत्साहनाशिवाय कार्यशाळेची प्रगती केविलवाणी आणि अनिश्चित झाली असती. एका युरोपीय अधिकाऱ्याने तर, "या कार्यशाळेसारख्या उद्योगाला प्रोत्साहन देऊन मी आपल्या लोकांचा घात करणार नाही," असे सरळच सांगितले. आपला अविचारीपणा त्याला नंतर जाणवला असावा; कारण नंतर तो काही तरी स्पष्टीकरण देऊ लागला. प्रांतातल्या शास्त्र शिकविणाऱ्या शाळांकरता उपकरणे तयार करून या कार्यशाळेने सुविधा निर्माण केली, याबद्दल शिक्षण विभागाच्या प्रमुखाने मात्र अधिकृतपणे समाधान जाहीर केले.

पुण्याचे औद्योगिक अधिवेशन -

ह्या सुमारास एका वेगळ्याच ठिकाणी माझ्या कार्यशाळेचे मूल्यमापन झाले. प्रथमदर्शनी त्या मूल्यमापनामुळे मी उदास आणि शंकाकुल झालो, तरी आमची उत्पादने परदेशी उत्पादनांशी मिळती-जुळती आहेत याचीही ग्वाही त्याच मूल्यमापनातून मिळाली आणि हुरूप वाढला. कार्यशाळेला आता पाच वर्षे होत आली होती, त्याच वेळी म्हणजे सन १८९३ च्या


एम्.जी. रानडे

उन्हाळ्यात पुण्याच्या एक मित्राकडून एक निमंत्रण मिळाले. त्या वर्षीच्या ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये पुण्याला एक औद्योगिक अधिवेशन भरणार होते. त्याला मी हजर राहावे याकरता श्री. माधवराव नामजोशी यांनी मला पाचारण केले होते. देशाचा औद्योगिक विकास व्हावा यासाठी ते झटत असत. अधिवेशनाच्या सभासदांनी त्यांची मानद सचिवपदी नेमणूक केली होती आणि ते योग्यच होते. महाराष्ट्रातील उत्पादनांचे एक छोटेखानी प्रदर्शनही त्या ठिकाणी आयोजित केले होते. माझी कार्यशाळा लोकांच्या नजरेपुढे आणण्याची ती एक चांगली संधी होती. हे लोकही नवीन उद्योगधंद्यात रुची ठेवणारे होते. अधिवेशनाचे दिवस मला सोयीचे होते; त्यामुळे मी ते आमंत्रण स्वीकारले. आम्ही कार्यशाळेत बनविलेली शास्त्रीय उपकरणे अनेक खोक्यांत भरून मी ती खोकी मुख्य मिस्त्र्याच्या ताब्यात दिली. त्याला बरोबर घेऊन मी पुण्याला येऊन दाखल झालो.

श्री. नामजोशींनी माझी राहण्याची सोय स्वतःच्या घरी केली होती. पण पहिल्या दिवशी एक रोचक प्रसंग घडला, तो जाता-जाता सांगतो. अधिवेशनाची सुरुवात झाली तेव्हा महादेव गोविंद रानडे तेथे येऊन पोहोचले. माझ्या खुर्चीपासून पाच-सहा फूट दूर असलेल्या खुर्चीत ते बसले. मी त्यांना सादर प्रणाम केला. ते त्यांच्या लक्षात आले मात्र, ते उठून माझ्यापाशी आले आणि मला मिठी मारली - जसा काही मी एखादा हरवलेला मुलगा होतो. माझ्याशी एक शब्दही न बोलता, सर्वांना उद्देशून ते म्हणाले,

''गृहस्थहो, हे माझे मित्र लाहोरवाले. मी त्यांची ओळख करून देतो.'' त्या क्षणी ते माझं नाव विसरले होते का, हे मला निश्चित सांगता येणार नाही; कारण तसे मानायला माझे मन तयार नव्हते. लाहोरवाला असे त्यांनी मला प्रेमाने म्हणण्याचीच शक्यता अधिक होती. त्यांच्यासारख्या थोर माणसाने अधिवेशन थांबवून माझी ओळख करून द्यावी या घटनेकडे मी वाचकांचे लक्ष वेधून घेतो. ते त्यांना अगदी सहज जमत असे. समाजरूढींची पर्वा न करणारा माणूस कुणी असेल, तर ते म्हणजे पुण्याचे ज्येष्ठ व श्रेष्ठ रानडे होते. जिथे जातील, तिथे त्यांचे आदरपूर्वक, किंबहुना भक्तिभावाने स्वागत होई; त्यामुळे लोकांकडे पितृभावनेने बघण्याचा त्यांचा गुण त्यांना शोभून दिसे. अधिवेशनाचे सकाळचे कामकाज संपल्यावर त्यांनी अगदी सहजपणे माझे सामान त्यांच्या घरी पाठवून द्या, असे नामजोशींना सांगितले. तशी विनंती वगैरे करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. आणि पाच-सहा दिवस रानड्यांच्या छत्राखाली राहण्याचा सन्मान मला मिळाला. या विद्वान मुत्सद्याच्या आयुष्याच्या उरलेल्या पुढच्या सात वर्षांत आणखीही काही वेळा त्यांच्या घरी राहण्याचा मान मला मिळाला.

अधिवेशनाकडे वळण्यापूर्वी रानड्यांविषयी मी जे पाहिलं, त्यातल्या एक-दोन विशेष गोष्टींबद्दल मी लिहिणार आहे. ते रोज सकाळी फिरायला जात. मला त्यांच्याबरोबर जायला मिळे व आवडेही ! फिरायला जाताना रस्त्यात थांबून एकाद्या मित्राला ते बोलावीत; पण रोज तोच मित्र नसे. मला त्यांच्या रूढीबद्ध नसलेल्या वागण्याची कल्पना होती; तरीही रस्त्यात मध्यावर उभे राहून ते जेव्हा मोठ्या आवाजात आपल्या मित्राला हाक मारीत, तेव्हा मला मोठी मौज वाटे. हे मित्रही प्रतिष्ठित व्यक्ती असत. पंजाबात, इतर कुठल्याही प्रांतापेक्षा, आम्ही बाह्य वागणुकीला अधिक महत्त्व देतो. त्यामुळे रस्त्यात उभे राहून मोठ्यांदा हाका मारणे आणि अशा इतर एक-दोन गोष्टी मला फार नवलाच्या वाटल्या. सिमल्यात आणि लाहोरात दोन्ही ठिकाणी रानड्यांच्या साधेपणाची प्रचीती मला आलेली होती. लाहोरमध्ये असताना ते एक्क्यातून हिंडल्याचे मला माझ्या मित्राने

सांगितले होते. रानडेच फक्त अशा गोष्टी करू जाणोत. माझ्या मनावर उमटलेला त्यांचा ठसा पन्नास वर्षांनंतर आजही तितकाच स्पष्ट आणि ताजा आहे.

आम्ही फिरायला जायचो, तेव्हा बोलण्याचे बहुतेक काम तेच करीत असत. त्यातून मला निरनिराळ्या टेकड्या, घरे आणि ऐतिहासिक स्थळे अंगुलिनिर्देश करून दाखविण्यात त्यांचा बराच वेळ जाई. विशेषतः शिवाजीच्या पराक्रमाशी जुडलेल्या जागा आणि मराठ्यांच्या वैभवाच्या काळातल्या घटनांशी संबंधित स्थळे ते मला दाखवीत असत. बारीक-सारीक तपशिलांसकट त्या प्रसंगांचे ते प्रभावीपणे वर्णन करीत. त्यांनी मराठ्यांचा इतिहास लिहावा, असे सुचविण्याचे मी धाडस केले. यावर त्यांनी संदिग्ध असे काहीतरी उत्तर दिले. ते काम त्यांनी केव्हाच हाती घेतले होते, ह्याची मला कल्पना नव्हती.

अधिवेशनात आमच्या अपेक्षेप्रमाणे काही निबंध वाचले गेले. ते विद्वत्तापूर्ण आणि व्यवहार्य होते. पण प्रदर्शनार्थ ठेवलेल्या माझ्या वस्तूंचे काय? अधिवेशन संपेपर्यंत त्या टेबलांवरच मांडलेल्या होत्या. नामजोशींच्या सूचनेवरून कार्यकारी मंडळाने तीन माणसांची एक समिती नेमली. त्या समितीने माझ्या उपकरणांवर एक रिपोर्ट तयार करावा असे ठरले. पण तो रिपोर्ट गोपनीय ठेवला, याचे मला फार आश्चर्य वाटले. काय प्रकार होता? मी ज्यांना-ज्यांना विचारले, त्यांना एक तर माहीत नव्हते किंवा त्याबद्दल सांगण्याचे ते टाळत होते. शेवटी नामजोशींनी मला विश्वासात घेतले. समितीने आपल्या रिपोर्टमध्ये माझ्या उत्पादनांविषयी जे लिहिले होते, त्यामुळे माझ्यावर अन्याय झाला होता आणि माझ्या कार्यशाळेची बदनामी झाली होती. पण मग मी त्या रिपोर्टकडे दुसऱ्या दृष्टीतून पाहिले; आणि मग त्या रिपोर्टाइतकी माझ्या उत्पादनांची इतकी प्रशंसा करणारे दुसरे कोणतेही विधान असू शकणार नाही, असेच माझ्या लक्षात आले. प्रदर्शनार्थ मांडलेल्या माझ्या उत्पादनांच्या संदर्भात माझ्या कार्यशाळेविषयी बोलण्याकरता मला अध्यक्षांनी दहा मिनिटे दिली - मला वाईट वाटू नये

म्हणून. त्या रिपोर्टाबद्दल जी गोपनीयता ठेवली होती, ती मी तोडली आणि अतिशय स्पष्ट आणि सडेतोडपणे बोललो. सचिवांच्या सौजन्याने माझ्या उत्पादनांविषयी तुमच्या समितीने रिपोर्टात काय लिहिले आहे, त्याची मला कल्पना आली आहे, असे मी त्यांना सांगितले. थोडक्यात सांगायचे, तर ती उत्पादने लाहोरला किंवा हिंदुस्थानातल्या इतर कोणत्याही ठिकाणी बनली होती यावर समितीचा विश्वास बसत नव्हता. उलट ती सर्व इंग्लंडमध्ये बनली असून लाहोरमध्ये त्यावरचे चांगले व्हार्निश खरवडून त्या जागी खडबडीत व्हार्निश लावून त्या वस्तू हिंदुस्थानात बनल्या आहेत, असा भास निर्माण केला होता, याबद्दल समितीची खात्री झाली होती. मुंबई किंवा इतर ठिकाणी उपलब्ध असलेली सामग्री आणि कारागिरी वापरून इतर कुणी अशा वस्तू बनविल्या नव्हत्या, ह्या वस्तुस्थितीचा आधारही आपल्या निष्कर्षाकरता समितीने घेतला होता. मी म्हटले, ''समितीच्या रिपोर्टाचा मी जो अर्थ लावला आहे, त्यावरून आमची प्रशंसा करणारा दुसरा कोणताही रिपोर्ट असूच शकत नाही, असंच मी म्हणेन. कारण त्यातून दोन गोष्टी स्पष्ट होतात : एक म्हणजे खडबडीत व्हार्निश सोडलं, तर आमच्या वस्तू काम देण्याबाबत आयात केलेल्या इंग्लिश उत्पादनांची बरोबरी करतात. दुसरी म्हणजे आम्ही लाहोरमध्ये बसून जे साध्य करून दाखवलं, ते मुंबईसारख्या प्रगत ठिकाणीही साधलेलं नाही.''

माझ्या वस्तू लाहोरमधल्या माझ्या कार्यशाळेत बनल्या आहेत, हे पटवून देण्याकरता मी त्यांच्यापुढे तीन प्रस्ताव मांडले :

१) इथे मांडलेल्या वस्तू लाहोरमध्ये बनल्या आहेत, असा विश्वास वाटत नसल्यास अधिवेशनातर्फे कितीही माणसे आमच्या कार्यशाळेला भेट देऊ शकतात. तिथे वस्तू बनत असताना त्यांना प्रत्यक्ष पाहता येईल. ते पाहूनही त्यांचे समाधान झाले नाही, तर त्यांच्या येण्या-जाण्याचा दुसऱ्या वर्गाचा भाडेखर्च कार्यशाळा देईल.

२) तुम्ही त्या वस्तू मोठ्या प्रमाणावर खरेदी करू शकता. आमच्या किंमती इंग्लिश मालाच्या निम्म्याने आहेत; त्यामुळे ग्राहकांचा चांगला फायदा होणार आहे. खरेदी किंमतीच्या अर्ध्या किंमतीत वस्तू विकायला काढणारा जर खुळा असेल, तर अशा संधीचा फायदा न घेणारेही खुळेच ठरतील.

३) माझा तिसरा प्रस्ताव असा होता की, मी माझ्या मिस्त्र्याला मी त्यांच्यापाशी सोडून जाईन. त्यांनी त्याला पुण्यात किंवा इतर कुठेही वस्तू बनविण्याच्या सर्व सुविधा पुरवाव्यात. तो त्यांच्या डोळ्यांसमोर वस्तू बनवून दाखवेल. हे मान्य असेल, तर जेवढे दिवस मिस्त्री इथे राहील, तेवढ्या दिवसांचा त्याचा पगार त्यांनी द्यावा आणि एक महिन्यापेक्षा अधिक त्याला ठेवून घेऊ नये.''

इतके बोलून मी खाली बसलो मात्र, लोकांनी उत्स्फूर्तपणे टाळ्यांचा जो कडकडाट केला, त्याचे मी वर्णन करू शकणार नाही. बडोद्याचे प्रा. मोडक, मला वाटते, रिपार्ट लिहिणाऱ्या समितीचे ते अध्यक्ष होते. ते उठून माझ्या जवळ आले व त्यांनी मला मिठीच मारली. त्यांनी इंटरमीजिएटकरता मराठीतून पदार्थविज्ञानाचे पुस्तक लिहिले होते. आमच्या मैत्रीचे प्रतीक म्हणून ते पुस्तक त्यांनी बडोद्याहून मला पाठवून दिले.

नंतरच्या कार्यशाळेचा इतिहास म्हणजे सातत्याने होणाऱ्या प्रगतीचा अहवाल होता. व्यापाराची बाजू सोडली, तर हे वर्णन तितकेसे बरोबर ठरणार नाही. उपकरणे तयार करून विकण्याच्या आमच्या कार्यक्रमात डोळ्यांत भरण्यासारखा काहीच बदल झाला नव्हता; पण कार्यशाळेच्या व्यापारात मात्र दर वर्षी वाढ होत होती. आमचे उत्पादन वाढत होते, विक्रीही वाढत होती; त्याबरोबर आमची कीर्ती प्रांताबाहेर जाऊन पोहोचत होती. दूरदूरच्या प्रांतांतून आमच्या मालाला मागणी येत होती. पुढच्या काळात इंडियन नॅशनल काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनाच्या बरोबर औद्योगिक प्रदर्शन भरायचे हे ठरून गेल्यासारखे झाले होते. त्या प्रदर्शनात आमच्या वस्तू लोकांच्या नजरेत भरत. सोन्या-चांदीच्या पदकांकरता आमच्या वस्तूंची शिफारस केली जाई. ज्या प्रांतात प्रदर्शन भरे, त्या



जे. सी. बोस

प्रांतातले जाणकार बक्षिसे ठरविण्याच्या समितीवर असत, हे सांगायला नकोच. उदाहरणार्थ, १९०६ साली जेव्हा कलकत्त्याला प्रदर्शन भरले होते, तेव्हा शास्त्रीय उत्पादनांचे परीक्षण करणाऱ्या समितीवर सर जगदीशचंद्र बोस होते. प्रदर्शनाकरता आम्ही केलेल्या योगदानाविषयी त्यांनी आमची प्रशंसा केली. इतर ठिकाणांप्रमाणे कलकत्त्याला आमच्या कार्यशाळेला सुवर्णपदक मिळाले. जसा काळ जाऊ लागला आणि लोकांकडून प्रोत्साहन मिळत गेले, तसा आमच्या उत्पादनांचा दर्जाही वाढू लागला. आम्ही अधिक गुंतागुंताची व नाजूक उपकरणे बनवू लागलो. केमिकल बॅलन्स किंवा रेझिस्टन्स बॉक्स् ही उपकरणे आम्ही बनवत होतो. मोजमापनातील अचूकपणात आमची उपकरणे आयात केलेल्या परदेशी उपकरणांची बरोबरी करीत. संशोधन-कामात लागणारी जी उत्कृष्ट उपकरणे लागत, ती बनविण्याच्या जवळपासही आम्ही कोठे पोहोचलो नाही; पण त्यात मला कमीपणा वाटला नाही. कारण जी काही नाजूक उरकरणे आम्ही बनवत होतो, त्यांच्या अचूकपणाची विश्वासार्ह चाचणी करण्याची सुविधा मिळणेही दुरापास्त होई आणि तशा उपकरणांना मागणीही फार थोडी असे. नोकरी आणि इतर व्याप माझ्यामागे नसते, तर कदाचित् स्वतः ठिकठिकाणी किंवा इतर प्रांतांत जाऊन त्या वस्तूंची मागणी थोडी-फार वाढवू शकलो असतो. देशातली एकूण परिस्थिती लक्षात घेतली, तर संबंधित माणसांना न भेटता केवळ पत्राद्वारे आमच्या देशी शास्त्रीय उपकरणांविषयी त्यांच्या मनात विश्वास

निर्माण करणे हे कठीण काम होते. पुण्यातल्या अनुभवाने मला प्रोत्साहन तर नाहीच मिळाले; पण आमच्या अति-आशावादाला ती एक धोक्याची सूचना मिळाली.

कलकत्त्याच्या सल्फ्युरिक ॲसिडच्या कारखान्याला भेट -

१९व्या शतकाच्या शेवटच्या दिवसात माझ्या सरकारी कार्यजीवनात अशा काही घटना घडल्या, की मला सरकारी नोकरी सोडून उद्योगात लक्ष घालावेसे वाटू लागले. माझी शास्त्रीय कार्यशाळा हा माझ्या कार्यक्रमाचा, सर्वात महत्त्वाचा नसला, तरी एक भाग होता. रासायनिक उत्पादनाकरता मोठा कारखाना उभारण्याचा एक महत्त्वाचा प्रकल्प माझ्या मनात होता. त्या दृष्टीने १८९८ च्या उन्हाळ्यातला बराच काळ अशा प्रकल्पात येऊ शकणाऱ्या अडचणींचा मी अभ्यास करीत होतो. त्या अभ्यासाचा एक भाग म्हणून मी कलकत्त्याला गेलो व माझा प्रकल्प आणि त्यासंबंधीची परिस्थिती डॉ. पी. सी. रे यांच्यापुढे मांडली. रासायनिक उत्पादनांचा कारखाना म्हटले की सल्फ्युरिक ॲसिडचा विचार आलाच. तेव्हा मी डॉ. रे यांना काही सल्फ्युरिक ॲसिडचे कारखाने दाखविण्याचा आग्रह केला. त्यांना तसे बरेच कारखाने माहीत होते. त्यांना ते अनेकदा भेट देत असत. पण तशा भेटीची एका उत्तर हिदुस्थानी माणसाला परवानगी मिळेल, याविषयी त्यांना शंका वाटू लागली होती. रसायनशास्त्राचे प्राध्यापक आणि गिऱ्हाइक या नात्याने ते सगळ्यांना परिचित होते; त्यामुळे ते कारखान्यात गेले, तर कुणाला गैर वाटत


पी. सी. रे

नसे. काही वेळा कारखानदार त्यांच्याकडे सल्ला मागायला येत असत. माझ्या बाबतीत त्यांना जी अडचण वाटत होती, ती अगदी सहज दूर करता येण्यासारखी होती. मी धोतर, सदरा आणि बंगाली काळ्या चपला घालून आणि डोक्याला पगडी किंवा तत्सम काहीही न घालता जायचे ठरले. ह्या पोषाखामुळे आमचा हेतू साध्य झाला. दोन मध्यम आकाराच्या कारखान्यांना भेट दिली. दोन्ही सल्फ्युरिक ॲसिड बनविणारे होते. ॲसिड बनविण्याचे सर्व तपशील बघून घेतले. डॉ. रे यांनी ॲसिडचे ३० ते ४० डबे विकत घेतले. ते खरे तर माझ्याकरता त्यांनी घेतले होते; त्यामुळे मी ते लाहोरला पाठविण्याची व्यवस्था केली. कलकत्त्यात असेतोवर मी आणखीही एक-दोन कारखान्यांचे काम बघून घेतले. त्यातला एक रासायनिक खतांचा कारखाना होता.

अशी सगळी तयारी करूनही आयुष्याचे नवीन पान उघडण्याच्या इराद्याने कारखानदार बनण्याचा अभ्यास करूनही त्यातून काही निष्पन्न झाले नाही.*

मी काही दैववादी नव्हे. पण सर्व घटनांचा विचार करून मी असेच म्हणेन, की माझ्या नोकरीत झालेल्या दडपशाहीमुळे मी एका कोंडीत सापडलो होतो. तिच्यातून स्वतःची सुटका करण्याची मी खूप धडपड केली; पण ओठाला लावलेला प्याला कोणत्या तरी अज्ञात हाताने हिसकावून नेला.

माझ्या कार्यशाळेची कहाणी पुढे सांगतो. त्यातून जे व्यापारी यश मिळत होते, त्याचे मी मनापासून स्वागत करीत होतो. पण पाच वर्षांत एकही नवीन विभाग न उघडल्याची वस्तुस्थिती मला खटकत होती. आपल्या कार्यशाळेत निरनिराळ्या प्रकारची भिंगे घासण्याची सुविधा असावी आणि नंतर दुर्बिणी, विद्यार्थ्यांकरता सूक्ष्मदर्शक यंत्रे वगैरे बनविण्याचे काम हाती घ्यावे, असे मला विशेषकरून वाटत होते. तशा

*रुचिरामांनी सल्फ्युरिक ॲसिडचा कारखाना सुरू केला व तो काही वर्षे चांगला चाललाही होता.

प्रकारच्या यंत्रांना तेव्हा फार मागणी येऊ लागली होती. त्या यंत्रांसंबंधीच्या चौकशीच्या पत्रांना ज्या प्रकारची उत्तरे येत असत, त्यांनी माझे समाधान होत नसे; तरी त्या बाबतीत १९१४ सालपर्यंत काही करता येण्यासारखे नव्हते. १९१४ साली रेडिओलॉजीचा अभ्यास करण्यासाठी मी जर्मनीला जायचे ठरविले आणि आपल्याला हवी ती उपकरणे व साधने विकत घेण्याच्या उद्देशाने मी बरेच पैसे बरोबर घेतले होते. दुर्दैवाची गोष्ट अशी की, युद्ध सुरू झाले व मला जर्मनी सोडून जावे लागले. तिथून मी इंग्लंडमध्ये गेलो व एक वर्ष राहिलो आणि तिथूनही माझ्या कार्यशाळेच्या दृष्टीने मी जसा गेलो, तसाच रिकाम्या हाताने परत आलो.

♦♦♦

सार्वजनिक कार्यात माझा सहभाग

सन १८८५ च्या डिसेंबरमध्ये इंडियन नॅशनल काँग्रेसची स्थापना झाली. त्याच्या पूर्वीचा काळ बघितला, तर हिंदुस्थानी माणसाला सामाजिक आयुष्य फारसे नसे आणि आजच्या मानाने तर अजिबातच नव्हते. त्यातल्या त्यात उल्लेख करण्यासारखी एकच संस्था पंजाबात होती, ती म्हणजे 'इंडियन असोसिएशन ऑफ कलकत्ता' या संस्थेची शाखा. सुरेंद्रनाथ बॅनर्जी किंवा सर अहमद केव्हा तरी पंजाबात येत, त्या वेळी जनमानसात थोडी उत्सुकता व हालचाल निर्माण होई. पण ती तेवढ्यापुरतीच असे; नंतर त्याचा विशेष परिणाम राहायचा नाही. अशा वेळी आम्ही - म्हणजे इंग्रजी जाणणाऱ्या पंजाब्यांची पहिली पिढी - म्हणजे देशाची आशा आहोत, असे बोलले जाई. आपल्याविषयी जे बोलले जाते, ते खरे करून दाखवले पाहिजे, असा विचार आम्ही करीत असू.

स्थानिक स्वराज्य -

लॉर्ड रिपनने स्थानिक स्वराज्याबद्दल जो ठराव मांडला होता, त्याच्या विरोधात प्रांतभर चळवळ झाली होती. त्यात मी भाग घेतला होता. ते माझे पहिले सार्वजनिक काम म्हणायला हरकत नाही. आज ज्याला साध्या सुधारणा म्हणता येतील, त्या करण्याचे जाहीर झाले, तेव्हा लोकांत जे चैतन्य आले, त्याचे वर्णन करणे अशक्य आहे. १८८२ साली जेव्हा लॉर्ड रिपनच्या सरकारने तसा ठराव मंजूर केला, तेव्हा या टोकापासून

त्या टोकापर्यंत संपूर्ण प्रांत आनंदून उठला होता. माझ्याच बाबतीत घडलेला एक किस्सा सांगतो, त्यावरून प्रांतातले सामाजिक व राजकीय वातावरण कसे कमालीचे बिघडले होते, त्याची कल्पना येईल. 'सिव्हिल अँड मिलिटरी गॅझेट'ची कचेरी लाहोरमध्ये उघडण्यात आली होती. त्या कचेरीजवळच, म्हणजे ४७ कोर्ट स्ट्रीटवर माझे वसतिगृह होते. एक दिवस मी वसतिगृहातून बाहेर पडलो व चालू लागलो, तर गॅझेटच्या संपादक मंडळातील एकजण रस्त्यावर येऊन माझ्याबरोबर चालू लागला. तो पुन्हा-पुन्हा माझ्याकडे बघून वेडीवाकडी तोंडे करी, जमिनीवर थुंके आणि तिरस्काराने 'स्थानिक कचरा' असे म्हणत होता. रिपनच्या नव्या ठरावानुसार नव्या धर्तीच्या नागरिकत्वाकरता आम्हाला आवश्यक ते प्राथमिक प्रशिक्षण देण्याची योजना होती. प्रातिनिधिक सरकार बनविण्याकरता तिचे किती महत्त्व होते, ते कालांतराने माझ्या लक्षात आले. त्या विषयावरची एक बाजू आम्हाला 'सिव्हिल अँड मिलिटरी गॅझेट'मध्ये वाचायला मिळे; तर दुसरी 'ट्रिब्यून'मध्ये. कोहिनूर' आणि 'आफताब-इ-पंजाब' ही दोन स्थानिक वर्तमानपत्रे होती. त्यात वाचण्यासारखे फारसे काही नसे. वरील ठरावाला पाठिंबा देणाऱ्या ज्या सभा होत, त्यांना आम्ही विद्यार्थी हजर राहत असू. वसतिगृहात एक बैठक बोलावून आम्ही एक निश्चय केला. उन्हाळ्याच्या सुट्टीत जवळपासच्या गावांतून जायचे, तिथे सभा घ्यायच्या आणि सुधारणांचे महत्त्व व उद्देश समजावून द्यायचे. कोणत्याही सार्वजनिक कामात भाग घेण्याची ती माझी पहिलीच वेळ होती.* सुट्टीत मी माझ्या भेरा या गावी गेलो. तिथे तीन-चार सभा घेतल्या. सभेचे श्रोते म्हणजे पुष्कळसे दुकानदार आणि थोडे-बहुत शाळेतले शिक्षक होते. मला जसे जमले तसे मी नव्या सुधारणांचे उद्देश काय आणि लोकांना त्यापासून काय फायदा होणार होता, तो सांगितला. तसेच

** १८८१ च्या फेब्रु. महिन्यात आमच्या प्राध्यापकांच्या सूचनांबरहुकूम शिरगणतीच्या कामात मी भाग घेतला होता. त्याला मी फारसे महत्त्व देत नाही.*

जवळपासच्या इतर खेड्यांतही तशा सभा भरवल्या. मला व माझ्या श्रोत्यांना तो एक नवा अनुभव होता.

मूर्तीच्या अवमानाचा खटला -

सन १८८३ च्या सुरुवातीला एक खटला कलकत्त्याच्या हायकोर्टात चालू होता. तेथे लोकांच्या संतापाचे जे एक वादळ उठले, त्याने सारा बंगाल अस्वस्थ झाला होता. त्याचे पडसाद संपूर्ण देशभर उठले. न्यायमूर्ती नॉरिस यांनी खटला चालू असताना ओळख पटण्यासाठी देवाची मूर्ती कोर्टात मागवून मूर्तीचा उपमर्द केला. त्या वेळी देशबंधू सी. आर्. दास. यांचे वडील श्री. भुबन दास हे 'द ब्राह्मो ओपिनियन' नावाचे एक साप्ताहिक संपादित करीत असत. आपल्या साप्तहिकात त्यांनी न्यायमूर्ती नॉरिस यांच्या वागणुकीबद्दल कडक शब्दांत लिहिले. 'द बंगाली' या वर्तमानपत्रात सुरेंद्रनाथ बॅनर्जींनी मोठ्या आवेशाने त्यांच्या वागणुकीवर ताशेरे ओढले. लगेच कोर्टाचा त्यांच्यावर रोष झाला व त्यांना कोर्टात खेचले गेले. त्यांच्या वकिलाने म्हणजे श्री. डब्ल्यू. सी. बोन्नर्जी यांनी आपल्या अशिलातर्फे माफी मागण्याची तयारी दाखवली; पण कोर्टाने ती स्वीकारली नाही आणि 'यंग इंडिया'च्या त्या प्रसिद्ध नेत्याला दोन महिन्यांची साधी कैद देण्यात आली. त्या शिक्षेमुळे जनमनाचे दुःख व संताप आणखीच उफाळून आले आणि त्याच्या लहरी साऱ्या देशभर पसरल्या.

देशाच्या सर्व भागांतून सार्वजनिक सभा घेतल्या जाऊ लागल्या. सुरेंद्रनाथ बॅनर्जी हे लोकप्रिय तर होतेच; पण देशातली तरुण मंडळी त्यांना आपले दैवत मानीत असे. अशा परिस्थितीत दिलेली शिक्षा वाजवीपेक्षा अधिक आहे, असे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वाटणे व त्याविरुद्ध त्यांनी निदर्शने करणे स्वाभाविक होते.

श्री. बॅनर्जींना शिक्षा जाहीर झाल्यानंतर लवकरच एक पत्र माझ्या हातात पडले. ते गव्हर्नमेंट कॉलेजमधल्या बी.ए.च्या विद्यार्थ्यांना उद्देशून

लिहिले होते. त्यात वरील घटनेच्या निषेधार्थ एक सार्वजनिक सभा भरवण्याची विनंती केली होती. आम्ही वसतिगृहातील मुलांनी लगेच एकत्र जमून दुसऱ्या दिवशी तशी सभा घेण्याचे ठरवून टाकले. ह्या सभेचे माहितीपत्रक सर्वत्र फिरवण्याकरता आम्ही एक अभिनव कल्पना काढली. आधी असे एक पत्रक तयार केले. जमलेल्या प्रत्येकाने त्याच्या पंधरा ते वीस नकला करायचे ठरवले. प्रत्येकाला शहराचा एकेक विभाग ठरवून दिला. प्रत्येकजणाने त्या त्या मोहल्ल्यात जाऊन ती पत्रके चिकटवून दिली. लाहोरच्या 'ट्रिब्यून' छापखान्याच्या आवारात सभा भरणार होती. विद्यार्थी आणि इतर बरेच लोक सभेला आले होते. त्या सभेत काय झाले, हे दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात छापून आले. ते वाचून माझ्या प्राध्यापकांना मी निषेधात सहभागी होतो हे समजले. एका पदच्युत सरकारी नोकराच्या बाजूने त्या सभेत ठराव केला, याबद्दल प्राध्यापक ओमान माझ्यावर रागावले. श्री. सुरेंद्रनाथ बॅनर्जी हे इंडियन सिव्हिल सर्व्हिसचे एक नावाजलेले सभासद होते. अगदी सुरुवातीच्या काळात लहानशा कारणावरून त्यांना पदच्युत करण्यात आले होते, हे सर्वश्रुतच होते. पुढे कित्येक वर्षांनंतर त्या संबंधातले एक पत्र पाहायला मिळाले. बंगालच्या त्या वेळेच्या लेफ्ट. गव्हर्नरांनी त्यात लिहिले होते की, सुरेंद्रनाथ बॅनर्जी हा इतका प्रभावशाली वक्ता आणि चळवळ्या माणूस होणार आहे हे सरकारला माहीत असते, तर त्यांना सेवेतून काढून टाकण्यापूर्वी सरकारने अनेक वेळा विचार केला असता. ते पत्र 'ट्रिब्यून'चे संपादक श्री. एन. गुप्ता ह्यांनी मला दाखवले. त्यांच्याकडे ते कसे आले, ते मला माहीत नाही.

हिंदू कुटुंबांकरता निधी -

सन १८८७ च्या मार्चमध्ये मी गव्हर्नमेंट कॉलेजमध्ये असिस्टंट प्राध्यापकाचे काम करण्याकरता लाहोरला आलो. त्या वेळी पंजाबात फारच थोड्या सार्वजनिक संस्था होत्या. आणि ज्या काही अस्तित्वात

होत्या, त्यांचे बहुतेक सर्व सभासद तरुण असत. पाश्चिमात्य संकल्पनेवर आधारित अशा या संस्थांचे महत्त्व आणि फायदे इंग्रजी न जाणणाऱ्या प्रौढांना माहीत नसत आणि म्हणून ते सभासद होत नसत. मी कॉलेजमध्ये लागल्यापासून ते त्या शतकाच्या (१९ व्या) अखेरीपर्यंत जितक्या संस्था आमच्या प्रांतात स्थापल्या गेल्या, त्यातल्या निदान दोन तृतीयांश संस्थांच्या घटना तयार करण्याचे काम मी आणि एल्. हरकिशन लालने केले होते, असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरणार नाही. त्यातल्या बहुतेक संस्था अल्पजीवी ठरल्या, ते वेगळे ! अशी कामे आम्ही दोघे मिळून करीत असू; पण काही वेळा एकेकट्यानेही करावी लागत.

इंग्लंडमध्ये आपला अभ्यासक्रम संपवून एल्. हरकिशन लाल १८९१ किंवा ९२ मध्ये लाहोरला आले. ते येण्यापूर्वी 'द हिंदू फॅमिली म्यूच्युअल रिलीफ फंड' ही संस्था स्थापली गेली होती. त्या संस्थेची घटना मी तयार केली. मग पाच-सहा लोकांच्या समितीने तिच्यावर विचार-विनिमय केला. त्या समितीमध्ये मीही होतो. चर्चेनंतर ती घटना स्वीकारण्यात आली. अशा प्रकारचा निधी उभारण्याची कल्पना निघण्यास एका कारकुनाचा मृत्यू कारणीभूत झाला. रेल्वेच्या कचेरीत, बहुधा आर्. बी. बिशनदासांच्या हाताखाली काम करणाऱ्या एका कारकुनाचा मृत्यू इतक्या दारिद्र्यात झाला, की त्याच्या विधवेच्या चरितार्थाकरता कचेरीतल्या इतरांना पैसे जमवावे लागले. अशी कल्पना हिंदू मनाला रुचत नाही, हे खरे; तरी 'नेंद्र' या हिंदू रूढीच्या तत्त्वानुसार कारकुनांनी नियमित निधी जमवायची कल्पना आनंदाने उचलून धरली. त्यांच्यापैकी कुणालाही अपघाती मृत्यू आला, तर त्याच्या बायका-मुलांना तो निधी उपयोगी पडेल, अशी मूळ कल्पना होती. ती ज्याला प्रथम सुचली, त्याने आर्. बी. बिशनदास यांच्यापुढे ती मांडली. नॉर्थ वेस्टर्न (वायव्य) रेल्वेच्या मॅनेजरचे व्यक्तिगत सहाय्यक म्हणून आर्. बी. बिशनदास किती तरी वर्षे काम करीत होते. या रेल्वेला 'नॉर्थ वेस्टर्न' असे नंतर म्हणू लागले. सन १८७९ च्या ऑक्टोबरमध्ये विद्यार्थी म्हणून मी प्रथम लाहोरला आलो,

तेव्हा ती रेल्वे 'सिंध, पंजाब अँड डेल्ही रेल्वे' या नावाने ओळखली जात असे.

हे विषयांतर झाले. आर्. बी. बिशनदासांनी आपल्या घरी संबंधित पाच ते सहा माणसांना घरी बोलावले व त्या कारकुनाचा प्रस्ताव त्यांच्यापुढे ठेवला. तेथे ज़मलेल्यांमध्ये मीही होतो. मला पहिल्यापासूनच ती कल्पना आवडली होती. माझे चुलत भाऊ आर्. बी. लढाराम त्या सुमाराला केव्हातरी बदली होऊन लाहोरला आले होते किंवा कदाचित् थोडे नंतर आले असतील; पण मला आठवते त्याप्रमाणे आमच्या पहिल्या बैठकीत ते हजर नव्हते. त्या बैठकीत आम्ही त्यावर चर्चा करून निधीकरता एक पद्धती ठरवून दिली. नियमावली तयार करून ती समितीने स्वीकारल्यानंतर एक मोठी प्रातिनिधिक सभा बोलावण्यात आली आणि निधीचे उद्घाटन झाले. तो कार्यक्रम 'शिक्षा सभा हॉल'मध्ये झाला. गेल्या चाळीस वर्षांत मी त्या हॉलमध्ये एकदाही गेलो नाही, तेव्हा त्यात काही बदल झाले असल्यास मला माहीत नाही. शहरातल्या साठ तरी प्रतिष्ठित व्यक्ती त्या सभेला आल्याचे मला आठवते आहे. ते बहुतेक सगळे संस्थापक सभासद झाले. तिथेच सभासदत्वाची प्रपत्रे (फॉर्म्स्) भरली. माझा सभासद क्रमांक ३१ होता. त्या सभासदांपैकी आज कोणी आहे का, हे मला माहीत नाही; पण कुणी असतीलही. निधीचे पहिले अध्यक्ष झाले माझे भाऊ श्री. लढाराम आणि मानद (ऑनररी) सचिव झाले आर्. बी. बिशनदास. निधीच्या व्यवस्थापनात आणि तो अधिक लोकप्रिय करण्यात त्या दोघांनाही फार रस होता. माझे भाऊ वारल्यानंतर आर्. बी. बिशनदास अध्यक्ष झाले. ते सुस्वभावी आणि पापभीरू होते. आपल्या कर्तव्याबाबत ते फार जागरूक असत - मग ती कामे औपचारिक असोत वा अनौपचारिक. ते हिंदू समाजाचे भूषण होते. त्यांचे बंधू एल्. माधोराम हेपण रेल्वेचे कर्मचारी होते. तोही लाख माणूस होता. त्यांची ओळख करून घेणे हा मोठा सुखावह अनुभव होता. ते दोघे लोकप्रिय होते. लोकप्रिय होण्याकरता इतकी पात्र माणसे मी क्वचितच पाहिली आहेत.

त्यांना कधी कुणी शत्रू असतील, असे वाटत नाही. प्रत्येक चांगल्या कामात मदत करायला ते तयार असत. त्यांचे चरित्र आणि कामाची पद्धत या दोन्ही गोष्टी निष्कलंक होत्या. त्या दोघांचे काही मुलगे माझे मित्र किंवा विद्यार्थी होते. त्यांच्यापैकी सर्वात उठून दिसणारे होते श्री. बालकराम. ते आय.सी.एस्. पास होऊन मुंबईच्या हायकोर्टात न्यायाधीशाचे काम करीत होते. नोकरीत असताना काही वर्षांपूर्वी त्यांना दुर्दैवाने अपघाती मृत्यू आला.

द हिमालयन युनियन क्लब -

मी सिमल्याला कामावर रुजू झाल्यावर थोड्याच दिवसांत माझी श्री. मौला बख्शी यांच्याशी ओळख झाली. त्या ओळखीचे लवकरच दाट मैत्रीत रूपांतर झाले. मौला बख्शींना नंतर 'नवाब' हा किताब मिळाला. आमची घरे सिमल्यात शेजारी-शेजारी होती. चांगल्या मनाची माणसे आपल्याला अशी सहज आणि वारंवार भेटत नाहीत. ते सार्वजनिक बांधकाम खात्यात कामाला होते; पण सिमल्यातल्या प्रत्येक हिंदुस्थानी माणसाला ते परिचित होते असे मला वाटे. सुरुवातीला ते पोस्टात कमी पगारावर कारकुनाचे काम करीत होते. आपल्या क्षमतेच्या बळावर आणि कष्टाळूपणा आणि मनापासून काम करण्याची वृत्ती या गुणांमुळे ते चढत-चढत इंडिया सरकारच्या कचेरीत कारकुनांच्या ज्येष्ठ पदापर्यंत पोहोचले. तसे ते अतिशय धूर्त होते; पण त्यांची वागणूक अति गोड असे आणि केवळ मित्रांनाच नाही, तर कुणालाही मदत करायला ते सदैव तत्पर असत. त्यानंतर दुभाष्याचे काम देऊन त्यांना पर्शियात पाठवले. ते उर्दू चांगले लिहीत. 'टूटी-इ-हिंद' या मीरतहून प्रसिद्ध होणाऱ्या साप्ताहिकात काहीतरी लिहून पाठवायला त्यांना आवडे. पर्शियन भाषा ते सराइताप्रमाणे बोलत असत. पर्शियामध्ये त्यांनी खान बहादुर अल्ला बख्श यांना साहाय्य केले. माजी अमीर आयुबखान यांनी इंडिया सरकारचा पाहुणचार स्वीकारावा याकरता मौला बख्शी यांचे साहाय्य झाले; आणि लवकरच

ते 'ॲटॅचे' झाले. हिंदुस्थानात परत आल्यावर त्यांना प्रथम अतिरिक्त सहाय्यक कमिशनर (एक्स्ट्रॉ असिस्टंट कमिशनर) च्या पदावर नेमण्यात आले आणि लगेचच राजकीय विभागात बदली करून दिल्लीला पाठविण्यात आले. तिथूनच ते यथाकाळ सेवानिवृत्त झाले आणि त्यांना 'नवाब' हा किताब देण्यात आला.


विषयांतर आटोपून मी पुन्हा माझ्या मूळ गोष्टीकडे वळतो. मौला बख्श आणि मी मिळून सिमल्यातले दिवस मोठे आनंदात घालवले. तिथे आम्ही एक संस्था सुरू केली. तिला 'द हिमालयन युनियन क्लब' असे नाव दिले. मी क्लबचा मानद सचिव झालो आणि ते मानद खजिनदार झाले. हा फरक फक्त कागदावर होता; प्रत्यक्षात आम्ही एकदिलाने काम करीत होते. आणि ते फक्त या क्लबमध्येच नाही, तर सर्वत्र. ह्या क्लबकरता आमचे मोठे बेत होते. प्रथम आम्ही एक सार्वजनिक ग्रंथालय सुरू केले आणि सर्व प्रकारच्या विषयांवर व्याख्याने आयोजित केली. त्या वेळी सिमल्यात ग्रंथालयांची काय परिस्थिती होती? तिथे एक युनायटेड सर्व्हिस क्लब होता. त्याच्या सभासदांनी भेट दिलेली आणि काही इतर अशी पुस्तके एकत्रित करून सुरू झालेले एक ग्रंथालय होते. प्रथम ते कार्ट रोडच्या वरच्या अंगाला असलेल्या असेंब्ली हॉलमध्ये होते. त्या हॉलला लोक 'नाच घर' म्हणत असत. नंतर ते ग्रंथालय मॉलमधल्या एका दगडी इमारतीत हलवण्यात आले. त्या इमारतीत नगरपालिकेच्या कचेऱ्या होत्या; शिवाय गच्चीवर एक हॉल आणि त्याला लागून काही खोल्या होत्या. त्यांचा वापर ए.डी.सी.सारखे लोक करीत असत. त्या इमारतीला 'गेएटी थिएटर' म्हणत असत. इथले ते ग्रंथालय हे सर्वजणांना खुले नसे.

'हिमालयन युनियन क्लब'च्या ग्रंथालयात पुस्तकांचा बऱ्यापैकी मोठा संग्रह होता. काही पुस्तके आम्हाला आमच्या युरोपीय आणि हिंदुस्थानी मित्रांकडून मिळाली होती. मित्रांकडून मिळालेल्या पैशांच्या देणग्यांमधून आम्ही काही पुस्तके विकत घेतली होती. ग्रंथालयाला जागा शोधण्याच्या दृष्टीने तीन-चार मालकांशी आम्ही बोलणीही सुरू केली होती. पण मौला

बख्श आणि मी सिमला सोडून गेल्यावर ते ग्रंथालय चालवणे आमच्या मित्रांना कठीण वाटू लागले, तेव्हा त्यांनी ती पुस्तके सिमला नगरपालिकेला देऊन टाकली. त्या सुमारास नगरपालिका कार्ट रोडवर एक ग्रंथालय सुरू करण्याच्या विचारात होती. काही वर्षांनंतर मी सिमल्याला गेलो असता त्या ग्रंथालयाला भेट दिली. तिथली केविलवाणी परिस्थिती पाहून माझी फार निराशा झाली.

मौला बख्श आणि मी सिमल्यात होतो, तोवर आमच्या व्याख्यानांच्या कार्यक्रमाची भरभराट होती. ज्यांची व्याख्याने आम्ही आयोजित केली होती, त्यात प्रतापचंद्र मुझुमदार, शंकर पांडुरंग पंडित आणि महादेव गोविंद रानडे ही नावे मला आठवत आहेत. मी काही व्याख्याने तिथे दिली. त्यात तीन होती हवामान या विषयावर आणि एक वेगळ्या विषयावर. हवामानावरची व्याख्याने सरकारी शाळेच्या सभागृहात झाली होती आणि तेव्हा महादेव गोविंद रानडे अध्यक्ष होते.

द इंडियन नॅशनल काँग्रेस -


अे. ओ. ह्यूम

सन १८८५च्या शेवटी 'इंडियन नॅशनल काँग्रेस'चे पहिले अधिवेशन मुंबईला भरले होते. त्या अधिवेशनाने संपूर्ण देशभर चैतन्य निर्माण झाले होते, हे सांगायची गरजच नाही. अशा या नव्यानेच झालेल्या राजकीय जागृतीचे काही प्रसंग मी यापूर्वी लिहिले आहेत. काँग्रेसच्या पहिल्या चार-पाच अधिवेशनांच्या वेळी लोकांना राजकीय जाणीव होत असल्याचा प्रत्यय येत होता.

काँग्रेसचे जनक ए.ओ.ह्यूम ह्यांनी स्वतःला या नव्या चळवळीत झोकून दिले होते. १८८६ साली त्यांनी खणखणीत, प्रभावी आणि हृदय हेलावून टाकणाऱ्या भाषेत तीन पत्रके काढली. त्यातला प्रत्येक परिच्छेद हा आशादायक आणि मनोधैर्य वाढवणारा होता. त्या पत्रकांच्या ५०,००० हून अधिक प्रती वाटल्या गेल्या, असे म्हणतात. मित्रांकरता हव्या आहेत असे सांगितले की आम्हा विद्यार्थ्यांना आठ-दहा प्रती मिळत असत.

व्हाइसरॉयच्या कौन्सिलचा सभासद होण्याइतका वर चढलेला हा माणूस पुढे एकाद्या प्रांतीय सरकारचा प्रमुख अधिकारी सहज झाला असता; पण ते सर्व सोडून ए. ओ. ह्यूम् या इंग्रज गृहस्थाने हिंदुस्थानच्या भल्याकरता, त्या देशाची बाजू मांडण्याची जबाबदारी आपणहून स्वीकारली. या त्यांच्या कृत्याने मी सर्वात प्रभावित झालो. त्यांना भेटायची मला फार इच्छा होती. असा निर्णय त्यांनी कसा घेतला, हे त्यांच्या स्वतःच्या तोंडून ऐकावे असे मला वाटे. त्या काळात सरकारी नोकरांवर बंधने आली नव्हती. ते राजकीय संस्थांचे सभासद होऊ शकत असत; राजकीय प्रश्नांवर होणाऱ्या सार्वजनिक चर्चेत भाग घेऊ शकत असत. लाहोरच्या गव्हर्नमेंट कॉलेजमध्ये प्राध्यापक असूनही मी इंडियन असोसिएशनचा सभासद होतो आणि ते माझ्या प्राचार्यांना माहीत होते. ब्रिटनच्या पार्लमेंटचे मेंबर श्री. डब्ल्यू. एस्. केन हिंदुस्थानातील घडामोडींत रस घेत. विशेषतः टेंपरन्स मूव्हमेंटमध्ये त्यांनी जातीने लक्ष घातले होते. त्याबद्दल इंडियन असोसिएशनच्या आम्ही सभासदांनी एक पत्र तयार केले होते. ते पत्र सादर करण्याकरता आम्ही एक सभा भरवली. ती महाविद्यालयाच्या एका हॉलमध्ये भरली होती आणि अध्यक्षस्थानी आमचे प्राचार्य बसले होते.

एक सरकारी नोकर असल्याने सेवानिवृत्त होईपर्यंत म्हणजे १९१८ सालपर्यंत काँग्रेसच्या कार्यक्रमात मी सक्रिय भाग घेऊ शकत नव्हतो; पण काँग्रेसच्या बहुतेक सर्व अधिवेशनांना मी हजर राहिलो होतो. स्थानिक भाषेतील पत्रके वाटल्यावर समाजात जी काय खळबळ उडाली होती, ती

मला चांगलीच आठवते आहे. ती पत्रके सर्व स्थानिक भाषांतून प्रसिद्ध करण्यात आली. सर्व देशभर त्यांच्या प्रती वाटल्या गेल्या. त्यांचे सार्वजनिक वाचन करण्यात आले. राजकीय चळवळीचे ते विराट स्वरूप पाहून अधिकारीवर्गात भीतीचे वातावरण तयार झाले. त्याचाच परिणाम असा झाला की लॉर्ड डफरिनने काँग्रेसच्या तिसऱ्या अधिवेशनात आणता येतील तितके अडथळे उभे केले. खरे तर या गृहस्थाने काँग्रेसच्या उदयाच्या वेळी आशीर्वाद दिला होता. काँग्रेसचे तिसरे अधिवेशन अलाहाबादला सर अँड्र्यू यूलच्या अध्यक्षतेखाली भरले होते. ते कलकत्त्याचे ख्यातनाम व्यापारी होते. सर ऑक्लंड केल्व्हिन हे त्या वेळी प्रांताचे ले. गव्हर्नर होते. त्यांनी काँग्रेसची चळवळ ही राजद्रोहाची आहे अशी कडक टीका केली. अलाहाबाद अधिवेशनाच्या वेळी काँग्रेस व सरकार यांच्यातला भेद स्पष्ट झाला.

याच्यापाठोपाठ उत्तर हिंदुस्थानातल्या प्रत्येक महत्त्वाच्या ठिकाणी 'देशभक्त' आणि 'स्वामिनिष्ठ' असे दोन तट उभे राहिले. काँग्रेसला विरोध करणे हा त्यांचा एकमेव उद्देश होता. स्थानिक राज्यांकडे 'शक्यतोवर मुसलमानांना नोकरीत घ्या' असे सांगणारी गुप्त पत्रके येऊ लागली.

संयुक्त प्रांतातही असे अनेक गट सुरू करण्याला अधिकारी (सरकारी) वर्गच कारणीभूत होता असे म्हणतात. पंजाबात असा एक गट उभा करण्यात आला; पण त्याचा लवकरच शेवट झाला. 'पंजाब पेट्रियट' नावाच्या साप्ताहिकाने देशभक्त गटाची जागा घेतली. हिंदुस्थानी दैनिक सुरू करण्याची ती वेळ नव्हती. 'ट्रिब्यून'सारखे लाहोरचे प्रसिद्ध वृत्तपत्रही साप्ताहिक होते. ते एका प्रसिद्ध हिंदुस्थानी माणसाने दीर्घ काळ संपादित केले होते. या साप्ताहिकाच्या मालकाचे नाव कधी जाहीर करण्यात आले नव्हते. स्थानिक अँग्लो-इंडियन 'सिव्हिल अँड मिलिटरी गॅझेट' मध्ये रस ठेवणारे एक प्रतिष्ठित इंग्रज गृहस्थ त्याच्यामागे होते असे मानण्यात येते. ते हिंदुस्थानी गृहस्थ संपादक होण्यापूर्वी श्री. रामकृष्णांना संपादक

होण्याकरता विचारण्यात आले होते. ह्या रामकृष्णांनी वरचा समज बरोबर असल्याचे सांगितले. त्यांनी 'मेसर्स रामकृष्ण अँड सन्स, बुकसेलर्स्' ही विख्यात कंपनी सुरू केली होती.

नवीन साप्ताहिकाचा मुख्य हेतू काँग्रेसला विरोध करणे हाच होता. ह्या सुमाराला 'ऑब्झर्वर' नावाने आणखी एक वृत्तपत्र सुरू झाले. त्याचा मुख्य हेतू मुसलमानांची बाजू मांडणे हा होता. 'पंजाब पेट्रियट' आणि 'ऑब्झर्वर' या दोघांनी काँग्रेसविरुद्ध जोरदार प्रचार सुरू केला. मोठ्या प्रमाणावर त्यांच्या प्रती विकत घेऊन सरकारी संस्था त्यांना पाठिंबा देत होत्या. इतके प्रयत्न करूनही त्यांना फारसे यश आले नाही, ह्यांचे मुख्य कारण म्हणजे काँग्रेसच्या हिंदू व मुस्लिम नेत्यांनी वारंवार भेट देऊन पंजाबात विश्वासाचे वातावरण तयार केले होते - विशेषतः विद्यार्थ्यांच्यात. पंजाबला वरचेवर भेट देऊन जनमतावर काँग्रेसचा प्रभाव टिकवून धरण्यास जबाबदार व्यक्ती म्हणजे राजा रामपाल सिंग आणि अली महम्मद भीमजी. दोघांनाही अस्खलित बोलणे जमत नसे; पण आपला उत्साह आणि उत्तम छाप पडेल अशी बोलण्याची पद्धत या दोन गोष्टींनी ते आपल्या भाषेतल्या त्रुटी भरून काढीत. रामपाल सिंगाचा पोशाख इतका वेगळा असे, की त्यांचा पोशाख पहायला ते कुठेही असले तरी गर्दी लोटत असे. ते इंग्रजी पद्धतीची हॅट घालीत आणि भाषणाच्या वेळी ती तशीच डोक्यावर राहू देत. त्यांचा बाकीचा पोशाख मोगल दरबारातल्या सरदाराला शोभावा असा असे. ते स्वतः तालुकदार होते आणि जवळच्या वायव्य प्रांतातून आले होते. ते नेहमी इंग्रजीत बोलत. व्याकरणाच्या आणि शब्दप्रयोगांच्या अनेक चुका ते बोलताना करीत. असे असूनसुद्धा श्रोत्यांवरचा त्यांच्या भाषणात प्रभाव कधी कमी झाला नाही. अली महम्मद भीमजी हे खोजा होते; पण ते मुंबईहून आलेले होते. त्यांची व्याख्याने उर्दूतून होत; पण त्यांचे उर्दूवर फारसे प्रभुत्व नव्हते. भाषेवर प्रभुत्व नसतानाही त्यांच्याइतका प्रभावी वक्ता क्वचितच भेटतो. ह्या दोघांचा दर वर्षी लाहोरला येण्याचा प्रघात कित्येक वर्षे होता.

'पंजाब पेट्रियट'कडे पुन्हा वळतो. एक मोठी गंमतीदार गोष्ट मला आठवते. एकदा संपादकाने 'आम्ही काँग्रेसला विरोध का करतो?' अशा मथळ्याखाली एक लेख लिहिला होता. महाविद्यालयात त्याची एक प्रत पडली होती. तिच्यावर त्या मथळ्याच्या प्रश्नापुढे कुणीतरी पेन्सिलीने लिहिले होते - 'कारण त्याकरता तुम्हाला पैसे मिळतात.' दुसऱ्या एका प्रसंगी 'पेट्रियट' या शब्दातल्या 'पी' (P)ला एक तिरकी रेघ जोडून त्याचा `R' केला होता. आणि मग त्याच अक्षरांची पुनर्रचना करून त्याचा 'ट्रेटर' हा शब्द बनविला होता. म्हणजे, २ ३ ५ ७ ४ ६ १

PATRIOT

R

1 2 3 4 5 6 7

TRAI TOR

एका शब्दापासून बरोबर विरुद्ध अर्थाचा शब्द बनविण्याची ती एक नामी शक्कल होती. आणि ते सगळ्यांना इतके आवडले, की बोलीभाषेत त्या वृत्तपत्राचे नाव पंजाब ट्रेटर असेच पडले. आज त्या गोष्टीला २५ वर्षे होऊन गेली, तरी ४० पेक्षा अधिक वयाचा कुणीही पंजाबी 'पंजाब ट्रेटर' कोण, ते सांगू शकेल.

मी हजर राहिलेल्या पहिल्या काही सार्वजनिक सभांपैकी एक म्हणजे १८८९ साली मुंबईला भरलेली काँग्रेसची सभा. तिला 'ब्रॅडलॉ सेशन' असेही म्हणत. त्या सभेला १८८९ प्रतिनिधी हजर राहिले होते, ह्या गोष्टीचा त्या काळात विशेष उल्लेख केला जाई; पण त्या सभेला आलेल्या पाहुण्यांची संस्था प्रतिनिधींपेक्षा अधिक होती. जे काही थोडे इंग्रज हिंदुस्थानचे मित्र म्हणून ओळखले जात, त्यांच्यापैकी एक होते सर विल्यम वेडरबर्न. ते अध्यक्षस्थानी होते. चार्ल्स् ब्रॅडलॉ सभेत उपस्थित राहणार होते म्हणून पंजाबामधून कितीतरी पाहुणे व प्रतिनिधी या सभेकरता मुद्दाम आले होते. सोन्या-चांदीची नाणी चलनात आणण्यासंबंधीच्या विषयाला बायमेटॅलिझम् म्हणतात. तो विषय त्या वेळी ज्वलंत समस्या-विषय होता. प्रा. गोखल्यांनी त्या विषयावर खुल्या बैठकीत एक छोटे भाषण केले होते.

या ठिकाणी मुद्दाम उल्लेख करण्यासारखी घटना सांगतो. काँग्रेसच्या निधीत योगदान करण्याचे आवाहन केले गेले, तेव्हा नोटा, नाणी, धनादेश यांचा जो वर्षाव सुरू झाला, तो केवळ अविस्मरणीय होता. तो गोळा करण्याकरता शेवटी टोप्याही फिरवल्या गेल्या, तरीही पैसे येतच होते. शेवटी वेळेअभावी तो वर्षाव थांबवावा लागला. अतिउत्साहाच्या वातावरणात श्री. ब्रॅडलॉ मंडपात आले होते; पण त्यांची प्रकृती ठीक नव्हती. खरे तर तब्येत सुधारण्याकरता ते एवढा जिकिरीचा प्रवास करून हिंदुस्थानात आले होते; पण यमदूत त्यांच्या भोवती घोटाळत होते आणि ते मायदेशी परतल्यावर थोड्याच दिवसांत यमदूतांनी आपले काम साधले. प्रकृती-अस्वास्थ्यामुळे ते मुंबईला फार काळ राहू शकले नाहीत. वेगवेगळ्या प्रांतांतून त्यांच्यासाठी आलेले संदेश त्यांना देण्यात आले. त्यांचे स्वतःचे भाषण म्हणजे वक्तृत्वाचा उत्कृष्ट नमुना होता. इतके उत्तम भाषण मी कधीच ऐकले नाही. सुरेंद्रनाथ बॅनर्जी, सौ. सरोजिनी नायडू, आनंद मोहन बोस, प्रतापचंद्र मुझुमदार, स्वामी विवेकानंद, सौ. ॲनी बेझन्ट इत्यादींची व्याख्याने मी अनेक वेळा ऐकली होती आणि तरीही मी ब्रॅडलॉंचे भाषण अद्वितीय म्हणतो हे लक्षात घेतले, तर त्याचा खरा अर्थ स्पष्ट होईल. ॲनी बेझन्ट ह्यांचे भाषण ऐकताना एकदा विचार न करता मी त्यांना उत्स्फूर्तपणे 'जादुगारीण' म्हटले होते. तो माझा उद्धटपणाच होता. त्यांच्या अलौकिक भाषणाचा विषय होता 'ईश्वर व सृष्टी एकच आहेत' हे सांगणारा. मला ती कल्पना अजिबात मान्य नव्हती. असे असूनही त्यांच्या वक्तृत्वाचा माझ्यावर इतका प्रभाव पडत गेला, की ते मानायला मी प्रवृत्त होत असल्याचे माझ्या ध्यानात आले. ही घटना लाहोरमध्ये १८९३ साली घडली. या काँग्रेसच्या वेळी मी आणखी ज्या विशेष व्यक्तींना पाहिले, त्यात पंडित हृदयनाथ कुंझ्रूंचे पिता पंडित आजुधियानाथ हे होते. श्री. ब्रॅडले नॉर्टन त्या वेळचे उत्साही काँग्रेसजन होते. एकदा नॉर्टन यांनी सांगितले की ते स्वतः व काँग्रेसजन जेव्हा मद्रासहून मुंबईला आले, तेव्हा येताना एक पोलिसांची तुकडी सदैव


त्यांच्याबरोबर होती. हे त्यांनी सांगितल्याक्षणीच पंडित आजुधियानाथ ताडकन उठले व म्हणाले, ''पोलिस तुकडीबरोबर यायचा मान हा फक्त मद्रासहून येणाऱ्या काँग्रेसजनांकरता राखून ठेवला नव्हता; उत्तर प्रदेशातून आलेल्या माझ्या व माझ्या साथीदारांच्या सोबतीलाही एक पोलीस तुकडी होती.'' त्यापुढे त्यांनी सांगितले की, ''आमच्या तुकडीचे वैशिष्ट्य असे की, तिचा प्रमुख म्हणून एक वरिष्ठ युरोपीय पोलीस अधिकारीही त्यांच्याबरोबर होता.'' त्याचे त्यांनी नावही सांगितले.

मुंबईच्या ब्रॅडलॉ काँग्रेसबद्दल लिहीत असताना त्या वेळचा एक व्यक्तिगत अनुभवही सांगतो. मुंबईत ही सभा चालू असतानाची गोष्ट. महादेव गोविंद रानडे व्यासपीठावर सन्माननीय पाहुण्यांमध्ये बसले होते. पाहुण्यांसाठी अगदी मागच्या रांगा राखून ठेवल्या होत्या, तिथे मी बसलो होतो. रानड्यांनी माणूस पाठवून मला व्यासपीठावर बोलावून घेतले. त्यांना एका सामाजिक सभेच्या विषयावर माझ्याशी काही बोलायचे होते, म्हणून. मी व्यासपीठावर त्यांच्याजवळ जाऊन बसलो. थोड्या वेळाने ते जरासे बाहेर गेले, तेव्हा मी होतो तेथेच बसून राहिलो. तेवढ्यात एक चांगले कपडे घातलेला एक माणूस माझ्यापाशी आला आणि जरा दम दिल्यासारखा 'तुम्ही कोण?' 'इथे कुठून आलात?' वगैरे प्रश्न विचारू लागला. मला त्याची गम्मतच वाटू लागली आणि मीही त्याने विचारलेले प्रश्नच त्याला विचारू लागलो. तो काँग्रेसचा कुणीतरी कार्यकर्ता होता, हे स्पष्टच दिसत होते. पण ह्या प्रश्नाप्रश्नीमुळे व्यासपीठावर जरा नाटकच झाले. माझ्या पलीकडे शिकारपूरचे आय.सी.एस्. श्री.दयाराम सिद्दूमल बसले होते. ते शेवटी मध्ये पडले. त्यांनी स्वतःला विशेष कोणी समजणाऱ्या त्या कार्यकर्त्याला मी कोण व इथे कसा पोहोचलो, ते सांगितले. तेव्हा माफी मागून महाशय निघून गेले.

पंजाब इन्क्वायरी कमिटी -


एका दृष्टीने ते दिवस माझ्या आयुष्यातले सर्वात प्रेरणादायी होते.

मालवीयजी, मोतीलालजी, सी. आर्. दास, अब्बास तैयाबजी आणि काही इतर जणांशी माझी जवळीक झाली. हे नेते कसा विचार करतात, ते मला जवळून पहायला मिळाले. तेही फक्त त्या एका इन्क्वायरीबाबतच नाही; तर त्यांचे सर्वसामान्यपणे सरकारशी व्यवहार कसे असत, तेही समजले. पंजाब इन्क्वायरीच्या वेळी सेंट्रल जेल आणि एल्. हरकिशन लाल यांचे घर यांच्यात पंडित मदनमोहन मालवीयांनी किती खेपा घातल्या असतील आणि किती मानसिक तणाव त्यांनी किती दिवस सोसला असेल, ते सांगता येणे कठीण आहे. कोणत्या अटींवर एल्. हरकिशन लाल आणि त्यांचे साथीदार हंटर कमिटीपुढे आपली साक्ष द्यायला तयार होते, ते शोधून काढायची जबाबदारी मालवीयांवर सोपवली होती. त्याच वेळी श्री. अँड्र्यूज हे एल्. हरकिशन लाल आणि गव्हर्नमेंट हाऊस यांच्यामध्ये फेऱ्या मारून त्यांच्या अटी सरकारला मान्य होत्या का, त्याचा शोध घेत होते. त्या वाटाघाटी फिसकटल्या आणि सरकारशी असहकार करण्याची पाळी आली. हरकिशन लाल यांच्या घरामागे मलिक गिरधारी लाल यांचे घर होते. तेथे काही निवडक नेत्यांच्या बैठकी झाल्या. त्या दीर्घकाळ चालल्या. त्यानंतरच निर्णय घेण्यात आला. त्यातली एक बैठक अखंड नऊ तास चालली होती. शेजारच्या खोलीत एका टेबलावर थोडी फळे आणि फराळाचे सामान ठेवले होते. ज्याला गरज वाटेल, त्याने तेथे जाऊन भूक भागवून यावे. दुसरी अशाच स्वरूपाची बैठक आठ तास चालली होती. एल्. हरकिशन लाल, एल्. दुनीचंद,



महात्मा गांधी

पंडित रामभाई दत्त आणि एक दोघेजण ह्यांना इन्क्वायरी चालू असताना त्या खोलीत येऊन, त्यांच्याविरुद्ध साक्ष देणाऱ्या सर्व साक्षीदारांचे निवेदन संपेपर्यंत तिथे थांबू द्यायला सरकार तयार नसेल, तर काँग्रेसने त्या कमिटीवर बहिष्कार टाकला पाहिजे, असे त्या दोन बैठकींनंतर ठरवले. आरोपीच्या देखत साक्षीदारांची तपासणी झाल्याशिवाय समाधानकारक चौकशी होऊच शकत नाही. शिवाय ज्या अधिकाऱ्यांनी आरोपींवर गंभीर आरोप करून त्यांना कोर्टात खेचले, त्या अधिकाऱ्यांना साक्षीदारांची तपासणी चालू असताना तिथे बसण्याची परवानगी देण्यात आली होती. आरोपींच्या वकिलांना आपल्या अशिलांकडून माहिती मिळवण्याकरता तेथे हजर राहणे भाग पडत होते. आरोपींना स्वतःविरुद्ध साक्षीदार काय सांगतात हे ऐकण्याची आणि त्यावरून आपल्या वकिलाला त्यांच्या उलटतपासणीबाबत सूचना करण्याची संधी मिळत नव्हती. ही चौकशी म्हणजे केवळ नाटक आहे, हे स्पष्ट होते. महात्मा गांधी, सी. आर्. दास, मोतीलाल नेहरू हे ठामपणे म्हणत होते की, अशा परिस्थितीत न्याय्य चौकशी होऊच शकत नाही. दुसऱ्या बैठकीचे शेवटचे दोन तास अतिशय तणावपूर्ण गेले. शेवटचा निर्णय अतिशय जड अंतःकरणाने घेण्यात आला. काय होणार आहे त्याची कुणालाच कल्पना करता येत नव्हती. प्रत्येक जण भीतीने व्याकुळ झाला होता. लोकांचा आत्मसन्मान टिकवायचा असेल, तर याशिवाय दुसरा मार्ग नव्हता आणि त्या आत्मसन्मानाकरता असा निर्णय घ्यावा लागत आहे अशी सगळ्यांची भावना होती. हे सगळ्यांना माहीत होते; तरीही मी वर म्हटल्याप्रमाणे



मदन मोहन मालवीय

शेवटच्या दोन तासांत सरकारच्या विरुद्ध निर्णय घेणाऱ्या सर्वांच्या मनांवर मोठे दडपण आले होते. तसा निर्णय घेताना आपण कोणती जोखीम पत्करत आहोत, काय धोका स्वीकारतो आहोत, याची त्यांना पुरेपूर जाणीव होती. आपला मान, लोकांचा सन्मान गहाण टाकायची तयारी असती, तरच दुसरा काही तोडगा निघू शकला असता; पण तशी तयारी नव्हती म्हणून हा निर्णय घेण्यावाचून गत्यंतर नव्हते. त्या दोन तासांत ते चिंताग्रस्त नेते काय काय बोलले, हे मी पुढचे दोन महिने मनात घोळवत राहिलो होतो. अशी जोखीम घेणे ज्यांना रुचत नव्हते; त्यामुळे कठिण परिस्थितीतून बाहेर निघण्याचा एकादा बिकट आणि चिंचोळा मार्ग जरी सापडता, तरी तो त्यांनी अवलंबिला असता. तसा मार्ग कुठे न दिसल्याने त्या शूर नेत्यांनी तो निर्णय घेतला. त्यांनी आपली मागणी कमीतकमी पातळीवर नेली होती, सरकारने आरोपींना निदान त्यांच्या वागणुकीबद्दल चर्चा चालली असताना तरी - मग साखळ्या बांधूनसुद्धा चालेल - कमिटीरूममध्ये यायला परवानगी द्यावी म्हणजे साक्षीदार त्यांच्याविरुद्ध काय बोलत आहेत, ते त्यांना कळेल आणि त्यानुसार उलटतपासणी करताना काही प्रश्न विचारता येतील; याबाबत आपल्या वकिलांशी त्यांना विचार-विनिमय करता येईल. एवढी कमीतकमी मागणी जर सरकारने अमान्य केली, तर मात्र सर्व प्रकारचा धोका पत्करून काँग्रेस आपली स्वतंत्र चौकशी समिती नेमेल, त्या प्रकरणाची चौकशी करून त्याचा अहवाल वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करेल, असे सरकारला सांगायचे ठरले. त्या दिवशी मी सर जॉन मॅनिनॉर्डना भेटलो. सरकारने आपला हट्ट वेळीच सोडून, मालवीयजी आणि सी. एफ. अँड्र्यूज गेले पंधरा-वीस दिवस ज्याची मागणी करीत आहेत, त्या सवलती द्याव्यात; आणखी ताणल्यास तुटेल; उद्या काँग्रेसचे नेते आपला निर्णय जाहीर करतील; त्यानंतर सरकारने सवलती जाहीर केल्या, तर त्यात सरकारचा आब राहणार नाही, असे मी त्यांना सांगितले. ते ऐकून तेही चिंतित झाले. ही कमीतकमी सवलतींची मागणी सरकारने आता मान्य केली, तर पुढचे काम सुरळीत चालू देतील

याची हमी घेणारे एका जबाबदार व्यक्तीचे पत्र त्यांना हवे होते. मी देतो आहे, ती माहिती खरी आहे; पण त्याची संपूर्ण संपूर्ण जबाबदारी मी घेऊ शकत नाही, हे मी स्पष्ट केले आणि असे सुचवले की, त्यांचा स्वतःचा आमच्या मागणीला पाठिंबा असल्याचे वचन आणि गव्हर्नरांना मागणी मान्य करण्याची विनंती करण्याचे जर ते लेखी देतील, तर ते म्हणतात तसे पत्र मी आणू शकेन. त्यावर त्यांनी तसे पत्र लिहून दिले. त्यात त्यांनी स्वतःचा काँग्रेसच्या कमीतकमी मागणीला पाठिंबा असल्याचे म्हटले होते आणि त्यांची तशी मागणी पूर्ण केल्यास काँग्रेस नेत्यांचे मन वळेल आणि हंटर इन्क्वायरी कमिटीला ते सहकार्य देतील असे लिहिले होते. मी त्यांचे पत्र पंडित मालवीयांना दाखवले. त्या पत्रात पंडित मालवीय आणि पंडित मोतीलाल नेहरूंना आशेचा किरण दिसला व खूप हलके वाटू लागले. पंडित मोतीलालजींच्या मदतीने पंडित मालवीयांनी एक पत्र तयार केले. त्याच संध्याकाळी मी ते सर मॅनिनॉर्डना नेऊन दिले. ते पत्र घेऊन ते लगेच गव्हर्नमेंट हाऊसवर गेले व काँग्रेसची मागणी मान्य करण्याचा आग्रह केला. दुर्दैव असे की त्या वेळी सर एडवर्ड मॅक्लागन हे श्री. जॉन थॉम्सनच्या प्रभावाखाली आले होते आणि थॉम्सन त्या वेळी काँग्रेसला सवलती देण्याबाबत काही ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत नव्हते. सर मॅनिनॉर्डच्या वाटाघाटींचा विचका झाला. काँग्रेस पक्षही मग इरेलाच पेटला. त्याने सर मायकेल ओ. डायरच्या मार्शल लॉच्या राजवटीत झालेल्या अत्याचारांची चौकशी करण्याचे ठरवले.



सी. आर. दास

एवढ्या टिप्पण्या वाचून वाचकाला वस्तुस्थितीची कल्पना

येणे शक्य नाही. ज्याला आता 'राष्ट्रीय सप्ताह' असे उदात्त नाव दिले आहे, त्या अविस्मरणीय सप्ताहात घडलेल्या घटनांनी पंजाबच्या जनतेत केवढी भीती निर्माण झाली होती आणि त्यानंतर दोन महिने मार्शल लॉची राजवट जारी झाली होती त्या काळात पंजाब्यांना किती दुर्दैवी प्रसंगांना तोंड द्यावे लागत होते, याची कल्पना यावी म्हणून एक-दोन प्रसंग सांगणे इथे उचित ठरेल. पंडित मदनमोहन मालवीय हे पंजाबी हिंदूंचे श्रद्धास्थान होते. झाल्या प्रकाराची ठिकठिकाणी चौकशी करण्याकरता ते साध्या घोडागाडीतून (टमटम) अमृतसरच्या रस्त्यावरून जाताना अनेकांनी पाहिले होते. पण सरकारी अधिकाऱ्यांचा रोष ओढवायला नको म्हणून त्यांच्या जवळ जाण्याचे धाडस कुणीही करीत नसत. सरकारच्या भीतीने कुणी प्रतिष्ठित त्यांना आपली गाडी वापरायला द्यायला धजावत नव्हता. साधा टांगेवालाही त्यांची सवारी घ्यायला जरा कचरत असे. न जाणो, काहीतरी सबबीखाली आपले लायसेन्स काढून घेतील ! एकदा काँग्रेसच्या काही चौकशीकरता पंडित मालवीयांना एक-दोन दिवसांकरता गुजरनवाला इथे जायची वेळ आली. गुजरनवाला येथल्या खटल्यातील एक आरोपी श्री. मेलाराम आनंद ह्यांनी पंडितांना आपल्या घरी रहायला सांगितले. घर रिकामेच होते. जेवणाची सर्व व्यवस्था पंडितांना स्वतःलाच करावी लागली होती. असे असूनही श्री. मेलाराम जेव्हा गुजरनवालात आले, तेव्हा पडितांना घरी थारा दिल्याबद्दल तेथल्या अधिकाऱ्याने त्यांना जाब विचारला होता. एक पैसा देऊन ते बाजारात राहू शकले असते, असेही तो म्हणाला. तो अपमान मेलारामांना जाणवला; पण ते इतके असहाय्य होते की ते त्यावर काही उत्तर देऊ शकले नाहीत. श्री. सी. आर्. दास आणि पंडित मोतीलाल नेहरू तर आपल्या गाड्या घेऊनच अमृतसरला जात असत. त्याने सोय व्हायची; आणि सोय होणे महत्त्वाचेच होते. पण आपल्याला गाडी दिल्याबद्दल इतर कुणी संकटात येऊ नये ही त्यामागे दृष्टी असे. एवढेच नव्हे, ते दोघे आपले जेवण-खाण, पाणी आपल्याबरोबर घेऊन जाण्याचीही काळजी घेत. एवढे करूनही लोक

आपली हकीगत सांगायला पुढे येण्यास धजावत नसत. अधिकाऱ्यांच्या भीतीने साक्षीदार आपल्या विधानातून संपूर्ण सत्य सांगत नसत. त्याकरता त्यांची विधाने पुन्हा पुन्हा तपासावी लागत. कित्येकदा काँग्रेस चौकशी समितीपुढे सही करून दिलेली विधानेही मागे घेण्याचा संभव असे. काही धक्कादायक विधाने आमच्या चौकशी-समितीपुढे केली जात, त्यांची आम्ही नोंद करीत नसू. ती विधाने इतकी धक्कादायक असत की सरकारी अधिकाऱ्यांच्या गंभीर धमक्यांमुळे ती माणसे ती हंटर कमिटीपुढे सांगतील अशी आम्हाला खात्री वाटत नसे. आणि ती विधाने आम्ही नोंद करून घेतली आणि सरकारी चौकशीत (मागे घेतल्यामुळे) त्यांचा उल्लेख नसेल, तर आमच्यावर खोटी विधाने नोंद केल्याचा ठपका यायची भीती असे.

अशी विधाने नोंद करून ठेवण्यास गांधीजींचा सक्त विरोध असे. ती विधाने केल्याने त्या माणसाला इतक्या गंभीर संकटांना तोंड द्यावे लागे की देशभक्तीच्या नावाखालीसुद्धा त्यांना असे संकटात ढकलण्याचा आपल्याला अधिकार नाही, असे गांधीजी म्हणत असत. रस्त्याच्या मध्यात बसून आपला सुबक असा पाचवान हुक्का पीत सी. आर्. दास आसपास राहणाऱ्या लोकांकडून माहिती गोळा करतानाचे दृश्य मोठे मनोहर असे. आम्ही त्यांच्या रोल्सरॉईसमधून सकाळी जात असू आणि संध्याकाळी उशिराने परत येत असू. असाच दिनक्रम पंडित मोतीलाल नेहरू आणि पंडित मालवीयांचा असे. लोकांच्या हृदयात कितीही तिरस्कार आणि राग भरला होता, तरी पुढे येऊन आपले अनुभव सांगा, असे त्यांना पटवणे मोठे कर्मकठीण होते. काँग्रेस समितीपुढे हजर होताना त्या स्त्री-पुरुषांच्या चेहऱ्यावर भीती पसरलेली असे.

काँग्रेस समिती स्वतंत्र चौकशी करीत असतानाच हंटर कमिटीपुढे दररोज काय होते, याचा संपूर्ण अहवाल मिळवण्याची व्यवस्था सी. आर्. दासांनी केली होती. त्यांची बैठक टाऊन हॉलमध्ये होत असे. सी. आर्. दासांनी दोन निष्णात् स्टेनोग्राफर आपल्याबरोबर लाहोरला आणले होते.

हंटर कमिटीपुढे काय पुरावा सादर झाला, तो जसाचा तसा लिहून घेण्यात ते गुंतलेले असत. अधिक महत्त्वाच्या पुराव्याचा शब्द न् शब्द घेतला जाई आणि रोज संध्याकाळी तिथे झालेल्या कामकाजाचा टंकलिखित अहवाल सी. आर्. दासांना वाचून दाखवला जाई. त्यामुळे सरकारी समितीपुढे कोणता पुरावा सादर झाला, ह्याची इत्थंभूत माहिती त्यांना कळे. तीच माहिती गव्हर्नरांना दोन-तीन तासांनंतर मिळत असे. ज्या दिवशी जनरल डायरने दिलेली साक्ष एका टंकलेखकाने त्यांना वाचून दाखवली, तेव्हा दासांचा चेहरा उजळला हे मला स्पष्ट आठवते आहे. ते वाचून संपल्यावर पाच मिनिटांतच त्यांनी एका माणसाला तारघरात पाठवले आणि डायरची संपूर्ण साक्ष तारेने इंग्लंडमधल्या त्यांच्या सॉलिसिटर्स्‌ना धाडून दिली. त्यासाठी त्यांचे १५०० रुपये खर्च झाले. ब्रिटनमधल्या उदार वातावरणात त्या साक्षीने काय खळबळ माजवली असेल, याची कल्पनाच केलेली बरी ! या साक्षीमुळे खरे म्हणजे हा खटला जनसामान्यांच्या बाजूला झुकला होता, सरकारी बाजूचे पितळ उघडे पडले होते; पण इंग्रज अधिकाऱ्यांची शिस्त अशी होती की आपली बाजू उघडी पडल्याची बेचैनी त्यांच्या चेहऱ्यावर यत्किंचितही त्यांनी दाखवली नाही. जनरल डायरच्या वेळेवर केलेल्या कृतीने बंडाचा बीमोड झाला असा जो पवित्रा सरकारी अधिकाऱ्यांनी घेतला होता, तो त्यांनी शेवटपर्यंत कायम ठेवला. जनतेला इंग्रज सरकारच्या सद्हेतूबद्दल जो विश्वास वाटत होता, त्याला मात्र त्या पवित्र्याने तडा गेला. आणि आपल्याला माहीत आहे की, ब्रिटनच्या हाऊस ऑफ लॉर्डस्‌ने तर जनरल डायरच्या कामाबद्दल त्याच्या प्रशंसेचा ठराव केला.

हंटर इन्क्वायरी कमिटीत काही हिंदुस्थानी सभासद होते. त्यांनी साक्षीदारांना जे प्रश्न विचारले होते, ते त्यांना आम्हीच सुचवलेले असत. ही गोष्ट सहसा कुणाला माहिती नसते, म्हणून त्याची माहिती देतो. पंडित मोतीलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली आम्ही तीन-चार लोकांची एक लहानशी समिती स्थापिली. पंडित जगन नरेन, नवाब सुलतान अहम्मद

आणि चिमणलाल सेटलवाड यांनी काय प्रश्न विचारायचे हे काम ती समिती करीत असे. हंटर कमिटी कोणकोणते साक्षीदार तपासणार, ह्याची आम्हाला माहिती असे. त्यांना विचारायचे प्रश्न तयार करण्याकरता जी माहिती मिळवायला आमचे नेते आम्हाला सांगत, ती आम्ही परिश्रमपूर्वक गोळा करून आणत असू. विचारायच्या प्रश्नांच्या टंकलिखित प्रती त्या तीन सभासदांना आदल्या रात्री नेऊन दिल्या जात. पंडित जगन नरेन आणि नवाब सुल्तान अहम्मद या दोघांकडे प्रती पोहोचवण्याचे काम सामान्यपणे माझ्याकडे असे. श्री. सेटलवाडांकडे कोण जाई, हे मला माहीत नाही. हे काम विश्वासू आणि माहितगार माणसावर सोपवावे लागे. त्याच्यावर प्रश्नांच्या प्रती गुप्तपणे पोहोचवण्याची जबाबदारी तर असेच; पण शिवाय त्यातल्या प्रश्नांचे स्पष्टीकरण देण्याची आणि सभासदांना आणखी काही माहिती हवी असल्यास ती पुरवण्याची जबाबदारी असे. हंटर कमिटीच्या चौकशीच्या वेळी शोधक असे अनेक प्रश्न विचारण्याबद्दल जगन नरेन प्रसिद्ध झाले; पण त्याचे कारण त्यांना अधिक प्रश्न पुरवले गेले होते हे नव्हते. कमिटी रूममध्ये ते जिथे बसले होते, तिथे बसणाऱ्याला प्रश्न विचारण्याची संधी प्रथम मिळत असे; त्यामुळे साहजिकच ते अधिक प्रश्न विचारत असत. नवाब सुल्तान हे तिसऱ्या जागेवर असत; त्यामुळे त्यांच्या वाट्याला अगदी कमी प्रश्न येत. अर्थात् तसे असले, तरी काही मार्मिक प्रश्न विचारून साक्षीदाराच्या उलटतपासणीबाबत त्यांनी चांगली प्रसिद्धी मिळवली. हंटर इन्क्वायरी कमिटीवर बहिष्कार टाकणाऱ्यांकडून ह्या तीन हिंदुस्थानी सभासदांना पूर्ण प्रशिक्षण मिळत असल्याची कल्पना सरकारला आली असणार; पण माझी खात्री आहे की, जनतेला आमच्या या कामाची जराही कल्पना नव्हती. आणखी एक गोष्ट नमूद केली पाहिजे. ती म्हणजे त्याबाबत गांधीजी पूर्ण अंधारात होते. जी गोष्ट स्पष्ट आणि सरळ नाही, तिच्याकडे ते संशयाने पाहत असत, हे आम्हाला माहीत होते. पण सगळे नेते तसा विचार करीत नव्हते. इतर काही ठिकाणी अशा वाममार्गाचा अवलंब केला गेला होता. सरकार स्वतः

अशा मार्गाचा सर्रास वापर करीत होते आणि त्याकरता त्याच्यापाशी भरपूर सुविधाही होत्या. महात्मा गांधी आणि इतर नेते यांच्यातला फरक मी एका उदाहरणाने दाखवून देतो.

एकदा एक गृहस्थ माझ्याकडे एक महत्त्वाचा कागद घेऊन आले. त्या कागदावर चालू चौकशीला फार उपयोगी पडण्यासारखी माहिती होती. सरकारी खात्यातल्या एका गुप्त विभागातून त्यांनी तो कागद काही आडमार्गाने मिळवला होता. त्या गृहस्थांचा आमच्या चळवळीशी तसा काही संबंध नव्हता. मी त्यांना तो कागद घेऊन पंडित मोतीलाल नेहरूंकडे जायला सांगितले. त्या गृहस्थांना पं. मोतीलाल नेहरू आणि पंडित मालवीयजी दोघेही बऱ्यापैकी माहितीचे होते. त्या दोघांनी तो कागद वाचला. इतक्या महत्त्वाच्या माहितीचा कागद हुशारीने मिळवल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. त्यानंतर तो कागद गांधीजींना नेऊन दाखवावा असे त्या गृहस्थांना वाटू लागले, तेव्हा तसे न करण्याचा मी त्यांना सल्ला दिला. पण ते आपल्या चतुरपणाने इतके भारावले होते की झालेले कौतुक त्यांना पुरेसे वाटले नाही आणि प्रत्यक्ष गांधीजींकडून त्यांना शाबासकी हवी होती. मला वाटते, सी. आर्. दास तेव्हा लाहोरमध्ये नसावेत; कारण त्यांना हा कागद दाखवल्याचे मला आठवत नाही. शेवटी ते गृहस्थ कागद घेऊन गांधीजींकडे गेले. त्या वेळी मी तिथे हजर नव्हतो. माझ्या मित्रांनी मला सांगितली, ती गोष्ट अशी : गांधीजींनी त्या कागदावर नजर फिरवली आणि तो कागद कसा मिळवलात, असे विचारले. त्या गृहस्थांनी त्याची हकीगत सांगितली. ते ऐकल्यानंतर गांधीजींनी त्या चिटोऱ्याकडे पाहायचेसुद्धा नाकारले. एका अधिकाऱ्याला गोत्यात आणल्याबद्दल गांधीजींनी त्या गृहस्थांची चांगलीच कानउघाडणी केली. ते त्यांना म्हणाले, ''आमची कामाची पद्धत स्वच्छ आहे. अशा चुकीच्या कामाकरता एकाद्याला प्रोत्साहन देणे तर सोडाच; पण त्यांना त्यापासून परावृत्तच केले पाहिजे.'' ते पुढे म्हणाले, ''ह्या कागदातल्या माहितीचा उपयोग चौकशीच्या वेळी आम्ही करणार नाही. आमच्या दृष्टीने तो कागद

अस्तित्वातच नाही. हा प्रकार जेव्हा पंडित मोतीलाल यांच्या आणि पंडित मालवीय यांच्या कानावर गेला, तेव्हा 'त्याबाबत गांधीजींचा काय विचार असेल हे आम्हाला माहीत होते', असे ते म्हणाले. त्या काळात गांधीजींना, गांधीजी असेच म्हणत असत. अजून कुणी त्यांना महात्मा म्हणत नसत. १९२१ मधली असहकाराची चळवळ त्यांनी सुरू केल्यापासून त्यांना महात्मा म्हणणे प्रचलित झाले.

पंजाबमधल्या चौकशीच्या काळात गांधीजी पंडित रामभाई दत्त ह्यांच्या घरी राहत असत. तिथे त्यांना भेटायला पुष्कळ स्त्रिया येत असत. इतक्या स्त्रिया आकर्षित व्हाव्या असे त्यांच्यात काय आहे, हे मला कधी समजले नाही. स्त्रियांना ते दोन वाक्यांत संदेश देत असत, ''सूत काढा आणि निर्भय व्हा.'' कित्येकदा स्त्रियांपुढे ते जे सांगत, ते पाच मिनिटांहून कमी वेळात संपे. पण तरी प्रत्यक्ष गांधीजींच्या तोंडून ते शब्द ऐकायला मिळाले यातच त्यांना धन्यता वाटे. या उपदेशाचा खरा काय अर्थ होता आणि त्याचे खरोखर इतके महत्त्व होते का, यावर मी बराच विचार करीत असे. 'सूत काढा व निर्भय व्हा' या उपदेशाचे महत्त्व आणि वैशिष्ट्य नंतरच्या काळात माझ्या लक्षात आले. ज्या स्त्रियांना त्यांनी तो संदेश दिला, त्या स्त्रियांनी त्याचा खरा अर्थ जाणायचा प्रयत्न केला असेल का? केवळ गांधीजींना बरे वाटावे म्हणून दुसरा-तिसरा काही हेतू मनात न बाळगता त्या सूत काढीत आणि सुताच्या लड्याच्या लड्या गांधीजींना भेट म्हणून देत. गांधीजींनाही सुताइतकी दुसरी कुठलीच भेट आवडत नसे. भेट म्हणून मिळालेल्या सुताच्या लड्यांचे ते काय करीत असत, हे मला कधीच कळले नाही. सुताच्या लड्यांचे हार करण्याची फॅशन अजून आली नव्हती. गांधीजींच्या मोठ्या चाहत्या सरलादेवी चौधुरानी ह्यांच्याकडेच भेट मिळालेल्या सगळ्या सुताच्या लड्या राहिल्या असाव्यात, असे मला वाटते.

काँग्रेस चौकशी समितीचा अहवाल एकत्रित करण्यात माझा सहभाग नसल्याने त्याबद्दल मी काही सांगण्याचे कारण नाही. पुरावा गोळा करणे,

त्याची नोंद ठेवणे हे काम मुख्यतः माझ्याकडे होते. अहवालाचे काम एल्. हरकिशन लाल यांच्या घरी करण्यात आले. सर्व पुराव्याची सुसूत्र नोंद करण्याच्या हेतूने श्री.सी. आर्. दास, पंडित मोतीलाल नेहरू, श्री. अब्बास तैयाबजी, फझल-उल्-हक आणि श्री.अभ्यंकर यांची निवड करण्यात आली होती. श्री.जयकरही आले होते; पण थोडाच वेळ थांबून ते निघून गेले. अहवाल प्रत्यक्ष लिहिण्याचे काम गांधीजींनी स्वतःच केले.

खिलाफत प्रकरण -

पहिल्या महायुद्धाच्या वेळी 'कुदाम-इ-कहवा' या नावाने एक संस्था सुरू करण्यात आली होती. मुसलमानांच्या पवित्र स्थळांचे संरक्षण करणे हा तिचा मुख्य हेतू होता. मुसलमानांच्या पवित्र स्थळांचा शिरोमणी म्हणजे मक्का, हे आपल्याला माहीत आहे. इस्लामच्या प्रेमाखातर मुसलमानांनी बरेच सोसले होते; पण ते प्रेम कोणत्या तरी विधायक कृतीतून व्यक्त न होता केवळ भावना राहिली, हे मोठी खेदाची गोष्ट आहे. कुदाम-इ-कहवा ही एक मोठी आणि प्रभावी संघटना असल्याचे मला माहीत नाही. कारण अली बंधूंच्या शिवाय या संघटनेच्या इतर कोणत्याच सभासदाचे नाव मी कधी ऐकले नाही. हे मी लिहित आहे त्या काळात मात्र अली बंधूंनी इतर मुसलमानांना जमवून आपली संघटना मजबूत केली होती. मुख्यतः ज्ञानी मौलवी आणि इमाम यांचा त्या संघटनेत समावेश होता. ते सगळे दोन मुद्यांवर सहमत होते. एक म्हणजे, तुर्कस्तानच्या अखंडत्वाचा आणि स्वातंत्र्याचा पुरस्कार करणे आणि दुसरे, हिंदुस्थानी मुसलमानांना लॉईड जॉर्ज यांनी दिलेल्या आश्वासनांचा व वचनांचा भंग केल्याबद्दल त्यांचा कडक निषेध करणे. या मुद्यांवर मुसलमानांची मने अल्पकाळ कडवट झाली होती. पण गांधीजींना खऱ्याखुऱ्या मुत्सद्याची दृष्टी होती; त्यामुळे त्यांनी मुसलमानांचा लढा आपलाच करून टाकला. पंजाबातील अत्याचारांबरोबर तुर्कस्तानातील अत्याचारांविरुद्धही आवाज उठवून ब्रिटिशांच्या विरुद्ध पुकारलेल्या बंडाला अधिक उंच पातळीवर

नेऊन बसवले. आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी त्यांनी असहकाराची प्रसिद्ध चळवळ सुरू केली. अली बंधूंनी जी खिलाफत चळवळ चालू केली, ती असहकाराच्या आंदोलनाला समांतर होती. एल्. हरकिशन लाल यांच्या घरी गांधीजींनी भेटण्यासाठी शे-दोनशे माणसांना मुद्दामहून पाचारण केले होते. त्यांच्यासमोर गांधीजींनी त्या चळवळीमागचा विचार पूर्णपणे स्पष्ट केला व जमलेल्या श्रोत्यांना असहकाराच्या आणि खिलाफत असा दोन्ही चळवळींत सामील होण्याचे आवाहन केले. अली बंधूही तेथे बोलले. विशेषतः शौकत अलींनी भावविवशतेने बोलून खिलाफतच्या अत्याचारांच्या कारणाने तरी असहकार आंदोलनाला पाठिंबा द्या, अशी त्यांनी हिंदूंना विनंती केली. त्यांनी आपल्या भाषणात वापरलेले काही शब्द माझ्या कानात अजून घुमत आहेत. पण नंतर जे-जे घडले, त्यावरून मी जराही न कचरता म्हणेन की, ते शब्द पोकळ आणि दांभिक होते. ते म्हणाले होते, ''हिंदू व मुसलमान भाऊ-भाऊ आहेत आणि जोवर या देशाच्या शब्दकोशात 'कृतज्ञता' हा शब्द आहे, तोवर मुसलमान तो विसरणार नाहीत. ब्रिटिशांच्या स्वार्थापासून आणि लोभापासून तुर्कस्तानला वाचवण्याकरता हिंदू जी मदत करतील, त्याबद्दल मुसलमान नेहमी कृतज्ञ राहतील.'' माझ्याशी व्यक्तिशः बोलून त्यांनी मला माझा (सरकारकडून मिळालेला) किताब सोडून द्यायला सांगितले. गेली अकरा वर्षे मी तो किताब बाळगून होतो. त्या किताबाचे मला अप्रूप नव्हतेच. मुसलमानांना त्यापासून काही मदत होणार असली, तर खुशाल माझा किताब घेऊन टाका, असे मी तिथल्यातिथे सांगून टाकले, त्यावर ते बरेच खुश झालेले दिसले. सभा संपल्यावर मी घरी गेलो, तर निरोप पाठवून दिलेल्या वचनाची मला त्यांनी आठवण करून दिली आणि दुसऱ्या दिवशी किताब सोडून देण्याचे जाहीर करायला सांगितले. मी ते केले. खिलाफतच्या प्रयोजनाला पाठिंबा दिल्याबद्दल त्यांनी सर्व मुसलमानांच्या वतीने माझे आभार मानले. आता माझ्या किताब सोडण्याने खिलाफत किंवा असहकार चळवळीला कसा पाठिंबा मिळत होता, ते मला समजले नाही. माझ्या

किताबाचा त्याग करताना मी एक गोष्ट स्पष्ट केली होती, की हे करताना मी असहकारी नव्हतो. मुसलमान मित्रांना बरे वाटावे याकरता किताब सोडून द्यायला मला उद्युक्त करण्यात आले होते. पहिले महायुद्ध संपल्यानंतर ब्रिटिशांनी तुर्कस्तानला ज्या तऱ्हेने वागवले, त्यामुळे आपला घात झाला असे मुसलमानांना वाटत होते. पंजाबात असहकाराची चळवळ जाहीर करून गांधीजींनी फार काही छाप पाडली असे मला वाटत नाही. २० सप्टेंबर १९२० रोजी कलकत्त्यात काँग्रेसची एक विशेष सभा घेण्याचे ठरले. काँग्रेसच्या अध्यक्षपदी त्या वेळी लाला लाजपतराय निवडून आले होते. त्यांच्याबरोबर पंजाबी प्रतिनिधी मोठ्या संख्येने कलकत्त्याला गेले. त्यात मीही होतो. माझा थोरला मुलगा डॉ. बी. जे. साहनी आमच्याबरोबर होता. कलकत्त्याच्या ह्या विशेष सभेचे मुख्य काम सब्जेक्ट कमिटीच्या (आता ती कमिटी 'ऑल इंडिया काँग्रेस कमिटी' या नावाने ओळखली जाते.) बैठकीत झाले होते. 'इंडियन असोसिएशन ऑफ कलकत्ता' याच्या सभागृहात ही विशेष सभा घेण्यात आली. असहकाराचा ठराव हा सभेचा मुख्य विषय होता. त्याने प्रतिनिधींना दिवसभर गुंतवून ठेवले होते. त्या ठरावाला सी. आर्. दासांचा विरोध होता आणि त्या विरोधात लेफ्टनंट (त्या वेळी) बिपिनचंद्र पाल सामील होते. असहकाराच्या बाजूने मुख्यतः गांधीजी बोलले. एम्.महम्मद अलीही त्या बाजूने अधून-मधून बोलत होते. गांधीजी हे यजमान असल्यासारखे होते. श्री. दास आणि बिपिनचंद्र पाल एका बाजूला; तर दुसरीकडे गांधीजी व महम्मद अली. दोन्ही बाजूंत ज्या चकमकी उडत होत्या, त्या विसरता येण्यासारख्या नव्हत्या. मी बसून निरीक्षण करीत होतो. गांधीजी आणि सी. आर्. दास एकमेकांशी झगडत होते. दोघेही तुल्यबळ होते; दोघेही युद्धकुशल नेत्यांप्रमाणे बेभान होऊन एकमेकांवर तुटून पडत होते. ते पाहून प्राण पणाला लावून एकमेकांवर चढाई करणाऱ्या दोन प्रचंड सैन्यांची आठवण झाली. एका सैन्याचे सी. आर्. दास सेनापती होते आणि एकेक तुकडी शत्रूवर सोडत होते. कुठेही एखादा कुमकुवत भाग दिसला

की ताबडतोब तिकडे जाण्याचा एका तुकडीला हुकूम सोडत होते. गांधीजी आपल्याकडील सामग्रीचा उपयोग करून घेण्यात कमी नव्हते. ते युद्ध बघणे हा एक विलक्षण अनुभव होता. माझ्यावर त्याचा उठलेला अविस्मरणीय ठसा फार खोलवर पोहोचला. मी ही वाक्ये लिहायला माझ्या लेखनिकाला सांगतो आहे खरा; पण त्या दोन बुद्धिवंतांमधला तो वाद कसा साकारत गेला, त्या वेळी प्रत्यक्ष कशी परिस्थिती निर्माण होत होती, ते परिपूर्णपणे व्यक्त करायला ही वाक्ये फारच तोकडी पडत आहेत.

शेवटी गांधीजी ती लढाई जिंकले. सब्जेक्ट कमिटीची मते त्यांना अधिक मिळाली. पण दोघांची मतमोजणी झाली, तेव्हा फारच थोड्या मतांनी गांधीजी जिंकले होते असे आढळले. ते किती मतांनी जिंकले, हे मला निश्चित सांगता येणार नाही; पण तो आकडा दहाच्या आसपास होता. एका दृष्टीने काँग्रेसची खुली सभा घेणे ही चांगली गोष्ट होती; पण तेथे पहिल्यापासून सर्वांना गाधी जिंकणार हे माहीत असल्यासारखे होते. त्या सभेत मते घेण्यापूर्वी दोन्ही बाजूंचा झटपट व जोरदार प्रचार करण्यात आला आणि मी वर सांगितल्याप्रमाणे गांधीजी जिंकले. काँग्रेसच्या त्या विशेष सभेबद्दल वेगळे काही सांगायचे कारण नाही. श्री. सी. आर्. दास आणि लाला लाजपतराय यांनी तरीही आपले मत बदलले नाही. पण मग त्याच वर्षी म्हणजे १९२० च्या डिसेंबरात जेव्हा नागपूरला काँग्रेसचे अधिवेशन भरले, त्या वेळी ते दोघे गांधींजींशी सहमत झाले. कलकत्त्याला झालेल्या सभेत असहकाराविषयी जे प्रतिपादन केले गेले, ते सगळे बरोबर आहे अशी माझी खात्री होत नव्हती; तरीही महात्माजींच्या आणि इतरांच्या भाषणांनी माझ्यावर एक खोल संस्कार झाला. इतका, की असहकाराची बाजू फारशी पटली नसूनही कौन्सिलच्या निवडणुकीतून मी माझे नाव मागे घेतले. त्या निवडणुकीत उभे राहण्यासाठी व निवडून येण्याकरता मी बराच प्रयत्न केला होता. नागपूरच्या अधिवेशनानंतर मी पक्का असहकारवादी झालो. तरी काही बाबतींत अजून माझी विचार वेगळे होते. तेवढ्या बाबी सोडल्या, तर बाकी सर्व बाबतींत जसा काळ गेला,

तशी असहकार चळवळीविषयी माझी सहमती आणखी सखोल व पक्की होत गेली. विषय बदलण्यापूर्वी नागपूरच्या अधिवेशनाविषयी आणखी एक गोष्ट सांगतो. पूर्वीच्या कोणत्याही अधिवेशनापेक्षा हे अधिवेशन वेगळे होते. यापूर्वीच्या बहुतेक अधिवेशनांना मी पाहुणा म्हणून उपस्थित राहत असे; पण नागपूरला उत्साहाची जी तीव्रता अनुभवास आली, त्याच्या दशांशानेही पूर्वी कधी आली नव्हती. काही राष्ट्रीय गीते, तसेच हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि चरखा यांचे यश, पंजाब व खिलाफतबाबतचे अत्याचार अशा विविध विषयांवर विविध भाषांतून स्त्री-पुरुषांनी गाणी म्हटली, तो देखावा बघण्यासारखा होता. काँग्रेस कँपकडे जाणारा जो रस्ता करण्यात आलेला होता, त्यावर ही गाणी म्हटली जात होती. त्यातील कितीतरी मी लिहून घेतली होती.

सेलम विजयराघवचारियार हे काँग्रेसचे अध्यक्ष होते. ते दक्षिणेतले अनुभवी नेते होते. सर्वच बाबतींत त्यांचे गांधींशी सहमत होत नसे; त्यामुळे आपल्या भाषणात असहकाराकरता त्यांनी जे आवाहन केले, ते मनापासून केल्यासारखे वाटले नाही. 'इंडिया' नावाचे एक पत्रक इंग्लडंमध्ये प्रसिद्ध होत असे. हिंदुस्थानातील घटना इंग्रज जनतेला सांगण्याचे ते काँग्रेसच्या हातामधील एक साधन होते. या अधिवेशनात हे पत्रक बंद करून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला. पंचवीस वर्षे त्या पत्रकाने हिंदुस्थानाकरता मोठी कामगिरी बजावली होती; पण असहकाराच्या कल्पनेने भारावून गेलेले गांधीजी त्या पत्रकाशी - ते कितीही उपयोगी असले तरी - संबंध ठेवायला तयार नव्हते. ती मोठी दुर्दैवाची गोष्ट झाली. मंडपाच्या बाहेर, देशातील निरनिराळ्या ठिकाणांहून आलेले काँग्रसचे प्रतिनिधी-नेते 'इंडिया' चालू ठेवण्याच्या प्रश्नावर उलट-सुलट चर्चा करीत होते. त्या चर्चेमध्ये तीन युरोपीय माणसेही भाग घेत होती. हिंदुस्थानला इंग्रज जनतेचा पाठिंबा मिळण्याकरता 'इंडिया' हे पत्र चालू ठेवावे अशी त्यांनीही कळकळीची विनंती केली. त्या पत्राने मोठे काम केले असून अशा कसोटीच्या वेळी ते पत्रक चालू ठेवणे अत्यावश्यक

आहे, असे श्री.हालफर्ड नाइट जोर देऊन सांगत होते. बाकी दोघांची नावे मला नक्की आठवत नाहीत; पण ते डॉ.रदरफोर्ड् आणि श्री.रॅमसे मॅक्डोनाल्ड् असावेत. या तीन युरोपीय मित्रांनी आणि किती तरी हिंदुस्थानी गृहस्थांनी तळमळीने सांगून काही फायदा झाला नाही. 'इंडिया'चे प्रकाशन पूर्णपणे थांबवून टाकायला मुख्य कारण गांधीजीच होते. माझ्या मते ती एक चूक होती. तेव्हापासून आजपावेतो जगात आमची बाजू मांडायला आम्हाला कोणतेही साधन उरले नाही. तशा एका साधनाच्या अभावामुळे आमचे शत्रू प्रचंड प्रमाणावर आमचे नुकसान करीत आहेत. इंग्लंडमध्ये तसे एखादे मुखपत्र सुरू करण्याबाबत काही हालचाल केली जाईल, अशी मी आशा करतो.

ब्राह्मो समाजाशी माझा संबंध -

हा माझ्या आयुष्यातील एक महत्त्वाचा विभाग असूनही त्याबाबत आतापर्यंत मी काहीही सांगितले नाही. मी लाहोरला येण्यापूर्वी म्हणजे सन १८७९ पूर्वी कोणत्याही सुधारक चळवळीची मला माहिती नव्हती. माझ्या वडिलांच्या श्रद्धेविषयी मला काही सांगता येईलसे वाटत नाही. मनोमन श्रद्धाळू माणसाच्या भावनेने ते रोज मूर्तिपूजा करीत असत. त्यातला नियमितपणा असा असे की, ते जर कधी आजारी पडले, तर सकाळी माझ्याकडून ते साग्रसंगीत पूजा करून घेत असत. म्हणजे देव धुणे, त्यांना कपडे घालणे, गंध, फुले आणि नैवेद्य सर्व काही. काही वेळा ते आपली खाट देवांजवळ न्यायला लावत; म्हणजे पूजेच्या वेळी योग्य ते मंत्र त्यांना म्हणता यावेत. वडिलांनी जे करायला सांगितले, ते बरोबर की चूक, असा प्रश्न मी कधी केला नाही. त्यांच्या इच्छेप्रमाणे आपण वागत आहो, एवढेच मला पुरेसे होते. ज्या भावुकपणे व नित्यनेमाने ते मूर्तिपूजा करीत, त्यावरून म्हणायचे झाल्यास ते एक प्रामाणिक मूर्तिपूजक होते. आज एक गोष्ट माझ्या मनात शंका निर्माण करीत आहे. जितक्या भक्तिभावाने ते पूजा करीत, तितक्याच नेमाने व श्रद्धेने ते सकाळी व

संध्याकाळी शिखांच्या रोहोरास आणि सुखमानी या प्रार्थना म्हणत असत. ह्या दोन गोष्टींचा ते कसा मेळ घालत असत, मला ठाऊक नाही. पण असे लाखो लोक असतात की जे अशा प्रश्नांवर विचार करण्याचा त्रास घेत नाहीत. माझ्या वडिलांचे तसेच असावे. मूर्तिपूजेने त्यांना जितके समाधान वाटे, तितकेच त्यांना जन्म किंवा रूप नसलेल्या, शाश्वत, अभेद्य, सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान अशा ईश्वराचे गुणगान करण्यातही वाटे; आणि तेवढे त्यांना पुरेसे वाटे. माझ्याबद्दल म्हणायचे तर, मूर्तिपूजेने माझा भक्तिभाव कधीच जागा झाला नाही; पण मूर्तिपूजेत काही गैर आहे असेही मला कधी वाटले नाही. शंभरातली नव्याण्णव माणसे धार्मिक बाबतीत 'का' आणि 'कसे' हे प्रश्न विचारीत नाहीत. त्यांच्या वाड-वडिलांनी जे केले, तसेच ते करीत राहतात. आपल्या आधीच्या कुणी काही शंका काढली नाही, तेव्हा ते बरोबरच असणार, असे समजून ते चालतात.

मी लाहोरला आलो, तेव्हा परिस्थिती बदललेली होती. माझे वडील देवाघरी गेले होते. मी केलेल्या पायी प्रवासाने माझा नव्या जगाशी अगदी जवळून संबंध आला. त्या प्रवासाने माझी दृष्टी विशाल झाली. माझे विचार पुष्कळ बाबतीत उदार झाले. शिखांच्या धर्मग्रंथांकडे माझा ओढा होता. डेरा इस्माइल खान येथे धरम प्रकाश स्कूलमध्ये मी गुरुमुखी शिकलो होतो. गावात एक लाला हुकमचंद गांधी नावाचे प्रतिष्ठित गृहस्थ होते. त्यांनी एक दिवस मला स्वतःजवळची 'पांजग्रंथी'ची एक प्रत दिली व त्यातले 'जपजी' म्हणावे असे सांगितले. माझ्या धार्मिक श्रद्धा वडिलांसारख्याच विशाल होत्या. पण माझ्या बाबतीत एक गोष्ट निश्चित होती, ती म्हणजे शीखधर्माच्या तत्त्वांकडे माझा अधिक कल होता.

असे धार्मिक संस्कार घेऊन मी लाहोरला आलो. तिथे मी एका असामान्य व्यक्तीच्या सहवासात आलो. धर्माबाबत नवे विचार ऐकले. ते वेगळे विचार ग्रहण करण्यासाठी माझ्या पूर्वाश्रमींच्या संस्कारांची बैठक पुरेशी ठरली. पंडित शिवनरेन अग्निहोत्री हे सरकारी शाळेत चित्रकला आणि क्षेत्रमापन शिकवत असत. ते कट्टर ब्राह्मो होते. सामाजिक सुधारणा

घडविण्याचा त्यांचा उत्साह अमाप होता. ते उत्कृष्ट उर्दू बोलत. मी ब्राह्मो समाजाचा सभासद व्हायला मुख्यतः तेच कारणीभूत झाले. लाहोरमध्ये आल्यावर सार्वजनिक व्याख्यान ही गोष्ट मला नवलाईची होती. डेरा इस्माइल खानमधल्या बाजारात एक पाद्री ख्रिश्चन धर्माबद्दल आपल्या मोडक्या-तोडक्या उर्दूत आवर्जून बोलत असत. ते सोडले, तर व्याख्यान असे मी कधी ऐकले नव्हते. लाहोरच्या ब्राह्मो मंदिरात आठवड्यातून एक दिवस धर्मोपदेशाचा कार्यक्रम होत असे; त्याला मी नियमित जात असे. तो कार्यक्रम पंडित नवीनचंद्र राय किंवा पंडित अग्निहोत्री घेत असत. नवीनचंद्र राय हे संस्कृत पंडित होते. त्यांना अस्खलित भाषेत व्याख्यान देता येत नसे; पण त्यांची धार्मिक व्याख्याने विचारपूर्वक केलेली असत आणि प्रभावी होत. त्याचे मुख्य कारण म्हणजे आपले मुद्दे ते हिंदू धर्मग्रंथांतल्या गोष्टींनी किंवा श्लोकांनी स्पष्ट करीत. अग्निहोत्री आपल्या पांडित्याचा अभाव आपल्या कळकळीने आणि वक्तृत्वशैलीने भरून काढीत. सामाजिक व धार्मिक विषयांवरच्या व्याख्यानांच्या पूर्वतयारीकरिता ते पुष्कळ कष्ट घेत. लाहोरात त्या वेळी 'इंडियन असोसिएशन ऑफ कलकत्ता' याची एक शाखा होती. इंडियन नॅशनल काँग्रेसच्या स्थापनेपूर्वी एवढी एकच राजकीय संस्था लाहोरमध्ये होती. अग्निहोत्री याचे सभासद आणि वक्ते होते. आर्यसमाजाच्या सकाळच्या प्रार्थनेला आणि रंगमहाल मिशन स्कूलमध्ये आर्यसमाजाने आयोजित संध्याकाळच्या भाषणांना मी कधी तरी जात असे. १८८२ साली अग्निहोत्रींनी शिक्षणखात्यातली आपली नोकरी सोडून दिली आणि संन्यास घेऊन स्वतःला ब्राह्मोसमाजाच्या कार्याला वाहून घेतले. अग्निहोत्रींनी संन्यास घेतला तेव्हाचा ब्राह्मो-मंदिरातला देखावा मला चांगला आठवतो. पंडित नवीनचंद्र राय हे पुरोहित झाले व अग्निहोत्रींना संन्यासाची दीक्षा दिली. त्या वेळी त्यांनी अग्निहोत्रींना स्वामी सत्यानंद अग्निहोत्री असे नाव दिले. त्या दिवसापासून शेवटपर्यंत अग्निहोत्री तेच नाव लावीत असत. जनतेला धार्मिक प्रबोधन करण्याकरता वाहून घ्यावे म्हणून एका इंग्रजी शिक्षण घेतलेल्या माणसाने आपली चांगल्या पगाराची नोकरी* सोडून दिल्याचे हे पहिलेच उदाहरण होते. संन्यास-समारंभ पाहण्यासाठी जमलेले प्रेक्षक त्या सभागृहात मावले नाहीत. पुष्कळांना व्हरांड्यात आणि अगंणात उभे राहावे लागले होते. त्या काळात दोनशेहून कमी माणसे जमली, तरी ती सभा विराट समजली जायची. उंच, सडपातळ आणि देखणे अग्निहोत्री संन्याशाच्या सैल वस्त्रांत प्रेक्षकांपुढे उभे राहिले, तेव्हा आम्हाला मूर्तिमंत आदरणीय व्यक्तीचे दर्शन झाल्यासारखे वाटले. ते बोलू लागले, तेव्हा सर्वत्र अतिशय शांतता होती. एकदाच फक्त जेव्हा नवीनचंद्र त्यांना भविष्यातील त्यांचे आयुष्य, कर्तव्ये, धार्मिक शिक्षक म्हणून मर्यादा याविषयी सांगू लागले, तेव्हा थोडा आवाज झाला होता. समाजाच्या एका वर्गात 'ब्राह्मोसमाज' अत्यंत अप्रिय होता. संन्यास-समारंभाच्या प्रसंगी गोंधळ करण्याचा काही जणांचा बेत होता. ते लक्षात येताच अग्निहोत्री ताडकन उठले, आपल्या त्या पायघोळ वस्त्राचे एक टोक त्यांनी उचलून धरले व म्हणाले, ''एके काळी ज्या गोष्टींमुळे हा देश महान झाला होता, त्या सगळ्या गोष्टी आज आम्ही हरवून बसलो आहोत. आजच्या दारिद्र्यात, अज्ञानात आणि पारतंत्र्यात एक गोष्ट अजूनही ह्या देशाकडे आहे; आणि ती म्हणजे ह्या केशरी कपड्यांबद्दलचा आदर. आणि हा आदर आपला बहुमूल्य आणि श्रेष्ठ असा ठेवा आहे.'' अग्निहोत्रींचे म्हणणे योग्य ठिकाणी जाऊन भिडले आणि ठरवल्याप्रमाणे खोडसाळपणा करण्याचे त्या व्यक्तींचे धाडस झाले नाही.

* *संन्यासी होण्यापूर्वी अग्निहोत्रींना १५० रु. ते ३०० रु. यामध्ये काहीतरी पगार मिळत होता.*

ह्या घटनेने प्रभावित होऊन बरेच उत्साही तरुण ब्राह्मोसमाजाकडे ओढले गेले. काहींनी अग्निहोत्रींच्या पावलावर पाऊल ठेवून चालायचे ठरवले. आपापल्या नोकऱ्या सोडून भावी आयुष्य ह्या आस्तिकवादी धर्मकार्याकरता वेचायचा ,त्यांनी निश्चय केला. त्यापैकी काहींची नावे : देवीचंद गुप्ता (ते त्यांच्या संन्यासी नावाने म्हणजे श्राधे प्रकाश देव म्हणून अधिक परिचित झाले.), भाई सुंदरसिंग, भाई हरभगवान, भाई छत्तरसिंग

आणि पंडित गिरधर राय बिस्वासी. त्यातील पहिले दोघेजण ब्राह्मोसमाजाचे मिशनरी झाले. भाई सुंदरसिंग ह्यांचे संन्यासी नाव होते साधुसेवा सिंग. त्याच नावाने ते सर्वांना परिचित झाले. ते फार दिवस जगले नाहीत. ते अतिशय नम्र असून साधूचे सर्व गुण त्यांच्या ठायी होते. मंदिराच्या मागच्या बाजूला एका आश्रमात ते आपल्या बायको व मुलांना घेऊन राहत असत. मंदिर झाडतानाही मी त्यांना पाहिले होते. आपल्या देहाची पर्वा न करता कष्ट केल्याने त्यांचा मृत्यू लवकर ओढवला, असे मला वाटते. ते फार मधुर गाणे म्हणत. लाहोरमधल्या रस्त्यातून हातात एकतारी घेऊन ते भजने म्हणत जात असत. श्राधे प्रकाश देव यांना ते आपला मोठा भाऊ व मार्गदर्शक समजत आणि त्यांच्याच संगतीत सदैव राहत असत. त्या दोघांनी मिळून सबंध उत्तर हिंदुस्तानभर जो धर्मोपदेश केला, त्याबद्दल ब्राह्मोसमाज ऋणी झाला. उत्तम व सच्चे श्रद्धाळू म्हणून ज्यांचे उदाहरण द्यावे, असे ते दोन पंजाबपुत्र होते. या पुस्तकात त्या दोघांचे चरित्र लिहिण्याचा माझा मानस नाही. श्राधे प्रकाश देवांनी काही धार्मिक पुस्तके लिहून भावी पिढ्यांकरता मार्गदर्शनाचा मोठाच ठेवा ठेवला आणि श्राधे प्रकाश देव गेले. त्यांच्या पुस्तकांबद्दल मी या प्रकरणात पुढे लिहिले आहे.

पंडित गिरधर राम बिस्वासी हे अग्निहोत्रींच्या प्रभावामुळे ब्राह्मो समाजाकडे आकर्षित झालेले आणखी एक भले गृहस्थ होते. वरच्या दोघांप्रमाणे त्यांनीही मोठाच त्याग केला. एका वेळेला तर आपले सर्वस्व त्यांनी ब्राह्मो समाजाला देऊ केले होते. पुढे अग्निहोत्रींमध्ये जो एक बदल घडून, तो आला नसता तर, साधुसेवा सिंग आणि श्राधे प्रकाश देव या दोघांप्रमाणे त्यांनीही ब्राह्मो समाजासाठी आपले सर्व आयुष्य वेचले असते. पंडित गिरधर राम हे कवी आणि गायकही होते. सबंध पंजाब प्रांतात ब्राह्मो समाजाच्या आस्तिकवादाचा आपल्या काव्यातून त्यांनी प्रसार केला. त्यांची प्रेरणादायी गाणी त्यांच्या तोंडून किंवा इतरांच्या तोंडून ज्यांनी ऐकली, त्यांच्या ती कायमची स्मरणात राहायची. मंदिरात ते उशिरापर्यंत असत. अशा वेळी ते स्वतःची गाणी किंवा स्तोत्रे म्हणत असत. त्यांच्या

गाण्यांचे 'बिस्वासी बनाई' हे पुस्तक केवळ ब्राह्मो घरातच नाही; इतर पंजाबी घरांतूनही संग्रही ठेवले जाई.

भाई छत्तर सिंगांचे नाव ब्राह्मो समाजातल्या लोकांनाही फारसे परिचित नाही. ते फार लवकर वारले. साधुसेवा सिंगांप्रमाणे त्यांनीही स्वतःची पर्वा न करता ब्राह्मो समाजाची सेवा केली. समाजाचे कुठेही काही काम निघाले, की भाई छत्तर सिंग सर्वांच्या पुढे असत. ते गरीब होते. मला वाटते, रेल्वेच्या एका कचेरीत ते २० रुपयांवर कारकुनाची नोकरी करीत होते. भांडखोर आणि संतापी पत्नीमुळे घरी ते सुखाला पारखे झाले होते. असे असूनही ते नेहमी हसतमुख असत. त्यांचा तो हसरा चेहरा पाहून कुणालाही आनंदच होई आणि त्यांच्या ब्राह्मो समाजाच्या कामातला अतिउत्साह पाहून सर्वात उदास माणसालाही स्फूर्ती येई. भाई छत्तर सिंग हे खऱ्या अर्थी धार्मिक होते. ते मरणासन्न झाले असताना मी त्यांच्या जवळ होतो. जाण्यापूर्वी ते खाटेवर पडले होते ते आपल्या इतक्या क्षीण परिस्थितीतही हाताने काहीतरी तरी सांगत आहेत, असे मला वाटले; पण काय ते कळत नव्हते. नीट पाहताना माझ्या लक्षात आले की ते काहीतरी लिहीत आहेत. तेव्हा मी आणखीच बारकाईने पाहू लागलो. तेव्हा त्यांची बोटे 'वाचन' असा शब्द लिहीत आहेत असे वाटले. मग कुणाला तरी बोलावून धार्मिक ग्रंथातले उतारे वाचायला व स्तोत्रे म्हणायला सांगितले, तेव्हा त्यांच्या बोटांची हालचाल थांबली आणि एक-दोन तासांनी त्यांना मृत्यू आला. आपल्या पंथाचे काम करणे म्हणजे त्यांना आपले परमकर्तव्य वाटत असे. घरातील अशांत परिस्थिती आणि पंथाचे काम करण्याची तळमळ या दोन्हींमध्ये त्यांच्या जवाची जी घालमेल होई, त्याचा माझ्या मनावर खोलवर परिणाम झाला.

या सगळ्या तपशिलात मी ह्या लेखातली बरीच जागा घेतली आहे; पण लाहोरमध्ये असताना ब्राह्मो समाजात माझा संपर्क कोणत्या प्रकाराच्या माणसांशी माझा संबंध आला त्याची जराशी कल्पना देण्यासाठी मला इतके सर्व सांगणे जरूरच होते. एवढे लिहिले असले, तरी लाहोरात ब्राह्मो

समाजाच्या स्थापनेकरता नवीनचंद्र रायांइतकेच जबाबदार असलेले अजून चार जण होते, त्यांच्याविषयी मी काही लिहिलेले नाही. ते सगळे आपापल्या परीने उल्लेखनीय आहे. समाजातील सर्वसामान्य माणसांपेक्षा अधिक प्रामाणिक, धैर्यवान आणि सुस्वभावी असे ते चारही जण होते. मी सांगतो आहे तो काळ म्हणजे सन १८८० ते ९० चा काळ. तेव्हा सर्व मनुष्यांत बंधुभाव आहे असे शिकवणे हे किती अवघड होते याची कल्पना आजच्या वाचकाला कदाचित् येणार नाही. आपल्या देशातील श्रीराम, श्रीकृष्ण, साधुसंत, द्रष्टे, यांच्याप्रमाणेच जगातल्या इतर ठिकाणचे प्रबोधनकार महम्मद पैगंबर, येशू ख्रिस्त हेही पूजनीय आहेत, हे सांगायला तेव्हा फार धैर्य लागत असे. कित्येक हिंदू ग्रंथांतून आणि प्रबोधनकारांच्या गीतांमधून असे बंधुभावाचे विचार व्यक्त झाले आहेत, असे मला कुणी दाखवू नये. स्वतःला सुधारक म्हणवणाऱ्या सुशिक्षित लोकांनी असल्या विषयांवर सार्वजनिक चर्चेत भाग घेण्याचे मला आव्हान दिले होते. ब्राह्मो समाजात एखाद्या प्रवचनात येशू ख्रिस्त किंवा पैगंबर हे महान प्रबोधनकार होते याचा नुसता उल्लेख आला, तरी ते सभागृह रिकामे व्हायला सुरुवात होई आणि शेवटी केवळ ब्राह्मो सभासदच राहत असत, असे मी स्वतः पाच-पंचवीस वेळा पाहिले आहे; म्हणून मला ते आवर्जून नमूद करायचे आहे. अशा वेळी सभागृहातून बाहेर पडताना, 'हे तर ख्रिश्चन आहेत', 'हे लोक पैगंबरभक्त आहेत', 'ह्यांना स्वतःचा धर्मच नाही', किंवा 'हे सगळे अराष्ट्रीय झाले आहेत' असे शेरे लोक मारत असत. माझे मित्र भाई काशीराम ह्यांना तर त्यांच्या समाजाने वाळीत टाकले होते. एखाद्या ख्रिश्चन मिशनऱ्याच्या घरी चहा प्यायला एवढ्या कारणावरून कित्येक सुशिक्षित लोकांनी माझी तोंडावर निर्भर्त्सना केली होती. आणखी दोन कारणांवरून दोन वेळा मला असा छळ सोसावा लागला होता. सन १८८२ मध्ये नव्यानेच ख्रिश्चन झालेल्या एकाला मी पुन्हा हिंदू धर्मात घेतले म्हणून आणि एकदा मुसलमान माणसाला पुन्हा हिंदू व्हायचे होते म्हणून मी त्याच्याबरोबर जेवलो, म्हणून. एक मेजवानी देऊन मी व

हरकिशन लाल त्या माणसाबरोबर जेवलो आणि हिंदू-धर्मात पुन्हा प्रवेश करण्याची त्याची इच्छा पूर्ण केली. १८९० ते १९०० या दशकाच्या सुरुवातीला केव्हा तरी एका सार्वजनिक सभेला मी गेलो होतो. त्या सभेच्या वेळी मिठाई वाटायची होती; पण ती वाटण्यापूर्वी मला आणि भाई काशीरामला सभागृहातून निघून जायला सांगण्यात आले. त्या सांगणाऱ्यांत सुशिक्षित मंडळी होती; रायबहाद्दर आणि जिल्हा न्यायाधीश हेही सामील होते. त्या सर्वांबरोबर त्या सतरंजीवर आम्ही दोन ब्राह्मो बसलो होतो; म्हणून त्याना मिठाई वाटता येत नव्हती. अशा प्रकारची असंख्य उदाहरणे देता येतील. ह्या उदाहरणांवरून ब्राह्मो समाजाचा कसा तिरस्कार केला जाई, हे वाचकांच्या लक्षात येईल.

मी ब्राह्मो समाजाचा पूर्ण सभासद केव्हा झालो, हे मला आठवत नाही; पण लाहोरमध्ये आल्यानंतरच्या एक-दोन वर्षांतच मी त्यांचा सहानुभूती-सभासद झालो होतो. माझा त्या कार्यातला रस पाहून इतर ब्राह्मो समाजींनी मला पक्क्या सभासदाप्रमाणे वागवायला सुरुवात केली. भाई काशीरामच्या सहाय्याने मी 'यंग मेन्स रिलिजस असोसिएशन'ची स्थापना केली. आमची दर आठवड्याला ब्राह्मो मंदिरात बैठक होत असे. मी सचिव होतो. या असोसिएसनचे सभासदत्व सगळ्या ब्राह्मो समाजींना आणि त्याच्या सहानुभूतांना खुले होते. आम्ही प्रार्थना, सभा, व्याख्याने आणि वादविवादात्मक चर्चा आयोजित करीत असू. आमचे असोसिएशन फार कार्यशील ठरले. विशेषतः आमच्या वादविवादात्मक चर्चांकरता अनेक लोक येत असत. बाहेरचे लोक सर्रास येत व वादविवादाची सुरुवात करीत. तिथे दिलेल्या माझ्या व्याख्यानांचा सारांश छापून त्याच्या पत्रिका काढल्या होत्या. त्यापैकी 'बुक रिव्हिलेशन' ही पत्रिका ब्राह्मो समाजाच्या ग्रंथ विभागात विक्रीकरता बरेच दिवस ठेवली होती. बुक रिव्हिलेशन, देवाचे अस्तित्व, वाईट प्रवृत्तींचे अस्तित्व, प्रार्थना इत्यादी विषय आमच्या चर्चांकरता असत. धार्मिक व सामाजिक विषयांवरच्या वादविवादात्मक चर्चांचा तो सुकाळ होता. कधी-कधी टेनिसन आणि विज्ञान, इंग्रजी

काव्यातला गूढवाद, एक नीतिवादी म्हणून शेक्स्पीयर, सर वॉल्टर स्कॉट यांच्या कादंबऱ्या, असे विषयही क्वचित असत. ब्राह्मो मंदिराजवळ आणखीही दोन ठिकाणी अशा चर्चा आयोजित केल्या जात. एक म्हणजे, रामजी दास पब्लिक रोस्ट्रम आणि दुसरे म्हणजे लताफटे सभागृह. पहिले ठिकाण म्हणजे एक दुकान होते. ते अनारकली बाजाराकडून हॉस्पिटल रोडने ब्राह्मो मंदिराकडे जाताना डाव्या हाताच्या कोपऱ्यावर होते. त्याचा दरवाजा बाजाराच्या दिशेला होता. श्रोते जमायला ते फार सोयीचे ठरे. रामजी दास आता कोणत्याही एका पंथाशी सख्य ठेवत नव्हते; पण त्यांचा दृष्टिकोन उदार होता. पूर्वी ते ख्रिश्चन झाले होते, मुसलमानही झाले होते आणि इतरही धर्म त्यांनी स्वीकारले होते. ते मुळातले कुसूरचे होते. सुरुवातीला त्यांनी आपला एक पंथ सुरू केला होता. शेवटी ते लाहोरला कायमचे रहायला आले होते. ते फार साधे होते. कधी गरज पडली, तर एखाद्या मित्राकडे जाऊन एकादा रुपया घेत. एकदा एखादी गोष्ट पटली की ते माघारी फिरत नसत. त्यांचा बहुतेक सारा वेळ पब्लिक रोस्ट्रमकरता जाई. लोकांना आवडतील असे दोन किंवा तीन विषय चर्चेकरता निवडत असत. चर्चा सुरू करायला कुणी पुढे न आल्यास ते स्वतःच सुरू करीत आणि कुणी बोलायला येईपर्यंत बोलत राहत. ज्या कुणाला बोलायचे असेल, त्याने प्रथम टेबलावर एक नाणे ठेवायचे, मग बोलायला सुरुवात करायची. त्यातून जे पैसे जमत, त्यातून दुकानाचे भाडे निघे. शिवाय रामजींनाही हातखर्चाला चार-आठ आणे राहत असत. अशा रीतीने संध्याकाळचे दोन-तीन तास रोस्ट्रमचे काम चालू असे. श्रोते बाजारात उभे राहत असत. सामान्यपणे हे श्रोते म्हणजे बाजारात येणारे-जाणारे लोक असत. कधी-कधी तरुण मंडळी, विशेषतः महाविद्यालयीन विद्यार्थी आपला एखादा विषय घेऊन त्यावर रोस्ट्रममध्ये जाऊन पोटभर बोलून घेत असत. इतर विद्यार्थ्यांप्रमाणे मीही रोस्ट्रममधल्या वादविवादात भाग घेत असे. एकदा विषय होता - बुक रिव्हिलेशन. मी त्या प्रसंगी माझ्या खिशातून पुस्तकाच्या आकाराचे कापलेले दगड घेऊन गेलो होतो. ते

माझ्या गावी बनत असत. त्यांचा उपयोग कागद-दडपणासारखा करीत असत. त्या प्रत्येकाची किंमत दोन-तीन आणे इतकी असे. माझे बोलणे सुरू झाल्यावर मी खिशातून एक दगड काढला व सर्वांसमोर धरत म्हटले, ''कुणी म्हणेल, की ह्या पुस्तकात ईश्वराचे सर्व सत्य सामावले आहे असे समजा.'' त्यानंतर मी दुसरा दगड बाहेर काढला व म्हटले, तर दुसरे कुणी सांगतील की ह्या पुस्तकात सर्व आहे. शिवाय असेही कुणी मानत असतील, की आपल्याच पुस्तकात ईश्वराचे सत्य साठवले आहे. इतरांचे कोणतेही म्हणणे नाकारण्याइतका त्यांचा आपल्या पुस्तकावर विश्वास असेल.''

चर्चा होत असे, असे दुसरे ठिकाण म्हणजे लताफट सभागृह. हेही ब्राह्मो मंदिराच्या जवळ होते. हे सभागृह म्हणजे मोकळी जागा होती. जवळपास एक थडगे असावे. सभागृहच काय; पण कोणत्याही स्वरूपाची इमारत तिथे नव्हती. तेव्हा सभागृह (हॉल) म्हटले, तरी प्रत्यक्षात ते एक मोकळे मैदान होते. त्याच्या एका बाजूला, रस्त्याच्या समोरच्या बाजूला एक उंचवटा होता, तो रस्त्यापेक्षा उंच होता.

इथल्या चर्चांची व्यवस्था कोण करीत असे, मला आठवत नाही; पण आठवड्यातून दोनदा निरनिराळ्या विषयांवर चर्चा किंवा व्याख्याने ठेवली जात. ऐन उन्हाळ्यात संध्याकाळी हा कार्यक्रम चाले. येथल्या चर्चा जरा उच्च दर्जाच्या असत. वाङ्मयावरही तिथे व्याख्याने होत असत. पब्लिक रोस्ट्रम आणि कमी भावनात्मक पण अधिक उपयोगी असा लताफट हॉल, अशी ही दोन ठिकाणे होती.

आज मागे वळून पाहताना वाद-विवाद स्पर्धांचा फारसा उपयोग झाला, असे वाटत नाही. आम्हा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना त्याचे आकर्षण वाटे. ह्याचे एक कारण म्हणजे अशा स्पर्धांतून आम्हाला सभेत बोलण्याची संधी मिळे. इंग्रजी भाषेचे ज्ञान वाढण्याकरताही त्यांचा उपयोग होई. सर्व व्याख्याने इंग्रजीतूनच दिली जात. एखाद्या अतिशय नाणावलेल्या उर्दू व्याख्यात्याचा अपवाद सोडला, तर एरवी उर्दूतले

भाषण खपवून घेतले जात नसे. बहुतेक सगळे वाद-विवाद पुष्कळ अंशी अवास्तव असत. त्याच्यामुळे भांडणाची भावना वाढीला लागे. वाद-विवादांची प्रथा आता पूर्णपणे नाहीशी झाली आहे, त्याबद्दल मला जराही वाईट वाटत नाही.

वाद-विवादात्मक चर्चा आयोजित करणाऱ्या केंद्रांबद्दल सांगताना मी वाहवून गेलो आणि ब्राह्मो समाजाच्या आठवणी दूर राहिल्या. पण व्यक्तिगत हकीगत सांगताना मूळ धारेपासून दूर जाणे अपरिहार्य आहे. माझी ब्राह्मो समाजाशी ओळख झाली, तेव्हा सबंध ब्राह्मो समाज कुचबिहारच्या एका लग्नावरून मतभेदांच्या भोवऱ्यात सापडला होता. लाहोरच्या ब्राह्मो समाजाने तटस्थतेची भूमिका स्वीकारली होती; पण प्रत्यक्षात तिथे साधारनिष्टांचे वर्चस्व होते. हिंदुस्थानातल्या ब्राह्मो समाजातून फुटून वेगळे झालेल्यांना साधारनिष्ट म्हणण्यात येते. ब्राह्मो समाजात त्या वेळी चाललेल्या मतभेदांबद्दल किंवा कलहांबद्दल इथे सांगण्याची मला गरज वाटत नाही; कारण त्यात मला काडीचा रस नव्हता आणि आजही नाही. कुणाला पाठिंबा देण्याकरतासुद्धा मी त्या भांडणात कधी भाग घेतला नव्हता. पण गंमतीची गोष्ट अशी की, दोन्ही बाजूंचे ठाम मतांचे अतिरेकी, कुणाचीच बाजू घ्यायला निश्चित नकार देणाऱ्या माझ्यासारख्याला खरा ब्राह्मो समजता येणार नाही, असे म्हणत असत. खऱ्या अर्थी तटस्थ राहणारे लोक अगदी कमी असत. आणि दोन्ही बाजूच्या नेत्यांचा माझ्यावर पूर्ण विश्वास होता. माझ्या बाजूने सांगायचे, तर मलाही दोन्ही बाजूच्या ब्राह्मो नेत्यांबद्दल सारखाच आदर वाटे.

शेवटी मतभेदांचे लोण लाहोरच्या ब्राह्मो समाजातही पोहोचले. त्याचा परिणाम ब्राह्मो समाजाचे दोन तट पडण्यात झाला. हे दोन तट आपापल्या प्रार्थना दोन वेगळ्या दिवशी घेऊ लागले - रविवार आणि बुधवार. हे नमूद करताना मला खेद होत आहे. एका प्रार्थनेचे पौरोहित्य लाल काशीराम किंवा भाई रल्लाराम भीमबात; करीत तर दुसऱ्या प्रार्थनेचे पुरोहित अग्निहोत्री किंवा नवीनचंद्र राय असत. असे असूनही त्या दोन तटातले

कलह अधिक उग्र होत गेले. अलिकडच्या काळात ब्राह्मो समाजाकडे आकर्षित झालेली तरुण मंडळी आणि इतर काही अशी मिळून बरीच मंडळी अग्निहोत्रींच्या भजनी लागली होती. अग्निहोत्रींना दुर्दैवाने, आपल्या कार्याला बंधन (ब्राह्मो नियमांचे) नसले, तर आपण अधिक उपयोगी कार्य करू शकू, असे वाटू लागले. त्यांच्या मित्रांनी त्यांचे मन वळवण्याचा बराच प्रयत्न केला; पण अग्निहोत्रींना अलीकडे जे यश मिळाले होते - विशेषकरून संन्यास घेतल्यापासून - त्यामुळे त्यांच्यात 'मी म्हणेन ती पूर्वदिशा' अशी वृत्ती बळावली होती. जो माणूस त्यांच्यातल्या बद्धिवादामुळे आणि सदसद्विवेकबुद्धिमुळे पूजनीय वाटे, तो माणूस पार बदलून गेला होता. सर्वसामान्य माणसांना मिळत नाही अशी दैवी शक्ती आपल्यात आहे, असे त्या बुद्धिवादी माणसाला वाटू लागले आणि पुढच्या आयुष्यात ते अधिक स्पष्ट दिसू लागले. अग्निहोत्रींसारख्या व्यक्तींचे जीवन हा मानवी मानसशास्त्राच्या अभ्यासाचा एक योग्य विषय ठरेल, असे मला कित्येकदा वाटे.

हे माझे स्वगतच आहे म्हणा ना ! शेवटी अग्निहोत्रींनी आपल्या धर्मोपदेशासाठी स्वतंत्र केंद्र स्थापण्याचे ठरवले. त्या कामी पुष्कळ ब्राह्मोंचा त्यांना पाठिंबा होताच; पण त्याच्यापैकी काहींनी त्या केंद्राचा गाभा रचला होता, असे मला त्यांच्यावर सर्वात अधिक भक्ती करणाऱ्या त्यांच्याच एका अनुयायाने म्हणजे श्राधे प्रकाशदेव यांनी सांगितले होते. हे केंद्र म्हणजे ब्राह्मो तत्त्वज्ञान शिकवणारे आणखी एक केंद्र आहे, अशीच पुष्कळांची समजूत होती. तटस्थ ब्राह्मो समाजापेक्षा इथे अधिक कळकळीने आणि आस्थेने ते शिकवले जाईल, अशी सर्वांची अपेक्षा होती. अग्निहोत्रींच्या एका पत्रकाने त्याच्यावर शिक्कामोर्तबच झाले. 'रूहानी जिंदगी' (आध्यात्मिक जीवन) नावाची एक प्रेरक पत्रिका अग्निहोत्रींनी प्रसिद्ध केली. त्याच्या प्रती ब्राह्मो घराघरातून पहायला मिळत. केवळ ब्राह्मोच नाही; तर इतरजनही आपापल्या धार्मिक पद्धतीला पूरक म्हणून त्या पत्रिकेचा उपयोग करीत. नव्या केंद्राला ' देव समाज' म्हणण्यात येई.

पहिल्या काही वर्षांत या केंद्राने झपाट्याने प्रगती केली. आम्ही देव-समाज म्हणजे ब्राह्मो समाजाची शाखा आहे, असे मानत होतो. मुख्य समाजापासून देवसमाज वेगळा करण्यास अग्निहोत्रींनी उद्युक्त होऊ नये म्हणून आम्ही त्यांच्या प्रार्थनेला मधुन-मधून जायचो. लवकरच त्यांनी एक मोठे घर बांधले आणि त्यात ब्राह्मो समाजाच्या सभागृहापेक्षा मोठे सभागृह बांधले. अतिउत्साही आणि निष्ठावान अनुयायांच्या पथकाच्या मदतीने अग्निहोत्रींनी आपला संदेश इतर जिल्ह्यांतही पसरवला. विशेष म्हणजे धार्मिक वाङ्मयाचा एक मोठा खंड तयार केला. हे सर्व चालू असताना अग्निहोत्रींच्यात एकाएकी एक मोठा बदल घडून आला. त्यांची देवावरची श्रद्धा अजिबात उडाली. आपला धर्म विज्ञानाच्या पायावर अधिष्ठित आहे, अशा विश्वासाने ब्राह्मो समाजाची दीक्षा घेताना जी प्रतीके त्यांनी उत्साहाने टाकून दिली होती, ती सनातन हिंदू धर्माची प्रतीके त्यांनी पुन्हा स्वीकारली.

हे सगळे कसे घडले? त्याची गोष्ट अशी. फिरोझपूरच्या एका आंधळ्या असलेल्या चंदासिंगबरोबरच्या खटल्यात अग्निहोत्री वाईट रीतीने हरले. अग्निहोत्रींना आपली बाजू बरोबर आहे असे वाटत होते; कोर्टाने मात्र त्यांच्या विरुद्ध निकाल दिला. "ईश्वर माझा असा पूर्णपणे घात कसा करू शकला? माझ्या सत्याधिष्ठित उद्दिष्टाला जर त्याने पाठिंबा दिला नाही, तर मानवतेकरता त्याचा काय उपयोग आहे?" असे ते तेव्हा म्हणाल्याचे सांगतात. नीतिमत्तेच्या ऱ्हासाइतकी दुःखद गोष्ट दुसरी कोणतीही गोष्ट असू शकत नाही. अनेकांप्रमाणे त्यांची परिस्थिती झाली; म्हणजे ते आपल्या मूळ उद्देश विसरले. सुकाणू आणि होकायंत्र नसलेल्या जहाजाचे दोर कापले, तर ते समुद्रातल्या वादळात जसे नुसते हेलकावे करीत राहील, तसे अग्निहोत्रींचे झाले. अशा वेळी न डगमगता उभे राहायला धैर्य लागते, तेवढे अग्निहोत्रींकडे नव्हते. पण स्वतःच्या सदाचारीपणाच्या अभिमानात बुडून जाऊन ते स्वतःला मानवातली अत्युच्च व्यक्ती समजू लागले. या मुद्यावर आणखी सांगण्याचे कारण



अग्निहोत्री स्वतःचीच पूजा करून घेतील यावर माझा विश्वास बसला नसता.

नाही. आर्च एंजल लुसिफरने स्वर्ग गमावला आणि तो खाली पडला, एवढे सांगितले की पुरेसे होईल.

दहा-बारा वर्षांपूर्वी मी जसा माझ्या वडिलांच्या देवांची पूजा करायचो, तशी अग्निहोत्रींची साग्रसंगीत पूजा त्यांच्या अनुयायांनी केलेली मी माझ्या डोळ्यांनी पाहिली आहे. त्या बाबतीत माझा दृष्टिकोन काय होता, हे अग्निहोत्री व त्याचे शिष्य जाणत होते; तरीही माझ्या आयुष्यातले सर्वात क्लेशदायक दृश्य पाहण्याकरता मला बोलावणे पाठवले गेले. कारण मला सांगता येणार नाही. देवसमाजाच्या त्या सभागृहात गर्दी जमली होती. बहुतेक सर्व पुरुष होते. तुरळक स्त्रियाही उपस्थित होत्या. मला वाटते, त्यातले बहुतेक सर्वजण ते दृश्य पाहण्याकरता खास निमंत्रण देऊन बोलावलेले माझ्यासारखेच पाहुणे होते. सभागृहाच्या एका बाजूला एक व्यासपीठ उभारण्यात आले होते. मध्यभागी टेकायला पाठ असलेली एक लाकडी खुर्ची ठेवण्यात आली होती. खुर्चीच्या वर एक छत्री होती. तिच्या खांबाला फुले, पताका लावून सुशोभित केले होते. आम्हाला एका विशेष समारंभाकरता बोलावले होते हे दाखवणारा बराच पुरावा आजूबाजूला विखुरला होता.

आम्हाला फार वेळ वाट पहावी लागली नाही. सगळ्यांनी बसून घेतल्यावर शेजारच्या खोलीतून लाल रेशमी वस्त्र आणि सोनेरी मुकुट घालून अग्निहोत्री अवतरले. डेरा इस्माइल खान गावी शेठ कल्याणदासांच्या अंगणात रासलीलेचे खेळ होत असत, ते मी पुष्कळदा पाहिले होते. त्यातल्या कृष्णापेक्षा अग्निहोत्रींचे रूप फार निराळे नव्हते. त्यांचे शिष्यगण त्यांच्या मागे-पुढे होतेच. त्यांनी त्यांना व्यासपीठावर छत्रीखाली नेऊन बसवले.

त्या दृश्याने मला अत्यंत विषाद वाटला. पण तेवढ्याने समारंभ संपला नव्हता. अग्निहोत्रींसारखा माणूस इतरांकडून आपली पूजा करून घेतो, या गोष्टीवर माझा कधीही विश्वास बसला नसता. पण इथे तर मी आपल्या डोळ्यांनी प्रत्यक्षच बघत होतो. दिवे, अत्तरे, फुले वगैरे वस्तू

एका तबकात ठेवल्या होत्या आणि चांगली शिकली-सवरलेली माणसे, पदवीधर माणसे आपले शिक्षण विसरून तबकातल्या वस्तूंनी एका व्यक्तीची पूजा करीत होती. त्यापेक्षा अधिक हीन दुसरे काही असू शकणार नाही. त्यानंतर माझे बी.ए. झालेले मित्र गुरमुखसिंग पाच जणांना घेऊन आले आणि त्यांनी सुमारे पाचशे माणसांसमोर अग्निहोत्रींची आरती केली. ते दृश्य पाहून मला अपरिमित यातना झाल्या. नकळत माझ्या डोळ्यांतून अश्रू गळू लागले. मला सल्ला देऊन आणि स्वतःच्या वर्तणुकीने ब्राह्मो समाजाकडे आकर्षित करणारा माणूस तो हाच का, असा प्रश्न मी पुन्हा-पुन्हा स्वतःला विचारत राहिलो.

त्या क्लेशदायक प्रसंगानंतर देवसमाज आणि त्याचे संस्थापक यांच्याशी आपल्याला काहीही कर्तव्य नाही, असे मी ठरवून टाकले. पुढे काही वर्षांनंतर युनिव्हर्सिटी कॉन्व्होकेशन हॉलजवळच्या रस्त्यावर एक दिवशी सकाळी मला अग्निहोत्री दिसले. माझ्याशी बोलण्याकरता ते थांबले. आमच्यात त्या वेळी जो संवाद झाला तो असा -

अग्निहोत्री : फार दिवसांत तुम्ही मला भेटायला आला नाहीत.

मी : आपले मार्ग भिन्न आहेत. तुम्ही एका वाटेने जाता; तर मी दुसऱ्या.

अग्निहोत्री : माझ्याबद्दल तुम्हाला काहीच आदर राहिला नाही का?

मी : नाही. मला ब्राह्मो समाजाकडे आकर्षित केल्याबद्दल मी तुमचा आभारी आहे. तुम्ही माझ्यासाठी जे केलेत, त्याकरता तुमचा मला आदर वाटतो.

अग्निहोत्री : जर माझ्याविषयी तुम्हाला आदर आहे, तर तुम्ही माझे शिष्य का होत नाही?

मी : महाराजजी, कोणत्याही मार्गदर्शनाकरता अगदी प्रथम स्वतःची बुद्धी आणि सदसद्विवेकबुद्धी यांच्यावर अवलंबून रहा, असं तुम्ही मला शिकवलंत; म्हणून मला तुमच्याबद्दल आदर आहे. महान व्यक्तींना मान द्यावा; पण त्यांची शिकवण आपल्या बुद्धीला आणि

सदसद्‌विवेक बुद्धीला पटली तरच त्यांचा शिष्य बना, असं तुम्ही मला शिकवलंत. आज मी जे काय करतो, त्यात तुमचा सल्ला मानतो; कारण तो मला पटतो. तुम्ही तुमची पूर्वीची शिकवण टाकून दिलीत. तुम्ही शिकवलेत आणि उदाहरण घालून दिलेत म्हणून समातन हिंदू धर्मातला जातिवाद आणि इतर चालीरीती मी टाकून दिल्या; आणि आता तुम्ही त्या मानू लागलात.

अग्निहोत्री : अच्छा !

एवढाच एक शब्द बोलून ते तडक निघून गेले. त्यानंतर मी त्यांना कधीही भेटलो नाही. नास्तिकवादाचे भय मला कधी वाटले नाही. पण जो संशयवादी आहे, त्याने आपल्याला ईश्वराच्या अस्तित्वाविषयी ज्ञान नाही, असे मानणे अधिक उचित ठरेल, असे मला वाटते, हे इथे सांगायला पाहिजे. चार्लस् ब्रॅडलॉ, ॲनी बेझंट आणि सेक्युलर सोसायटीच्या सभासदांनी प्रसिद्ध केलेले नास्तिकवादासंबंधीचे बरेच वाङ्मय मी जिज्ञासेने वाचले होते. ब्रॅडलॉंची मी दोन-तीन चरित्रे वाचली होती, त्यांच्याविषयी मला मनापासून कौतुक वाटते असे मी अभिमानाने सांगतो; पण त्यांचा नास्तिकवाद मला पटला नाही. प्रामाणिकपणा, सत्यता, निर्भयता, गरिबांना आणि गरजवंताना मदत करण्याची वृत्ती, गंभीर स्वरूपाची जोखीम पत्करूनही पारतंत्रातल्या देशांकरता लढण्याची तयारी हे ब्रॅडलॉंचे गुण होते. त्या गुणांच्या एक दशांशाने गुण आस्तिक म्हणवणाऱ्यांच्यात असायला हवे होते, असे मला कित्येकदा वाटते. १८६० मध्ये इटलीतल्या देशभक्तांनी स्वतंत्र्याची चळवळ चालवली होती. त्या चळवळीच्या अगदी कठीण आणि धोक्याच्या वेळी मॅझिनीला त्यांनी व्यक्तिशः मदत करण्याची तयारी दाखवली होती, ती कोणत्याही मानवतावाद्याला प्रेरक ठरेल अशीच होती. त्यांनी ए.ओ.ह्यूमना लिहिलेले एक पत्र माझ्या वाचण्यात आले होते. ब्रॅडलॉंनी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीत जो त्याग केला होता, त्याबद्दल इंडियन नॅशनल कॉंग्रेसच्या संस्थापकांनी काही आर्थिक मदत देऊ केली होती, ह्या गोष्टीबद्दल

ब्रॅडलॉंनी त्या पत्रातून टोकले होते. ते ह्यूमवर फार रागावले होते; आणि आपण केलेल्या कामाबद्दल नुकसानभरपाईची भाषा जर कधी पुन्हा ऐकली, तर पाठिंबा देण्यास अयोग्य असे समजून कॉंग्रेससाठी काही करणे सोडून देईन, असे बजावले होते. मी ब्रॅडलॉंना पाहिले होते, ऐकलेलेही होते. प्रकृतीच्या कारणाने एवढा जिकिरीचा प्रवास करून ते हिंदुस्थानात आले होते. आणि त्या वेळी मुंबईत भरलेल्या कॉंग्रेसच्या पाचव्या अधिवेशनाला उपस्थित राहिले होते. १८८९ च्या डिसेंबरमध्ये भरलेल्या त्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते सर विल्यम वेडरबर्न.

अग्निहोत्रींविषयी माझी नाराजी दाखवण्याकरता मी विषयांतर करून ब्रॅडलॉंच्या विषयी सांगितले. ब्राह्मो समाजाशी आपले संबंध तोडून टाकण्याकरता आणि त्या सर्व शक्तिमानाच्या अस्तित्वाविषयीची श्रद्धा सोडून देण्याकरता अग्निहोत्रींनी काम काय उलट-सुलट उड्या मारल्या होत्या आणि कोणताही मानव घेऊ शकणार नाही आणि घेऊ नये असे अत्यंत उच्च स्थान त्यांनी घेतले, तेव्हा माझी सहनशक्ती संपली.

ब्राह्मो समाजाचा पक्का सभासद मी केव्हा झालो, ते मला आठवत नाही; पण मला नोकरी लागण्यापूर्वी झालो नव्हतो, हे नक्की. अग्निहोत्री, नवीनचंद्र राय, लाला काशीराम आणि इतर ब्राह्मोंच्या सहवासात आल्यानंतर मी माझे जानवे काढून टाकले आणि जातींवरचा माझा विश्वास उडाला. ब्राह्मो समाजाच्या महत्त्वाच्या कार्यक्रमांना मला नेहमी आमंत्रण असे. त्या काळात त्या समाजाच्या उत्सवाचा 'प्रीतिभोजन' हा एक महत्त्वाचा भाग असे. प्रीतिभोजनाला मी नियमितपणे जात असे. मी अजून ब्राह्मो झालो नव्हतो; तरीपण माझ्या सवयी आणि वागण्याची पद्धत ही उदारमतवादी असल्याने मी निश्चितपणे ब्राह्मो होणार याचा सर्वांना विश्वास वाटत होता. लाला हंसराजांचे मोठे भाऊ मुल्कराज भल्ला. त्यांचे लग्न लाला बेनीप्रसाद यांच्या मुलीशी झाले. त्या लग्नाला गेल्याचे मला आठवते. ब्राह्मो समाजाच्या सभागृहात ब्राह्मिक पद्धतीने तो विवाह पार पडला. मला वाटते, नवीनचंद्र रायांविषयी थोडे सांगण्याची वेळ झाली

आहे. ज्या गोष्टी मला सांगायच्या आहेत, त्या आज विद्यमान कोणत्याच व्यक्तीला माहीत नसतील. बाबू नवीन चंद्र १८६९ साली लाहोरात आले. तेथे ओरिएंटल महाविद्यालयात उपप्राचार्यपद आणि पंजाब विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिवपद अशी दोन्ही पदे ते सांभाळत होते. पंजाब विद्यापीठाला पदवी देण्याची परवानगी १८८२ मध्ये मिळाली. तोपर्यंत तिथे परीक्षा घेतल्या जाऊन केवळ डिप्लोमा दिले जात असत. नवीनचंद्र ही एक असामान्य व्यक्ती होती. पंजाबमध्ये हिंदी वाङ्मयाची सुरुवात होण्याला ते जबाबदार आहेत असे म्हटल्यास वावगे होणार नाही. त्यापूर्वी एखादे हिंदी पुस्तक पंजाबात लिहिले गेल्याचे ऐकिवात नव्हते. ते स्वतः हिंदीतून पुस्तके लिहीत असतच आणि स्थानिक पंडितांना हिंदीतून लिहिण्याचा आग्रह करीत. हिंदीतून लिखाण करण्याकरता लोकांनी प्रवृत्त व्हावे म्हणून कधी-कधी आपण एखादे पुस्तक लिहीत आणि दुसऱ्या कुणाला तरी त्याच्या नावावर प्रसिद्ध करायला सांगत, असे म्हणत. ते स्वतः अतिशय निःस्वार्थी होते आणि दुसऱ्याचे चांगले करावे असे त्यांना सतत वाटत असे. सल्ला विचारायला आणि मदतीला त्यांचा दरवाजा कुणाहीकरता नेहमी खुला असे. त्यांचा मोकळा वेळ त्यांना भेटायला आलेल्यांना शिकवणे, धर्मोपदेश देणे, सल्ला देणे आणि मदत करणे यातच व्यतीत होत असे. अख्बार-इ-आम याचे खरे संस्थापक नवीनबाबू होते, हे पुष्कळांना माहीत नसेल. त्याची हकीगत अशी - 'अंजुमन-इ-पंजाब'साठी पंडित मुकंदराम काम करीत होते. पण ते पत्रक अक्षरशः पंजाब विद्यापीठाच्या आधिपत्याखाली होते. आपल्या दोन मुलांनी काय करावे असा सल्ला पंडित मुकुंदरामांनी नवीनबाबूंना विचारला. त्या दोघांनी उर्दूमध्ये साप्ताहिक किंवा पाक्षिक सुरू करावे असा नवीनबाबूंनी त्यांना सल्ला दिला. ते स्वतः हिंदीतून टिप्पण्या व बातम्या लिहून देतील. मुलांनी त्याचे उर्दूत भाषांतर करावे असे त्यांनी सुचविले. 'अख्बार-इ-आम'ला अशी मदत त्यांनी बराच काळ केली. १८८० ते ९० या दशकात पंडित मुकंदरामांचे मुलगे सरकारी महाविद्यालयाच्या सभागृहात बरेचदा

दिसत. बहुतेक वेळा ते सी.अँड.एम्. गॅझेटमधून काही टिप्पण्या त्यांच्या साप्ताहिकात छापण्याकरता उतरवून घेत असत. नवीनचंद्रांच्या अनेक सत्कृत्यांत आणखी एक विशेष काम म्हणजे एका अनाथ मुलाला घरी आणून त्याचे पालन-पोषण करून, शिकवून त्याला एक प्रतिष्ठित नागरिक बनवला, हे होय.

एकदा रस्त्यात एक मुलगा भीक मागताना नवीनचंद्रांना दिसला. चौकशी केली तेव्हा कळले की त्याला आई-वडील नाहीत. एक भाऊ सोडला, तर त्याला कोणी नाही. भावालाही स्वतःलाच काही मदत मिळाल्यास हवी होती. नवीनचंद्रांनी त्याला आपल्या घरी नेले आणि 'उधो'च्या नावावर एक खाते चालू केले. उधो हे त्या मुलाचे नाव होते. तेवढ्या भांडवलावर उधोला त्यांनी उकडलेले चणे विकायचा धंदा चालू करून दिला. उधो त्यांच्या स्वयंपाकघरात जेवे आणि मग उकडलेल्या चण्यांची टोपली घेऊन रस्तोरस्ती हिंडे. रोज किती नफा होई, ते नवीनचंद्र स्वतः बघत असत. त्याचा रोज हिशोब ठेवला जाई. काही महिन्यांनंतर उधोच्या शिलकीत काही रुपये जमले.

त्यानंतर उधोचा चणे विकण्याचा धंदा नवीनचंद्रानी बंद केला आणि त्याला ते लिलावाच्या ठिकाणी घेऊन जाऊ लागले. लहान-सहान वस्तूकरिता तेच उधोकरता किंमत बोलत. ज्या वस्तू विकत घ्यायला उधोला परवडेल आणि ज्या सहज विकल्या जातील, अशा वस्तू म्हणजे पुस्तके, आरसे, काचेची भांडी इत्यादी वस्तू ते पसंत करीत असत. कोणती वस्तू कुणाकडे विकायला न्यावी, हे ते उधोला सांगत. उदाहरणार्थ, विज्ञानाचे एखादे पुस्तक असले, तर ते अमुक प्राध्यापकाकडे घेऊन जा, अमुक इतकी किंमत सांग, असे त्याला सांगत. अशा सर्व बारीक गोष्टीतसुद्धा नवीनचंद्रांचे मार्गदर्शन उधोला मिळे. त्यांच्या सल्ल्याने काम करून उधोकडे काही शेरुपये साठले. वापरलेली पुस्तके विकत घेऊन ती गरजू विद्यार्थ्यांना विकून उधोला सर्वात जास्त नफा होत असे. कधी ही खरेदी काही आण्यांत होई आणि विक्री मात्र काही रुपयांत

होई. त्यानंतर उधोच्या वाढीचा तिसरा टप्पा सुरू व्हायला हरकत नाही, असे नवीनचंद्रांना वाटले; आणि त्यांनी अनारकली बाजारात एक लहानसे दुकान भाड्याने घ्यायचा उधोला सल्ला दिला. निरनिराळ्या ठिकाणी विकत घेतलेल्या वस्तू उधो त्या दुकानात ठेवू लागला. कधी नवीनचंद्रांच्या देखरेखीखाली, तर कधी एकटा असे काम करू लागला. हे सर्व लहान-लहान बारकावे मी प्रत्यक्ष उधोच्या तोंडून ऐकले आहेत. पुढे तो उधो मिसार या नावाने ओळखला जाऊ लागला; आणि लाहोरात सर्वांना परिचित असा गृहस्थ झाला. नंतर त्याने मोठे दुकान भाड्याने घेतले; तरीही त्याच्या वस्तूंची साठवण त्याला दुकानामागच्या गोडाऊनमध्ये करावी लागे. आयुष्याची शेवटची बरीच वर्षे तो खेळांच्या वस्तूंचा व्यापार करीत होता. मी एकदा त्याला त्याच्या मालाची किंमत विचारली, तर कुणी चाळीस हजार रुपये देऊ केले तरी तो आपला माल देणार नाही, असे तो म्हणाला. नवीनचंद्र राय आणि ब्राह्मो समाजाशी त्यांचे संबंध निकटचे होते, हे स्वाभाविक आहे. सन १८८६ मध्ये नवीनचंद्र राय सेवानिवृत्त झाले आणि त्यांनी पंजाबही सोडला. त्यानंतर उधो अग्निहोत्रींच्या देवसमाजात जाऊ लागला. शेवटपर्यंत तो तिथे जात असे. उधोने आपल्या भावाच्या मुलीचा सांभाळ केला; तिला थोडे शिक्षण दिले. त्या कामात त्याला नवीनचंद्र आणि अग्निहोत्री या दोघांचा पाठिंबा होता. कालांतराने अग्निहोत्रींनी त्या मुलीशी लग्न केले. त्यांची पहिली बायको जाऊन काही वर्षे झाली होती. उधो मिसारची राहणी साधी होती. त्याचे कपडेही साधे असत. रस्त्यावर सापडलेल्या या मुलाला नवीनचंद्र रायांनी घरी आणले व सांभाळले. त्या अभाग्याचे त्यांनी एका समाजात मान असलेल्या, साध्या सरळ आणि अजिबात दिखाऊ नसलेल्या एका नागरिकात रूपांतर केले. अग्निहोत्रींच्या भक्तगणांत उधोइतका मनापासून काम करणारा, विश्वासू व निष्ठावंत भक्त दुसरा कुणी असेल, असे मला वाटत नाही.

माझ्या स्वतःच्या आयुष्याबद्दल लिहिताना ह्या लेखात मी बरेच विषयांतर केले; माझ्या मूळ विषयापासून दूर गेलो. तसे करून मला दाखवून द्यायचे आहे की, शाळा व महाविद्यालयातील शिक्षणानेच फक्त माणूस बनत नसतो; त्याच्या भोवतालचा समाज त्याच्यावर काही सखोल संस्कार करीत असतो. ते संस्कार कधी त्याच्या जीवनामार्गावर प्रभाव पाडतात; तर कधी त्याच्या मानसिक आणि नैतिक जडणघडणीचा अविभक्त भाग होऊन जातात. कदाचित् हे माझ्यासारख्याच्या बाबतीत अधिक खरे ठरत असेल. लहानपणापासून मला आपली काळजी घ्यावी लागली होती. त्या वयात मी संपूर्णपणे नव्या वातावरणात आलो नव्या जगाशी माझा अगदी जवळून संबंध आला. ते नवे वातावरण इतके जबरदस्त होते, की त्याने मला मोहवून टाकले.

♦♦♦

आत्मसन्मान राखण्याचे धोरण व तंत्र

१९ व्या शतकातील शेवटची तीन दशके हा व्हिक्टोरिया राणीच्या वैभवाचा काळ समजला जातो. त्याच काळात मध्यमवर्गीय भारतियांपुढची सर्वात मोठी समस्या होती - 'आपला मान कसा राखावा?' आज ज्यांनी चाळिशी ओलांडली नाही, त्यांना मी काय म्हणतो ते कळायला फार अवघड जाईल. त्या काळात साम्राज्यवाद्यांना आपल्या देशाविषयीचा दुरभिमान वाटे. त्या दुरभिमानाने ते मदोन्मत्त झाले होते, असे म्हणतात ते योग्यच आहे. आफ्रिकेतल्या प्रदेशाला ते 'मानवाने न व्यापलेली जागा' असे अपमानास्पद नाव देत. त्या भूभागासाठी युरोपियांची झोंबाझोंबी चाले. नव्यानेच सापडलेल्या 'प्रभावाखालील क्षेत्र' या तत्त्वाचा पूर्वेत ते पुरेपूर वापर करीत होते. तत्कालीन मुत्सद्यांना तर सत्तेची नशा चढली होती. 'या प्रदेशांवर आमची संस्कृती लादण्याचे काम नियतीनेच आमच्यावर सोपवले आहे', असे ते एका बाजूला म्हणत; आणि त्या प्रदेशातील लोक जर त्यांची संस्कृती आत्मसात् करून युरोपियांचे अनुकरण करू लागले, तर ते लोक त्यांना तिरस्करणीय वाटत. स्वातंत्र्याची भाषा बोलणारे हे लोक आपल्या हुकुमतीत असलेल्या प्रदेशातल्या भूमिपुत्रांची संपत्ती बिनदिक्कत लुबाडीत होते. दोन भिन्न प्रकारच्या संस्कृतींत जेव्हा संघर्ष होतो, तेव्हा गैरसमज फैलावतात. डिझ्रायलीला खालच्या दर्जाचा मुत्सद्दी समजणारा ग्लॅडस्टोन स्वतः मुत्सद्दीच नव्हता, असे माझे मत आहे. मग खरा मुत्सद्दी कोण?

ग्लॅडस्टोनचा उजवा हात समजला जातो, त्या जॉन ब्राईटच्या शब्दांत सांगायचे तर, 'व्यक्तिगत व्यवहाराप्रमाणे आंतर्देशीय व्यवहारात जो नीतिमत्तेला महत्त्व देतो, तोच खरा मुत्सद्दी.'

तू - तू - तू - किधर जाता ? -

वर सांगितलेल्या विषयावर निबंध लिहिण्याचा माझा हेतू नाही; तर केवळ काही व्यक्तिगत अनुभवांची नोंद करण्याचा माझा मानस आहे. साम्राज्यवादी सत्ताधाऱ्यांच्या मस्तीखोर अभिमानाचा प्रत्यय मला प्रथम एका धक्कादायक अनुभवातून आला. तो मला व्यवस्थितपणे सादर करता येणार नाही, हे मी जाणून आहे. १९ व्या शतकाच्या ८ व्या दशकाच्या शेवटी किंवा ९ व्या दशकाच्या सुरुवातीला उन्हाळ्याच्या दिवसांत मी सिमल्याहून लाहोरला चाललो होतो. त्या काळी सिमला ते अंबाला हा प्रवास फक्त टांग्याने होत असे. कालका ते अंबाला या प्रवासात माझ्याबरोबर एक युरोपीय माणूस होता. तो बहुधा कालका येथे चढला असावा; कारण त्यापूर्वी त्याला पाहिल्याचे मला आठवत नव्हते. घग्गर पर्यंत म्हणजे अर्ध्यापेक्षा अधिक रस्ता जाईपर्यंत आमच्यात एका चकार शब्दाचीही देवाण-घेवाण झाली नाही. मागची दोघांची जागा त्याने एकट्याने घेतली होती. मी पुढे टांगेवाल्याजवळ बसलो होतो.*

घग्गरला आलो, तेव्हा तिथल्या ओढ्याला मोठा पूर आल्याचे दिसले. अशा वेळी हत्तीवर बसून ओढा ओलांडायचा आणि पलीकडे दुसरे वाहन घेऊन पुढे जायचे, अशी व्यवस्था असे.

हत्तीवर बसून आम्ही अर्धा-अधिक ओढा ओलांडला, तेव्हा एक धक्कादायक घटना घडली. आज जवळ-जवळ ५० वर्षांनंतरही त्या आठवणीने मला झिणझिण्या येतात. इतक्या वेळचा अबोला सोडून त्याने

** घग्गर हा डोंगरातून येणारा लहानसा ओढा आहे. एरवी तो काही मिनिटांतच पार करता येतो; पण मोठा पाऊस पडून गेला की ह्या ओढ्याला पूर येतो व तो असुरक्षित होतो.*

एकदम विचारले, ''तू - तू - तू - किदर जाता?'' विचारणाऱ्याला आपल्या भाषेची नीट ओळख नाही असे समजून मी त्यातल्या अपमानास्पद सुराकडे दुर्लक्ष केले; आणि त्याला इंग्रजीतून मी लाहोरला जात असल्याचे सांगितले. त्यावर एक शब्दही न बोलता त्याने माझ्या डोक्यावर वार केला व रक्त काढले. त्याने मी इतका गांगरून गेलो की काय करावे, ते मला सुचले नाही. आणि तेवढ्यात आम्ही तीरावर पोहोचलो होतो. पलिकडच्या तीरावर आम्ही शक्रममध्ये (टांगा नाही) बसलो, तेव्हा माझ्यावर वार का केलात, असे विचारले. उत्तरादाखल तो नुसता हसला व मला वाकुल्या दाखवू लागला. एवढे झाले तरी माझा राग मी शब्दातून किंवा कृतीतून दाखवला नाही. पण त्या प्रसंगाने मी विव्हल झालो; माझी मती कुंठित झाली. त्याच्यावर खटला भरावा असा विचार करून अंबाल्याच्या टनेज टर्मिनस्‌मधून त्याचे नाव व पत्ता घ्यायचे ठरवले. आपल्या हातात कायदा घेऊन त्याला धडा शिकवण्याचा विचार एक-दोन वेळा मला चाटून गेला; पण त्याच वेळी शहाणपणाचे विचारही आले - आता फार उशीर झाला आहे. 'त्याने प्रथम विनाकारण माझी खोडी काढली', असे मी सांगू शकत नव्हतो. असे भलतेच काही करून स्वतःलाच खोड्यात टाकेन, असे ते विचार होते.

अंबाल्याला पोहोचल्यावर टांगा ऑफिसमधून मी त्या माणसाविषयी माहिती काढली; पण लाहोरला जाणारी गाडी लगेचच सुटणार असल्याने त्यात जाऊन बसावे लागले. झालेल्या गोष्टीने आलेली माझी चीड शांत होईना. यशस्वीरीत्या त्या घटनेची भरपाई मी कशी करू शकेन, हा विचार माझा सतत पाठलाग करीत होता. त्या वेळी माझी जी तडफड झाली, त्याची तुम्हाला कल्पना येऊ शकेल; पण त्यातून सुटका करून घेण्याचा एकही मार्ग मला सापडेना. त्यातून तो माणूस नागपूरला राहत होता; त्यामुळे त्याला शिक्षा करण्याची शक्यता नव्हती. आगगाडीमध्ये घडलेले रागीटपणाचे पुष्कळ नमुने मी ऐकले होते, ते मला आठवू लागले. मला एक गोष्ट निश्चित माहीत होती - अशा प्रसंगाचा निर्णय काहीही झाला, तरी नंतर ते मला आपले लक्ष्य बनवतील. नोकरी जरी गेली नाही, तरी हर तऱ्हेने ते मला त्रास देतील.

पुढे चार महिने मी अशा यातनामय मनःस्थितीत काढले. आपला मान राखून घेण्याबाबत गाफील राहिलो याबद्दल स्वतःला एक-दोन वेळा थपडा मारून घेतल्या. शेवटी माझा आतला आवाज म्हणाला, ''हरकत नाही रुचिराम. मागचे सोडून दे; पण त्याचा गंभीरपणे विचार करून यापुढचे धोरण ठरव. आयुष्याची ही तर सुरुवात आहे. झालेल्या घटनेपासून धडा शीक. प्रेमळ आणि कडक, म्हणजे एकाच वेळी प्रेमळपण आणि कडकपण, असा जीवनासारखा दुसरा शिक्षक मिळणार नाही.''

हा उलगडा म्हणजे सर्व घटनेच्या अर्थाचा खरा उलगडा होता. अधिकारवाणीने दिलेल्या आज्ञेसारखा समर्थपणे माझ्यापुढे उभा राहिला. तो संदेश पुढे कित्येक दिवस मी मनात घोळवत होतो. संभवनीय असे प्रसंग मी मनात रचत असे. प्रत्येक प्रसंगाची परिस्थिती काळजीपूर्वक लक्षात घेऊन, आत्मसन्मानाचा बळी न देता, योग्य आणि सभ्यपणाचे नियम न मोडता, त्यातून काय मार्ग निघू शकेल, यावर खूप विचार करीत असे. स्वसंरक्षणार्थ कृती करताना आपण चुकीच्या बाजूला झुकता कामा नये. कोणत्याही प्रसंगी कायदा हातात घ्यायचा नाही (शारीरिक स्वसंरक्षण सोडून), आक्रमक व्यक्तीला किंवा व्यक्तींना दिलगिरी व्यक्त करायची संधी द्यायची, हे माझे सूत्र निश्चित झाले. त्यानंतर प्रत्यक्षात बारा-पंधरा अशा प्रसंगांना तोंड द्यायची माझ्यावर पाळी आली. भांडणाचा प्रसंग टाळण्याचा प्रयत्न करूनही उपयोग होईना, अशा वेळी माझ्या सूत्राप्रमाणे मी काय केले, हे पुढील तीन-चार प्रसंगांवरून दिसून येईल.

ठोशास ठोसा -

आगगाडीच्या प्रवासात कायम संघर्ष होत असत. अलीकडे असे संघर्ष पूर्ण नाहीसे झाले नसले, तरी खूपच कमी झाले आहेत. गेल्या शतकात

वर्तमानपत्रांच्या भारतीय विभागात अधून-मधून तशा घटना छापून येत असत. अशा संघर्षांना कितीतरी प्रतिष्ठित भारतियांना तोंड द्यावे लागल्याची उदाहरणे मला माहीत आहेत. त्या काळातले वातावरण कशा प्रकारचे असे, ते दाखविण्याकरता पुढील प्रसंग सविस्तर लिहीत आहे. माझ्या बाबतील घडलेले असे चार-पाच प्रसंग सहज देता येतील; पण एकाचाच उल्लेख पुरेसा होईल.

१९व्या शतकाच्या शेवटच्या दशकात एकदा मी सिमल्याला निघालो होतो. कालका स्टेशनवर गाडी बदलून छोट्या गेजची पर्वतीय आगगाडी घ्यावी लागे. दुसऱ्या वर्गाच्या डब्यात खिडकीजवळच्या जागेवर मी पिशवी ठेवली आणि बाकीचे सामान बुक करायला गेलो. त्या वेळी त्या डब्यात एका कोपऱ्यातल्या जागेवर एक युरोपीय माणूस बसला होता. सामानाची व्यवस्था करून मी दहा मिनिटांनी परत येऊन पाहतो, तर डब्यातल्या सर्व जागा भरलेल्या होत्या आणि माझी पिशवी बाहेरच्या कॉरिडॉरमध्ये पडली होती. त्यानंतर जे झाले, ते संवादात देणे अधिक उचित होईल.

मी : (माझ्या जागेवर बसलेल्या माणसाला उद्देशून -) तुम्ही चुकून माझ्या जागेवर बसला आहात. मी इथे ठेवलेली पिशवी कुणीतरी बाहेर टाकलेली मला आढळली.

तो : (गुरकावून) तुमच्याकरता इथे जागा नाही. पाहताय ना, सगळ्या जागा भरल्या आहेत. (सगळे बसलेले युरोपीय होते.)

मी : पण ही जागा माझी आहे. तिथे मी माझी पिशवी ठेवली होती. त्या वेळी डब्यात फक्त एकच जागा भरली होती. पिशवी इथे ठेवून मी माझ्या सामानाची व्यवस्था करायला गेलो होतो.

तो : ते काही मला माहीत नाही. तुम्ही दुसऱ्या डब्यात जागा शोधा, जा.

मी : त्यालाही मी हरकत घेतली नसती; पण आता फार उशीर झालाय्.

तो : मला त्रास देऊ नका. दुसरीकडे जागा बघा.

मी : पण ही जागा मी धरली होती. माझी जागा सोडण्याची मी तुम्हाला विनंती करतो आहे.

तो : चालते व्हा.

मी : ही जागा माझी आहे. तुम्हीच स्टेशनमास्तरकडे जाऊन दुसरीकडे जागा मिळवा.

तो : (हात उगारून) जाता का नाही?

मी : ही जागा माझी आहे. आणि तुम्ही मला मारलंत, तर मीही उलटून मारीन. (आवाज नरम करून) महाशय, तमाशा करू नका व माझी जागा मला द्या.

त्यावर त्याने मला डाव्या गालावर एक जोराची थप्पड लगावली. मला हे अपेक्षितच होते व मी तशा तयारीत होतोच. क्षणाचाही विलंब न लावता मी सर्वशक्तीनिशी त्याला एक सणसणीत लगावून दिली. डब्यातले बाकी प्रवासी नुसते बघत होते; पण त्या माणसाची बायको समोर बसली होती, ती उठली व मला छत्रीने मारणार होती. तेवढ्यात,

मी : (तिच्याकडे वळून, माझ्या हाताची घडी घालून) बाईसाहेब, मला मारायचं तर जरूर मारा. पण एक लक्षात ठेवा, तुमच्या प्रत्येक फटक्याच्या बदल्यात (हातांच्या हालचालीने सूचित करत) मी तुमच्या नवऱ्याला दोन फटके देईन.

ती किंचाळत स्टेशनमास्तरला बोलवायला गेली. स्टेशनमास्तर चांगला दणदणीत माणूस होता. तो मला मारणाऱ्या युरोपीय माणसाहून तगडा दिसत होता.

स्टेशनमास्तर: तुम्ही जरा बाहेर येता का? मी तुम्हाला दुसरी जागा मिळवून देतो. इथे जे घडलं, त्याचा वृत्तांत सिमल्याच्या पोलिसांना दिला जाईल. तिथे तुम्हाला कुणीतरी भेटायला येईल. इथल्या पोलिसांना येऊन चौकशी करण्याइतका वेळ राहिलेला नाही.

मी : (त्या युरोपियाकडे बोट दाखवून) ह्या माणसाने माझी जागा घेतली आहे. त्यालाच तुम्ही कृपया दुसरी जागा द्या. तो माझ्या जागेवर

बसला आहे. ही गोष्ट कोपऱ्यात बसलेल्या त्या माणसाला माहीत आहे.

स्टे.मास्तर : एवढं करायला मला वेळ नाही. पहिल्या वर्गाच्या डब्यात एकच जागा रिकामी आहे. नाहीतर मी त्या दोघांना तिकडं बसायला सांगितलं असतं.

मी : अजूनपर्यंत ती जागा रिकामी असेल कशावरून?

स्टे.मास्तर : तेही बरोबर आहे. तुमची पिशवी माझ्याकडे द्या; म्हणजे मी ती त्या जागेवर ठेवून तिथे एक माणूस बसवतो.

मी : ठीक. ही घ्या माझी पिशवी.

स्टेशनमास्तर जाऊन परत आला. त्याने मला पहिल्या वर्गातली आरामशीर जागा दिली आणि जाण्यापूर्वी 'सिमल्याला पोलिस अधिकारी तुम्हाला भेटतील' असे बजवायला तो विसरला नाही. काही स्टेशनांनंतर एक शिपाई माझ्यापाशी येऊन माझे नाव व पत्ता विचारू लागला. मी त्याला म्हटले,

''माझ्या जागेवर बसलेल्या त्या माणसाचे नाव व पत्ता आणि त्या डब्यात कोपऱ्यात बसून ज्याने मी पिशवी ठेवल्याचे पाहिले, त्या माणसाचे नाव व पत्ता मला तुम्ही दिलात, तर माझा पत्ता व नाव मी तुम्हाला आनंदाने देईन.''

त्या शिपायाने मला हवी असलेली माहिती मला आणून दिली, तेव्हा मीही त्याला माझे नाव व दोन ठिकाणचे पत्ते दिले. सिमल्याला उतरल्यावर मी पंधरा मिनिटे वाट पाहिली; पण मला भेटायला कुणीच आले नाही. त्याचे मला आश्चर्यही वाटले नाही. त्यानंतर त्या घटनेविषयी मी काही ऐकले नाही.

क्षणिक मनोरंजन' या दृष्टीतून -

सिमला रेल्वेस्टेशनवरच्या प्लॅटफॉर्मवर माणसांची वर्दळ चालू होती. बरेच सामानाचे डाग एके ठिकाणी ठेवले होते. त्याच्याभोवती बरीच युरोपीय मंडळी आपल्या बाकीच्या सामानाची वाट पाहत उभी होती. मी तिथेच उभा होतो. माझ्याजवळ एक गोरा उभा होता. आपल्या खांद्याने त्याने मला ढकलले. कदाचित् प्लॅटफॉर्म म्हणजे त्याला फुटबॉलचे मैदान वाटले असावे. मीही त्याला एक कोपरखळी दिली. त्यानंतर त्याने आणखी जोराचा धक्का मारला. मीही माझ्या कोपरांनी त्याला अधिक जोराने ढोसले. असे निदान तीन-चार वेळा झाले. असे आणखी चालू ठेवण्यात अर्थ नाही, असे त्याला वाटले असावे; कारण त्याचे धक्के बंद झाले. त्याबरोबर माझ्या कोपरखळ्याही थांबल्या. त्या वेळात आमच्यात एक शब्दही बोलणे झाले नाही. मीही चेहऱ्यावरची सुरकुती न हलवता आपले काम करीत होतो. त्या धक्काबुक्कीकडे क्षणिक मनोरंजन आहे, असे समजून पाहत होतो. त्याला अधिक उग्र स्वरूप येईल अशा अपेक्षेने मी तयारीत होतो; पण ती स्पर्धा अर्ध्यातच थांबली आणि मला त्याबद्दल वाईट वाटले नाही.

दुसऱ्या दिवशी मी माझ्या भारतीय मित्राबरोबर नाष्टा घेत होतो. तो मित्र उत्तर प्रदेशातला एक आय्. सी. एस्. अधिकारी होता. तिथे मला एक बाई भेटल्या. त्या एका मुसलमान तालुकदाराच्या पत्नी होत्या. मी टेबलाशी बसताच त्यांनी संवाद सुरू केला. ''आम्हा भारतियांच्यात मोठा बदल घडून येत आहे.'' त्या म्हणाल्या. संदर्भ न कळल्याने मी विचारले, ''का, काय झाले?'' तिच्या मुलाने रेल्वे प्लॅटफॉर्मवर पाहिलेले दृश्य त्यांनी सांगितले. तो प्रसंग मला मनोमन कळला; पण त्यांच्या आश्चर्याच्या भावनेत सामील होऊन, ''इंग्रजांच्या विनाकारण हल्ल्यांना तोंड देण्याइतके भारतीय धीट झाले पाहिजेत व त्यांनी आपला मान राखायला शिकलंच पाहिजे,'' असे म्हटले. त्यांच्या दृष्टीने तो फार नवलाईचा प्रकार होता. ''त्या माणसाला भेटायचं आहे का?'' असे जेव्हा मी त्यांना विचारले, तेव्हा त्यांनी चाणाक्षपणे ओळखले व विचारले, ''तो माणूस म्हणजे तुम्हीच तर नव्हेत ना?''

टांग्यातून प्रवास -

त्या काळात टांग्याचा सार्वजनिक वाहन म्हणून उपयोग करीत. अशा

टांग्यांना मेलटांगा म्हणत. मी एकदा कालकाहून सिमल्याला जात होतो. टांग्याच्या मागच्या बाजूला दोन जागा असत आणि एक जागा पुढे टांगेवाल्याजवळ असे. आम्ही तिघे प्रवासी होतो. एक जण सैन्यातला अधिकारी होता. तो टांगेवाल्याजवळ बसला. मागे मी व एक युरोपीय माणूस बसलो. त्याला माझ्या शेजारी बसणे सहन होईना; पण त्यावर काय उपाय करावा हे न सुचल्याने तो अस्वस्थ होत होता व ते माझ्या लक्षात येत होते. मग तो काही अर्वाच्य शब्द पुटपुटू लागला. मला कळावे म्हणून तो हिंदुस्थानीतले शब्द वापरत होता. मी गंभीरपणे बसलो होतो, जसे काही मला ऐकू येत नव्हते किंवा ऐकले तरी समजत नव्हते. मला मध्येच उतरवून टाक, असे त्याने टांगेवाल्याला सांगून बघितले. सोल या स्टेशनवर त्याने बराच कांगावा केला, टांगा ऑफिसमधल्या कारकुनाशीही तो बोलला; पण टांगेवाल्याप्रमाणेच इथेही त्याला थंड प्रतिसाद मिळाला. आपण पुढचा प्रवास करणार नाही अशी धमकीही त्याने देऊन पाहिली; त्याचाही काही परिणाम झाला नाही. शेवटी धुसफुस करीत तो टांग्यात चढला. आपले काहीच चालले नाही, यामुळे तो चिडला होता. त्याने मला धक्के मारायला सुरुवात केली. मीही माझ्या कोपराने त्याला ढोसू लागलो. सारा प्रवास अशा धक्क्यांच्या खेळातच झाला.

या सर्व प्रसंगातली गंमतीची गोष्ट म्हणजे आमचा तिसरा सहप्रवासी मध्ये न पडता सर्व न्याहाळून आपली करमणूक करून घेत होता. ते दोघे एकमेकांशी एक चकार शब्द बोलले नाहीत. मी टांगेवाल्याजवळ बसावे असेही कुणी सुचवले नाही. मी स्वतः तसा प्रस्ताव मांडणार नव्हतो; पण कुणी तसे नम्रपणे सुचवले असते, तर मी तत्परतेने मानले असते. घग्गरच्या त्या कडवट अनुभवानंतर मी जे नियम घालून घेतले होते, त्यात तशी 'नम्र विनंती' बसत होती.

मेल टांग्यात मागच्या भागात आम्हाला बसणे भाग पडले होते. त्या सबंध प्रवासात एकमेकांना धक्के आणि कोपरखळ्यांची भरपूर देवाण-घेवाण झाली. थोड्या-फार फरकाने घडलेल्या अशा अनेक प्रसंगांची

वाचक कल्पना करू शकतील. त्या सर्वांत एक घटक समान होता, तो म्हणजे आक्रमकाला प्रत्युत्तर देत राहणे. असे अनुभव वारंवार येत; पण मी नेहमी तयार असे. माझी निराशा झाल्याचे मला आठवत नाही.

मी पंजाबी आहे, ध्यानात असू द्या !

एकदा माझ्यावर आठ-नऊ जणांशी मुकाबला करण्याची वेळ आली होती. त्या प्रसंगाचे तपशील मी विसरून गेलो आहे; पण त्यातून शिकलेला धडा मी अजून विसरलो नाही. परिस्थिती विकोपाला गेली, की मारामारी हा एकच उपाय शिल्लक राहतो, हे माझ्या लक्षात आले होते. वर सांगितलेले आठ-नऊ तरुण बहुतेक फुटबॉलची मॅच खेळून येत असावेत. त्यांचा एकूण आव पाहून मी त्यांना खणखणीत आवाजात सांगितले, "मी पंजाबी आहे, हे ध्यानात असू द्या आणि या समोर." असे म्हणून मी माझ्या बाह्या वर सरकवून पुढे सरसावलो. माझा अवतार पाहून त्या तरुणांनी खेळ पुरे, असे ठरवले व ते निघून गेले. मी ठरवले होते, की आपल्या जवळच्या तरुणाला पकडून त्याच्याशी दोन हात करायचे. म्हणजे मी त्यांच्यातल्या एकाशी तरी तुल्यबळ ठरेन. बाकीच्यांकडून मार खाण्याचीही मी तयारी ठेवली होती. शेवटी ते संख्येने अधिक होते. खेळाच्या नियमांप्रमाणे त्यांचा विजय हा विजय ठरला नसता. सन्माननीय विजयाचे पारडे माझ्या बाजूलाच झुकले असते. अर्थात् हा माझ्या मनाचा विश्वास होता. एका वेळी अनेक आक्रमकांशी दोन हात करायची वेळ आल्यास काय करावे, यासंबंधी मी जे सूत्र ठरवले होते, त्यामध्ये जया-पराजयाची शहानिशा करण्याचा संदर्भातला हा विश्वास होता.

एक शेवटचा प्रसंग -

ज्या प्रकारच्या घटना मी अजून सांगितल्या नाहीत, अशा घटनांच्या मालिकेतला हा अनुभव आहे. दहा वर्षांपूर्वी लाहोरमधल्या मॉलजवळच्या एका फुटपाथवर मी माझ्या दोन मित्रांबरोबर उभा होतो. दोन इंग्रज त्या

रस्त्याने चालत येत होते. त्यांना जायला हवी तेवढी जागा होती; पण कदाचित् त्यांना ती पुरेशी वाटली नसावी किंवा शेजारी-शेजारी राहून चालण्यास ती जागा त्यांना प्रशस्त वाटली नसावी. ते एकमेकांमागून चालू लागले. पहिला माणूस आमच्यापर्यंत पोहोचला व काही न बोलता त्याने माझ्या मित्राला धक्का दिला व पुढे गेला. मी माझ्याजवळच्या काठीने त्याच्या पाठीला हलकेच स्पर्श केला. त्याच्याकडे दुर्लक्ष करून तो तसाच पुढे चालत राहिला. पण त्याच्यामागून चालणारा त्याचा मित्र माझ्याजवळ सरसावून आला व त्याने काठी उगारली. तत्क्षणी मी दोन पावले मागे गेलो व काठीने जमिनीवर एक रेघ आखली व त्याला म्हणालो, "ही रेघ ओलांडलीत, तर मीसुद्धा तुम्हाला मारीन." त्याने विचारले, "माझ्या मित्राला पाठीवर का मारलेत?" मी म्हटले, "ते मला विचारू नका. आपल्या मित्रालाच विचारा." जेव्हा काय व कसे या मुद्द्यांवर बोलणे सुरू होते, तेव्हा रागाचा भर ओसरून जातो आणि नंतरच्या शाब्दिक चकमकी 'बरं जाऊ दे', अशा निर्णयाप्रत येतात, असा माझा सर्वसाधारण अनुभव आहे. इथे तेच झाले. पण अशा सर्व प्रसंगांत काही तथ्ये पाळावी लागतात. एक म्हणजे, तुम्ही संघर्ष सुरू करता कामा नये आणि दुसरे म्हणजे, तुमची कृती 'आठवण करून देणे' किंवा 'सक्रिय निषेध' यांच्या मर्यादेपलीकडे जाता कामा नये.


दादाभाई नौरोजी

हा प्रसंग घडला तोपर्यंत पूर्वीचे इंग्रजांचे विनाकारण हल्ले खूपच कमी झाले होते. पण ते पूर्ण बंद झाले नव्हते, हे सत्य आहे. तरी त्या हल्ल्यांचे प्रकार व तीव्रता कितीही असली, तरी माझे प्रत्युत्तर देण्याचे तंत्र त्या परिस्थितीनुरूप विस्तृत

आणि लवचिक असे. घग्गरच्या ओढ्यातून हत्तींवरून जाताना एका इंग्रजाचा जो दुर्दैवी अनुभव मला आला, त्यानंतर मला जे अनेक अनुभव आले, त्यांच्याकडे दृष्टिक्षेप टाकताना आज मला रुखरुख वाटत नाही. त्या त्या प्रसंगातल्या व्यक्तींच्या वागणुकीत सभ्यतेचा अभाव होता, एवढेच आज मला वाटते. त्या घटनांमुळे माझ्या राजकीय विचारतत्त्वांमध्ये फरक पडत नव्हता. ब्रिटिशांचे हिंदुस्थानात आगमन हा नियतीचा निर्णय होता असा रानडे, फिरोझशहा मेहता व दादाभाई नौरोजी यांचा विश्वास होता. सत्तेने उन्मत्त झालेल्या इंग्रजांच्या गैरसमजांचे आणि अन्याय्य वागणुकीचे ह्या सर्वांना बळी व्हावे लागले होते, हे आपल्या सर्वांना चांगलेच माहीत आहे. पण समस्त परिस्थितीचा आढावा ते घेऊ शकले. दिव्यदृष्टी, कल्पनाविलास आणि राजकीय सुज्ञपणा यांचे त्यांना वरदान होते. भारतीय दृष्टिकोनात कसा बदल घडत गेला, ही वेगळी गोष्ट आहे. त्याचा विचार या पुस्तकाच्या कक्षेत येत नाही.

आणखी एका घटनेचा उल्लेख करून मी हे प्रकरण संपवतो. ही घटनाही जरा वेगळ्या प्रकारची आहे. पण ज्या मनोवृत्तीतून मी अनेक प्रसंगाशी टक्कर दिली, ती वृत्ती त्या घटनेतूनही दिसून येईल.

१९१७ साली लाहोर येथे सायन्स काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. सायन्स काँग्रेसचे सचिव होते - प्राध्यापक क्ष. आणि अधिवेशनाकरता स्थानिक सचिव म्हणून माझी आणि प्राध्यापक य यांची नेमणूक झाली होती. प्राध्यापक क्ष आणि य हे दोघे युरोपीय होते. स्थानिक सचिव या नात्याने माझा व प्राध्यापक क्ष यांचा बराच पत्रव्यवहार झाला. त्यांचे पहिले पत्र आले, त्यावर श्री. रुचिराम साहनी असे लिहिले होते. त्यांना उत्तर पाठवताना मीही त्यांच्या नावापुढे केवळ श्री. लिहिले. त्यापुढेही त्यांच्या पत्राच्या पत्त्यावर माझ्या नावापुढे जे लिहिलेले असे, तसेच मी त्यांच्या पत्त्यावर लिहीत असे. ते माझे धोरणच ठरून गेले. तसे पाहिले तर बाब क्षुल्लक होती; पण इतर भारतीय प्राध्यापक सद्गृहस्थांना तसे वाटले नव्हते. मला त्यांच्याकडून बरीच रागाची पत्रे आली. त्यात ही बाब गंभीर

असून सायन्स कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या अध्यक्षांच्या ती नजरेस आणून दिली पाहिजे, असे स्पष्ट लिहिले होते. ही गोष्ट क्षुल्लक असून मी त्याला जशास तसे वागवत असल्याचे त्या प्रत्येकाला कळवले. प्राध्यापक य यांच्याशी बोलताना मी या गोष्टीचा उल्लेख केला आणि प्राध्यापकांना केवळ श्री. लिहून प्रा. क्ष त्यांचा मान राखत नाहीत, अशी प्राध्यापकांची तक्रार असल्याचे सांगितले. त्यावर 'हीपण एक संबोधण्याची एक पद्धत आहे. ज्यांनी रागावून तक्रार केली, त्यांचा राग निराधार आहे', असे त्यांनी उत्तर दिले. पण मग ''तुम्हाला श्री. य. असे संबोधून लिहिलेले एक पत्र जरी मला दाखवलेत, तरच माझे समाधान होईल; एरवी नाही.'' असे मी निक्षून सांगितले. तसेच 'अरे' ला 'कारे' म्हणून मी प्रा. क्ष यांच्याशी व्यवहार ठेवला असल्याने माझी तक्रार नाही, असेही मी त्यांना सांगितले व ते प्रकरण बंद करून टाकले.

पण कुणीतरी अध्यक्षांच्या नजरेला ही गोष्ट आणून दिल्याचे अधिवेशनाच्या वेळी माझ्या लक्षात आले. त्या वर्षी अधिवेशनाचे अध्यक्ष होते - सर गिल्बर्ट वॉकर. ते हवामान वेधशाळांचे निदेशक होते. भारतीय प्राध्यापकांच्या बाबतीतल्या लहान-सहान गोष्टींवर ते माझ्याशी विचार-विनिमय करीत. कुणी हरकत घेतली नसती अशा बारीक-सारीक गोष्टींबाबत ते माझा सल्ला घेत.


अधिवेशनाच्या शेवटी विद्यापीठाच्या कुलगुरूंनी कॉंग्रेसचे अध्यक्ष आणि काही सभासद यांना जेवण दिले आणि योगायोग असा की, माझ्या शेजारी प्राध्यापक क्ष बसले होते. पण हा योगायोग नसून तसे हेतुपुरस्सर केल्याचे माझ्या लवकरच लक्षात आले. जेवायला बसताक्षणी प्रा. क्ष माझ्याशी बोलू लागले. मला पाठवलेल्या पत्रांवर आपण योग्य ते संबोधन लिहिले नाही याबद्दल दिलगिरी व्यक्त करूनच त्यांनी संभाषणाची सुरुवात केली. असा त्या घटनेचा शेवट समाधानाकारक झाला.

♦♦♦

निरोगी व दीर्घ आयुष्याचे गमक

माझ्या निरोगी आणि दीर्घ आयुष्याचे काय रहस्य आहे, असे लहान-थोर, परिचित-अपरिचित सगळ्यांनी मला हजारदा विचारले असेल. आणि त्याच्या अनुषंगाने, मी काय व किती वेळा जेवतो, केव्हा झोपतो, किती झोपतो, झोप चांगली लागते का, मी चालतो का, चालत असल्यास किती आणि केव्हा, असे अनेक प्रश्न मला विचारले जातात. खाणे, पिणे, झोपणे, चालणे या सर्व बाबतींत माझे काटेकोर अनुकरण केल्यास त्यांचे सर्व छान होईल, असे कित्येकांना वाटते. मला स्वतःला मात्र ते तितकेसे पटत नाही. सर्व गोष्टींत किंवा कोणत्याही एखाद्या बाबतीत माझे जसेच्या तसे अनुकरण करूनही एखाद्याचे काही बरे-वाईट होण्याचा संभव आहे, असे मला वाटते.

मी आता जे काय खातो, पितो, झोपतो किंवा वाचतो, ते सर्व माझ्या गेलेल्या आयुष्यातल्या सवयींना धरून आहे, हे विसरून चालणार नाही. ज्या काही चांगल्या किंवा वाईट सवयी मला होत्या, त्या पूर्णपणे बदलून टाकण्यावर माझा विश्वास नाही. संपूर्ण व्यक्ती ही एक अतिशय गुंतागुंतीची पद्धती असते आणि ती शारीरिक रचनेइतकीच मानसिक, नैतिक आणि आध्यात्मिक गुणधर्मांनी युक्त अशी असते. विज्ञान आणि तत्त्वज्ञानाच्या विविध शाखांमध्ये माणसाला फारच थोडे ज्ञान प्राप्त झाले आहे, असेच म्हणावे लागते. आणि जे ज्ञान उपलब्ध झाले आहे, त्याचा पुष्कळसा भाग हा प्रायोगिक आणि अनुभवाचा आहे.



त्यांच्या ८०वा वाढदिवसादिवशी (५ एप्रिल १९४३)

पुनरावृत्तीचे तत्त्व -

युगानुयुगे माणसाने जे ज्ञान व विद्वत्ता जमा केले आहे, त्यात पुनरावृत्तीचे तत्त्व फार महत्त्वाचे आहे, असे मला वाटते. आयुष्याबद्दलच्या माझ्या तत्त्वज्ञानात इतर कोणत्याही तत्त्वापेक्षा ह्या तत्त्वाला व्यवहारात अधिक किंमत आहे, असे मी मानतो. इतर कुणी त्या तत्त्वाला त्याच नावाने ओळखतात का, ते मला माहीत नाही. पुनरावृत्तीचे तत्त्व हे चांगले प्रस्थापित झालेले आहे. प्रत्येक कसरतपटू, कवाइत घेणारा सार्जंट आणि प्रत्येक शिक्षक ते जाणतो. चांगली किंवा वाईट सवय म्हणजे तरी काय आहे? एक कृती पुनःपुन्हा इतक्यांदा करायची, की ती अंगवळणी पडून जाते. एकदा लागलेली सवय सहजी जात नाही. त्या सवयीच्या विरुद्ध गोष्ट तुम्ही जर असंख्य वेळेला केलीत, तर ती सवय जाऊ शकते.

आणखी एक गोष्ट. पुनरावृत्तीने एखादी कृती सवय बनते हे खरे असले, तरी ते तिथेच थांबत नाही. त्या कृतीमागची तीव्रता दिवसें-दिवस वाढीला लागते. माणूस दोन सिगरेटी ओढून सुरुवात करेल; पण कालांतराने सिगरेटींची संख्या वाढत-वाढत वीस होईल. मला अशी काही माणसे माहीत आहेत की, जी उठल्यापासून झोपेपर्यंत पन्नास सिगरेटी ओढतात. मुद्दा असा की, हे लोक सुरुवात वीस, तीस किंवा पन्नास सिगरेटींपासून करीत नाही. ती सवय सोडायची असेल, तर सिगरेटींची संख्या हळूहळू कमी करीत जावे. थोडक्यात म्हणजे, सवय जर एक कृती पुन्हा-पुन्हा आणि वाढत्या तीव्रतेने करू लागते, तर ती सवय सोडण्याचे कामही तसेच पुन्हा-पुन्हा करून आणि वाढत्या तीव्रतेने झाले पाहिजे.

मी माझेच उदाहरण देऊ शकतो. मी कधीही सिगरेट ओढली नाही, दारू प्यालो नाही किंवा कोणत्याही प्रकारची नशा केली नाही; पण नोकरी लागल्यापासून मला चहाचे व्यसन लागत गेले. व्यसन हा शब्द जरा भडक होतो आहे; कारण मी कधी फार कडक चहा प्यायलो नाही किंवा साधा चहाही अतिप्रमाणात प्यायलो नाही. पण ठराविक वेळेला एक किंवा दीड कप चहा मात्र मला लागत असे. कितीही कामात असलो, तरी ती वेळ

झाली, की मला चहाची गरज भासत असे. माझ्या वाढत्या वयात चहा माझ्या प्रकृतीला हानिकारक आहे, असे मला सांगण्यात आले आणि तसा प्रत्ययही येत होता. वर म्हटल्याप्रमाणे एखादी सवय पूर्णपणे सोडून द्यायला मला आवडत नाही. पण मग हळूहळू माझ्या चहातील गरम पाण्याचे प्रमाण वाढवत मी तो अगदी फिका करून पिऊ लागलो. हल्ली सकाळी मी जो चहा पितो, त्यात जेमतेम दोन चमचे चहापत्ती असते. त्यातही सर्व पाने चहाची नसतात; तर त्यात थोडी बिनाफ्शा किंवा व्हायोलेटची पाने असतात. त्याचे दोन फायदे होतात. एक म्हणजे बिनाफ्शा ही औषधी वनस्पती असल्याने त्याचा माझ्या शरीराला लाभ होतो आणि दुसरा फायदा म्हणजे त्या पानांमुळे माझ्या चहाला रंग येतो. हा अर्थात् मनाचा खेळ आहे. आता मी वृद्ध झालो आहे; त्यामुळे कडक चहा मला मानवत नाही, ह्याची रोजच्या रोज आठवण करून घेणे चांगले नाही. माझ्या फिक्या चहाला त्या पानांमुळे रंग येई व तो चहा पूर्वीच्या चहासारखा दिसत असे.

मानसशास्त्रीय नियम आपल्या आयुष्यात महत्त्वाची कामगिरी बजावत असतात. त्याचे महत्त्व पुष्कळांच्या लक्षात येत नाही. त्या बाबतीत मला जरा ध्यासच आहे, हे मी कबूल करतो. गेली कमीतकमी पन्नास वर्षे मी कुणाही ५० वर्षांच्या माणसाला ५० वर्षांचा म्हातारा म्हणायचे मी टाळले आहे. अमुक एक व्यक्ती ५० वर्षांची आहे, असे मी म्हणतो. कित्येकजण वयाची चाळीशी ओलांडली, की आपण म्हातारे झालो, असे समजू लागतात. मध्यम वयाचे झाल्यापासून काहीजणांना वृद्धांचे अधिकार आपल्याला मिळाले पाहिजेत, असे वाटू लागते. 'पांढरे केस मृत्यूचा संदेश घेऊन येतात,' अशी फारसी भाषेतील प्रसिद्ध ओळ आहे. ती ओळ कुणी म्हणून दाखवली, की मला मनापासून राग येतो. निसर्गाला आपण फसवू शकत नाही, हे मला माहीत आहे; तरी आयुष्याबद्दलच्या माझ्या तत्त्वज्ञानात आशावादाला मी अतिशय महत्त्वाचे स्थान देतो.

तर मी काय सांगत होतो? सवयी लावून घेणे आणि लागलेल्या

सवयी सोडून देणे. पुष्कळ वर्षांच्या अनुभवांवर आधारलेल्या माझ्या मताला जर काही किंमत असेल, तर कोणत्याही जुन्या सवयी किंवा आयुष्याच्या पद्धती उपटून टाकण्यासारखे काहीही करू नये. टोकाचे उदाहरण द्यायचे, तर लठ्ठ माणसाने आपला लठ्ठपणा झटपट कमी करण्याचा कोणताही उपाय करू नये. तो काही एका दिवसात लठ्ठ झाला नाही, हे ध्यानात घेतले पाहिजे. कोणत्याही प्रकारचा आहार, औषध किंवा व्यायाम केला, तरी त्याला लठ्ठ व्हायला जितका काळ लागला, त्यापेक्षा कमी काळात त्याचा लठ्ठपणा ओसरणार नाही. बदल हा नेहमी सावकाश आणि नकळत येत असतो. वादळी बदलाने फायद्यापेक्षा नुकसानच अधिक होते - विशेषतः चाळीस किंवा पन्नासपेक्षा अधिक वयाच्या माणसांत.

योगिक व्यायामाने गेलेले तारुण्य परत आणण्याविषयी कितीही जाहिरात केली, तरी माझा विश्वास नाही. त्याला कारणेही आहेत. योगाच्या चाहत्यांनी किंवा भक्तांनी आपल्याला काहीही सांगितले म्हणून मध्यमवयस्काने जर आपल्या आयुष्यात आणि नेहमीच्या शिरस्त्यात अचानक बदल केल्यास, त्याचा चांगला परिणाम तर सोडाच; पण त्याच्या शारीरिक प्रणालीला धक्का लागतो आणि त्याचा शेवट लवकर जवळ येतो. आपल्या पुरातन संस्कृतीचा मला मनापासून अभिमान आहे; पण त्या अभिमानाच्या भरात चमत्कारांचे युग संपले आहे हे, मी विसरू शकत नाही.

रोगाच्या प्रतिकारापेक्षा त्याचा प्रतिबंध अधिक हितकर -

शक्य तितके स्वच्छ, स्वाभाविक आणि नियमित राहून औषध घेण्याची वेळ न येऊ देणे हा आरोग्याचा पहिला नियम आहे. 'औषध घेणे टाळा', हे माझे लहान-थोरांना सांगणे आहे. डॉक्टरच्या जवळपास फिरकू नका, असे मी म्हणत नाही. मी म्हणतो, रोग निस्तरण्यापेक्षा तो न होऊ देणे अधिक श्रेयस्कर असते. सर्वजण असेच म्हणतात; पण कृतीत

उतरवत नाहीत. उत्तम प्रकृती असलेला एक माणूस मला माहीत आहे. तो डॉक्टरला भरपूर पैसे देऊन भावी काळात आपली प्रकृती चांगली राहण्याकरता नेहमी सल्ला विचारत असतो. आपली तब्येत चांगली असतानाही एखाद्या निष्णात डॉक्टरचा सल्ला घेण्याची किंमत काय असते, हे सांगण्याकरता मी बारा वर्षे काय करीत होतो, ते सांगतो. त्याच्याइतके चांगले दुसरे स्पष्टीकरण सापडणार नाही.

सन १८८७ मध्ये लाहोरला आल्यानंतर लवकरच डॉ. बेलीराम या एका प्रसिद्ध डॉक्टरांशी मी ओळख करून घेतली. तेव्हापासून ते आमचे फॅमिली डॉक्टर झाले. दुर्दैवाने पुढे त्यांना अपघाती मृत्यू आला. त्याचा शोक सर्व जनतेला झाला. १९१२ साली माझा मुलगा डॉ. बी. जे. साहनी इंग्लंडमध्ये शिक्षण घेऊन परतला. तोही डॉक्टर बेलीरामांच्या देखरेखीखाली असे.

पण माझी गोष्ट एवढ्यानेच संपली नाही. मी पस्तिशीचा होतो त्या सुमाराला डॉ. कर्नल हॅडली यांची लाहोरला बदली झाली. ते एक निष्णात डॉक्टर आहेत, अशी त्यांची ख्याती होती. मी त्यांना जाऊन भेटलो. वर्षातून एकदा त्यांनी माझी तासभर नियमित तपासणी करावी, असे मी त्यांच्याशी ठरवून टाकले. माझी प्रकृती उत्तम आहे, असे मला वाटते, हेही त्यांना सांगितले. पण कोणत्याही आजाराची पूर्वचिन्हे जर त्यांना तपासणीत आढळली, तर तो आजार टाळण्याकरीता मी काय काळजी घ्यावी, हे त्यांनी मला सांगावे. अशा वार्षिक तपासण्या कित्येक वर्षे चालू होत्या - म्हणजे कर्नल हॅडली पंजाब सोडेपर्यंत. लाहोरहून दुसऱ्या ठिकाणी त्यांची बदली झाली, तर मी मुद्दाम त्या गावी जात असे.

प्रत्येक तपासणीच्या वेळी मी त्यांना ३२ रुपये देई आणि माझा पक्का विश्वास होता की, त्या खेपा योग्यच होत्या. त्या तपासण्यांमुळे माझे पैसे वाचतच होते. शिवाय ज्याची मोजदाद करता येणार नाही, अशा उत्तम प्रकृतीचा वर मिळण्याचे ते एक साधन होते. सामान्यपणे ज्याला वैद्यकीय तपासणी म्हणता येईल, अशी तपासणी ते कित्येकदा करीत नसत; पण

चहा पिता-पिता ते माझ्याशी तास-दीड तास गप्पा करीत. त्यातून ते माझी सर्व प्रकारची चौकशी करीत असत. मी पायी चालत कुठवर व कितीदा गेलो, आहार, झोप, काम, करमणूक, माझे मित्र, अभ्यास वगैरे सर्व विचारून घेत. थोडक्यात म्हणजे मागच्या वर्षात मी कसे आयुष्य घालवले, याची ते इत्थंभूत माहिती करून घेत. माझा असा निकटचा परिचय झाल्याने पहिल्या दोन वर्षांनंतर त्यांची चौकशी अधिक शोधक होऊ लागली. आम्ही बोलत असताना ते मला लहान-सहान सूचना करीत; त्या मला फार उपयोगी ठरत. त्यांच्यामुळे क्षुल्लक दिसणाऱ्या अशा चुका मी टाळल्या. कदाचित् त्या चुकांची पुढे मला मोठी किंमत मोजावी लागली असती.

तशा एक-दोन गोष्टी सांगतो. एक वर्षी उन्हाळ्याच्या दिवसांत दर महिन्याला मित्राला भेटण्याकरता मी अमृतसरला जात असल्याचे मी डॉक्टरांना सांगितले. १८९६ किंवा ९७ साली प्रा. ओमान सरकारी महाविद्यालयातून सेवानिवृत्त झाले. त्यानंतर त्यांनी खालसा कॉलेजचे प्राचार्यपद घेतले होते. महिन्याचा शेवटचा रविवार त्यांच्या घरी घालवण्याकरता मला कायमचे निमंत्रण असे. मीही त्याचा पुरा फायदा घेतला. पहाटे चहा पिऊन मी सायकलने अमृतसरला जायचो. दिवसभर त्यांच्याशी पुस्तके, विद्यापीठ, माणसे व सार्वजनिक हालचाली इत्यादी विषयांवर गप्पा करीत असे. राजकीय दृष्टीने प्रा. ओमान हे अँग्लो-इंडियन होते. राजकारणाविषयी बोलायचे आम्ही टाळत असू. ओमान पती-पत्नींबरोबर संध्याकाळचा चहा घेऊन मी सायकलवरून सुवर्णमंदिरात जाई; तेथे एक-दोन मित्रांना भेटून आगगाडीने लाहोरला परत येई. थोडक्यात म्हणजे सायकलवरून त्या दिवशी माझा सुमारे चाळीस मैल प्रवास होई. पूर्वी दोन वेळा माझा गुडघा दुखावल्याचे डॉ. हॅडलींना माहीत होते. एकदा प्रवासातल्या अपघातात आणि एकदा आमच्या महाविद्यालयीन वसतिगृहात उंच झोपाळ्यावर आमची स्पर्धा होती, तेव्हा झोपाळा उंच गेला असताना त्याची दोरी तुटली आणि मी दूर फेकला गेलो होतो व

बराच काळ मला अंथरुणावर पडून राहावे लागले होते. माझा हा दुखावलेला गुडघा हिंवाळ्यात दुखतो, हेही डॉ. हॅडलींच्या नियमित चौकशीतून त्यांना माहीत झाले होते. सांधेदुखीची प्रवृत्ती माझ्यात असल्याचेही त्यांच्या ध्यानात आले होते. ह्या सगळ्या गोष्टींचा विचार करून त्यांनी सायकलचा प्रवास पूर्णपणे थांबवून टाकण्याचा मला सल्ला दिला. त्यानंतर, एका आजारी माणसाला भेटण्याची निकड होती, तेव्हा मी एकदाच सायकलवर बसलो व एखाद-दुसरा फर्लांग गेलो होतो.

सायकलचा विषय आला, आहे तेव्हा एक मजेची गोष्ट सांगतो. सन १८९० ते ९५ या काळात लाहोरमध्ये हिंदुस्थानी व युरोपीय दोन्ही प्रकारचे पुष्कळ लोक तीन चाकी सायकलवरून ये-जा करताना दिसत. दोन चाकी सायकली पंजाबमध्ये केव्हा आल्या, हे मला निश्चित सांगता येणार नाही; पण १८९५-९६ या वर्षात तिथे सहापेक्षा अधिक दुचाक्या नव्हत्या, हे मला निश्चितपणे आठवतेय्. त्या सायकलींचे पुढचे चाक खूप मोठे म्हणजे जवळ-जवळ पाच फूट व्यासाचे असे आणि मागचे चाक लहान म्हणजे दीड फूट किंवा त्यापेक्षाही कमी व्यासाचे असे. माझ्या अडगळीच्या खोलीत अजूनही तशी एक दुचाकी आहे. (योग्य प्रसंगी ती प्रदर्शनार्थ ठेवण्याची कल्पना काही वाईट नाही.) मी ती कधी वापरली नाही. रेल्वे वर्कशॉपमधल्या एक-दोन मिस्त्रींकडे तशी यंत्रे होती. कदाचित् संपूर्ण स्टेशनमध्ये तशा आणखी दोन-तीन सायकली असतील. एक दिवस मी तारघरावरून जात होतो, (तेव्हाचे पोस्टऑफिस आज आहे तिथे हलवले होते का नाही, ते मला आठवत नाही.) तेव्हा एका युरोपीय माणसाला मी येताना पाहिले. तो सायकलवरून येत होता. त्याच्या सायकलीची दोन्ही चाके जवळ-जवळ सारख्या आकाराची होती. त्या दिवशी मी माझी सायकल काढून टाकली आणि तशी नव्या पद्धतीची सायकल घेतली. आता ज्याला मिंटो पार्क म्हणतात, त्या पूर्वीच्या परेड ग्राऊंडवर दोन-तीन तास ती नवी सायकल फिरवून त्याच सायकलीवरून घरी गेलो.

माझ्या वार्षिक तपासणीतून माझ्या सांधेदुखीची कल्पना डॉ. हॅडलींना फार लवकर आली. त्यावर बद्धकोष्ठता टाळायचा त्यांनी मला सल्ला दिला. त्यांच्या सूचनेवरून मी गरज भासली की, कुटन्यूची पावडर घेत असे. त्याची सवय लावून घेऊ नये असाही त्यांनी सल्ला दिला होता. माझ्या तीन-चार प्रवासी बॅगा होत्या. त्या प्रत्येकीत एक बाटली मी ठेवून देत असे. अगदी अल्प प्रमाणात मी ती पावडर घेत असे आणि तीही फक्त गरज भासल्यास.

ह्यानंतर थोड्याच दिवसांनी मी स्वतःला एक सवय लावून घेतली. तिचा मी उल्लेख केला, तरी लोक हसतील याची मला खात्रीच आहे. पण मी सांगणार आहे; कारण आपली प्रकृती सुधारण्यास कुणाला तरी त्याचा फायदा होईल असे वाटते. तसे झाल्यास मला हास्यास्पद व्हावे लागले, टोमणे ऐकावे लागले, तरी त्याचे सार्थक होईल.

गेली चाळीस वर्षे शौचाला गेल्यावर शौचाचे निरीक्षण केल्याशिवाय मी बाहेर येत नसे. त्याचा रंग, रूप जर ठीक नाही असे वाटले, तर मी माझ्या आहारात बदल करी. कधी एक जेवण टाळीत असे; पण बहुतेक वेळी आहार कमी करीत असे; किंवा जेवणातून एक-दोन पदार्थ वर्ज्य करीत असे. त्या निरीक्षणाची पहिली दहा वर्षे मी नोंद करून ठेवीत असे. शौचासंबंधी माझी तीन निरीक्षणे असत. त्या तिनांना प्रत्येकी दहा मार्क मी ठेवी व निरीक्षणांवरून मी त्या त्या मुद्याला मार्क देत असे. नंतर-नंतर मार्कांऐवजी मी शेरे द्यायला सुरुवात केली. समाधानकारक, असमाधानकारक आणि त्या मधल्या पातळ्या वगैरे. इतक्या वर्षांची सवय असल्याने नोंद ठेवली नाही, तर मला अवघड जाई. शेवटी नोंद ठेवणे मी सोडले; पण निरीक्षण करण्याची सवय इतकी अंगवळणी पडली होती, की ती सोडणे मला अशक्य होते. आगगाडीतून प्रवास करताना शौच-निरीक्षण करायला मिळत नाही, म्हणून मला अस्वस्थ वाटे.

ह्या सवयीने काय होते? गेल्या २४ तासांत काय खाल्ले, याचा मी विचार करतो आणि आपल्या शरीरधर्मानुरूप त्यात बदल करतो. उदाहरण

सांगायचे तर जसे माझे वय वाढत गेले, तसे माझ्या आहारातल्या मांसाच्या जागेवर भाज्या व फळें आली. तरुणपणी कोंबडी, बकरा, मासे मी अतिआवडीने खायचो; पण आता मी क्वचित एखादा माशाचा किंवा कोंबडीचा तुकडा खातो. मात्र एखादे वेळी मला मटनाचे सूप दिले, तर आवडते. माझ्या आहाराच्या तपशिलात जाण्याचा काही फायदा नाही; कारण वर म्हटल्याप्रमाणे प्रत्येकाने आपापल्या शरीरधर्मानुसार किती व काय खावे हे ठरवणे चांगले. आहाराबाबत माणसा-माणसात फरक करावा लागतो; इतकेच नव्हे, तर एका माणसालाही वर्षा-वर्षाला किंवा ऋतू-ऋतूत आपला आहार बदलावा लागतो. आहार ठरविण्यात वेगवेगळे मुद्दे लक्षात घ्यावे लागतात; त्यामुळे एक नियम घालून देंता येत नाही. मी दिवसातून दोन पौंड दूध या ना त्या स्वरूपात घेत असतो. दही, ताक, नुसते दूध, पुडिंग वगैरे. दिवसाकाठी मी दोन अंडीही खातो. सकाळ-संध्याकाळच्या जेवणानंतर फळे खायला मला आवडते. गेली चाळीस वर्षे बर्फ किंवा आईस्क्रीम खाण्याचे मात्र मी कटाक्षाने टाळले आहे.

गेली दहा वर्षे, म्हणजे मी सत्तर वर्षांचा झाल्यापासून, मी बाहेर जेवायला जाण्याचे बंद केले आहे. पूर्वीसुद्धा बाहेर जेवण्याचा प्रसंग येई, तेव्हा शक्य झाल्यास पुष्कळ पदार्थ खाण्याचे मी टाळत असे. तसे करण्यामागे एक हेतू असा असे, की वाजवीपेक्षा अधिक आहार पोटात जाऊ नये. दुसरा असा, की माझा शरीराला मानवणाऱ्या पदार्थांपेक्षा वेगळे पदार्थ खाल्ले जाऊ नयेत. पुष्कळजणांना माझा आहार साधा वाटत नाही. पण जो काय आहार मी घेतो, त्यापेक्षा अगदी वेगळ्या प्रकारचे पदार्थ खाण्याबद्दल माझ्या मनात एक प्रकारची भीती निर्माण झाली आहे. नवा पदार्थ चाखून बघायला मला आवडते; पण असे नवे व खास पदार्थ जेवणात आले की, त्रासाला सुरुवात होते.

एकदा मला माझ्या एका मित्राने घरी जेवायला बोलावले. तेव्हा वेगवेगळ्या प्रकारचे ५२ प्रकार बनवले होते. आता हा माझा मित्र राजघराण्यातला नव्हता किंवा फार श्रीमंतही नव्हता; पण आम्ही अनेक

वर्षांत भेटलो नव्हतो, तेव्हा माझ्या भेटीचा आनंद व्यक्त करण्यासाठी त्याने अशी - त्याच्या कुवतीबाहेरची - मेजवानी द्यायचे ठरविले. ते सगळे पदार्थ मोजण्यापलीकडे मला त्यांची माहिती नव्हती; ना मला ते फार आकर्षक वाटले. मी तुम्हाला पूर्वी माहीत होतो तसाच अजूनही साधा माणूस आहे, असे मी त्याला सांगितले. शिवाय माझ्या आयुष्याच्या तत्त्वज्ञानानुसार सांगायचे, तर माझ्यासमोर मांडलेले पदार्थ पाहून जरी माझ्या तोंडाला पाणी सुटत आहे, तरी त्यांच्या सेवनाने मला बरीच इजा होण्याचा संभव आहे, असेही मी सांगितले. तो माझा खूप जवळचा मित्र असल्याने मी धाडस केले व म्हटले,

''माझ्यासमोर मांडलेले पदार्थ पत्त्यांच्या जोडातल्या पत्त्यांइतके आहेत; पण ते खाऊन मला माझ्या तब्येतीशी जुगार खेळायची इच्छा नाही.''

तुमच्या पसंतीचे चार-पाच पदार्थ ठेवून बाकीचे पदार्थ आत घेऊन जायला सांगा, अशी मी विनवणी केली; पण तो बेटा ऐकायला तयार होईना. 'पाहिजे तितके खा; बाकीचे टाकून द्या' असा त्याने सल्ला दिला. मित्रांचा पाहुणचार करण्याची हीच आपली उधळी पद्धत आहे. शेवटी मी हाताजवळचे पदार्थ खाल्ले. इतर पदार्थ मी घेतले तर नाहीच; पण त्यांच्याकडे पाहिलेही नाही.

हाव हे विनाशाचे मूळ आहे -

वर सांगितलेल्या प्रसंगांनंतर काही वर्षांनी मी एकदा राजघराण्यातल्या गृहस्थांबरोबर जेवत होतो. त्या प्रसंगी एक मोठी कुतूहल जागे करणारी घटना घडली. टेबलाभोवती आम्ही तिघेजण होतो. राजघराण्यातले यजमान पुरुष, सरदार घराण्यातले एक सद्गृहस्थ आणि मी. ह्या आमच्या मजेशीर त्रिकोणाचे तीनही सामाजिक कोन असमान होते. एक साधा प्राध्यापक, एक राजपुत्र आणि एक सरदार ! जेवण वाढण्यात आले. ताटांचा आकारच मला घाबरवून टाकायला पुरेसा होता. तसा मोठ्या

लोकांबरोबर जेवायचा मान मला मिळालेला होता; पण हे काही औरच होते. राजपुत्राचा व माझा तसा निकटचा परिचय होता; पण तरी असली खास मेजवानी दिल्याबद्दल काही म्हणणे व्यर्थ होते. राजपुत्राची पार्श्वभूमी पाहता तो यापेक्षा दुसरे काही करू शकला नसता. जेवतानाही कोणत्या एका पदार्थाची प्रशंसा करण्याचे मी टाळत होतो; कारण राजपुत्राचे लक्ष वेधले जाऊन त्या पदार्थाचा मला आग्रह होण्याची भीती होती. ते मला नको होते. सुरुवातीलाच शक्यतो कमी पदार्थ खाण्याचे मी ठरवून टाकले होते. त्या प्रशस्त ताटातले पदार्थ आणि टेबलावर मांडलेल्या इतर पदार्थांवर मी नीट नजरही टाकत नव्हतो. हे सर्व पाहून मी स्वतःला काय बजावत होतो, ते मला आठवतेय् :

"वा, काय मेजवानी आहे ! पण मोह आवर आणि जसा धडपणे आलास, तसाच परत जा ! जमेल का? हो; नक्कीच !"

समोर मांडलेल्या पदार्थांपैकी दोन किंवा तीनच खायचे असे मी ठरवले आणि मग जर एखाद्या पदार्थाचा आग्रह झाला, तर तो खायचा. मी पुलावाने सुरुवात केली आणि त्याच्याच जवळचे पदार्थ खाऊ लागलो. त्यातला एक होता फुलकोबी. मधून-मधून मी इतर गोष्टी घेतल्यासारखे दाखवत होतो; पण खरे तर मी त्यातला कणही खात नव्हतो. दोन-तीन पदार्थ खाऊन बघण्याचा राजपुत्राचा आग्रह पडला; म्हणून मी ते खाल्ले. ते फारच उत्कृष्ट होते. सरदारसाहेब मात्र सर्व पदार्थांची मुक्त कंठाने प्रशंसा करीत होते. त्यांना सर्वांत आवडलेला पदार्थ होता - बदामयुक्त पक्वान्न. त्याची स्तुती ऐकून वाढप्यांनी त्याच्या तीन बशा आणल्या. मी माफी मागून म्हणालो की, "मला इतक्या तुपात बनवलेले पदार्थ खाण्याची सवय नाही." नक्की माहीत नाही; पण सरदारसाहेबांनी आणलेल्या तीनही बशा फस्त केल्या, असे मला वाटते. घरी येऊन मी नित्याप्रमाणे फलाहार घेतला. एक-दोन भाज्याही खाल्ल्या. पोळी-भाकरी मात्र टाळली. दुसऱ्या दिवशी सरदार भेटले, तेव्हा रात्रभर पोटाचा त्रास झाल्याचे सांगू लागले. मी म्हटले,

"हाव हे विनाशाचे मूळ आहे, असे आपली शास्त्रे उगीच सांगत नाहीत."

आणि मग मी माझी सकाळची तीन मैलांची रपेट केली, दिवसभराचे कार्यक्रमही पार पाडले.

♦♦♦

परिशिष्ट

१) **एच्. एफ्. ब्लॅनफोर्ड. एफ्.आर्.एस्.** : भारतीय पावसाळ्याचा सखोल अभ्यास करणारे हे पहिले हवामानशास्त्रज्ञ होते. (त्यांनी 'रेनफॉल इन इंडिया' हे पुस्तक लिहिले. इंडिया मीटिअरॉलॉजिकल डिपार्टमेंट. ३, ६५८, १८८६)

२) **जगदीशचंद्र बोस** (१८५८-१९३७) : पदार्थविज्ञान, विद्युत्-पदार्थ विज्ञान, वनस्पती-शरीरशास्त्र, शरीरशास्त्र या विज्ञानशाखांतल्या आद्य संशोधकांपैकी एक होते. सन १८९४ च्या सुमाराला त्यांनी आपल्या संशोधनकामाची सुरुवात केली. तेव्हा ऑलिव्हर लॉजच्या आलेखातून हर्टझ्च्या कामाबद्दल कळले व त्यांची विद्युत्-लहरींविषयी जिज्ञासा जागृत झाली. कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमधून सन १९१५ साली ते सेवानिवृत्त झाले. १९१७ साली कलकत्त्यात बोस इन्स्टिट्यूटची स्थापना केली. त्या संस्थेच्या वनस्पति-शरीरशास्त्रातील संशोधनाकरता त्यांनी अकरा लाख रुपयांची निधी उभा केला.

३) **पी. सी. रे** (१८६१-१९४४) : लोक त्यांना आचार्य प्रफुल्लचंद्र असे म्हणत असत. ते आंतरराष्ट्रीय कीर्तीचे रसायनशास्त्रज्ञ होते. बंगालमधील रासायनिक आणि औषधोत्पादनाचे उद्योग सुरू करणाऱ्यांमध्ये ते अग्रणी होते. त्यांना विविध गोष्टींत रस वाटत असे. ते कळकळीचे शिक्षणशास्त्रज्ञ होते; तसेच निःस्वार्थी देशभक्त आणि समाजसेवेला वाहून घेतलेले सामाजिक कार्यकर्ते होते. आचार्य रे यांच्याविषयी व त्यांच्या कामाविषयी

जवाहरलाल नेहरूंनी 'पूर्वीच्या पिढीतले आचार्य रे हे एक खंदे पुरुष होते. विशेषतः विज्ञानक्षेत्रात तर ते दैदीप्यमान दिव्यासारखे होते. त्यांची नाजूक शरीरयष्टी, उत्साही देशप्रेम, विद्वत्ता आणि साधेपणा या गुणांमुळे युवावस्थेत माझ्यावर त्यांची चांगलीच छाप पडली होती.' असे म्हटले होते.

४) **डेन्झिल इबेटसन** : शिरगणतीचे सर्वेक्षक, पब्लिक इन्स्ट्रक्शनचे निदेशक आणि पंजाब प्रांताचे फायनान्स कमिशनर आणि मध्य प्रांताचे चीफ कमिशनर अशी अनेक पदे त्यांनी भूषविली होती.

५) **आनंद मोहन बोस** (१८४७ - १९०६) : रँग्लर झालेले हे पहिले भारतीय होते. ब्राह्मो-समाजाचे ते नेते होते. स्वातंत्र्य चळवळीत ते अग्रेसर होते. त्याशिवाय ते शिक्षणतज्ज्ञ आणि समाजसुधारकही होते. इंडियन नॅशनल काँग्रेसची स्थापना झाल्यापासून त्यांचा त्यात सहभाग होता आणि १८९८ सालच्या मद्रास येथे झालेल्या अधिवेशनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. सन १८७९ मध्ये त्यांनी सिटी कॉलेज ऑफ कलकत्ता स्थापन केले. शिक्षणाकरता त्यांनी केलेले कार्य लक्षात घेऊन १८८२ सालच्या एज्युकेशन कमिशनचे सभासदत्व त्यांना देऊ केले होते.

६) **सय्यद अहमद खान** (१८१७-१८९८) : ह्यांनी १८७५ साली 'मुहम्मदन अँग्लो ओरिएंटल कॉलेज'ची स्थापना केली. १९२० मध्ये त्याच महाविद्यालयाला अलीगढ मुस्लिम विद्यापीठाचा दर्जा देण्यात आला. १८८२ मध्ये सरकारने चालू केलेल्या एज्युकेशन कमिशनचे त्यांना सभासद करून घेतले. त्यांचे उत्खननासंबंधीचे 'असारस-सँडिड' पुस्तक सन १८४७ मध्ये प्रसिद्ध झाले. दिल्लीमधील विविध स्मारकांचा तो अभ्यास आहे. प्रसिद्ध 'अलीगढ इन्स्टिट्यूट गॅझेट' हे साप्ताहिक त्यांनीच सन १८६६ मध्ये सुरू केले.

७) **अलेक्झांडर पेडलर, एफ्. आर्. एस्.** : कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये रसायनशास्त्र शिकवत असत. बंगाल सरकारकरता ते हवामानाचा रिपोर्टर

म्हणून काम करीत होते. १९९६ साली ते प्रेसिडेन्सी कॉलेजचे प्राचार्य झाले. १८९९ साली बंगालमधील पब्लिक इन्स्ट्रक्शनचे निदेशक झाले. सन १९०४ मध्ये ते कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरू झाले.

८) **आशुतोष मुखर्जी** (१८६४ - १९२४) : हे एक महान शिक्षणतज्ज्ञ आणि कायदेपंडित होते. ते कलकत्ता विद्यापीठातील उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील मूर्तिमंत चैतन्य होते. कलकत्ता हायकोर्टात ते वीस वर्षे न्यायाधीशाचे काम करीत होते.

९. **गुरू गोविंदसिंग** (१६६६-१७०८) : शिखांचे हे दहावे आणि शेवटचे गुरू होते. शिखांच्या धार्मिक श्रद्धा आणि आचार यांना त्यांनी नवीन वळण दिले आणि सामाजिक असमता व जातिभेदांचा त्यांनी त्याग केला. तेग बहादुरांच्या नंतरचे गुरू ह्या नात्याने गुरू गोविंदसिंगांनी आपल्या अनुयायांना संघटित करण्याचे काम हाती घेतले. त्या कामाचा त्यांनी बारकाईने सर्व बाजूंनी विचार केला. त्यांनी 'ग्रंथसाहिबा'करता एक पुरवणी ग्रंथ तयार केला. 'दहाव्या गुरूचा ग्रंथ' असे त्या पुरवणी ग्रंथाला म्हणतात. आजूबाजूच्या डोंगराळ प्रदेशांच्या राजांशी आणि मोंगल सरदारांशी गुरू गोविंदसिंगांनी मोठ्या धैर्याने व चिकाटीने लढा दिला.

१०. **रणजीतसिंग महाराज** (१७०८-१८३९) : आधुनिक भारताच्या इतिहासातल्या महत्त्वाच्या व्यक्तिमत्त्वांपैकी हे एक होते. स्वभावतःच ते राज्यकर्ते होते. त्यांनी लढाईत गुंतलेल्या शीख प्रांतांना एका नेटक्या राज्याचे रूप दिले. केवळ विसाव्या वर्षी त्यांनी लाहोर काबीज केले आणि १८०२ मध्ये अमृतसर हे शिखांचे पवित्र स्थळ आपल्या राज्याला जोडले. महान जेते असले, तरी स्वभावाने रणजीतसिंग हे उग्र नव्हते.

११. हरीसिंग नलवा (नाओला) : शिखांचे हे सेनापती होते व त्यांनी ६ मे १८३४ रोजी पेशावरचा बालेकिल्ला जिंकून घेतला.

१२. **रवींद्रनाथ टागोर** (१८६१-१९४१) : बहुगामी बुद्धीचे असे हे या भूमीचे सुपुत्र होते. 'टोवर्डस् युनिव्हर्सल मॅन' या टागोरांच्या निवडक निबंध-संग्रहाची प्रस्तावना श्री. हुमायून कबीर यांनी लिहिली आहे. त्यात ते टागोरांविषयी म्हणतात, ''टागोरांनी आपल्या जीवनात जे जे केलं, त्याचा विचार करताना त्यांच्या बहुगामी प्रतिभेने आपण स्तिमित होऊन जातो. ते मुख्यतः कवी होते; तरी त्यांना फक्त काव्यातच रस नव्हता. त्यांनी इतकं काम केलं आहे, की त्यांचा हात धरणारा लेखक विरळाच. एक हजाराहून जास्त कविता त्यांनी लिहिल्या आहेत. त्यांच्या गीतांची संख्या २ हजारांपेक्षा अधिक आहे. शिवाय लघुकथा, कादंबऱ्या, नाटके आहेत. त्यांनी भिन्न-भिन्न विषयांवर निबंध लिहिले आहेत. त्यांच्या लिखाणाचा दर्जाही खूप उंच आहे. क्वचितच एखाद्याने तशी उंची गाठली असेल. ते फार उच्च प्रतीचे संगीतकार होते. सत्तरी उलटल्यावर त्यांनी चित्रं काढायला सुरुवात केली आणि केवळ दहा वर्षांत तीन हजार चित्रं काढली. त्यातली काही उत्कृष्ट दर्जाची आहेत. धर्म, शिक्षण, राजकारण, सामाजिक परिवर्तन, ग्रामीण पुनरुज्जीवन, आर्थिक पुनर्रचना याबाबत त्यांचे विशेष योगदान आहे. या सर्व क्षेत्रांत त्यांनी जे मिळवलं, ते इतकं महान् आहे की त्यामुळे ते भारताचे महान पुत्र ठरतात. एवढेच नव्हे, तर त्यांचा संदेश साऱ्या मानवजातीसाठी आहे.'' त्यांच्या 'गीतांजली' या खंडकाव्याकरता त्यांना साहित्यासाठी असलेला सर्वोच्च 'नोबेल पुरस्कार' प्रदान केला गेला.

१३. **राजा राममोहन राय** (१७७२-१८३३) : समाजसुधारक, मुत्सद्दी असे हे राजा. त्यांनी ब्राह्मोसमाजाची स्थापना केली. सती जाण्याच्या चालीविरुद्ध त्यांनी यशस्वी बंड केले. दुसऱ्या अकबराचा दिल्लीच्या गादीवर हक्क सांगण्याकरता त्याचे प्रतिनिधी म्हणून ते इंग्लंडमध्ये गेले आणि ब्रिस्टलमध्ये त्यांचा देहान्त झाला.

१४. **देवेन्द्रनाथ टागोर** (१८१७-१९०५) : कलकत्त्यातील जोरासांको येथील प्रसिद्ध अशा टागोर कुटुंबात यांचा जन्म झाला होता. ते ब्राह्मो समाजाचे नेते होते. बालवयात त्यांचा राजा राम मोहनराय यांच्याशी संबंध आला. राममनोहन राय हे अधुनिक भारताच्या शिल्पकारांपैकी एक होते.

देवेन्द्रनाथांवर त्यांची खोलवर छाप पडली. 'तत्त्वबोधिनी सभा' ह्या ऐतिहासिक संस्थेची स्थापना सन १८३९ साली देवेंद्रनाथांनी केली. आधुनिक बंगालातील मते व कल्पना घडवण्यात या सभेचा वाटा मोठा होता. ते कट्टर देशभक्त होते. बंगाली भाषेच्या प्रसारासाठी त्यांनी १८८२ साली 'सर्वतत्त्वदीपिका' या संस्थेची स्थापना केली. समाजाच्या राजकीय जागरणाकरता देवेंद्रनाथांचे योगदान मोठे होते. आदराने व कृतज्ञतेने त्यांचे मित्र व शिष्य त्यांना 'महर्षि' म्हणून संबोधत असत.

१५. **महेंद्र लाल सरकार** (१८३३-१९०४) : कलकत्त्याच्या मेडिकल कॉलेजमधून ते १८६० साली पास झाले आणि १८६३ साली एम्.डी. झाले. कलकत्ता विद्यापीठाचे ते १८७० साली ते फेलो झाले आणि १८८७ मध्ये कलकत्त्याचे शेरीफ झाले. बंगालच्या विधानसभेचे ते १८८७ ते १८९२ पर्यंत सभासद होते. अनेक शिक्षणसंस्थांशी त्यांचा संबंध होता. १८७६ साली त्यांनी 'इंडियन असोसिएशन फॉर कल्टिव्हेशन ऑफ सायन्स'ची स्थापना केली. वैज्ञानिक संशोधनाकरता स्थापन झालेली भारतातील ती पहिलीच संस्था होती.

१६. **रुडयार्ड किप्लिंग** (१८६५-१९३६) : हे ब्रिटिश लेखक व कवी होते. त्यांचा जन्म मुंबईला झाला व शिक्षण इंग्लंडमध्ये झाले. १८८२-८९ पर्यंत ते वार्ताहर म्हणून हिंदुस्थानात काम करीत होते. साहित्याचा नोबेल पुरस्कार त्यांना १९०७ मध्ये मिळाला होता. 'जंगल बुक', 'किम', 'जस्ट सो स्टोरीज', 'पक ऑफ पुक्स हिल', 'डेबिटस् अँड क्रेडिटस्', 'लिमिटस् अँड रिन्युअल्स्' वगैरे त्यांच्या महत्त्वाच्या कथा आहेत.

१७. **गिसेप मॅझिनी** (१८०५-१८७७) : हा इटलीतील देशभक्त. त्याने इटलीच्या एकत्रीकरणाकरता महत्त्वाची भूमिका बजावली. सन १८३१ मध्ये 'यंग इटली'ची स्थापना केली. संघटित इटलीच्या प्रजासत्ताकाची मेढ रोवणे हेच त्यांच्या चळवळीचे उद्दिष्ट होते. मॅझिनी जवळ-जवळ सर्वकाळ हद्दपारीतच म्हणजे फ्रान्स, स्वित्झर्लंड व इंग्लंड येथे राहिले.

१८. **कासिमीर फजन्स्** (१८८७-१९७५) : इंग्लंडच्या फ्रेडरिक सोडी यांच्याप्रमाणे त्याच काळात रेडोओॲक्टिव्ह डिस्प्लेसमेंटचे तत्त्व शोधून काढले. ह्या तत्त्वानुसार रेडिओॲक्टिव्ह अणू एक अल्फाकण बाहेर फेकल्याने नष्ट होतो, तेव्हा एक नवा अणू तयार होतो. त्याचा आण्विक क्रमांक हा मूळच्या अणूपेक्षा दोनाने कमी असतो. जेव्हा मूळचा अणू बीटाकण बाहेर फेकतो, तेव्हा तयार होणाऱ्या अणूचा आण्विक क्रमांक मूळच्या अणूच्या क्रमांकापेक्षा एकाने अधिक असतो. लिपझिग, हायडेलबर्ग, झुरिक आणि मँचेस्टर अशा वेगवेगळ्या विद्यापीठांत त्यांनी अभ्यास केला. १९११ ते १९१७ पर्यंत ते कार्लस्रूहच्या टेक्निक होकशूलमध्ये काम करीत होते. ऑटो गोहरिंग यांच्याबरोबर फजन्स्नी युरेनियम x2 चा शोध लावला. त्याला आला प्रोटोॲक्टिनियम - २३४ म्हणण्यात येते.

१९. **पहिले महायुद्ध** (१९१४-१९१८) : हे जागतिक पातळीवरील युद्ध मित्रराष्ट्रे (ब्रिटिश साम्राज्य, फ्रान्स, रशिया, बेल्जियम, जपान, सर्बिया, इटली, पोर्तुगाल, रुमानिया आणि ग्रीस) आणि मध्यवर्ती देश (जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी, टर्की, बल्गेरिया) यांच्यात होते. ८० लाखाहून अधिक माणसे या युद्धात ठार झाली आणि २१ कोटींहून अधिक जखमी झाली. (१लाख = १००,०००; १ कोटी = १०० लाख)

२०. **प्रार्थना-समाज** : ब्राह्मोसमाज चळवळीपासून स्फूर्ती घेऊन प्रार्थना समाजाची महाराष्ट्रात स्थापना झाली. ब्राह्मो-समाजाप्रमाणे प्रार्थना-समाजाची उद्दिष्टे ही बुद्धिप्रामाण्याने ईश्वराची उपासना आणि समाजसुधारणा अशीच होती. पश्चिम महाराष्ट्रातल्या बऱ्याच सामाजिक सुधारणांचे कार्य प्रार्थना-समाजातून होत होते. प्रा. समाजाला मुख्यतः महादेव गोविंद रानड्यांमुळे यश येत होते.

२१. **महादेव गोविंद रानडे** (१८४२ ते १९०१) : 'इंडियन इकॉनॉमिक्स' आणि 'राइझ ऑफ मराठा पॉवर' या पुस्तकांचे ते लेखक असून त्यांना

काही वर्तुळांतून भारतीय अर्थकारणाचे जनक म्हणतात. इंडियन नॅशनल काँग्रेसच्या स्थापकांपैकी ते एक होते. १८९३ ते १९०१ पर्यंत मुंबई हायकोर्टाचे ते न्यायाधीश होते. १८६१ साली विधवा-विवाह संस्था स्थापण्यात त्यांचा मोठा वाटा होता. तसेच सुप्रसिद्ध 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन स्थापण्यात आली होती. सी. एफ्. अँड्र्यूज लिहितात : ''हिंदुस्तानातल्या नव्या सुधारणांचा शेवटचा आणि चिरकाल टिकणारा घटक हा बॉम्बे प्रेसिडेन्सीमध्ये उगवला आणि तो न्यायमूर्ती रानड्यांच्या नावाशी जोडला गेला आहे.''

२२.माधवराव नामजोशी (१८५३-१८९६) : हिंदुस्थानच प्रगती औद्योगिकीकरणाशिवाय होऊ, शकणार नाही असा त्यांचा दृढ विश्वास होता. 'डेक्कन पेपर मिल', 'दि रे इंडस्ट्रियल म्यूझियम्', 'दि व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल स्कूल' या संस्थांच्या स्थापनेस ते मुख्यतः कारणीभूत होते. उद्योजकांना फायदा घेता यावा म्हणून त्यांनी १८९३ मध्ये पुण्यात एक औद्योगिक प्रदर्शन भरवले होते. त्याच वेळी एक इंडस्ट्रियल कॉन्फरन्स सुरू करून त्याचे ते सचिव झाले.

२३. शिवाजी (१६२७-१६८०) : भारताच्या इतिहासात शिवाजीचे स्थान महत्त्वाचे आहे. तो स्वयंभू नेता होता. विलक्षण शौर्य व मुत्सद्देगिरी यांच्या बळावर तो जहागिरदाराचा छत्रपती झाला. त्याची सर्वात महत्त्वाची कामगिरी म्हणजे मराठ्यांना एकत्र करून त्याने एक राष्ट्र बनवले. ह्या राष्ट्राने औरंगजेब आणि त्याच्या नंतरच्या काळात मोगल साम्राज्याला शह दिला. अठराव्या शतकातही शिवाजीने घडविलेल्या या मराठा राष्ट्राची अधिसत्ता चालू होती.

२४. लॉर्ड रिपन : इंग्लंडमधल्या कायद्याच्या धर्तीवर स्थानीय स्वराज्याची कल्पना रुजवण्याचा ह्यांनी मनापासून प्रयत्न केला. १८८२ सालच्या सरकारच्या ठरावात त्यांनी आपल्या कल्पना मांडल्या होत्या. अशा प्रकारच्या ठराव मांडण्याचा उद्देश स्पष्ट करताना ते म्हणतात, ''कारभारात सुधारणा करण्याच्या दृष्टीने मुख्यतः हा ठराव मांडण्यात किंवा त्याला पाठिंबा देण्यात आलेला नाही; तर ह्या ठरावाने समाजाला व सामान्य जनांना शिक्षण मिळणे हे अगत्याचे आहे.'' पण रिपनच्या उदारमतवादी कल्पना स्थानीय सरकार आणि इंग्लंडमधल्या सत्ताधाऱ्यांना पसंत पडल्या नाहीत.

२५. सी. आर्. दास (१८७०-१९२५) : भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील दास हे उत्तुंग व्यक्तिमत्त्व होते. लोक त्यांना प्रेमाने 'देशबंधू' म्हणत असत. १८९० साली कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमधून पदवी मिळवल्यावर ते इंग्लंडला गेले. तिथे 'इनर टेंपल'मध्ये कामास सुरुवात केली. १८९४ साली त्यांना बारमध्ये बोलावण्यात आले. १९१७ साली राष्ट्रीयत्वाच्या राजकारणात ते आघाडीवर होते. १९२२ साली गया येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले, त्याचे अध्यक्ष म्हणून त्यांना निवडून देण्यात आले. त्यांनी एक कौन्सिल एन्ट्री प्रोग्रॅम (उदा. कौन्सिलमधून असहकार वगैरे) आखला. त्या कार्यक्रमाच्या आधारे राजकारणाला नवी दिशा देण्याचा त्यांचा मानस होता. त्याला पुरेसा पाठिंबा मिळाला नाही. परिणामी त्यांनी काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर काँग्रेसमध्येच त्यांनी स्वराज्य पक्ष स्थापन केला. रवींद्रनाथ ठाकूर लिहितात -- ''आपल्या देशबांधवांकरता चित्तरंजनने जी सर्वोत्तम भेट ठेवली, ती त्याच्या एका विशिष्ट राजकीय वा सामाजिक कार्यक्रमात नव्हती; तर त्याच्या त्यागात होती. त्या त्यागात महत्त्वाकांक्षेची सृजनशील शक्ती अमर होऊन राहिली होती. त्याचे आयुष्य म्हणजे मूर्तिमंत त्यागच होता.''

२६. सुरेंद्रनाथ बॅनर्जी (१८४८-१९२५) : हे सिल्हेत (आता हे गाव बंगला देशात आहे.) येथे कलेक्टर होते; पण वरिष्ठांशी मतभेद झाल्याने त्यांनी राजीनामा दिला. 'बंगाली' नावाचे दैनिक त्यांनी संपादित केले. इंडियन नॅशनल काँग्रेसचे १८९५ साली ते अध्यक्ष बनले. सर हेन्री कॉटन त्यांच्या 'न्यू इंडिया' ह्या पुस्तकात लिहितात - ''पंजाबात बंगालचा प्रभाव असणे ही कल्पना लॉर्ड लॉरेन्स्ना अशक्य कोटीतली वाटत होती; पण

गेल्या वर्षात ते खरे ठरले आहे. एक बंगाली व्याख्याता इंग्रजीतून व्याख्याने देत उत्तर हिंदुस्थानात फिरत होता. त्या व्याख्यानांना या प्रभावाच्या विजयाचे स्वरूप आले आहे. आज सुरेंद्रनाथ बॅनर्जींचे नाव ढाक्याप्रमाणे मुलतानमधील उभरत्या पिढीलाही स्फूर्ती देते.''

२७. डब्ल्यू. सी. बोन्नर्जी (१८४४-१९०६) : हे बॅरिस्टर-ॲट-लॉ होते. सरकारच्या कायमस्वरूपी सल्लागार म्हणून काम करणारे हे पहिलेच हिंदुस्थानी होते. (१८८२, १८८४, १८८६-८७) १८८३ साली सुरेंद्रनाथ बॅनर्जीवर न्यायालयाचा रोष झाला होता. त्या खटल्यात बोन्नर्जींनी त्यांच्या बाजूने वकीली केली होती.

२८. ए. ओ. ह्यूम (१८२९-१९१२) : १८८५ साली ह्यांनी 'इंडियन नॅशनल काँग्रेस'ची स्थापना केली. 'जनमित्र' नावाचे हिंदी भाषेतले दैनिक काढण्याकरता त्यांनी साहाय्य केले. ते जेव्हा सरकारच्या रेव्हेन्यू आणि शेतकी विभागाचे सचिव होते, तेव्हा शेतकी कर्जापासून मुक्त करण्याच्या आणि ग्रामपंचायतींसाठी योजना तयार केल्या.

२९. सर विल्यम वेडरबर्न (१८३८-१९१८) : पुण्यात 'हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स्' आणि मुंबईत 'अलेक्झांड्रा स्कूल फॉर गर्ल्स्' स्थापन करणाऱ्यांत हे प्रमुख होते. काँग्रेसची 'इंडिया' नावाची पत्रिका लंडनमधून प्रकाशित होई. ती सुरू करून चालू ठेवण्याकरता ह्यांनी वेळ आणि पैसा दोन्ही देऊन झळ सोसली होती. १८८९ आणि १९१० या दोनही वर्षांत ते इंडियन नॅशनल काँग्रेसचे अध्यक्ष होते. परदेशी गेलेल्या भारतियांच्या अडचणी समजावून घेण्यात त्यांना रस होता.

३०. चार्ल्स् ब्रॅडलॉ (१८३३-१८९१) : हे ब्रिटिश गृहस्थ स्वतंत्र विचारांचे पुरस्कर्ते होते. व्यक्तिस्वातंत्र्याच्या मर्यादा वाढवण्याचा त्यांनी आग्रह धरला. ॲनी बेझंटबरोबर 'फ्रूटस् ऑफ फिलॉसॉफी' हे पुस्तक त्यांनी प्रकाशित केले. त्यात कुटुंबनियोजनाचे समर्थन केले आहे. त्याकरता १८७७ साली त्यांच्यावर खटला भरण्यात आला होता. त्यात त्यांचीच

सरशी झाली होती. १८८२ साली ते 'हाऊस ऑफ कॉमन्स्'वर निवडून आले; पण १८८६ सालापर्यंत त्यांनी आपली जागा घेण्याचे नाकारले होते. १८८९ सालच्या मुंबई येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाला ते हजर राहिले होते.

३१. गोपाळ कृष्ण गोखले (१८६६- १९१५) : आधुनिक भारताच्या शिल्पकारांपैकी हे एक होते. महात्मा गांधी त्यांना आपले राजकीय गुरू मानत असत. वयाच्या छत्तिसाव्या वर्षी ते 'इंडियन नॅशनल काँग्रेस'चे अध्यक्ष झाले. भारतीय राजकीय नेत्यांत पंचवीस वर्षे त्यांना वरचे स्थान होते. 'सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी'ची त्यांनी स्थापना केली.

३२. बायमेटॅलिझम् : याला द्विधातुवाद म्हणतात. ही एक चलनाची पद्धती आहे. यात बहुतेक वेळा सोने व चांदी हेच धातू असतात. यानुसार एका धातूतील पैसे दुसऱ्या धातूत बदलून घेता येतात. अर्थात् त्याकरता एक विशिष्ट गुणोत्तर ठरलेले असते. १९ व्या शतकाच्या सुरुवातीस अनेक देशांनी ही पद्धती स्वीकारली. दोन्ही धातूंच्या मूल्यांत नेहमीच फरक असल्याने ही पद्धती अस्थिर होत असे.

३३. सरोजिनी नायडू (१८७९-१९४९) : यांनी स्वातंत्र्य-चळवळीत मोठे काम केले होते. मिठाच्या सत्याग्रहात त्या अग्रणी होत्या. १९२९ साली गोलमेज परिषदेला त्या हजर होत्या. स्वतंत्र भारतात गव्हर्नर होणाऱ्या त्या पहिल्याच महिला होत्या. त्यांचा देहान्त झाला, तेव्हा जवाहरलाल नेहरू म्हणाले, ''त्या म्हणजे एक प्रखर तेजस्वी व्यक्तिमत्त्व होत्या. त्यांचे तेज मार्मिक व जोमदार होते. त्यांच्या ठायी उपजत असे अनेक गुण होते. त्यापैकी काही गुणांमुळे त्या सर्वांहून वेगळ्या उठून दिसत. आपल्या राष्ट्रीय लढ्यात त्यांनी कुशलता व काव्य ओतले.''

३४. स्वामी विवेकानंद (१८६३-१९०२) : विवेकानंदांच्या कल्पना आणि देशभक्तीपासून अनेकांनी स्फूर्ती घेतली आणि परमार्थनिष्ठा आणि तीव्र धर्मनिष्ठा या दोन्हींचा आपल्या आयुष्यात मेळ घालून ते देशसेवेकरता

पुढे आले. आधुनिक भारतातील सर्व प्रमुख समस्यांवर विवेकांनंदांनी विचार केला होता. स्त्री-पुरुष सर्व जनांत शिक्षणाचा प्रसार करण्याचा त्यांनी पुरस्कार केला. तांत्रिक शिक्षणाबरोबर संस्कृत शिकण्यावरही त्यांचा भर होता. त्यांची धर्माची कल्पना वैश्विक होती. ते लिहितात, ''प्रत्येक माणसाचा ठायी देवत्व आहे. अंतर्बाह्य स्वभावाला वळण लावून हे देवत्व प्रगट करावे, हेच आपले ध्येय आहे आणि हेच धर्माचे सार आहे.''

३५. ॲनी बेझंट (१८४७-१९३३) : चार्लस् ब्रॅडलॉ यांच्याबरोबर अनेक वर्षे ॲनी बेझंट काम करीत होत्या. संतति-नियमनाच्या अगदी सुरुवातीच्या काळातील पुरस्कर्त्यांपैकी त्या होत्या. जॉर्ज बर्नाड शॉ यांच्या प्रभावाखाली येऊन १८८० सालच्या अखेरीस त्या पक्क्या 'फेबियन' झाल्या. त्यांचे बरेचसे आयुष्य हिंदुस्थानात गेले. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या त्या एक नेत्या होत्या. १९१६ साली त्यांनी 'इंडियन होमरूल लीग'ची स्थापना केली. तसेच १८७७ पासून १९३३ पर्यंत त्या थिऑसॉफिकल सोसायटीच्या अध्यक्ष होत्या.

३६. पंडित अजुधिया नाथ (१८४०-१८९२) : हे आग्र्याला कायद्याचे प्राध्यापक होते. त्यांनी आग्रा येथे 'व्हिक्टोरिया हायस्कूल'ची स्थापना केली. १८७९ मध्ये त्यांनी 'इंडियन हेराल्ड' हे इंग्रजी दैनिक सुरू केले. नंतर १८९० मध्ये त्यांनी 'इंडियन युनियन' नावाचे आणखी एक पत्रक सुरू केले. इंडियन नॅशनल काँग्रेसचे १८८९ ते १८९२ पर्यंत जनरल सेक्रेटरी होते. वायव्य पंजाब लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे १८८६ ते १८९० या काळात ते पहिलेच भारतीय सभासद होते.

३७. पंडित मदन मोहन मालवीय (१८६१-१९४६) : ह्यांनी 'बनारस हिंदू विद्यापीठा'ची स्थापना केली. १९३१ साली लंडन येथे भरलेल्या गोलमेज परिषदेला ते हजर होते. १९१४ साली ते 'इंडियन 'नॅशनल काँग्रेस'चे अध्यक्ष झाले. तसेच 'हिंदुमहासभा' स्थापन करण्यात त्यांचा सहभाग होता.

३८. मोतीलाल नेहरू (१८६१-१९३१) : हे निष्णात कायदेपंडित आणि राजकारणी होते. उत्तरप्रदेश विधानसभेवर (लेजिस्लेटिव्ह कौंसिल) १९०९ साली ते निवडून आले. 'इंडियन नॅशनल काँग्रेस'च्या १९१९ सालच्या अमृतसर येथे भरलेल्या अधिवेशनाकरता अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. उत्तम वक्ते, महान पार्लमेंटेरियन आणि संघटक म्हणून त्यांची ख्याती होती. जवाहरलाल नेहरूंचे ते पिता होते.

३९. अब्बास तैयाबजी (१८५४ ते १९३६) : सुरुवातीपासून हे 'इंडियन नॅशनल काँग्रेस'चे सभासद होते. पारंपारिक हिंदी-मुस्लिम संस्कृती आणि आधुनिक पाश्चिमात्य विचार यांचा सुरेख संगम तैयाबजी यांच्या ठायी झाला होता. १९१९ साली 'जालियनवाला बाग हत्याकांडा'च्या चौकशीकरिता काँग्रेसच्या कमिटीवर त्यांनी महात्मा गांधींच्या आग्रहाखातर काम केले. त्यानंतर मात्र ब्रिटिशांशी त्यांनी आपले संबंध तोडले. मिठाच्या सत्याग्रहात ते दुसऱ्या क्रमांकाचे नेते होते. गांधींना अटक झाल्यानंतर त्या सत्याग्रहाचे नेतृत्व त्यांच्याकडे आले. म. गांधींचे ते एकनिष्ठ आणि सच्चे अनुयायी होते.

४०. सी. एफ अँड्रयूज (१८७१-१९४०) : शिक्षणतज्ज्ञ आणि समाजसुधारक असलेले अँड्रयूज दिल्ली येथील 'केंब्रिज बंधुभाव (ब्रदरहूड)' मध्ये सामील झाले. प्रथम दिल्लीच्या स्टीफन कॉलेजमध्ये (१९०४ ते १९०७) आणि नंतर १९२०-२१ या काळात शांतिनिकेतनच्या 'विश्वभारतीत' त्यांनी काम केले. परदेशातल्या हिंदी लोकांच्या समस्येत त्यांना आस्था होती.

४१. महात्मा गांधी (१८६९ ते १९४८) : गुजराथेतील पोरबंदर येथे २ ऑक्टोबर या दिवशी यांचा जन्म झाला. १८८८ साली ते कायद्याचा अभ्यास करण्यासाठी ते इंग्लंड येथे गेले. १८९३ साली ते वकीली करण्याच्या इराद्याने दक्षिण अफ्रिकेत गेले. तिथल्या हिंदुस्थानी समाजाच्या हक्कांकरता त्यांनी अनेक प्रयत्न केले. त्याकरता त्यांनी नागरी

कारभाऱ्यांना असहकार करण्याचे धोरण स्वीकारले. ते धोरण हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यात त्यांनी शस्त्रासारखे वापरले. दक्षिण अफ्रिकेतून ते १९१५ साली हिंदुस्थानात परतले. पहिल्या महायुद्धाच्या अखेरीपासून ते स्वातंत्र्य मिळेपर्यंत भारतीय राजकारणाच्या रिंगणात त्यांना एक प्रमुख स्थान होते. कल्पकता व कार्यशीलता असे दोन्ही गुण त्यांच्यात होते. त्यांचे जीवनाचे तत्त्वज्ञान आणि राजकीय-सामाजिक-धार्मिक-आर्थिक क्षेत्रांतील त्यांचे विचार यांच्यावर तपशीलवार व सखोल संशोधन झालेले आहे.

४२. **सर चिमणलाल एच्. सेटलवाड** (१८६६-१९४७) : हे वकील होते आणि उदारमतवादी नेते होते. १९३१ आणि १९३२ साली लंडन येथे भरलेल्या दोन्ही गोलमेज परिषदांना ते हजर होते. 'जालियनवाला बाग हत्याकांडा'ची चौकशी करण्याकरता 'हंटर कमिशन' नेमले होते (१९१९साली), त्याचे ते सभासद होते. बारा वर्षे ते मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू होते.

४३. **अली ब्रदर्स** : मुहम्मद अली (१८७८-१९३१) आणि शौकत अली (१८७३-१९३८) हे हिंदुस्थानातील स्वातंत्र्यसेनानींपैकी होते. पहिले महायुद्ध सुरू झाले, तेव्हा ब्रिटिशांनी तुर्कस्तानविरुद्ध जो दृष्टीकोन स्वीकारला होता, त्याबद्दल ह्या दोघांनी ब्रिटिश सरकारचा कडवा विरोध केला होता. अनेक वर्षे ते म. गांधींच्या निकट होते. मुहम्मद अलींनी 'कॉम्रेड' नावाचे इंग्रजी साप्ताहिक आणि 'हमदर्द' नावाचे दैनिक संपादित केले होते. त्या नियतकालिकांचे व्यवस्थापन शौकत अली करीत. 'जमिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ' १९२० झाली स्थापन झाले. मुहम्मद अली विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते. १९३० सालच्या लंडनच्या गोलमेज परिषदेला मुहम्मद अली हजर होते. १९३० शौकत अलींनी 'अंजुमन खुद्दाम इ काबाह' या संस्थेची स्थापना केली. सौदी सैनिकांकडून मक्केच्या काबा या इमारतीला धक्का पोहोचत नाही हे बघणे, आणि हज यात्रेकरता जे मुस्लिम मक्केला जात, त्यांना सुविधा पुरवणे ही कामे ही संस्था करीत असे.

४४. **खिलाफत चळवळ** : पहिल्या महायुद्धानंतर भारतीय मुसलमानांनी ब्रिटिशांविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला. त्या महायुद्धात तुर्कस्तानला हरवून त्या साम्राज्याचे तुकडे ब्रिटिशांनी केले; त्यामुळे मुसलमानांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या, हे या चळवळीचे कारण होते. मुस्लिमांचा हा ब्रिटिशद्वेष संघटित करून त्याला राष्ट्रीयत्वाचे वळण द्यावे या विचाराने अलीबंधूंनी व मौलाना अबुल कलाम आझाद यांनी मुसलमानांची एक चळवळ सुरू केली. तिलाच 'खिलाफत चळवळ' म्हणतात. या चळवळीच्या द्वारे हिंदू-मुसलमानांचे ऐक्य होईल या विचाराने म.गांधींनी या चळवळीला मनापासून पाठिंबा दिला.

४५. **लाल लाजपत राय** (१८६५-१९२८) : यांना 'पंजाब-केसरी' या नावाने ओळखतात. १८८८ मध्ये अलाहाबादला जे काँग्रेसचे अधिवेशन भरले होते, त्यात हे सामील झाले व तेव्हापासून त्यांच्या राजकीय कार्याला सुरुवात झाली. १९२० मध्ये कलकत्ता येथे काँग्रेसचे एक विशेष अधिवेशन भरवण्यात आले, त्याचे लालाजी अध्यक्ष होते. त्यांनी विपुल लिखाण केले. त्यांना वृत्तपत्रीय व्यवसायात खूप रस होता. 'वंदे मातरम्' हे उर्दू दैनिक आणि 'द पीपल' नावाचे इंग्रजी दैनिक सुरू केले. आर्यसमाजाशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता आणि महात्मा हंसराज यांच्या सहकार्याने त्यांनी लाहोरला 'डी. ए. व्ही. महाविद्यालया'ची स्थापना केली.

४६. **बिपिनचंद्र पाल** (१८५८-१९३२) : कटक अकादमीच्या (१८८९) कटकमधल्या हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणून ह्यांनी आपल्या कार्यजीवनाची सुरुवात केली. वृत्तपत्रीय कामात त्यांना फार रस होता. १८८० साली सिल्हेत येथे 'परिदर्शक' नावाचे बंगाली साप्ताहिक त्यांनी सुरू केले. १८८२ मध्ये 'बंगाली पब्लिक ओपिनियन'चे ते सहसंपादक झाले. तसेच लाहोरहून प्रसिद्ध होणाऱ्या 'ट्रिब्यून'करताही ते काम करीत (१८८७) होते. केशवचंद्र सेन, शिवनाथ शास्त्री आणि बिजोयकृष्ण गोस्वामी या विचारवंतांच्या मतांचा बिपिनचंद्रांवर पगडा होता. ते कट्टर राष्ट्रवादी

होते. १९०२ साली त्यांनी 'द न्यू इंडिया' नावाचे साप्ताहिक सुरू करून त्यातून ते पूर्ण स्वराज्याची कल्पना पसरवत असत. (धैर्य, स्वावलंबन व स्वार्थत्यागातूनच संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य मिळवावे लागेल.) १९०६ साली 'द वंदे मातरम्' हे दैनिक त्यांनी सुरू केले. त्याचे ऑरोबिंदो घोष हे संपादक होते. 'हिंदू रिव्ह्यू' हे मासिक १९१३ साली त्यांनी सुरू केले. ब्रिटिश साम्राज्याची पुनर्रचना करून त्याला संघराज्याचे रूप देऊन हिंदुस्थान हा त्यातला एक घटक असावा, ह्या घटकाला स्वतंत्र व बरोबरीचा मानला जावा, अशी कल्पना ते ह्या मासिकातून लोकप्रिय करण्याचा प्रयत्न करीत. ते केवळ महान उपदेशकच नव्हते; तर विपुल लेखन करणारे साहित्यिकही होते.

४७. **सेलम सी. विजयराघवचारियार (१८५२-१९४४)** : हे निष्णात ॲडव्होकेट होते आणि सेलमच्या बारमध्ये अग्रणी असत. १८८२ साली हिंदू-मुस्लिम दंग्यात त्यांचा संबंध दाखवून त्यांच्याविरुद्ध खटला भरला होता. त्यात त्यांनी आपला यशस्वी रीतीने बचाव केला व निर्दोष सुटले. ह्या दंग्याच्या घटनेने त्यांना एका रात्रीत प्रसिद्धि मिळाली. इंडियन नॅशनल काँग्रेसचे संस्थापक ए. ओ. ह्यूम ह्यांचे हे निकटवर्ती होते. १९२० साली नागपूर येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. अहिंसात्मक असहकारातून पूर्ण स्वराज्य मिळवणे ह्या संकल्पनेवर ह्या अधिवेशनात चर्चा होऊन तिचा स्वीकार करण्यात आला होता.

४८. **ब्राह्मोसमाज** : १८२८ साली राजा राममोहन राय यांनी या समाजाची स्थापना केली. सुरुवातीला ब्राह्मोसभा असे म्हणत असत. ब्राह्मोसभा म्हणेजे ईश्वराच्या ऐक्यात विश्वास असणाऱ्यांची सभा. राममोहन राय यांच्या मृत्यूनंतर देवेन्द्रनाथ ठाकूर यांनी या सभेत जीव ओतला. ते १८४३ साली ब्राह्मो सभेचे सभासद झाले; पण ह्या संस्थेचा प्रसार करण्यास केशवचंद्र सेन हेच कारणीभूत झाले. १८६५ मध्ये ब्राह्मो-समाजाचे दोन भाग झाले. सनातनी आणि पुरोगामी. केशवचंद्रांनी पुरोगामी पंथाचे नेतृत्व केले. केशवचंद्रांच्या १४ वर्षे वयाच्या मुलीचा

विवाह १८७६ च्या मार्चमध्ये कुचबिहारच्या महाराजांशी लावून देण्यात आला; त्या कारणाने ब्राह्मो समाजाची आणखी फाळणी झाली. स्त्री-शिक्षण आणि स्त्री-मुक्ती याबाबत केशवचंद्रांचा दृष्टिकोन मवाळ होता. त्यांच्या मते उच्च शिक्षण हे मुलींकरता सुयोग्य ठरणार नाही; तसेच स्त्री-पुरुषांचे अनिर्बंध मिसळणे आणि बुरखा अजिबात काढून टाकणे या गोष्टी समाजाला घातक ठरतील. ज्यांना हे मत पटले नाही, त्यांनी वेगळे होऊन 'साधारण ब्राह्मो-समाजा'ची स्थापना केली.

५०. **आर्य-समाज** : हा स्वामी दयानंद सरस्वती (१८२४-१८८३) यांनी स्थापला. वेदांनंतर वाढत गेलेल्या अनिष्ट प्रथा, चाली काढून टाकून मूळ वेदांतील संकल्पनांच्या धर्तीवर समाजाची रचना करावी, असा त्यांचा उद्देश होता. ईश्वर हा एकच आहे, असा त्यांचा विश्वास होता. ईश्वराची अनेक रूपे व मूर्तिपूजा यांना त्यांनी विरोध केला. जातिबंधने, बालविवाह आणि समुद्र प्रवासावरची बंदी यांच्याविरुद्ध त्यांनी आवाज उठवला. त्यांनी शुद्धीकरण चळवळ सुरू केली. त्यातून अहिंदूंना हिंदू धर्मात घेण्यात आले. हिंदुस्थानची राष्ट्रीय, सामाजिक, धार्मिक या तिन्ही दृष्टींनी एकता व्हावी, ह्या ध्येयाच्या पूर्तीसाठी हा एक प्रयत्न होता. त्यांनी स्त्री-शिक्षण व विधवा-विवाहाला पाठिंबा दिला. त्यांची तत्त्वे त्यांनी 'सत्यार्थ प्रकाश' यात विशद केली. ते त्यांचे लिखाण प्रसिद्ध होते. सुरुवातीला ब्राह्मो-समाजाशी जुळवून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यासाठी १८६९ मध्ये कलकत्त्यात त्यांनी एक सभा बोलावली. त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही. पण जरी पंजाबातील ब्राह्मो-समाजाची चळवळ आर्य-समाजाने आपल्यात सामावून घेतली, तरी तिथे समाजाची स्थापना १८६३ मध्ये झाली होती. लाला हंसराज, पंडित गुरुदत्त, लाला लाजपत राय आणि स्वामी श्रद्धानंद हे दयानंदांचे प्रमुख अनुयायी होते.

५१. **दादाभाई नौरोजी (१८२५ ते १९१७)** : 'इंडियन नॅशनल काँग्रेस'च्या संस्थापकांपैकी हे एक होते. १८८६, १८९३ आणि १९०६ असे तीन वेळा ते काँग्रेसचे अध्यक्ष झाले. १८६७ साली त्यांनी लंडन येथे 'ईस्ट

इंडिया असोसिएशन'ची स्थापना केली. १८९२ साली 'ब्रिटिश हाऊस ऑफ कॉमन्स'वर ते निवडून आले. त्यांची महत्त्वाची प्रकाशने होती : 'पॉव्हर्टी अँड अनब्रिटिश रूल इन इंडिया', 'इंग्लंडस् ड्यूटी टु इंडिया' व 'फायनांशियल अॅडमिनिस्ट्रेशन ऑफ इंडिया'.

५२. **फिरोजशहा मेहता** (१८४५-१९१५) : 'इंडियन नॅशनल कॉंग्रेस'चे हे संस्थापक सभासद होते. १८९०मध्ये ते कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. १९१० साली ते मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू झाले.

♦♦♦

CLASS NOTES

ON

ELEMENTARY ORGANIC CHEMISTRY.

BY

RUCHI RAM SANHI, M. A.,

PROFESSOR, GOVERNMENT COLLEGE, LAHORE

Lahore:
G. R. COOMAWR & SONS,
"The Lyceum", Machhi Hatta Street
AND
Government College.
1914.

रुचिराम साहनी यांच्या प्रकाशित झालेल्या क्लास नोट्स्चे पहिले पान